


डॉ. निर्मला तळपे-झांजरे
(M.A.,B.Ed,M.Phil.,SET, Ph.D.)
सहाय्यक प्राध्यापक ,
फर्ग्युसन महाविद्यालय (स्वायत्त),
अर्थशास्त्र विभाग, पुणे ४११००४


महिला सबलीकरण हा एकविसाव्या शतकातील की-वर्ड अर्थात परवलीचा शब्द झाला आहे. महिला सबलीकरणामध्ये स्त्रीला तिचा शारीरिक, मानसिक आणि बौद्धीक क्षमतेची जाणीव तिला स्वतःला होणे अपेक्षित आहे. पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ. तिचे समाजातील स्थान दुय्यम आहे. हा विचार समाजमनात खोलवर रुजला आहे. स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित समान समाजरचनेमध्ये स्त्रीला तिच्या स्वत्वाची जाणीव होण्यासाठी तिचे सबलीकरण होणे आवश्यक आहे. महिला सबलीकरण ही स्त्रीला  स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी निरंतर प्रकिया आहे.

स्त्रीला आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक व सांस्कृतिक दृष्टीने सुदृढ करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. अशा समर्थ, सबळ झालेली स्त्री कुटुंबामध्ये तसेच सार्वजनिक जीवनातील महत्वाच्या विषयांमध्ये निर्णय घेण्यामध्ये ती सहभागी होणे. तिचे तिचा निर्णयप्रकियेतील सहभाग वाढविणे हे महिला सबलीकरणाचे अंतिम उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्टपूर्ण करण्यासाठी महिलांचे हक्क व अधिकार याबाबतची माहिती तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती सदर पुस्तकामध्ये लिहिलेली आहे.


Dayadhan Publishers Group
263, Anudaya, Akola Road, Near Gram  Panchayat Office,
Balsond, Hingoli Maharashtra State (India)
7276193979
www.dayadhanpublication.com

ISBN : 978-81-951061-6-5


आत्मभान- महिला सबलीकरण | डॉ. निर्मला तळपे - झांजरे

# आत्मभान :
# महिला सबलीकरण

डॉ. निर्मला तळपे - झांजरे

E-book

# आत्मभान:
# महिला सबलीकरण

डॉ. निर्मला तळपे – झांजरे
M.A. (Economics), B. Ed., M. Phil., SET, Ph. D.
फर्ग्युसन महाविद्यालय, (स्वायत्त)
पुणे-४११००४

**दयाधन पब्लिशर्स ग्रुप,**
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

# आत्मभान महिला सबलीकरण

© **डॉ. निर्मला तळपे – झांजरे**

आवृत्ती :- पहिली

**प्रकाशिका**

**सौ. मस्के अनिता दयाराम**

दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, ( भारत) 431513.

**Mob. No. 7276193979 / 9604872233**

Email Id: - dayadhanpublishersgroup@gmail.com

Website: - http://www.dayadhanpublication.com

**मुद्रक**

श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.

प्रकाशन दिनांक 17/09/2021

**ISBN 978-81-951061-6-508**

**किंमत 225/-**

**टीप:-**

प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क **डॉ. निर्मला तळपे – झांजरे** यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखकच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी प्रकाशिका किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

**न्यायाधिकरण:-**

जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

# प्रस्तावना

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. निर्मला तळपे - झांजरे यांचे "आत्मभान" हे पहिले पुस्तक प्रसिद्ध होत आहे. याचा मला विशेष आनंद होत आहे. कॉलेजमधील विविध उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होणाऱ्या प्राध्यापिका म्हणून त्या सर्वांना परिचित आहेत. कोणतीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली की ती उत्तम प्रकारे पूर्ण होणार या विश्वासाने काम सोपवणारी व्यक्ती निश्चिंत होते. असा लौकिक असणाऱ्या व्यक्तीने ग्रंथलेखनाला सुरुवात करणे ही कौतुकास्पद बाब आहे. त्यामुळे सर्वप्रथम डॉ. निर्मला तळपे यांचे अभिनंदन!

पुणे जिल्ह्यातील महिला सबलीकरणाच्या विविध योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांची जातीनिहाय सर्वेक्षण हा या ग्रंथातील महत्वाचा भाग आहे. लेखिका डॉ. निर्मला तळपे यांच्या संदर्भातही हा विषय महत्वाचा आहेच कारण त्यांचे आजोळ निमगिरी हे गाव जुन्नर तालुक्यातील आणि अर्थातच पुणे जिल्ह्यातील महत्वाचे गाव. आणखी एक महत्वाची गोष्ट म्हणजे तळपे मॅडमचे सासर आहे माळीण हे गाव. आपल्या गावातील भोवतालच्या परिसरातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या विचार करणे आणि त्यावर संशोधन करणे ही उल्लेखनीय बाब आहे. कारण एका अर्थाने हा आपल्या जन्मभूमीच्या गावाच्या मातीचा अभ्यास आहे.आपल्या आजोळ गावाचा विकास कसा झाला? आणि त्या विकासमागे महिलांचे योगदान किती?  यावर संशोधन करणे म्हणजे 'गावाकडे चला' या घोषणेचीच आठवण आहे. त्यांच्या अभ्यास विषयाचा विचार करताना मला तो आपल्याच सामाजिक-सांस्कृतिक अस्मितेची पाळंमुळं शोधणे या दृष्टीने अतिशय महत्वाचा वाटतो. हा अभ्यास शास्त्रशुद्ध संशोधनावर आधारित आहे. त्यामुळे त्याला केवळ भावनिक दृष्ट्या महत्त्व आहे असे नाही म्हणता येणार!त्या अर्थशास्त्राच्या अभ्यासक असल्यामुळे वास्तवावर आधारित संख्याशास्त्रीय माहितीचा आधार त्यांच्या अभ्यासात आहे.ही आणखी खास बाब!

अभ्यास विषय महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाशी त्यांमुळे येणाऱ्या आत्मभानाशी, आत्मविश्वासांशी घट्ट जोडावेत पण त्याला सामाजिक दृष्टीने महत्त्व आहे.कारण सर्व जातीतील स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे कारण मुळातच धर्मसंस्थेतून झालेली वर्णव्यवस्था आणि त्यातून पुढे आकाराला आलेली जातिसंस्था या पुरुष केंद्रित आहेत. पुरुषकेंद्रित जातीसंस्थेतील स्त्रियांचे स्थान दोन कारणांमुळे अधिक दुय्यम होते. त्यातले पाहिले कारण म्हणजे जातीच्या जाती उतरंडीमधील जातीचे स्थान कुठे आहे? म्हणजे मुळातच जातीचे स्थान कुठे आहे.जातीचे स्थान कुठे आहे? उच्चवर्णामध्ये म्हणजे जातीच्या शिर्षस्थानी आहे का! की मध्यमस्तरावर आहे? ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार वर्णांच्या संदर्भात जातीचे स्थान कोणते आहे? यावर स्त्रीचे स्थान महत्त्वाचे की बिनमहात्त्वाचे असे काही होणार आहे का? तर अर्थातच नाही. सर्व जाति-धर्मातीलस्त्रियांचे स्थान तळागाळातल्या शूद्र वर्णाच्या बरोबरीचे आहे. स्त्री माणूस आहे. हा साधा परंतु महत्त्वाचा विचार आजही पुन्हा पुन्हा सांगावा लागतो. यातच सर्व काही आहे. पुरुषसत्ताकेंद्रित समाजरचनेत स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहतात. कुटुंब, घरकाम, अपत्य संगोपन या तीन जबाबदाऱ्या नेकीने आणि निष्ठेने आयुष्यभर पूर्ण करत जाणे हेच स्त्री जन्माचे सार्थक.हा परंपरागत विचार स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवतो. मग रोजगार नोकरी तिने तिचे स्वतंत्र्य करिअर घडिवणे या गोष्टी तिची अचिव्हमेंट तिने काहीतरी नाव कमविले अशा कौतुकास्पद वाटतात.खेडोपाड्यांतील स्त्रियांच्या बाबतीत ‘चूल आणि मूल’ इतकेच बाईचे जगणे हा विचार घट्ट रुजले आहेत म्हणुनच महिला सबलीकरण अर्थातच स्त्रियांचे आर्थिक रूची वाढवून व तिचा सार्वजनिक जीवनातील आत्मविश्वासपूर्ण सहभाग असणे यांना विशेष महत्त्व आहे. त्यासाठी शासनाने विशेष विचार करून ग्रामीण भागातील महिलांच्या सबलीकरणाचा उपक्रम हाती घेतले आहेत. त्यासाठी लघुउद्योगासाठी लागणारी आर्थिक मदत विकास योजनांच्या माध्यमातून दिली जाते. या योजनांच्या लाभार्थी महिलांच्या आर्थिक - सामाजिक बाजूंनी संख्याशास्त्रीय अभ्यास  लेखिका डॉ. तळपे यांनी केलेला आहे.

पुणे जिल्ह्याच्या परिसरातील ग्रामीण भागात महिला सबलीकरणाच्या योजनांच्या लाभार्थी सर्वाधिक लाभार्थी महिला खुल्या (ओपन कॅटॅगिरी-तील) आहेत. त्या खालोखाल अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या कॅटॅगिरीतील महिला लाभार्थ्यांनी

योजनांचा लाभ घेतलेला दिसतो.पण ओ.बी.सी., एन.टी, एस.बी.सीच्या संवर्गातील महिला लाभार्थींचे प्रमाण खूपच कमी आहे. या लाभार्थी प्रामुख्याने प्रौढ वयोगटातील आहेत. त्यांचे शिक्षणही बेताचेच आहे. प्राथमिक शिक्षण हीच त्यांची शैक्षणिक पात्रता आहे. दारिद्र्यरेषेखालील जीवनस्तर, शेतमजुरीचा व्यवसाय करणाऱ्या महिलांनी, विकासयोजनेत शिलाई मशीन घेऊन फॉल, पिको करण्याचे काम, पिठाची गिरणी घेऊन ती चालविणे,खाजगी सावकारी कर्जातून बऱ्याच प्रमाणात सुटका होणे.असे या महिला सबलीकरणाच्या योजनाचे स्वरूप आणि फलित आहे.

इतर मागासवर्गीय ,भटके विमुक्त, या जातस्तरांवर महिला सबलीकरण, बाईचे आर्थिक स्वावलंबन तिने छोटा व्यवसाय सुरू करणे, कुटुंबाचे आर्थिक स्तर उंचावणे व कुटुंबाचे जीवनमान सुधारणे हा विचार अजूनही नगण्य प्रमाणात पोहचला आहे. हेच या संशोधनातून स्पष्ट होते. महिला सबलीकरणाच्या लाभार्थी स्त्रिया त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी धडपडत असतात. त्यामुळे महिला सबलीकरण अखेरीस कुटूंबाचे सबलीकरण होते. याकडे फार लक्ष दिले जात नाही. तसेच आर्थिक स्वावलंबातून स्वतंत्र विचार करणे, पुढे निर्णय घेण्याचे स्वातंत्र असा व्यक्तिमत्त्व विकास होण्यापर्यंत सबलीकरणाची प्रक्रिया पूर्णत्त्वास जाते का? तशी संधी आणि शक्यता स्त्रीच्या संदर्भात निर्माण होते का? या प्रश्नाचे उत्तर नरोवा कुंजरोवा या उक्तीप्रमाणे धुसर, अस्पष्ट आहे. डॉ.निर्मला तळपे मॅडमनी मांडलेले संख्याशास्त्रीय सत्य महिला सबलीकरणाची सामाजिक बाजू स्पष्ट करते.हे त्यांच्या अर्थशास्त्रीय संगोपनाचे समाजशास्त्रीय फलित आहे म्हणूनच ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे. अधिर लेखनासाठी डॉ. निर्मला तळपे मॅडम यांना शुभेच्छा!

**डॉ.रुपाली शिंदे**

(सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग फर्ग्युसन महाविद्यालय स्वायत्त पुणे)

# मनोगत

“आत्मभान” हे माझे पहिले पुस्तक प्रसिद्ध होत आहे. याचा मला आनंद होत आहे, त्याचबरोबर जबाबदारी वाढलेली आहे याची जाणीवही आहे. माझ्या घरात, माझ्या माहेरच्या आणि सासरच्या संपूर्ण कुटुंबामध्ये पुस्तक लिहिण्या पर्यंत प्रवास झालेली. मी पहिली आणि सध्यातरी एकमेव व्यक्ती आहे. मला माझी मुलं, आणि पुढच्या पिढीतल्या मुलांच्या शिक्षणातील प्रगतीकडे पाहून यापुढे हे शिक्षणाचे चित्र बदलेल असा विश्वास वाटतो. यामुळे माझे पुस्तक प्रसिद्ध होणं मला महत्त्वाचे वाटते. हे पुस्तक माझ्या पीएच.डी. पदवी साठी मी केलेल्या “महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या निवडक योजनांचा चिकित्सक अभ्यास” या विषयावर आधारित आहे. पीएच.डी. चे संशोधन करण्यासाठी मला 2013 ते 2015 या काळात यू.जी.सी. टीचर फेलोशिप मिळाली होती. या दोन या दोन वर्षात बारामती, इंदापूर, खेड आणि जुन्नर या तालुक्यांमध्ये जाऊन या तालुक्यांमध्ये  वेगवेगळया गावांमध्ये लोकांकडून प्रश्नावलीच्या साह्याने माहिती गोळा केली. त्यावेळी माझं गाव आजूबाजूच्या भागातील अक्षर ओळख झालेल्या, थोडं - फार शिकलेल्या स्त्रिया आणि कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बदलावी यासाठी कशाप्रकारे धडपड करतात हे जवळून पाहता आले. शासनाच्या वेगवेगळया योजनांचा लाभ मिळावा. यासाठी खेड्यातल्या स्त्रियांनी केलेले प्रयत्न मला जवळून पाहता आले. समजून घेता आले. याचं एक वेगळं समाधान आजही माझ्या मनात आहे. माझे पीएच.डी. साठी चे संशोधन पूर्ण करण्यासाठी सर्वतोपरी मदत व प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या गुरु,मार्गदर्शक डॉ.सौ.निर्मल दिनेश भालेराव यांच्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते. पीएच.डी.चे संशोधन करत असताना मला पडलेल्या प्रश्नांसाठी, वेगवेगळया संदर्भासाठी मी जेष्ठ अर्थतज्ञ डॉ. प्रदीप आपटे, डॉ. शर्मिष्ठा मतकर, डॉ.कल्याणी कुलकर्णी, डॉ.रूपाली शिंदे यांचे वेगवेगळया पद्धतीने सहकार्य लाभले.

महिला सबलीकरण करण्यासाठीच्या योजनांच्या संदर्भात प्रशासकीय माहिती देण्याचे महत्त्वाचे काम जिल्हा परिषद कार्यालयातील विशेष कार्यकारी आधिकारी श्री. मुंढे साहेब, नंदिनी घाणेकर श्री काळे साहेब व त्याच प्रमाणे महीला व बालविकास आयुक्तालय पुणे येथील सौ. कांबळे , वळवी साहेब, भुमकर साहेब, आणी जुन्नर तालुक्यातील गटविकास आधिकारी श्री.घाडगे साहेब, योगेश जाधव त्याचप्रमाणे

बारामती तालुक्यातील गटविकास आधिकारी राहुल काळभोर साहेब,मिलींद मोरे साहेब तसेच खेड तालुक्यातील श्री. मोहिते साहेब, या सर्वांचे बहुमूल्य मार्गदर्शन आणी सहकार्य मला वेळोवेळी लाभले त्या बद्दल मी या सर्व मान्यवरांचे आभार मानते. त्याचप्रमाणे पुस्तक लिहित असताना वेळोवेळी माझे मनोधैर्य वाढवून सदैव माझ्या पाठीशी उभे राहून माला प्रोत्साहन देणारी माझी आदरणीय आई सौ. झुंबर आणी वडील श्री. मुरलीधर यांचे अनेक आशीर्वाद, सहकार्य माझ्यासाठी लाख मोलाचे आहेत. त्याच बरोबर माझे पती श्री. बुधाजी झांजरे व दीर देवराम झांजरे, माझ्या बहिणी सौ. सीमा रावते व सौ. नीलिमा वरे यांचे सहकार्य लाभले यामुळेच मी पुस्तकातील लेखन पूर्णत्वास नेऊ शकले. तसेच माझी कन्या कु. समृद्धी आणी चिरंजीव सोहम यांचा बालवयातील जाणतेपणा परिपक्वता आणी समजूतदारपणाचा उल्लेख मला येथे अभिमानाने आवर्जून करावसा वाटूतो मी माझ्या कुटुंबातील सर्व सदस्ययांची  अत्यंत ऋणी आहे. पीएच.डी ची पदवी २०१६ या वर्षी मला प्राप्त झाली. २०२१ या वर्षी मी पुस्तक प्रसिध्द करत असताना कोरोनाची जगभर साथ आणी त्यांचे महिलांवर झालेले परीणाम अभ्यासने मला महत्वाचे वाटले. म्हणूनच सदर पुस्तकामध्ये महिलांची संख्याशास्त्रीय माहिती पीएच. डी. प्रबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध करताना फर्ग्युसन महाविद्यालयातील प्राचार्य रविंद्रसिंह परदेशी यांचे आशीर्वाद आमच्या पाठीशी नेहमीच असते. तसेच माझे सहकारी यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच पुस्तक प्रकाशन म्हटल की, अतिशय अवघड काम परंतु हि जबाबदारी दयाधन प्रकाशनाचे श्री. दयाराम मस्के यांनी स्वीकारून या पुस्तकास आकार दिल्याबद्दल मी त्यांची ही ऋणी आहे. पुस्तक छपाई चे काम सुबकरीतीने पार पाडल्याबद्दल त्यांना व त्यांच्या सहकार्यांना धन्यवाद देते. शेवटी या पुस्तकाचा उपयोग अभ्यासक, संशोधक, विध्यार्थी यांना अभ्यासासाठी संशोधनासाठी उपयुक्त ठरेल अशी आशा व्यक्त करते.

**डॉ. निर्मला तळपे – झांजरे**
फर्ग्युसन महाविद्यालय, (स्वायत्त)
पुणे-४११००४

मो.नं. ९५२७४८४४१५
E mail-nirmala.talape@fergusson.edu

# अनुक्रमणिका


| प्रकरण | शीर्षक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|
| १ | महिला सबलीकरण | १-५९ |
| २ | संशोधन पद्धती आणि संदर्भ साहित्याचा आढावा | ६०-९५ |
| ३ | स्त्रियांच्या चळवळी आणि त्यांचे घटनात्मक हक्क | ९६-१३१ |
| ४ | पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन आणि महिला विकासाच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा | १३२-१९१ |
| ५ | स्त्रियांच्या सद्स्थितीचा आढावा | १९२-२१५ |
| ६ | संदर्भ सुची | २१६ |

# प्रकरण – १
# महिला सबलीकरण

*प्रकरण पहिले*

# महिला सबलीकरण

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | प्रस्तावना | २ |
| १.२ | महिली सबलीकरणाची व्याख्या | ५ |
| १.३ | महिला सबलीकरणाचे स्वरुप | ७ |
| १.४ | महिला सबलीकरणाची तत्त्वे | १२ |
| १.५ | महिला सबलीकरणाची उद्दिष्ट्ये | १३ |
| १.६ | महिला सबलीकरणाची दिशा | १३ |
| १.७ | महिला सबलीकरणाची गरज | १७ |
| १.८ | महिला सबलीकरणाची आवश्यकता | १९ |
| १.९ | महिला सबलीकरण आणि शिक्षण | २४ |
| १.१० | महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान | ३२ |
| १.११ | महिला आणि विकासाचा धोरणात्मक दृष्टिकोन | ३७ |
| १.१२ | स्वयंसहायता बचत गटांद्धारे महिलांचे सबलीकरण | ४९ |
| १.१३ | सारांश | ५७ |
| ● | संदर्भसूची | ५८ |


.....

## १.१ प्रस्तावना :

विकसनशील देशाचा विकास आणि महिलांचा विकास, यांचा अत्यंत जवळचा व प्रत्यक्ष संबंध आहे. भारत हा विकसनशील देश असुन, तो खेड्यांचा देश आहे. विकासाच्या अवस्थेतुन जाताना, देशातील अनेक क्षेत्रांमध्ये पुरुषांप्रमाणेच स्त्रियाही देशाचा विकास करण्यासाठी हातभार लावतात. आज वाढत्या लोकसंख्येमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी आहे. भारताची जवळजवळ निम्मी लोकसंख्या महिलांची असुन, त्यांच्या सबलीकरणासाठी, केंद्रशासन आणि राज्यशासन प्रयत्नरत आहेत. महिलांना त्यांच्या हक्क व अधिकारांची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. तसेच, त्यांचे मुलभूत हक्क व अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी, अनेक घटनात्मक कायदेही तयार करण्यात आले आहेत. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, आर्थिक व्यवहार आणि संपत्तीमध्ये सहभागी करणे, अशी अनेक उद्दिष्ट्ये महिला सबलीकरणासाठी आवश्यक आहेत.

संपुर्ण जगामध्ये स्त्री सबलीकरणाची चर्चा व कार्य होत असताना, विकसनशील राष्ट्रांमध्ये, प्रामुख्याने, भारतात, स्त्री सबलीकरणाचे कार्य, १९ व्या शतकाच्या अखेरीस सुरु होताना आढळते. १९७५ हे साल, संयुक्त राष्ट्रसंघात 'अ' दर्जाचे स्थान असलेल्या, 'आंतरराष्ट्रीय लोकशाही फेडरेशन' ने आणलेल्या ठरावानुसार 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणुन घोषित करण्यात आले. तर ८ मार्च हा दिवस जगभरात 'जागतिक महिला दिन' म्हणुन दरवर्षी साजरा केला जातो. हे सर्व वर्ष, दिन साजरे करण्यामागे महिलांचे सबलीकरण, हा प्रमुख हेतु असल्याचे दिसते. लिंगभेदविरहीत विचारशक्ती जागृत करुन, स्त्री व पुरुष या दोघांनी मिळुन, नवे तत्वज्ञान विकसित केल्यामुळेच, हवे असलेले सकारात्मक बदल घडुन येतील.

भारतीय राज्यघटनेने बहाल केलेला 'समानतेचा मुलभूत हक्क' हा महिलांच्या विकासाचा भक्कम पाया आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९७५-८०) महिलांसंबंधीच्या तरतुदींमुळे बदलाची प्रक्रिया गतीमान झाली. कारण या काळात प्रथमच, विकास प्रक्रियेत चालना देण्याची क्षमता स्त्रीवर्गामध्ये आहे, यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे १९९० साली राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना झाली. तर महाराष्ट्र राज्याने जानेवारी १९९३ मध्ये या आयोगाची स्थापना केली. समाजाच्या दुर्बल घटकांच्या मुलभूत गरजांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महिला व बालविकास' हा स्वतंत्र विभाग जून १९९३ मध्ये स्थापन केला.

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने, दिनांक २४ फेब्रुवारी १९७५ रोजी 'महिला आर्थिक विकास महामंडळा' ची स्थापना करण्यात आली. महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व व महामंडळाची या क्षेत्रातील तज्ञता व कौशल्य लक्षात घेऊन, महाराष्ट्र शासनाने दिनांक २० जानेवारी २००३ रोजी महामंडळाला, महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखरसंस्था' म्हणुन घोषित केले. या महामंडळाच्या अखंड विकास प्रक्रियेतुन महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करण्याचा हेतु, काही प्रमाणात साध्य झाल्याचे दिसुन येते.

भारत सरकारने २००१ हे वर्ष 'महिला सबलीकरण वर्ष ' म्हणुन जाहीर केले. त्या निमित्ताने, महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा जो आढावा घेतला गेला, त्यात काही सकारात्मक आणि नकारात्मक बाबी दिसुन आल्या. त्यामध्ये भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी केलेली सकारात्मक प्रगती केंद्रस्थानी ठेऊन, तत्कालीन पंतप्रधानांनी 'स्त्री-शक्ती पुरस्कार' सुरु केला. तसेच, महिला व बालविकास विभागांतर्गत, महिला विकासाच्या, विविध योजना राबविण्यात येत असुन, सर्व नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शासन, महिला सबलीकरणासाठी, सर्व स्तरांवरील वार्षिक व पंचवार्षिक योजनांची आखणी करताना दिसतात. विविध स्तरावरील महिला व बालविकास समित्यांकडुन या योजनांचा समन्वय साधण्यात येतो. त्या त्या पातळीवरील ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगर पालिका या संस्थांकडुन, योजनांचा नियमित आढावा घेण्यात येतो. भारत संघराज्य, महिला सबलीकरणामध्ये आघाडीवर असुन, देशाचा विकास आणि प्रगती साधण्यासाठी, सर्व महिलांचे सबलीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी विविध क्षेत्रात सार्वजनिक, सरकारी आणि खाजगी संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी, शासन सर्वेतोपरी प्रयत्नशील असल्याचे दिसुन येते.

महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांमुळे महिलांचे सर्वांगाने सबलीकरण होताना दिसुन येते. महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय सबलीकरणामध्ये, महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

एकविसाव्या शतकात 'स्त्री सबलीकरण' हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक महत्त्वाचा व अत्यंत उपयुक्त विषय आहे. त्यामुळे कोणत्याही अभ्यास शाखेचा हा एक प्रमुख अभ्यास विषय ठरणे स्वाभाविक आहे. त्या दृष्टिने यु.जी.सी. च्या नवीन निर्देशित अभ्यासक्रमात या विषयाला समाविष्ट करण्यात आले आहे.

‘स्त्री सबलीकरण’ या विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन, संशोधकाने, प्रस्तुत पहिल्या प्रकरणात विविध नामवंत तज्ज्ञांनी केलेल्या, स्त्री सबलीकरणाच्या व्याख्या, स्वरुप, तत्त्वे, दिशा, आवश्यकता, गरज, शिक्षण, स्त्रियांचे विविध आर्थिक क्षेत्रातील योगदान, महिला व विकासाचा धोरणात्मक दृष्टिकोन, इत्यादी घटकांचा समावेश केला आहे.

## १.२ महिला सबलीकरणाच्या व्याख्या :

‘स्त्री सबलीकरण’ ही संकल्पना पुर्णपणे नवीन नाही. सर्व समाजामध्ये विविध क्षेत्रांबाबत त्याचा इतिहास उपलब्ध आहे. नवीन आहे ती त्याची पुनरावृत्ती, जी नव्या स्वरुपात प्रदर्शित होत आहे. या संकल्पनेचा प्रवास नवीन स्वरुपात, स्त्री कल्याण, स्त्री विकास याद्वारे आता ‘स्त्री सबलीकरणा’ पर्यंत आला आहे. याचाच अर्थ, १०-१५ वर्षांपासुन महिलांच्या संदर्भात ‘सबलीकरण’ या शब्दाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे.

‘स्त्री सबलीकरण’ या शब्दाची फोड केल्यास, स्त्रीला सबल करणारी म्हणजेच तिची दुर्बलता नष्ट करणारी, तिच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक क्षमतेची आणि प्रामुख्याने, तिच्या स्वत्वाची, तिच्या अस्तित्वाची, अस्मितेची जाणीव व जागरुकता तिच्यात निर्माण करुन, त्या दृष्टिने स्वयंविकासासाठी तिला प्रवृत्त करणारी एक प्रक्रिया होय. या दृष्टिने तिचा सर्वांगिण विकास, प्रगती आणि विविध कार्य क्षेत्रातील तिचा समान सहभाग, तसेच, न्याय्य वागणुकीबाबत किंवा संपूर्ण समता व न्याय्य निर्मितीच्या दृष्टिने विश्लेषण करणारी संकल्पना, हे ‘स्त्री सबलीकरणाचे’ प्रमुख उद्दिष्टय आहे.

पुढील भागात स्त्री सबलीकरणाच्या काही मान्यवर, तज्ज्ञांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. त्यांमधुन एकच दिसुन येते की, आजच्या आधुनिक युगात ‘स्त्री सबलीकरण’ ही काळाची एक महत्त्वाची गरज असुन, त्या दिशेने संपुर्ण जगभरात पाऊले उचलली जात आहेत.

- ***किरण देवेंद्र :***

*“स्त्री सबलीकरणाचा अर्थ, स्त्री ही आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र, स्वयंनिर्भर व स्वावलंबी असणे होय. तिला स्वतःबद्दल सकारात्मक दृष्टिकोन असावा, जेणे करुन, कोणत्याही विपरित परिस्थितीला तिला एकटीला सामोरे जाता येईल. विकास कार्यात सहभागी होण्यास ती पात्र ठरेल. निर्णय निर्धारण प्रक्रियेत ती सहभागी होऊ शकेल. या करिता ‘शिक्षण’ हा सबलीकरणासाठी महत्त्वाची भुमिका वठविणारा एक घटक आहे.”*

- ***शर्मा :***

  ***"The term Empowerment, refers to range of activities from individual self-assertion to collective resistance, protest and mobilisation, that challenge basis power relations."***

- ***Encarta Dictionery :***
  - ***"Empower means give authority to somebody to give somebody a power or authority - Inspire somebody with Confidence, to give somebody a sense of Confidence or Self-esteem."***
  - ***"Empowerment may mean equal status to women opportunity and freedom to develop herself."***

- ***Country Report of the Government of India :***

  ***"सबलीकरण म्हणजे बळजबरीने दुर्बल ठेवण्याच्या अवस्थेकडून शक्तीकडील वाटचाल होय. याव्दारे, स्त्रियांमध्ये स्वतःबद्दलची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते व त्यांच्या क्षमतेत वाढ होते."***

- ***Oxford Dictionery :*** **(ऑक्सफर्ड डिक्शनरी)**

  ***"सशक्तीकरण या शब्दाचे काही अर्थ दिले आहेत. त्यानुसार, सशक्तीकरण म्हणजे कायदेविषयक नैतिक आधार देणे होय. नैसर्गिक अधिकार देणे म्हणजे सुद्धा सशक्तीकरण होय."***

- ***संदिपकुमार चौधरी :***

  ***"सशक्तीकरण म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी बनविणे, असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. सामाजिक दृष्टिकोनातुन स्त्रियांवर अन्याय सुरु आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे महिलांचे सशक्तीकरण होय."***

- ***"स्त्री सबलीकरण म्हणजे स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी स्त्रीला आर्थिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक दृष्टिने सुदृढ करणे."***

'स्त्री सबलीकरण' म्हणजे सध्या स्त्री  कुठे आहे, याचा विचार नव्हे, तर स्त्री सबलीकरणात त्या स्वतःच्या आयुष्याबद्दल, मुलांबद्दल आणि कुटुंबाबद्दल निर्णय स्वतः घेऊ शकतील. तसेच, सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील. जेथे स्त्रियांच्या अधिकाराचा व्यक्तीशः संबंध येतो, पुनरुत्पादनाच्या अधिकाराचा संबंध येतो, कुटुंबाप्रतीचे कार्य व जबाबदारी समाजाप्रतीची जबाबदारी निश्चित होते, लैंगिक व सामाजिक शोषणाची भिती नसते, तसेच, त्यांच्या घरातील हक्क व मुलांबाबतच्या पालकत्वाचा अधिकार त्यांना प्राप्त होतो, अशी परिस्थिती म्हणजे 'स्त्री सबलीकरण' होय. या ठिकाणी स्त्रिला तिने केलेल्या उत्पादक कार्यातुन प्राप्त होणाऱ्या उत्पादनांचा फायदा मिळावा, तिने कुटुंबाकरिता केलेल्या मोफत कार्याची दखल घेऊन त्या कार्याला महत्त्व दिले जावे, कौटुंबिक कार्याकडे सन्मानाने पाहिले जावे, कुटुंबातील जबाबदारी व निर्णय प्रक्रियेत त्यांना सामील करावे, अशी विचारसरणी होय.

त्या अंतर्गतच, स्त्रीच्या आहारात सर्व आरोग्यपुर्ण घटकांचा समावेश असणे, तिला आवश्यक ती विश्रांती व विचार व्यक्त करण्यास स्वातंत्र्य व संधी, तसेच, मित्रमंडळींसोबत व पालकांच्यासोबत, इतर कुटुंबियांसमवेत, आनंदात वेळ घालविण्यास मिळावा. एकुणच मुक्त व स्वतंत्र वातावरणात जीवन जगण्याचा अधिकार मान्य व्हावा, त्यांच्या कृती व वर्तनात केवळ दोष पाहुन, तिच्या कार्यात अवरोध करण्याचा प्रयत्न होऊ नये. तिच्या भोवती नियंत्रण ठेवणाऱ्या व तिला अवरोध करणाऱ्या लोकांचा वावर असु नये. खरे सबलीकरण म्हणजे समाजाची स्त्रीकडे बघण्याची मानसिकता बदलुन, तिला समजुन घेणे, तिचे विचार ऐकणे, तिची कृती पाहुन, वेळप्रसंगी तिला योग्य ती दिशा दाखवुन, सत्कर्मासाठी तिला प्रोत्साहित करुन, तिची सकारात्मक मानसिकता तयार करणे होय. यामधुनच स्त्री बद्दलचा आदर वाढेल आणि तिचा आत्मविश्वास वाढेल, अशी वातावरण व परिस्थिती निर्मिती म्हणजे 'स्त्री सबलीकरण' होय. असा स्त्री सबलीकरणाच्या विविध व्याख्यांवरुन, सर्वसमावेशक अर्थ अभिप्रेरित होतो.

## १.३ महिला सबलीकरणाचे स्वरुप :

'स्त्री सबलीकरण' म्हणजे काय, हे वरील व्याख्यांवरुन स्पष्ट होते. तसेच स्त्री सबलीकरणाचे स्वरुप पुढील मुद्येसुद विवेचनावरुन समजते.

- **सबलीकरण – भितीपासुन मुक्तता :**

सबलीकरण, ही प्रदीर्घकाळ चालणारी एक प्रक्रिया असुन, ती कोणाही व्यक्तिच्या मानसिकतेवर निर्भर आहे. ज्याद्वारे, बलहिन व्यक्ती, स्वतःच्या जीवनावर, अधिकार व नियंत्रण प्राप्त करु शकतात. सबलीकरणाचा परिणाम सत्ता संतुलनात होतो, जो जीवन पद्धतीत व वैयक्तित संबंधांतुन जाणवतो.

सबलीकरण, ही संकल्पना, हा शब्दप्रयोग, अलीकडे वारंवार वापरला जातो. यात दुर्बल किंवा बलहिन व्यक्तिला, स्वतःच्या आयुष्यावर अधिक नियंत्रण असावे, असे वाटते. अशा व्यक्ति स्वतःला अनेक बाबतीत बलहिन, दुर्बल, कमकुवत समजतात. त्यांना सतत असे वाटते की, ज्यावर त्यांचे स्वतःचे नियंत्रण नाही, आणि जे त्यांच्या दृष्टिने त्यांच्यापेक्षा अधिक बलशाली आहेत, ते संपुर्ण आयुष्यात अशा अनेक बलांचा सामना करतात, कि जे अतीदूर असुन, ज्यांची ओळख पटु  शकत नाही. या बलहिनतेतुनच त्यांच्यात भिती निर्माण होते, त्यांचा आत्मविश्वास लोप पावतो, ते कायम कोणत्या तरी तणावाखाली वावरत असतात, सारे जगच आपल्याला फसवायला बसलेले आहे, या व अशा स्वरुपाच्या अनेक प्रकारच्या भयामुळे त्यांचे आयुष्य पोखरुन गेलेले असते, त्यांचा स्वतःवर आणि बाकी कोणावरच विश्वास नसतो, त्यांचे आयुष्य अशा स्वभावामुळे जमीनदोस्त झालेले असते, त्यांचे मानसिक संतुलन बिघडल्यामुळे, त्यांचे मनोधैर्य, आत्मविश्वास, सकारात्मकता, आत्मानंद नष्ट झाल्यामुळे, त्यांचे जगणे निरर्थक व निष्प्रभ झालेले असते. त्यांना यातुन बाहेर काढणे म्हणजे अग्नीदिव्यच असते.

परंतु ही बलहिनतेची भावना, आर्थिकदृष्ट्या गरीबांपेक्षा, मानसिकदृष्ट्या कमकुवत, दुर्बल व्यक्तिंना जास्ती त्रास देते. याचे प्रमुख कारण म्हणजे, त्यांचा स्वतःशीच चाललेला संघर्ष होय, त्यांच्या चिंताच याला कारणीभुत असतात. ते साधे दैनंदिन जीवनदेखील, आनंदाने व सुख समाधानाने जगु शकत नाहीत. हा जीवन संघर्ष बलशाली अशा समाजाविरुद्ध सुरु झाला की, अशा व्यक्ती स्वतःला बलहिन समजु लागतात. ही बलहिनतेची भावना स्त्रियांबरोबरच पुरुषांमध्येदेखील असते. त्याचाच परिणाम म्हणुन, अशा व्यक्ति, बाह्य, आर्थिक व सामाजिक ताकदीविरुद्ध नव्हे तर स्वतःच्या कुटुंबांतर्गत विरोधाचादेखील सामना करु शकत नाहीत. जीवनाकडे बघण्याचा त्यांच्या दृष्टिकोनच चुकीच्या तत्त्वांवर आधारित असतो. अशा व्यक्तींचे मानसिक व शारीरिक सबलीकरण होणे अत्यंत गरजेचे असते.

- **सबलीकरण – एक बाह्य घटक :**

सबलीकरण हा एक बाह्य घटक असुन, तो बाहेरुन साध्य केला जातो. आंतरिकदृष्ट्या एखाद्या व्यक्तिला सबलतेची जाणीव तेव्हाच होते, जेव्हा त्या व्यक्तिला बाह्यदृष्ट्या काही दर्जा प्राप्त होतो. सामाजिक वर्तन हे रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती व संकेतांव्दारे लावले जाते. दुसरीकडे कायदे व राज्य, हे या स्थितीबाबत कधीच समाधानी नसतात. या ठिकाणी मान्यतेचा अभाव दिसतो. त्यांचा कल हा नियंत्रणात्मक कृतीबाबत त्रासदायक असतो. त्यामुळे समाज, कायदे, राज्य, या सर्वांच्या दडपशाही विरुद्धचा संघर्ष, हा जगाच्या इतिहासाचाच एक भाग असतो. जरी आपण सबलीकरणास

आंतरिक घटक मानले तरी, त्याकरिता उपयुक्त वातावरणनिर्मिती आवश्यक ठरते, जी बाह्य स्वरुपाची असते.

- **सबलीकरण – एक क्रांतीकारी संघर्ष :**

'प्रत्येक व्यक्ती जन्मजातच जर समान असेल तर, त्यातील एखादी व्यक्ती दुर्बल, कमकुवत, अशक्त कशी असु शकेल?' हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. सर्व स्त्री-पुरुष जन्मतःच समान आहेत, असे म्हटले जाते, तरीही, समानतेचे काही घटक, काही व्यक्तिंकरिताच (प्रामुख्याने) स्त्रियांकरीता, हरविलेले दिसतात. सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टिने वाद केला जातो, कि विकासाच्या प्रक्रियेतील समानतेचा ऱ्हास, हा संस्कृतीच्या व समाजाच्या विकासातील मोठा अडसर आहे. शक्तिचा वापर हा प्रबलांकडुन दुर्बलांवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी सर्वच सिद्धांतांमध्ये केला जातो. या विरुद्ध संघर्ष करणे, म्हणजे क्रांती करणे होय, ही संकल्पना कोणत्याही शासन प्रकारात समानतेने आढळते.

जन्मजात सर्व स्त्री-पुरुष समान आहेत. प्रत्येकाला कोणत्याही प्रतिबंधाशिवाय मुक्त व स्वतंत्र जीवन जगण्याचा अधिकार आहे, हे केवळ पुस्तकात वाचण्यापुरतेच ठिक आहे, पण प्रत्यक्ष प्रत्येक कुटुंबात, समाजात असे घडताना दिसते का? कुटुंबात, समाजात, राष्ट्रांमध्ये शांतता, सहकार्य व सुरक्षित जीवन, ही विकासाची प्राथमिक अट आहे. त्यामुळेच मानवाचा विकास समानतेच्या अटीवर होत असतो. त्यावर कुटुंब, समुदाय, समाज, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता, समन्वय, सहकार्य व सुसंगती आवश्यक असते.

सामाजिकस्तरावर आपण समजु शकतो की, काही रुढी, प्रथा, परंपरा, चालीरिती, त्रासदायक, अनिष्ट, अन्याय ठरु शकतात. विविध सिद्धांतांच्या माध्यमातुन, समाजाच्या विविध स्तरांवरील हा अन्याय, विशद करण्यात आला आहे. निरनिराळे कायदे, सनदा, घटनात्मक तरतुदी, अशा प्रकारच्या अन्यायांविरुद्ध व अन्यायाच्या निवारणार्थ बनविण्यात आल्या आहेत. स्त्रियांचा प्रत्येक काळातील संघर्ष, हा जरी इतिहास असला तरी, त्याचीच कमी-जास्त प्रमाणात पुनरावृत्ती आजसुद्धा घडताना आपल्याला दिसते. तर मग समाज कुठे व कधी जागृत होता. हे तर काल घडले, आजही घडतेय आणि उद्याही घडतच राहणार आहे. कुठे आहे समान दर्जा, समान वागणुक, समान कायदे? महिलांचे सबलीकरण, ही संकल्पना, वास्तवात उतरणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या न्याय व समानतेच्या लढ्याशी व संघर्षाशी संबंधित आहे.

श्री. शर्मा यांच्या मते, *"स्त्री सबलीकरण ही संकल्पना, स्वतःबद्दल ठाम प्रतिपादनाच्या कृतीपासुन सामुहीक प्रतिकारापर्यंत निषेध आणि संघर्षासाठी एकत्र जमण्यापर्यंत, सर्व घटकांशी निगडीत आहे, ज्यात मुळ सत्तासंबंधांना आव्हान दिले जाते."* विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात या संघर्षाला अधिक संघटनात्मक स्वरुप प्राप्त झाले. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेनंतर, (जून १९४५) या महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला अधिक वेग आल्याचे दिसते.

- **विविध घटकांतील क्रिया-प्रतिक्रिया :**

  सबलीकरण, या संकल्पनेला अनेक पदर आहेत, विविध पैलु आहेत. ही संकल्पना अनेक पैलुंची, बहुआयामी आणि अनेक थरांची आहे. ती अनेक घटकांतील क्रिया-प्रक्रिया आणि प्रतिक्रियांनी बनलेली आहे. त्यात शारीरिक, मानसिक, स्वभाविक, नैतिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, मानसशास्त्रीय, वर्तनविषयक, अशा अनेक घटकांतील क्रिया व प्रतिक्रियांची गोळाबेरीज अंतर्भुत आहे. स्त्री सबलीकरणाची व्याख्या बनविताना, ती स्त्रियांच्या विविध संसाधनांवरील, नियंत्रणातील सहभागाची प्रक्रिया आहे, असे म्हटले जाते. त्यात भौतिक, नैसर्गिक (स्त्री-स्वभाव), साहित्य, बौद्धिक व मानसिक घटक, ज्यात बुद्ध्यांक, वैचारिक पातळी, आकलनशक्ति, सामान्यज्ञान, माहिती, व्यावहारिक ज्ञान, आत्मिक ज्ञान, कल्पनाशक्ति, आर्थिक संसाधने, जसे पैसा आणि पैसा मिळविण्याचे विविध नैतिक व अनैतिक मार्ग, तसेच, स्वतःचा आर्थिक विकास, आत्मिक विकास, कुटुंबाचा विकास, समुदाय, समाज, प्रांत, राष्ट्र व आंतरराष्ट्रीय विकासातील निर्णय निर्धारणातील सहभाग, अशा अनेक घटकांचा समावेश होतो.

- **महिला सबलीकरण - एक सकारात्मक दृष्टिकोन :**

  महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांना शक्ती देऊन, त्याद्धारे, त्यांची इतरांवर सत्ता वाढविणे किंवा इतरांवर त्यांचे वर्चस्व, श्रेष्ठत्व निर्माण करणे नव्हे, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. श्री. अख्तार यांनी याबाबत त्यांचे मौलिक मत मांडले आहे. त्यांच्या मते, *"या शोषणाभिमुख व भ्रष्ट समाजात, पुरुषी अहंकाराने ग्रासलेली, पुरुषांची शोषण करण्याची भ्रष्ट पुरुषी सत्ता (जी आतापर्यंत पुरुषाने वापरली) ती आता स्त्रीने स्विकारुन, तिचा अवलंब पुरुषांविरुद्ध करणे, ही स्त्री सबलीकरणाची कल्पना नाही. स्त्रियांनी वैयक्तिक, मानसिक, बौद्धिक, आत्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, अशा विविध क्षेत्रात स्वतःचा विकास करणे म्हणजे स्त्री सबलीकरण होय. याचा अर्थ, पुरुषांना वाईट, अयोग्य, दुय्यम वागणुक देण्यासाठी, आपल्या सत्ताधिकारांचा गैरवापर करणे किंवा पुरुषांचे शोषण करणे नव्हे. स्त्री सबलीकरण, हे स्त्रियांना सर्वांगाने सबल करणारे, सशक्त करणारे, सक्षम करणारे असावे, त्यांना पुरुषांपेक्षा सत्तावान, शोषणाभिमुख, उन्मत्त करणारे नसावे."*

ग्रीफन् यांच्या मते, *''स्त्रीच्या बाबतीत सत्ता, या शब्दाचा अर्थ, स्त्रीच्या सत्ताधिकारात वाढ होय. तिचे नियंत्रण, तिचे ऐकणे, तिला समजुन घेणे, तिला समान नागरिक म्हणुन मान्यता व सन्मान देणे, तसेच, समाजातील विविध क्षेत्रात सक्रिय सहभाग घेण्याची स्वपात्रता तिच्यात निर्माण होणे होय. स्त्रीच्या बाबतीत सत्ता ही केवळ घरातच नव्हे, तर समाजातील सर्वच स्तरांवर, स्वतःचा सहभाग सिद्ध करण्याची क्षमता स्वतःमध्ये निर्माण करुन, त्यानुरुप कृती करणे होय.''*

नैरन बर्जर यांनी स्वामी रामानंद यांच्या विचारांना शब्दबद्ध करताना म्हटले की, *''स्वतःमधील अव्यक्त, बुद्धिसामर्थ्य व क्षमतांबद्दल जाणीव निर्माण केल्यास, प्रत्येक व्यक्ति निष्णात नागरिक बनेल, आपल्या राष्ट्रास मदत करेल आणि मानवतेसाठी जीवात जीव असे पर्यंत कार्य करेल.'' ''सबलीकरण म्हणजे, जो परमेश्वरीय अंश प्रत्येक सजीवामध्ये आहे त्याला, म्हणजे आपल्या आंतरिक शक्तीस, अंर्तमनास जाणुन, त्याप्रमाणे कृती करणे होय.''* ही झाली सबलीकरणाची अध्यात्मिक बाजू, ज्याअंतर्गत अगदी बोटावरच मोजता येतील असे आपल्या देशातील महात्मे गणले जातात. उदाहरणार्थ, महात्मा गांधी, गौतम बुद्ध, भगवान् महावीर, संत गाडगे बाबा, मदर टेरेसा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले व त्यांच्या पत्नी सौ. सावित्रीबाई फुले, असे अनेक महात्मे, ज्यांनी आपले स्वतःचे आयुष्य पणाला लावुन, आदर्श समाज घडविण्यासाठी प्रयत्न केला.

सबलीकरण म्हणजे स्वतःमधील क्षमता ओळखणे, त्यांचा विकास करणे आणि त्याद्वारे, कुटुंब, समुदाय, समाजात यथार्थ योगदान देणे, तसेच, स्वतःची एक सकारात्मक प्रतिमा निर्माण करुन, सुप्त क्षमतांचा व पात्रतांचा विकास करणे, जेणे करुन आपल्या मार्गात येणाऱ्या कोणत्याही प्रश्नाचे वा अडचणीचे निवारण करण्याची पात्रता, ताकद आपल्यात येईल. आपल्या स्वयंप्रतिष्ठा व न्यायाबद्दलच्या मुलभूत अधिकारांची, हक्कांची जाणीव आपल्याला व्हावी आणि अन्याय , स्वार्थी, सापत्न वागणुकीविरुद्ध मागणी करुन योग्य तो न्याय साधावा.

स्त्री सबलीकरणाची सुरुवात, कोणत्याही स्त्रीने स्वतःपासुन सुरु करुन, तिच्या समवेत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिस, समुह-समुदायास, समाजास बरोबर घेऊन मानसिक, सामाजिक, सांस्कृतिक रुढी, परंपरा, चालिरिती, अन्याय यांच्या विरुद्ध आवाज उठवुन, त्यातून योग्य तो सकारात्मक परिणाम साधल्यावरच होईल. याचाच अर्थ, स्त्री जेव्हा स्वतःच्या व्यक्तीमत्व व प्रतिमेबद्दल, अधिकार, कर्तव्यांबद्दल, क्षमतांबद्दल, सुप्त बुद्धीसामर्थ्याबद्दल जागरुक होईल, सकारात्मक होईल, तेव्हाच स्त्रीचे सबलीकरण शक्य आहे.

स्त्री सबलीकरणाचा खरा अर्थ, स्त्रीच्या बुद्धिमत्तेला, सुप्त शक्तिला किंवा कार्यक्षमतांना, सामर्थ्याला, धारणक्षमतेला फुलविणे, तसेच, स्वतःची खरी ओळख, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ति स्वातंत्र्य, आणि प्रत्यक्ष कृती, तसेच, तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय. स्त्रियांना केवळ त्यांच्या क्षमतेची जाणीव करुन न देता, त्यासोबतच, त्यांना आवश्यक त्या संधी, सुविधा आणि बाह्य व आंतरिक वातावरण निर्माण करुन देणे, त्यांच्या जन्मजात गुणांचा यथायोग्य वापर करुन, त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मनिर्भरता निर्माण करुन देणे, हे स्त्रीच्या सबलीकरणासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. तिच्याविरुद्ध होणाऱ्या अन्याय व शोषणाविरुद्ध आवाज उठविणे व त्याविरुद्ध संघर्ष निर्माण करण्याची क्षमता तिच्यात निर्माण करणे, म्हणजे तिचे सबलीकरण करणे होय. स्त्री सबलीकरण हा एक सकारात्मक दृष्टिकोन असुन, समाज विकासाच्या हेतुने उचललेले ते अत्यंत उपयुक्त पाऊल आहे.

वरील मुद्यांवरुन, स्त्री सबलीकरणाची संकल्पना आणि स्वरुप, अतीशय व्यापक व आवश्यक असल्याचे दिसुन येते.

## १.४ महिला सबलीकरणाची तत्त्वे :

महिली सबलीकरणाच्या कुठल्याही प्रयत्नात, खालील तीन तत्त्वांचा समावेश केला जातो.

- स्त्री व पुरुष यांना समान अधिकार आहेत, हे मुलभूत तत्त्व म्हणून मान्य झाले पाहिजे. याअंतर्गत, कायदेविषयक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक अडचणी ओळखुन, त्यात धोरणात्मक सुधारणा व कडक सकारात्मक कारवाई करुन, उपाय योजले गेले पाहिजेत.

- या सुधारणांचा लाभ उठविण्यासाठी स्त्री लाभार्थी आहे व त्या सुधारणा घडवुन आणण्यात तिचा हातभार आहे, हे समजुन कार्य केले पाहिजे. स्त्रियांच्या कार्यक्षमतेमध्ये गुंतवणुक करुन, त्यांना त्यांच्या मताप्रमाणे कार्य करु देण्यामध्ये त्यांचा फायदा तर आहेच, याशिवाय, त्यांची सर्वांगीण प्रगती करुन, त्यांना सबल बनविण्याचा तो एक उत्तम मार्गसुद्धा आहे.

- लिंगभेद नाहिसे करण्यासाठी योजलेल्या या विकास प्रक्रियेत, विकास आराखड्यामध्ये, स्त्री किंवा पुरुष दोघांच्याही बाबतीत विचार करताना, वेगवेगळे सामाजिक किंवा सांस्कृतिक गट त्याबाबत कसा विचार करतात, हे पाहण्याची गरज नाही. स्त्री व पुरुष दोघांना समान कामासंबंधी एक संधी मिळत आहे, हे पाहणे आवश्यक आहे.

## १.५ महिला सक्षमीकरणाची उद्दिष्ट्ये :

२००१ साल हे 'महिला सक्षमीकरण वर्ष' म्हणुन पाळण्यात आले. त्याच वर्षी युनायटेड नेशन्स्तर्फे स्त्री सक्षमीकरणाविषयी विशेष योजना तयार करण्यात आली. या योजनेमध्ये स्त्री-पुरुष लिंग भेदावर आधारीत गोष्टी सामाजिक आणि आर्थिक रचनेमध्ये समाविष्ट करण्यात आल्या.

स्त्री सक्षमीकरण योजनेतील ठळक उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :

- स्त्रियांना स्वसामर्थ्याची जाणीव करुन देणारे वातावरण निर्माण करणे.
- सर्वच घटकांमध्ये म्हणजेच आर्थिक, सामाजिक, नागरिक आणि सांस्कृतिक घटकांमध्ये स्त्रियांना विशेष स्थान देणे.
- देशव्यापी स्तरांवर, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बाबींमध्ये निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग असणे.
- स्त्रियांना शिक्षण, आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास, व्यावसायिक प्रशिक्षण, यांमध्ये समान संधी आणि समान रोजगार देणे.
- कायदेशीर तरतुदींमध्ये, न्यायामध्ये स्त्रियांना बरोबरीची वागणुक देऊन दुजाभाव दूर करणे.
- बदलत्या समाज व्यवस्थेच्या कार्यात स्त्री-पुरुष दोघांचा बरोबरीचा सहभाग असणे.
- विकास प्रक्रियेत स्त्रियांना मुळ स्त्रोतात समाविष्ट करुन, त्यांना विशेष जागा प्रदान करणे.
- स्त्रिया आणि मुलींवर सर्वच स्तरांत होणाऱ्या अत्याचारांना आळा घालणे.
- नागरी संस्थांमध्ये स्त्रियांच्या विकासाशी निगडीत कार्य करणाऱ्या संस्थांचा बरोबरीचा सहभाग साधणे.

## १.६ महिला सबलीकरणाच्या दिशा :

प्रा. आर.एम्. मांजरे यांनी 'महिला सबलीकरणाच्या दिशा' याबाबत आपले मत मांडले आहे, ते पुढीलप्रमाणे :

जवळजवळ मागील १०-१५ वर्षांपासुन, महिलांच्या संदर्भात 'सबलीकरण' या शब्दप्रयोगाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. आजकाल महिलांसाठी चेतना, कल्याण, उत्थान, जागृती, अशा शब्दांपेक्षा 'सबलीकरण' हे विशेषण अधिक प्रमाणात ऐकण्यात येत आहे. या मागील कल्पना काय आहे? 'सबलीकरण' करण्याचा अर्थ काय आहे, याचा शोध मात्र म्हणावा तसा घेतला जात नाही. यासाठी हे माहित करुन घेतले पाहिजे की, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संदर्भात महिला सबलीकरणाच्या दिशा काय आहेत?

सध्या महिला सबलीकरणाच्या नावाखाली विविध कार्यक्रम हाती घेतले आहेत. '*जुन्या कढीलाच ऊत आणण्याचा*', हा प्रकार काही योजना व कार्यक्रमांच्या बाबतीत लागू पडतो. एवढेच नाही तर काही धोरणे व कार्यक्रम, या संकल्पनेला समजुन न घेता, आपल्या जुन्या धोरणांनाच 'महिला सबलीकरण' म्हणुन राबवित आहेत. महिला विकास, एकात्मिक ग्रामीण विकास, सामुदायिकता व महिला सहभागिता, अशा कार्यक्रमांनी स्वतःस सबलीकरणाचे कार्यक्रम मानले आहे. परंतु, त्यांच्या कामाच्या पद्धतीत परिवर्तन झाले नाही. चिंतन करण्याचा विषय असा आहे की, सबलीकरण हा या सर्वांना खरोखरच पर्याय आहे का? आणि जर असेल तर त्यास सफल करण्यासाठी त्या कार्यक्रमात, त्या योजनेत, कोणते व कसे बदल करण्याची आवश्यकता आहे, हे तपासणे गरजेचे ठरेल.

सबलीकरण या शब्दात 'सबल' हा शब्द आहे. याचा अर्थ 'शक्ति' असा होतो आणि या शक्तिला प्राप्त करणे म्हणजे 'सबलीकरण' होय. प्रत्येक समाजात शक्तिशाली व शक्तिहिन समुह असतात. परंतु, कल्पना व प्राप्त संसाधनांने योग्य त्या दिशेने समायोजन करणे, म्हणजे सबलीकरण होय. ज्या संसाधनांना सबलीकरणांतर्गत समायोजित केले जाऊ शकते, ती संसाधने म्हणजे –

- आर्थिक संसाधने : धन आणि त्यांच्याजवळ पोहोचणे.
- भौतिक संसाधने : हवा, पाणी, जमीन, जंगल.
- मानवी संसाधने : व्यक्ती, मेहनत, कौशल्य.
- बौद्धिक संसाधने : ज्ञान, विचार माहिती.

अशा प्रकारे कल्पनांच्या समायोजनाचा अर्थ म्हणजे लोकांमध्ये विश्वासमुल्य आणि त्यांच्या विचारात परिस्थितीनुरुप परिवर्तन करणे होय. परंतु, वास्तविकता वेगळीच आहे. ज्यांच्यामुळे शक्ती वा बळ येते, ते बौद्धिक आणि भौतिक साधनांवर, तसेच व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनातील विचारांवरही नियंत्रण ठेवीत असतात. निर्णय असे घेतले जातात की, ते आपल्या फायद्याचे असतात. कोणत्याही व्यक्ती वा समुहाच्या शक्तिचा अंदाज, त्यांचे कोणकोणत्या संसाधनांवर नियंत्रण आहे, यावरुन लागत असतो, कारण या नियंत्रणामुळे त्यांना निर्णय घेण्याची शक्ती प्राप्त होत असते आणि या शक्तिमुळेच पुन्हा ते संसाधनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात.

जर आपण महिला सबलीकरणाच्या वरील व्याख्या स्विकारल्या तर सामान्यपणे सर्व महिला, विशेष रुपात, आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला तुलनात्मकतेने शक्तिहीन असतात. कारण, त्यांच्यात संसाधनांना समायोजित करण्याची क्षमता नसते, त्यामुळे त्या लगेच निर्णय घेऊ शकत नाहीत.

याचा अर्थ असा नाही की, महिला पुर्णतः शक्तिहीन असतात. स्त्रिया प्राचीन काळापासुनच, आपल्या आई, पत्नी, बहीण, कामगार, अशा भुमिका व्यवस्थित सांभाळुन, आपल्या भोवतालच्या वातावरणावर प्रभाव टाकण्याचा व योग्य परिणाम साधुन, आपली एक आदर्श प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. तरीपण पितृसत्ताक प्रभावाने गप्प बसुन, उद्‌भविलेल्या प्रसंगाला निमुटपणे सामारे जाणे, दबुन राहणे, नाईलाजाने आज्ञापालन करणे, वेळप्रसंगी त्याग करणे, यावरुन महिलांची सहनशीलता व सोशिकपणाच समोर येतो आणि त्यावरुनच त्यांची कुटुंबातील व समाजातील प्रतिमा उंचावते. त्यामुळेच ती संसाधनांना समायोजित करण्याच्या प्रयत्नात सतत अयशस्वी होत असते. याचाच अर्थ, स्वतःचे विचार, मनन व चिंतनाने बदलणे, प्राप्त संसाधनांचा योग्य वापर करणे, म्हणजेच ती 'शक्ती' प्राप्त करणे, त्यालाच 'सबलीकरण' म्हटले जाते.

सबलीकरणाचा अर्थ निरनिराळ्या परिस्थितीत वेगवेगळा असु शकतो. त्याची व्याप्ती व्यक्तीगत हक्कांच्या लढाईला विरोध दाखविणे आणि शक्ती संबंधांना आव्हान देण्यासाठी संगठीत होणे, येथपर्यंत असु शकते. तेव्हा नाती, वर्ग, लिंग, इत्यादि घटकांच्या आधारावर, व्यक्तिच्या आधारावर, व्यक्ति वा समुहांना संसाधनांवर अधिकार मिळत असतो. त्यामुळेच त्यांच्या शक्ति आणि बळाची सीमा निश्चित होते. तेव्हा आपले शोषण करणाऱ्या शक्ति ओळखणे आणि त्या बदलण्याच्या दृष्टिने कार्यवाही करणे, ही सबलीकरण प्राप्त करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात मानली जाऊ शकते. त्यामुळेच सबलीकरण ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे, तो एक प्रवाह आहे, जिचा उद्देश्य, एका निश्चित बनविणाऱ्या बळाचा मुकाबला करणे असतो. सबलीकरण हा एक प्रवास आहे. ते ध्येय नाही, ते एक साधन आहे, साध्य नाही. ते एक आव्हान आहे, निवड नाही.

आपण जर असे समजले की, महिला सबलीकरणामुळे पुरुष वर्ग कमजोर होईल, तर तसे मात्र घडणार नाही. आज महिला समुह, महिला संघटना आणि त्यांचावर आधारित शोध व अभ्यास, यांवरुन असे स्पष्ट झाले आहे की, महिलांचे सबलीकरण पुरुष वर्गाला कधीच कमजोर बनवित नाही. त्यामुळे सबलीकरणाची दोन प्रमुख उद्दिष्ट्ये स्पष्ट होतात.

- अधिनता आणि दबावाला आव्हान देणे.
- असमानतेची वृद्धि करणाऱ्या संस्था उदा. कुटुंब, जाती, वर्ग व्यवस्था, धर्म इत्यादी संरचनेला परिवर्तित करणे.

'सबलीकरण', अशा सिद्धांतांवरही प्रश्नचिन्ह निर्माण करते की, कोणत्या तरी एका व्यवस्थेला वा संरचनेला सर्व शक्तिला आपण आधार मानतो. असे मानले जाते की, शक्तिहीनता आणि

असमानतेचा आधार हा केवळ आर्थिक व्यवस्था आहे. याचाच अर्थ असा होतो की, ज्या ठिकाणी महिला पुरुषांच्या बरोबर वा त्यांच्यापेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक मजबुत असतात. त्या ठिकाणी स्त्रियांचा दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीने असतो. परंतु अनेक अभ्यासातुन असे स्पष्ट झाले आहे की, आर्थिक परिवर्तनाने, महिलांवर पडणारे ओझे कमी झालेले नाही, तर हे ओझे अधिक झाल्याचे दिसुन येते. असाही एक प्रश्न उपस्थित केला जातो की, 'महिला सबलीकरण' पुरुषाच्या विरोधात आहे. परंतु, आतापर्यंतच्या विश्लेषणावरुन स्पष्ट झाले आहे की, संसाधनांवर नियंत्रणाचा प्रश्न आहे. पुरुष ही तेवढाच शक्तिहीन आहे, जेवढी महिला आहे. महिला सबलीकरणातुन जर कुटुंबाला लाभ होणार असेल तर कुटुंबातील कर्ता पुरुषसुद्धा महिला सबलीकरणाचीच कास धरतो.

महिला सबलीकरणामुळे पुरुषांवरील आर्थिक तणावसुद्धा काही प्रमाणात कमी होईल. त्यांचीही दमन व शोषणाच्या दुष्टचक्रातुन सुटका होईल. ते चांगले नागरिक बनुन, आपल्यातील स्व-स्वरुपाचा शोध घेऊ शकतील. आपल्यामध्ये दडलेल्या कोमल व्यक्तिमत्त्वाला व्यक्त करु शकतील. जे वर्तमान काळात, पुरुषी अहंकाराचा पडदा पांघरुन आपल्या स्व-स्वरुपाला लपवुन ठेवण्याचा प्रयत्न करतात. यावरुन असे दिसुन येते की, सबलीकरणाची प्रक्रिया ही बुद्धि आणि सबलीकरणाची जाणीव, यांपासुन सुरु होते. जेव्हा स्त्री स्वतःवर, आपल्या अधिकारांवर, आपल्या योग्यतेवर विश्वास करेल, तेव्हाच तिच्या मनात लहानपणापासुन घर करुन बसलेल्या दुर्बलता, सहनशीलता, कमकुवतपणा, या स्वभावाला काही प्रमाणात का होईना ती नष्ट करु शकेल. असे जरी असले तरी, सबलीकरणासाठी अनेक बाह्य परिस्थितीजन्य प्रेरणा स्त्रोतांची आवश्यकता असतेच. कारण स्त्री ही आर्थिक व मानसिक दृष्ट्या सशक्त नसते, याला इतिहास साक्षी आहे. उदाहरणार्थ राणी लक्ष्मीबाई, रजिया सुलतान, अशा अनेक स्त्रिया त्यांचे कर्तृत्व, कर्तबगारी, यांमुळे तत्कालिन सर्व स्त्रियांच्या जीवनात परिवर्तन घडवु शकत नाहीत. जेव्हा एक वा दोन स्त्रिया परंपरा तोडण्याचा प्रयत्न करतात, प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊन, काही तरी विशेष, असाधारण करु पाहतात, तेव्हा त्यांना त्यांच्या आयुष्यात अनेक अडचणींना सामोरे जावे लागते, त्यांची नैतिकता, शालिनता पणाला लागते, त्यांची बेअब्रू होते, त्यांच्या अस्तित्वावर, शालिनतेवर शंका निर्माण होते. याचाच अर्थ, समाज व्यवस्थेला आव्हान देण्यासाठी एकट्या-दुकट्यांपेक्षा समुहाची, संघटनेची ताकद व शक्ती प्रभावी ठरत असते.

वरील सर्व बाबींवरुन असे म्हणता येते की, सबलीकरण ही अशी एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये स्त्रिया सामुहिक रुपात आपल्यासाठी 'वेळ आणि स्थळ' शोधत असतात. आपल्या जीवनाला विश्लेषणात्मक रुपाने न्याहाळत असतात. जुन्या समस्यांना नव्या पद्धतीने पहाणे, सभोवतालच्या

वातावरणाचे सर्वांगाने परिक्षण करुन, त्याचे विश्लेषण करणे, स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करणे, स्वतःच्या विचारांत व कृतीत बदल घडवून आणणे, नवनवीन माहिती व तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करणे, आपल्या कार्यकुशलतेमध्ये वाढ करणे, आपली कर्तव्यतत्परता वाढविणे, या व अशा अनेक अंगांनी ती सबलीकरण साकारु शकते. सबलीकरण म्हणजे केवळ बौद्धिक बदल वा परिवर्तन नाही, तर समाजाने त्या परिवर्तनास स्विकारले पाहिजे. घर, गांव, कुटुंब यामध्ये महिलांचा समान सहभाग, भागीदारी निश्चित करणे, त्यांच्या प्राथमिकतेची निवड सामुहिक रुपात होणे, म्हणजे सबलीकरण होय.

अशा विविध अंगांनी आपल्याला असे दिसुन आले की, महिला सबलीकरणाच्या दिशा या सामाजिक व आर्थिक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावतात.

## १.७ महिला सबलीकरणाची गरज :

आजच्या आधुनिक युगात, महिला सबलीकरणाची गरज अतिशय महत्त्वाची आहे. ती का महत्त्वाची आहे, महिला सबलीकरण का गरजेचे आहे, हे खालील विवेचनावरुन स्पष्ट होईल.

- **स्त्रियांच्या स्थितीचा आढावा :**

वेदकाळात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे स्थान मिळत असे. स्त्रियांना स्वतंत्र आध्यात्मिक जीवन होते. विवाहानंतर स्त्रियांना 'पत्नी' म्हणुन आदराचे उच्च स्थान होते. स्त्री ही सर्वश्रेष्ठ गुरु समजली जात होती. हजार शिक्षकांपेक्षा पिता श्रेष्ठ आणि त्यापेक्षाही माता श्रेष्ठ, असे मानले जात होते. अथर्व वेदात, स्त्री पुर्नविवाहाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. बालविवाहाची प्रथा त्या काळात अस्तित्वात नव्हती. सोळाव्या बर्षांनंतर मुलींचा विवाह होत असे, त्यामुळे मुलींच्या शिक्षणाला योग्य कालावधी उपलब्ध होता. मुलींना पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते.

थोडक्यात, वेदकाळात स्त्री व पुरुष यांच्यात फार फरक नव्हता. हे सारे जरी असले तरी स्त्रियांवर अन्याय, अत्याचार होतच नव्हते, असे नाही. त्या काळातही, पुत्र प्राप्तीसाठी मंत्रोच्चारांचे विधी होत असत. पण आजच्या एवढे स्त्रिला दुय्यम स्थान तेव्हा नव्हते व तिला मिळणारी वागणुकसुद्धा आजच्या आधुनिक युगात मिळत आहे, तेवढी कनिष्ठ दर्जाची नव्हती.

त्यानंतरच्या काळात मात्र स्त्रियांची मानसिकता बदलत गेली. स्त्रियांचा समाजातील दर्जा खालावला. स्त्रियांचे या ना त्या कारणांसाठी शोषण होऊ लागले आणि पुरुषांना त्या काळात संख्याधिक्यामुळे

स्थलांतर करण्याची वेळ आली. त्यांची संस्कृती हळुहळु बदलु लागली. जीवन कलह व्यापक झाले, त्यामुळे पुरुष वर्गाचे महत्त्व वाढु लागले. स्त्री दुय्यम व कनिष्ठ दर्जाची समजली जाऊ लागली. स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व व प्रभावी व्यक्तिमत्व लोप पावले. त्यांच्या भरणपोषणाची जबाबदारी पुरुषांनी स्विकारली आणि स्त्रीची तत्त्वसिध्दता सिध्द करण्याच्या चाली आर्य समाजात सुरु झाल्या. पुढे मनुने तर पुरुषाला आई, बहीण व मुलगी यांच्यापासुन सावध रहायला सुचविले. *'स्त्री म्हणजे केवळ दुर्गुणांची खाण'*, असा कलंक मनुने स्त्रियांवर लावला. तेव्हापासुनच स्त्रियांच्या कपाळी पारतंत्र्याचा शिक्का कायमचा लागला गेला.

हिंदुस्थानात इंग्रजांचे राज्य आले आणि हिंदुस्थानातील जनता पारतंत्र्यात गेली. त्याचा परिणाम स्त्रियांवरील अत्याचार वाढण्यातच झाला. स्त्रियांचा दर्जा, या संदर्भात राणी व्हिक्टोरियाच्या कारकिर्दीत प्रख्यात उदारमतवादी, कवी लॉर्ड टेनिसन् यांनी म्हटले आहे, *''पुरुषाला जग आणि बाईला चुल आणि मुल, पुरुषासाठी समशेर आणि बाईसाठी सुई, पुरुष चालणार बुद्धिने आणि बाई चालणार भावनेने, बाकी सारे गौडबंगाल !''* यावरुनच स्त्रियांचा दर्जा लक्षात येतो.

- **स्त्रियांची पारंपारिक जबाबदारी :**

  देशात सर्वच समाजामध्ये मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्त्रीवरच टाकण्यात आलेली आहे. ती जबाबदारी कुठलेही वेतन न घेता, आर्थिक लाभाची अपेक्षा न करता, स्त्री पार पाडताना दिसते. स्त्रियांच्या आयुष्यातील लग्नानंतरचा बराचसा काळ हा मुलांचे पालनपोषण व संगोपन करण्या बरोबरच, घरातील नित्य दळणकांडण, स्वयंपाक, स्वच्छता, आवराआवर, साफसफाई करण्यामध्ये आणि इतर शारीरिक कष्टांची कामे करण्यात जात असतो. विशेषतः, विकसनशील देशातील, ग्रामीण भागातील स्त्रियांनाही घरातील कौटुंबिक जबाबदाऱ्यांबरोबरच शेतीतील कामे करावीच लागतात.

- **स्त्रियांचे कामाचे तास :**

  नेपाळमध्ये स्त्री आठवड्याला पुरुषांपेक्षा एक तास जास्ती काम करते. भारतातील स्त्री आठवड्यात १२ तास काम करते, तर केनियामध्ये ती आठवड्यात ८ तास काम करते. १४ वर्षांची मुलगी घरकामासाठी तिच्याच वयाच्या मुलापेक्षा रोज पाच तास जास्ती काम करते. त्यामुळे स्त्रियांना मनाप्रमाणे आयुष्य जगण्याची संधी मिळण्याच्या मार्गात ही कामे आड येतात. परिणामी, स्त्रियांची प्रगती, विकास खुंटतो. तिचा शिक्षणाच्या बाबतीत गुणात्मक व कौशल्यात्मक दर्जा खालावतो. स्त्री फक्त शारीरिक कष्टाची कामे करुन पुरुषी वर्चस्वाला बळी पडते.

मनुष्य विकास फक्त मिळकत वाढल्याने, शैक्षणिक दर्जा वाढल्याने, चांगल्या आरोग्याने, सबलीकरणाने किंवा शुद्ध वातावरणामुळे होतो, असे नाही, तर त्यासाठी दुसऱ्याबद्दल काळजी, आपुलकी व जिव्हाळा वाटणे, दुसऱ्याच्या सुखासाठीची तळमळ, जास्ती महत्त्वाचे असते. दुसऱ्याबद्दल काळजी, आपुलकी व जिव्हाळा वाटणे, ही क्रिया माणसा-माणसातील मायेपोटी, जिव्हाळ्यापोटी, आपुलकीपोटी व एकमेकांशी जोडल्या गेलेल्या ऋणानुबंधनातून आपसुकच निर्माण होते. एखाद्या व्यक्तिच्या आर्थिक भरभराटीसाठी त्या व्यक्तिच्या आस्थेला, सामाजिक पुनरुत्पादनाच्या क्रियेची जोड द्यावयास हवी. यासाठी स्त्री सबलीकरणाची गरज आहे.

## १.८ महिला सबलीकरणाची आवश्यकता :

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे, भारतात स्त्रीला पुर्वीपासूनच दुय्यम स्थान देण्यात आले आहे. अगदी वैदिक काळतही, काही अपवाद वगळता, स्त्रियांची परवड झाल्याचे दिसते. मध्युगीन कालखंड स्त्री वर्गाच्या दृष्टिने अत्यंत भयंकर समजला जातो. आधुनिक काळातही, पुरुषी वर्चस्वाची मानसिकता पुर्णांशाने संपलेली नाही. पुरुष मंडळी स्त्रीला दुय्यम समजत असल्यामुळे, स्त्री देखील स्वतःला पुरुषाच्या तुलनेत हीन, कनिष्ठ लेखते. संस्कृत भाषेत 'महिला' या शब्दाचा अर्थ 'महान', म्हणजे फार मोठी 'शक्ती' असणारी असा आहे. अशा महान, शक्तिमान असणाऱ्या स्त्रिचे आणखी सशक्तीकरण कशासाठी?

शतकानुशतकांच्या दुर्बलतेमुळे, दास्यत्व भावनेमुळे, दुय्यम स्थानामुळे, महान शक्ति असणाऱ्या स्त्रिची शक्ती कमालीची क्षीण करुन टाकण्यात आली आहे. त्यामुळेच तिच्या सशक्तीकरणाची, सबलीकरणाची आवश्यकता आहे. तसेच, संख्येने जवळजवळ निम्म्या असलेल्या स्त्रियांना समाजात समान स्थान नाही. त्यामुळे तिच्या सशक्तिकरणाची आवश्यकता आहे. आर्थिक स्वावलंबन, निर्णय प्रक्रियेत समान सहभाग, राजकीय क्षेत्रात प्रभावी कामगिरी करता यावी, म्हणुन स्त्रियांचे सबलीकरण करण्याची आवश्यकता आहे. सशक्तीकरणाचा विचार केला तर अनेक घटकांबद्दल वास्तव स्थिती लक्षात येऊ शकते. यावरुन महिलांचे सशक्तीकरण होण्याची आवश्यकता का आहे, याची खात्री पटते. महिला सशक्तीकरण साक्षरता, आरोग्य, समानता, आर्थिक स्वावलंबन, कौटुंबिक जबाबदारी, आर्थिक विकासात महत्त्वाचा घटक, नवीन पिढीला प्रोत्साहन, राजकीय सहभाग, सामाजिक कल्याण, स्त्रियांवरील अत्याचार, राष्ट्रीय उत्पन्न, अर्थार्जन आणि स्त्रिया, या घटकांमध्ये होऊ शकते. त्यांचे मुद्देसुद विश्लेषण पुढे करण्यात आले आहे.

- **साक्षरता :**

  महिलांच्या सबलीकरणाच्या दृष्टिने 'स्त्री साक्षरता' हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. इतर सर्व घटकांचा पाया साक्षरता आहे. प्रत्येक स्त्री साक्षर होणे, ही सशक्तीकरणाची पहिली अट आहे. परंतु भारतात स्त्री साक्षरतेचे प्रमाण काही वर्षांपुर्वी अगदीच नगण्य होते. स्त्रियांच्या साक्षरतेमध्ये येत्या काही वर्षात उल्लेखनिय वाढ झाल्याचे दिसते. १९९१ च्या जनगणनेनुसार, ८४ कोटी ४३ लाख एकुण लोकसंख्येपैकी केवळ ३६ कोटी २४ लाख एवढी जनता साक्षर होती. त्यात महिला साक्षरतेचे प्रमाण केवळ ३९.४२ टक्के इतके होते. स्त्रियांच्या साक्षरतेमध्ये गेल्या काही वर्षात उल्लेखनिय वाढ झाल्याचे दिसते. २००१ च्या जनगणनेनुसार, भारताची लोकसंख्या १०२ कोटी होती. एकुण लोकसंख्येपैकी साक्षरांची संख्या ५६ कोटी होती. असे असले तरी, निम्म्याहुन अधिक स्त्रिया अद्यापही निरक्षर असल्याचे आढळते. हे निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्यासाठी सबलीकरण  केवळ उपयुक्तच नव्हे तर अत्यावश्यक आहे.  सबलीकरण झाल्याने स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण कमी होण्यास नक्कीच मदत होईल आणि त्यावरुन असे सिद्ध होईल की, सबलीकरण आणि साक्षरता हे एकमेकांस परस्पर पुरक आहेत.

- **आरोग्य :**

  भारतीय स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न अत्यंत भीषण स्वरुपाचा आहे. पुरुषांच्या तुलनेत, स्त्रियांच्या आरोग्याकडे पुर्वीपासुनच कमालीचे दुर्लक्ष केले जात आहे. शरीराला आवश्यक असणाऱ्या जीवनसत्वांचा व प्रथिनांचा आवश्यक पुरवठा, आर्थिक चणचण आणि पुरुषी मानसिकता, यांमुळे स्त्रियांचे आरोग्य खालावले आहे. त्यापेक्षाही खेदजनक गोष्ट म्हणजे, स्त्रिया स्वतःच्या आरोग्याकडे बहुतेक वेळा दुर्लक्षच करताना दिसतात. विशेषतः, ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांना, आरोग्याचे गांभीर्य लक्षात न आल्यामुळे, केवळ पोटाची खळगी भरणे, पोटात काहीतरी अन्न ढकलणे आणि घरात व शेतात राब राब राबणे, एवढेच माहित असते. स्त्री ही स्वतःच्या नवऱ्याची, मुलांबाळांची व कुटुंबातील इतरांच्या खाण्यापिण्याची व आरोग्याची काळजी घेते, परंतु स्वतःच्या आरोग्याची पुर्णपणे हेळसांड करते. त्याचाच परिणाम म्हणुन भविष्यात त्यांना विविध व्याधींना सामोरे जावे लागते. आरोग्याच्या समस्या त्यांना कमी वयातच भेडसावु लागतात. त्यामुळे त्यांचे आर्युमान घटते. स्त्रिला आरोग्याच्या बाबतीत सक्षम बनविले, तरच ती जास्तीत जास्त कार्यक्षमपणे व कुशलतेने, आपली कौटुंबिक जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडु शकेल.

- **समानता :**

  'समानता' म्हणजे स्त्रियांना प्रत्येक बाबतीत समतेने वागविणे. शिक्षण, आरोग्य, तिच्या आवडी-निवडी, नोकरी, अशा अनेक क्षेत्रात, स्त्रिला समानतेने वागणुक देण्याची आवश्यकता आहे. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया या पुरुषांच्या बरोबरीने कार्यरत आहेत. त्यामुळे तिला समान दर्जा व वागणुक देण्याची आवश्यकता आहे. परंतु वास्तवात तसे घडताना दिसत नाही. बऱ्याचदा स्त्रिला प्रत्येक क्षेत्रात दुय्यम व कमी दर्जाची वागणुक दिली जाते. ही विषमता नष्ट करण्यासाठी, तिचा सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी, तिच्या सबलीकरणाची गरज आहे.

- **आर्थिक स्वावलंबन :**

  आज प्रत्येक स्त्रिला आर्थिक स्वावलंबनाची गरज आहे. स्त्री आर्थिकदृष्ट्या सक्षम, सबल झाल्यास ती स्वतःच्या आरोग्याची, तसेच, आपल्या कुटुंबाच्या आरोग्याची व्यवस्थित काळजी घेऊ शकेल. तिचे आरोग्य व्यवस्थित असेल तरच तिला सैनिकी व पोलीस क्षेत्रात अनेक शिक्षणाच्या संधी प्राप्त होऊ शकतील. ती आपल्या वैयक्तिक समस्या व अडचणी स्वतःच सोडवु शकते. तसेच, नोकरी-व्यवसाय करुन, ती आपल्या कुटुंबाला आर्थिक मदत करु शकते. मानसिक समाधान, योग्य शारीरिक वाढ झाल्याने, विविध क्षेत्रात ती उत्साहाने व कार्यक्षमतेने आपले कर्तव्य बजावु शकते. त्यामुळेच स्त्रिला शारीरिक, मानसिक व आर्थिक सक्षमीकरणाची आवश्यकता आहे.

- **कौटुंबिक जबाबदारी :**

  स्त्रिला अनेक स्तरांमध्ये विविध जबाबदाऱ्या व कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्यात सर्वात महत्त्वाची जबाबदारी म्हणजे कौटुंबिक जबाबदारी. कौटुंबिक जबाबदारी हे स्त्रिचे आद्यकर्तव्य असते. आपल्या अपत्यांचे पालनपोषण व संगोपन, पतीचे आरोग्य, कुटुंबियांमधील एखाद्या व्यक्तीचे अपंगत्व, नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यु, अशा अनेक गोष्टींना तिला एकटीलाच सामोरे जावे लागते. ते सामर्थ्य व  शक्ति तिला सबलीकरणातुनच प्राप्त होऊ शकते.

- **आर्थिक विकासात महत्त्वाचा घटक :**

  आर्थिक विकासात उत्पादनाच्या प्रमुख चार घटकांपैकी 'श्रम' हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. श्रम ह्या घटकात, स्त्री व पुरुष यांचा विचार प्रामुख्याने येतो. पुरुषांप्रमाणेच स्त्रियासुद्धा प्रत्येक क्षेत्रात तितकेच महत्त्वाचे कार्य करतात. शेती, शैक्षणिक, उद्योग-व्यवसाय,  सामाजिक, राजकीय, हवाई सेवा, धार्मिक व अध्यात्मिक क्षेत्र, अशा विविध क्षेत्रांमध्ये स्त्रिया महत्त्वाचे कार्य करतात. त्यामुळे तिच्या व पर्यायाने, सामाजिक व राष्ट्राच्या आर्थिक विकासात वाढ होण्यासाठी, स्त्री सबल होणे आवश्यक आहे.

- **नवीन पिढीला प्रोत्साहन :**

  नवीन पिढी घडविण्याचे महत्त्वाचे कार्य स्त्रिया अगदी सहज, अजाणतेपणे करत असतात. उदा. घरातच आपल्या मुलांवर चांगले संस्कार करणे, त्यांना शिस्त लावणे, खोटे बोलू नये, चोरी करु नये, कोणाला फसवु नये, अशा नैतिकतेचे धडे देणे, आपल्या योग्य चालीरिती, रुढी व परंपरांची सांस्कृतिक ओळख मुलांना करुन देणे, व्यवहाराचे ज्ञान देणे, विविध विषयांवर मार्गदर्शन करणे, त्यांच्याशी विविध विषयांवर मोकळेपणाने, 'मैत्रीण' या नात्याने गप्पा मारणे, त्यांची चेष्टामस्करी, विनोद करणे, अशा विविध प्रकारे, एक स्त्री, आई, बहीण व मैत्रीण बनुन, आपल्या मुलाबाळांचा मानसिक, बौद्धिक व अध्यात्मिक विकास अप्रत्यक्षपणे साधुन, त्यांना सतत प्रोत्साहित करत असतात. स्त्री जर सर्व क्षेत्रात सबल असेल तरच हे करु शकते, म्हणुन स्त्री सबलीकरण गरजेचे आहे.

- **राजकीय सहभाग :**

  इतर सर्व क्षेत्रांप्रमाणे राजकीय क्षेत्रातही स्त्रियांची परवड झाली आहे. महिला आरक्षण विधेयक, गेल्या अनेक वर्षांपासुन निर्णयाशिवाय भिजत पडुन आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, ते पारित करण्यासाठी संसदेत दोन्ही सभागृहांमध्ये महिलांचे आवश्यक असणारे संख्यात्मक बळ पुरेसे नाही. १९९९ च्या आकडेवारीनुसार, लोकसभेत एकुण ५४३ जागांपैकी, महिला खासदारांची संख्या, केवळ ४३ इतकी होती. अर्थातच, केवळ ७.९ टक्के स्त्रियांना, देशातील ५० टक्के स्त्रियांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळत आहे. राज्यसभेतही फार चांगली परिस्थिती आहे, असे नाही. १९९९ च्या आकडेवारीनुसार, राज्यसभेत एकुण २३७ जागांपैकी, केवळ २२ महिला खासदार होत्या. त्यामुळे राजकीय क्षेत्रात महिलांची संख्या वाढणे गरजेचे आहे, ही परिस्थिती सुधारण्यासाठी महिला सबलीकरण आवश्यक आहे.

- **सामाजिक कल्याण :**

  समाजाचे कल्याण घडवुन आणायचे असेल तर स्त्रियांचा विकास फार महत्त्वाचा आहे. जेव्हा स्त्रियांच्या विकासात वाढ होईल, म्हणजेच, प्रत्येक कुटुंबात स्त्रियांना निर्णय घेण्याची संधी, समान हक्क व तिचा सहभाग वाढेल, तेव्हाच, तिच्या सबलीकरणात घरापासुनच सुरुवात होईल. तिचे शिक्षण, आरोग्य, व्यक्तिमत्व विकास, उद्योग वा व्यावसायिक प्रशिक्षणात समान संधी आणि समान रोजगार, अशा अनेक बाबतीत वाढ झाल्यास तिचे कल्याण होईल. अशा अनेक स्त्रिया घडल्या म्हणजे आपोआपच अख्खा समाज घडेल व त्यातुन सामाजिक कल्याणात वाढ होईल. त्यासाठी तिचे सबलीकरण होणे पर्याप्त आहे.

- **स्त्रियांवरील अत्याचार :**

  स्त्रियांवरील अत्याचाराचा विचार केला तर ग्रामीण व शहरी अर्थार्जन करणाऱ्या, नोकरी-धंदा-व्यवसाय करणाऱ्या, घरकाम करणाऱ्या, अशा सर्व स्तरांमधील स्त्रियांना शारीरिक व मानसिक अत्याचारांना तोंड द्यावे लागते. हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, बलात्कार, स्त्री भृण हत्या, असमान वेतन, अशा अत्याचारांशी सामना भारतातील अनेक स्त्रियांना सतत करावा लागतो.

  केंद्र सरकारद्धारा, २७ जानेवारी १९९३ रोजी 'महिलांच्या विरुद्ध हिंसा' या विषयावर, एक अहवाल प्रकाशित करण्यात आला. त्यानुसार, भारतात प्रत्येक ५४ मिनिटांत, एका महिलेवर बलात्कार होतो. याचाच अर्थ असा की, एका महिन्यात ८०० तर वर्षभरात ९,६०० स्त्रियांना बलात्कारासारख्या लैंगीक, अमानवी अत्याचारांना बळी पडावे लागते. स्त्री भृणहत्येनेही नवीन समस्यांना वाचा फोडली आहे. जन्माला येण्यापुर्वीच, एक स्त्री जीव गर्भावस्थेतच नष्ट करणे, ही एक नवीन सामाजिक विकृती निर्माण झाली आहे. त्याचाच विपरित परिणाम म्हणजे, लोकसंख्येतील स्त्री-पुरुष प्रमाणात असंतुलन निर्माण झाले आहे. दर हजारी पुरुषांमागे स्त्रियांची संख्या सातत्याने घटत आहे. २००१ च्या जनगणनेनुसार, 0 ते ६ वयोगटातील बालकांमागे स्त्री बालकांची संख्याही सातत्याने घटत आहे. १९९१ मध्ये दर हजारी मुलांमागे ९४५ मुली हे प्रमाण, २००१ मध्ये दर हजारी मुलांमागे ९२७ मुली असे झाले आहे. हा समाजाला धोक्याचा इशारा आहे. अशा स्त्री-पुरुष असंतुलनामुळे स्त्रियांची विक्री होण्याची समस्या उत्तर भारतात आढळुन आली आहे. ह्या प्रकारच्या समस्या कमी होण्यासाठी, महिला सबलीकरण होणे आवश्यक आहे.

- **राष्ट्रीय उत्पन्न :**

  राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवुन आणायची असेल तर स्त्रियांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणे गरजेचे आहे. आज स्त्रियाही आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचुन, विविध क्षेत्रात, आपली कार्यकुशलता, कर्तबगारी व कर्तृत्व सिद्ध करताना दिसतात. तसेच, परकिय गंगाजळीत भर टाकण्यातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे देशांतर्गत उत्पन्न व आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील विकासाने, राष्ट्रीय उत्पन्नात देखील वाढ होताना दिसते. स्त्री सबलीकरणामुळे हे सहज शक्य आहे.

- **अर्थार्जन आणि स्त्रिया :**

  स्त्रियांना अर्थार्जन करण्याची संधी मुळातच कमी प्रमाणात मिळते आणि मिळालीच तर एकाच कामासाठी पुरुषांना जास्ती वेतन व स्त्रियांना त्यापेक्षा कमी वेतन, अशी वेतन विषमता बऱ्याच क्षेत्रात आढळुन येते. 'समान काम, समान वेतन' या कायद्यानुसार, समान कामासाठी, समान

वेतन देणे बंधनकारक आहे. परंतु, त्याची अंमलबजावणी सर्वत्र होताना दिसत नाही. केवळ शहरी भागातच वेतनातील हा फरक केला जातो असे नाही, तर ग्रामीण भागातदेखील स्त्री मजुरांना कमी वेतन दिले जाते. एवढेच नव्हे तर नोकरीत त्यांना बढतीसुद्धा डावलली जाते.

वरील सर्व घटकांचा विचार करता आपल्याला असे दिसुन येते की, समाजात महिला सबलीकरण केवळ महत्त्वाचेच नसुन, अपरिहार्यसुद्धा आहे.

## १.९ महिला सबलीकरण आणि शिक्षण :

महिला सबलीकरणात, 'शिक्षण' हा मौलिक घटक आहे. पुर्वीपासुनच भारतात कशा प्रकारचे शिक्षण देण्यात येत होते आणि त्यात कशा पद्धतीने बदल होत गेला. तसेच, महिला सबलीकरणात शिक्षण कशा प्रकारची भुमिका बजावते, ते पुढे मांडले आहे.

- **स्वातंत्र्यपुर्वकालीन शिक्षण :**

स्वातंत्र्यपुर्वकाळ म्हणजे इंग्रज भारतात आल्यानंतरची परिस्थिती होय. या काळातील शिक्षणाचा विचार करता, आपल्याला असे समजते की, ब्राह्मण व क्षत्रिय वर्गातील पुरुषांचे शिक्षणसुद्धा मंदावत चालले होते. ते निर्जीव व अर्थहिन झाले होते. राज्यकारभार चालविण्यास योग्य असे शिक्षण देणाऱ्या संस्था त्या काळात अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळेच पाश्चात्य लोकांनी भारतात येऊन त्यांच्या सत्तेखालील प्रदेशातील थोड्या होतकरु लोकांना, आपल्या पद्धतीचे शिक्षण देण्यासाठी शाळा सुरु केल्या. आपल्या राज्यकारभारास उपयोगी ख्रिस्ती धर्माच्या प्रसारार्थ, काही ठिकाणी शाळा सुरु केल्या. त्यांचा हेतु कोणता का असेना, पण इथल्या मुलांना शिक्षणाची द्वारे उघडी झाल्याची बाब अतिशय महत्त्वाची व आवश्यक होती.

इंग्रजी सत्तेच्या राज्यकर्त्यांनी, भारतातील लोकांसाठी, शिक्षण मंदिराचे द्वार खुले केले, पण भारतातील स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत मात्र त्यांनी तटस्थता दर्शविली. कारण भारतातील स्त्रियांना शिक्षण देणे, म्हणजे भारतीय लोकांच्या धर्मात ढवळाढवळ करणे होय, असे इंग्रज राज्यकर्त्यांचे मत झाले होते. भारतीय कुटुंबातील पुरुषांनासुद्धा आपल्या कुटुंबातील मुलींनी, शिक्षणाच्या निमित्ताने घरा बाहेर पडावे, असे अजिबात वाटत नव्हते.

ब्रिटिशांची सत्ता मद्रास (आताचे चेन्नई), बंगाल, बॉम्बे (आताची मुंबई) या प्रांतांवर स्थापित झाल्यानंतर, त्यांनी येथील जनतेच्या शिक्षणाकडे लक्ष दिले. परंतु ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी जे मिशनरी भारतात आले होते, त्यांनी शिक्षणाच्या संधी भारतातील लोकांना उपलब्ध करुन देण्यास या पुर्वीच सुरुवात केलेली होती. कंपनी सरकारचा याच गोष्टीला विरोध होता. त्यामुळे भारतीयांना शिक्षण कोणी व कश्या प्रकारचे द्यावे, यात मतभेद निर्माण झाले. मिशनरींना भारतीय लोकांना आंग्ल पद्धतीचे व भौतिक ज्ञान देणारे शिक्षण द्यावयाचे होते, तर कंपनी सरकारला पौर्वात्य पद्धतीच्या शिक्षणाबरोबरच पाश्चात्य शिक्षण द्यावेसे वाटत होते. शेवटी पौर्वात्य शिक्षणाबरोबर पाश्चात्य शिक्षणही देण्यात यावे, असा निर्णय झाला. याबाबतीत प्रथम चार्लस् ग्रँट आणि राजाराम मोहन रॉय यांनी असे सुचविले की, प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षण इंग्रजी भाषेत देण्यात यावे. त्यामुळे  लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शक्य तेथे सरकारने शाळा सुरु केल्या. इतरत्र मात्र, मिशनरींनी आणि काही भारतीयांनी स्वतःच्या जबाबदारीवर शाळा चालविण्यास ब्रिटिश सरकारने हरकत घेऊ नये, असे धोरण आखुन, मोठ्या शहरांमध्ये श्रीमंत व उच्चजातीय वर्गातील मुलांसाठी शाळा सुरु केल्या.

त्यावेळी मुंबई प्रांताचा मुख्याधिकारी, माउंट एल्फिंस्टन, याने पाश्चात्य शिक्षणाच्या प्रसारार्थ, मुंबई येथे ‘द बॉम्बे नेटीव्ह एज्युकेशन सोसायटी’ या नावांने एक शैक्षणिक संस्था स्थापन केली. या अधिकाऱ्याच्या शिफारशीनेच, संस्थेला आर्थिक सहाय्य मिळाल्यामुळे, भारतात, तेथुन पुढे म्हणजे १८४० साला पर्यंत पाश्चात्य शिक्षणाचा भरपुर प्रसार झाला. मुंबई, ठाणे, पनवेल व पुणे या चार ठिकाणी इंग्रजी व इतर विषयांचे शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्याही वाढली. त्याचप्रमाणे, जिल्ह्याच्या ठिकाणी व इतर मोठ्या गावांमधुन प्राथमिक शाळा स्थापण्यात येऊन, या शाळांमधुन, मातृभाषा, प्राणीशास्त्र, बीजगणित, भूमिती, त्रिकोणामिती, अशा विषयांचे शिक्षण भारतीय मुलांना मिळु लागले.

भारतातील मुलांना शिक्षणाचा लाभ मिळु लागला, पण, मुलींच्या शिक्षणाचे काय? त्यासाठी १८५० साली, लॉर्ड डलहौसीने, मुलांप्रमाणेच मुलींनाही शिक्षण देण्यासंबंधी, सरकारचा पाठिंबा असल्याचे धोरण जाहिर केले. परंतु त्यापूर्वीच म्हणजे १८२४ सालात, अमेरिकन मिशनच्या लोकांनी भारतीय मुलींच्या शिक्षणासाठी मुंबई शहरात एक स्वतंत्र शाळा सुरु केली होती. नंतर त्यांनी मुलींच्या शाळांची संख्या वाढवुन, मुलींच्या शिक्षणासाठी, विशेष प्रयत्न सुरु केले. इ.स. १८२९ साली डॉ. विल्सन् आणि त्यांच्या पत्नी यांनी मुंबईत फक्त मुलींसाठी सहा शाळा सुरु केल्या.

इ.स. १८५१ मध्ये महात्मा जोतिराव फुले आणि त्यांच्या सुविद्य पत्नी, सावित्रीबाई फुले यांनी मुलीसांठी, पुण्यातील भिंडे वाड्यात पहिली शाळा सुरु केली. इ.स. १८८४ मध्ये सर विल्यम् वेडरबर्न या आंग्ल सत्पुरुषाला मुलींच्या उच्च शिक्षणासाठी पुण्यात शाळा सुरु करण्याची सत्बुद्धि झाली. *"स्त्रियांना योग्य असे उच्च प्रतीचे शिक्षण मिळाल्याशिवाय भारताची उन्नती व्हावयाची नाही"*, असे त्यांना मनापासुन वाटत होते. त्यांनी आपले स्वर्गवासी बंधु, सर डेव्हीड वेडरबर्न यांच्या स्मरणार्त १०,००० रुपयांची देणगी देऊन, पुण्यामध्ये 'हायस्कुल फॉर नेटीव्ह गर्ल्स', या शाळेची, २९ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापना केली. त्यानंतरच्या काळात, भारतात शहरांबरोबरच, मोठ्या गावांमधुन, लहान लहान खेड्यावाड्यातुन मुलांबरोबरच, मुलींच्या शाळांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढत गेली. त्यामध्ये लोकमान्य टिळक, गोखले, आगरकर, महादेव रानडे, अशा तेव्हाच्या अनेक उच्चशिक्षित, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तिंनी पुणे, मुंबई, सांगली सारख्या ठिकाणी मुला-मुलींच्या शिक्षणासाठी शाळा, महाविद्यालये सुरु केली. दिनांक १४ जून १८९६ रोजी, महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी, 'अनाथ बालिकाश्रमाची मंडळी' या नावांची संस्था पुण्यात स्थापन केली. आज त्या संस्थेचे खूपच मोठे स्वरुप, 'महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था', कर्वेनगर, पुणे, येथे पहावयास मिळते.

- **स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री शिक्षण :**

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळापुर्वी व नंतरही स्त्रिला दुय्यम स्थान दिले जात होते. जीवनातील अनेक महत्त्वपुर्ण मुद्यांच्या निर्णय प्रक्रियेत महिलांना *'तिला काही कळत नाही'*, या हीन सबबीवर शिक्षणापासुन दूर ठेवण्यात आले, *'शाळा शिकून काय करायचे आहे, शेवटी चुल आणि मुलच सांभाळायचे आहे'*, *'मुलींनी एकटीने घराबाहेर पडू नये,'* अशा जुनाट चालीरितींनी व पुरुषप्रधान संस्कृतीने, मुली व स्त्रियांना जाणुन बुजून शिक्षणापासुन दुर ठेवले आहे. स्त्रियांवर होणारे अत्त्याचार आणि अपराध, निरंतर वाढत जाण्याचे प्रमुख कारण म्हणजे साक्षरता दरातील वाढती स्त्री-पुरुष विषमता असुन, प्रतिहजार पुरुषांमागे सतत घटत जाणारे स्त्रियांचे प्रमाण होय.

स्वातंत्र्योत्तर काळातदेखील, आज ६०-६५ वर्षांनतर, महिला साक्षरतेची समस्या देशाच्या प्राथमिक समस्येत समाविष्ट केली गेली नाही. संपुर्ण जगभरात प्राथमिक शिक्षणापासुन वंचित असलेल्या मुलांमध्ये ३/५ भाग मुलींचा आहे. भारतात शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण खूपच कमी आहे. तसेच, त्यामध्येही इयत्ता चौथीनंतर पाचव्या वर्गात जाण्यापुर्वीच, बऱ्याच मुलींची शाळा, आजही ग्रामीण व आदिवासी भागात बंद केली जाते. त्यांना शाळेत न पाठविता घरकामाला वा मोलमजुरीसाठी शेतात जुंपले जाते. त्यामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांमध्ये शिक्षणाचे एकंदरच प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, १७४ देशांच्या यादीत, महिला साक्षरतेच्या बाबतीत, भारत हा देश झिंबाब्वे, पाप्युआ, न्युगिनी, म्यानमार आणि इराक या कमी विकसीत देशांच्याही मागे आहे.

खालील तक्त्यात, भारतातील, सन १९५१ ते २०११ या कालावधीतील 'स्त्री-पुरुष साक्षरता' दर्शविली आहे.

तक्ता क्र. १.१

भारतातील स्त्री-पुरुष साक्षरता दर (सन १९५१ ते २०११)

| साल | एकूण साक्षरता (टक्के) | स्त्री साक्षरता (टक्के) | पुरुष साक्षरता (टक्के) | स्त्री साक्षरता दशवार्षिक वाढ (टक्के) | पुरुष साक्षरता दशवार्षिक वाढ (टक्के) | स्त्री साक्षरता दरातील फरक (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | १८.३३ | ८.८६ | २७.१६ | - | - | १८.३० |
| १९६१ | २८.३० | १५.३५ | ४०.६० | ६.४९ | १३.२४ | २५.०५ |
| १९७१ | ३४.४५ | २१.९७ | ४५.७६ | ६.६२ | ५.५६ | २३.९९ |
| १९८१ | ४३.५७ | २९.७६ | ५६.३८ | ७.७९ | १०.४२ | २६.६२ |
| १९९१ | ५२.२१ | ३९.२९ | ६४.१३ | ९.५३ | ७.७५ | २४.८४ |
| २००१ | ६५.३८ | ५४.१६ | ७५.८५ | १४.८७ | ११.७२ | २१.६९ |
| २०११ | ७४.०४ | ६५.४६ | ८२.१४ | १८.१२ | ६.२९ | १६.६८ |

*स्त्रोत : योजना, ऑगस्ट २०१३.*

वरील तक्ता क्र. १.१ वरुन असे निदर्शनास येते की, भारतात सन १९५१ मध्ये एकुण साक्षरता दर १८.३३ टक्के एवढा होता. तो वाढुन २०११ मध्ये ७४.०४ टक्के इतका झाला आहे. १९५१ ते २०११ या कालावधीत, पुरुष साक्षरता दर २७.१६ टक्क्यांवरुन ८२.१४ टक्क्यांपर्यंत गेला आहे. याचाच अर्थ, भारतात पुरुष साक्षरता दर ५४.९८ टक्क्यांनी वाढला आहे. मात्र स्त्री साक्षरतेचा दर हा, पुरुष साक्षरता दरापेक्षा नेहमीच कमी राहिला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, स्त्री-पुरुष साक्षरता दरातील ही तफावत, १९५१ सालात १८.३० टक्के होती, ती वाढुन १९८१ मध्ये ती २६.६२ टक्क्यांवर पोहचली. मात्र त्यानंतरच्या कालावधीत, ही तफावत थोडी कमी होऊन, २०११ मध्ये ती १६.६८ टक्क्यांवर घसरल्याचे दिसते. स्त्री सबलीकरणाच्या दृष्टिकोनातुन एक महत्त्वाची बाब म्हणजे, स्त्री साक्षरता दशवार्षिक वाढीचा दर हा सातत्याने वाढत गेल्याचे आढळते. स्त्री साक्षरता वाढीचा दर १९६१ मध्ये ६.४९ टक्के होता, तो वाढुन २०११ मध्ये १८.१२ पर्यंत पोहचला. यावरुन असे स्पष्ट होते की, या कालावधीत शिक्षण घेण्याच्या बाबतीत तरी, स्त्री व पुरुष समानता मान्य केली जात आहे. ही गोष्ट स्त्री सबलीकरणाच्या

दृष्टिने अनुकुल असल्याचे दिसते. भारतातील राज्यांनुसार स्त्री-पुरुष साक्षरता प्रमाणाचा विचार केला तर असे दिसते की, भारतात राज्यांतर्गत साक्षरता दरातील विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. देशात केरळ राज्यात एकुण साक्षरता दर आणि स्त्री-पुरुष साक्षरता दर सर्वाधिक आहे, तर बिहार राज्यात तो सर्वात कमी आहे.

राज्यांतर्गत स्त्री-पुरुष साक्षरता दरातही प्रचंड प्रमाणात तफावत असल्याचे दिसते. देशात सर्वात कमी स्त्री-पुरुष साक्षरता दरातील सफावत २००१ सालात, मिझोरम या राज्यात ४.५६ टक्के एवढी आहे, तर सर्वाधिक स्त्री-पुरुष साक्षरता दरातील तफावत, राजस्थान राज्यात त्याच सालात ३२.१२ टक्के एवढी असल्याचे आढळते. देशात केरळ राज्यात स्त्रियांचे साक्षरता प्रमाण पुरुषांच्या प्रमाणापेक्षा अधिक असुनही व साक्षरता दर अधिक असुनही, स्त्री साक्षरता दर मात्र, पुरुष साक्षरता दरापेक्षा कमीच आहे. एवढेच नाही तर, प्रत्येक राज्यातील स्त्री साक्षरता दर हा पुरुष साक्षरता दरापेक्षा सर्वच ठिकाणी कमी असल्याचे जाणवते. महाराष्ट्र राज्यातील शिक्षणाच्या पातळीनुसार, मुलांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण, तक्ता क्र. १.२ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. १.२

महाराष्ट्र राज्यातील शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण (सन २००७)

| शैक्षणिक पातळी | विद्यार्थी संख्येतील मुलींचे प्रमाण (टक्के) |
|---|---|
| • प्राथमिक | ४८.० |
| • माध्यमिक | ४६.० |
| • महाविद्यालयीन | ४३.० |
| • इतर उच्च शिक्षण | ४०.० |

*स्त्रोत : महाराष्ट्र २००८, संतोष दास्ताने, पृ. क्र. ५४.*

वरील तक्ता क्र. १.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या एकुण विद्यार्थी संख्येपैकी ४८.० टक्के प्रमाण मुलींचे आहे. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण ४६ टक्के तर इतर उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण ४०.० टक्के असल्याचे दिसते. याचाच अर्थ, प्राथमिक शिक्षण ते उच्च शिक्षण, या दरम्यान मुलींमधील शिक्षणाचे प्रमाण घटत गेल्याचे आढळते. हे प्रमाण वाढण्यासाठी या नंतरच्या काळात, २००१ सालापासुन, विविध योजना व शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातुन विशेष प्रयत्न सुरु करण्यात आल्याचे दिसते.

महाराष्ट्र राज्यात, १९८३-८४ या सालापासुन, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींच्या शिक्षणासाठी पालकांना आर्थिक मदत व्हावी, यासाठी 'सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना' सुरु करण्यात आली. २००१ सालात, राज्यात सुमारे ३ लाख मुली, या योजनेचा लाभ घेत होत्या. काही अटींवर मुलींना बारावीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचे धोरणही अंमलात आले असुन, यापुर्वीच मुलींना दहावीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जात आहे.

२००१ सालात, राज्यातील मागासवर्गीय मुलींसाठी, १०१ शासकीय वसतीगृहांना मान्यता देण्यात आलेली असुन 'कमला नेहरु' वसतीगृहांमुळे २,००० मागासवर्गीय मुलींच्या निवासी शिक्षणाची सोय झाल्याचे दिसते. या शिवाय, सर्व तालुका-गावांमध्ये मुलींसाठी 'प्रियदर्शनी वसतीगृहांची' उभारणी करण्यात आलेली आहे. राज्यातील आदिवासी भागात, निवासी तत्त्वावर ३२७ निवासी आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. त्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीतील मुलांचा शैक्षणिक व सामाजिक विकास व्हावा, या उद्देशाने, त्यांच्या निवासाची व शिक्षणाची व्यवस्था एकाच ठिकाणी करण्यात आली आहे. राज्यात अनेक ठिकाणी, प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरांवर, आश्रमशाळा चालविल्या जात आहेत. त्यात कोणत्याही समाजाचे अनिवासी विद्यार्थी दाखल होऊ शकतात. मात्र फक्त भटक्या व विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्यांना तेथे निवासाची सोय करण्यात आली आहे.

मुला-मुलींना पुर्णवेळ प्रशिक्षित व इतर कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली मोफत शिक्षण दिले जाते. स्वयंसेवी संस्था, अशा प्रकारच्या आश्रम शाळा चालवित असल्यास, महाराष्ट्र शासन, त्यांना आर्थिक अनुदान, गणवेष, लेखनसाहित्य, वह्या-पुस्तके, असे शिक्षणसाहित्य देऊन मदत करीत असते. तसेच, ठिकठिकाणा बालवाड्या, अंगणवाड्या, पाळणाघरेही, उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. आदिवासी मुलांना माध्यमिक शाळेतील शिक्षणासाठी, शिक्षण साहित्याबरोबरच, विद्यावेतनाचीही सोय करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, आदिवासी व दुर्गम, डोंगराळ भागातील शिक्षकांकरीता विशेष आर्थिक प्रोत्साहन व पगारही दिले जातात. त्यांच्या प्रशिक्षणासाठी अंशकालीन वर्गही चालविले जातात. अशा प्रकारे मुला-मुलींच्या शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी, शासन विशेष प्रयत्न करीत आहे. तसेच, ग्रामीण आदिवासी भागातील मुला-मुलींच्या शिक्षणाच्या पातळीत व विद्यार्थी संख्येत वाढ होण्यासाठी, शासन उपयुक्त पावले उचलित आहे. त्यांच्या प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षणात व उच्चशैक्षणिक दर्जात वाढ होण्याच्या दृष्टिनेही शासनाकडुन विविध योजना व कार्यक्रमांची आखणी होत आहे. या योजनांच्या माध्यमातुन एक प्रकारे स्त्री-सबलीकरणाकडे, योग्य ती वाटचाल सुरु झाल्याचे दिसते.

- **महिला सबलीकरणात शिक्षणाची भुमिका :**

स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान बदलण्यासाठी 'शिक्षण' हे अत्यंत महत्त्वाचे आणि उपयुक्त माध्यम आहे. १९९८-९९ च्या जागतिक अहवालात, 'स्त्री शिक्षण' हे तिच्या व समाजाच्या आर्थिक विकासासाठी सहाय्यभुत तर ठरतेच, शिवाय, तिचा सर्वांगीण विकास होण्यासाठी ते आवश्यकसुद्धा असल्याचे नमुद केले आहे. त्याच बरोबर, प्रजनन कमी करणे, मुलांचे योग्य पद्धतीने पालन पोषण व संगोपन करणे, स्वतःचे व कुटुंबियांचे आरोग्य नीट ठेवणे, कुटुंबात व समाजिक विविध क्षेत्रात, आपल्या कार्यस्थळी वातावरण खेळीमेळीचे ठेवण्यात, व्यावहारीक ज्ञान उंचावण्यातही शिक्षण उपयुक्त ठरते. शिक्षणामुळे स्त्री सुशिक्षित तर होतेच, पण त्याच बरोबर, सुसंस्कृत, कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर, कार्यकुशल होऊन, तिच्या सुप्त दैवी गुणांचाही विकास होतो. तिच्या व्यक्तीमत्त्वाला, तिच्या अस्मितेला, तिच्या आत्मसम्मानतेला नवीन आकार येऊन, ती कौटुंबिक व सामाजिक क्षेत्रात यशस्वी होऊ शकते.

थोडक्यात, आधुनिक व्यावहारीक व गतीमान युगाशी जुळवून घेण्याची तिची क्षमता व सामर्थ्य वाढु शकते. भारतीय सामाजिक शास्त्र परिषदेमध्ये, शैक्षणिक धोरणांसंदर्भात, असे नमुद करण्यात आले की, *''शिक्षणाचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट, समाजाला आधुनिक बनविणे होय. आधुनिकीकरणाच्या माध्यमातून स्त्रियांचे सशक्तिकरण करणे, हा एक महत्त्वाचा घटक आहे.''* स्त्री शिक्षणाबद्दल, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी, ३० मार्च १९८४ रोजी, नवी दिल्लीत झालेल्या, सातव्या, अखिल भारतीय मुस्लिम शिक्षण संमेलनात, आपले विचार व्यक्त केले होते. त्यांच्या मते, *''वर्तमान सामाजिक रचनेमध्ये स्त्रियांवर खुप मोठे ओझे आहे. कारण स्त्रिया घर चालवितात, तशाच त्या नवीन पिढी घडविण्यातही महत्त्वपुर्ण भुमिका बजावतात. एवढेच नाही तर, त्या इतर कौटुंबिक व सामाजिक क्षेत्रात पुरुषांना हातभारदेखील लावतात. यासाठी शिक्षण अतिशय महत्त्वाचे ठरते. यातुनच स्त्रीमध्ये स्वावलंबनाची व स्वाभिमानाची भावना जागृत होते.''*

वरील सर्व विवेचनावरुन, महिलांच्या सशक्तीकरणात शिक्षणाचे महत्त्व किती व कसे आहे, हे लक्षात येते. शिक्षणामुळे स्त्रियांचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. हा विकास पुढील काही घटकांद्वारे स्पष्ट होऊ शकतो.

- *आत्मविश्वासाची निर्मिती :*

स्त्रियांच्या अंगी शिक्षणामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. तिला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होते. एखाद्या उच्चशिक्षित महिलेचे व्यक्तीमत्व, तिची वक्तृत्वकला, वाक्चातुर्य, संभाषण, तिचा

सुसंस्कृतपणा, तिचे शिष्टाचार, कोणाही एका व्यक्तीवर नव्हे तर प्रचंड समुदायावर आपले प्रभुत्व पाडु शकते. शिक्षणामुळे स्त्री अधिक सखोलपणे, तर्कशुद्ध व व्यापक विचार करुन, त्याप्रमाणे आचरण करु शकते. तिच्यात निर्माण झालेला दृढ आत्मविश्वास, तिच्या प्रत्येक सकारात्मक कृतीतुन प्रत्ययास येतो. त्यामुळेच अशा स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात आपला ठसा उमटविण्यात यशस्वी होतात.

- ***नोकरी व्यवसायासाठी उपयुक्त :***

  शिक्षणामुळेच विविध क्षेत्रांमध्ये, स्त्रियांच्या अर्थार्जनाचे अनेक मार्ग खुले होतात. विविध प्रकारच्या नोकऱ्या, व्यवसाय व उद्योग करण्यासाठी शिक्षण उपयुक्त ठरते. वैद्यकीय, कला, क्रिडा, वाणिज्य, संगणकीय, अभियांत्रिकी, विज्ञान, अशा कोणत्याही क्षेत्रात, सुशिक्षित स्त्री यशस्वी होऊ शकते. आधुनिक युगातील, गतीमान जगातील, समाजाच्या प्रवाहात ती सहज सहभागी होऊ शकते. प्रशासन, नियोजन, संघटन, नेतृत्व, अशा विविध गुणांचा विकास, स्त्रीच्या आयुष्यात, केवळ शिक्षणामुळेच होऊ शकतो.

- ***स्व-अधिकार व हक्कांची जाणीव :***

  राज्य घटनेने बहाल केलेले अधिकार असोत किंवा स्त्रियांचे मुलभूत हक्क असोत, ते योग्य त्या पद्धतीने प्राप्त करुन घेण्याची क्षमता, पात्रता व प्रेरणा, स्त्रियांना शिक्षणामुळेच येऊ शकते. सुशिक्षित स्त्री, ही अशिक्षित स्त्रीपेक्षा अधिक जागरुक, सतर्क व सकारात्मक असते. तिची निर्णयक्षमता, आकलन शक्ती, व्यापक विचार, तिला विविध क्षेत्रात प्रगतीच्या वाटा निर्माण करते. त्यामुळेच तिला, तिच्या घटनात्मक अधिकार व मुलभूत मानवी हक्कांपासुन दूर ठेवणे, एका पुरुषालाच नव्हे तर पुरुषी सत्तेला अतिशय अवघड जाते. त्यामुळे तिच्या वाटेला जाण्याचा, कोणीही पुरुष, प्रयत्नसुद्धा करु शकत नाही, एवढी शिक्षणात ताकद व क्षमता आहे.

- ***आरोग्याची काळजी :***

  शिक्षणामुळे स्त्रिला स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्यास प्रेरणा मिळते. ग्रामीण व आदिवासी भागातील स्त्रियांपेक्षा, शहरी भागातील सुशिक्षित व उच्चशिक्षित स्त्रिया, आपल्या आहार व आरोग्याबाबत जास्ती जागरुक असतात. स्वच्छता, नीटनेटकेपणा, व्यवस्थित राहणीमान, यांचे आरोग्यदृष्ट्या महत्त्व स्त्रियांना त्यांच्या शिक्षणामधुन सतत मिळत असते.

- ***राजकारणात सक्रिय सहभाग :***

  सध्या मतदार म्हणुन भारतीय नागरिकत्वाच्या नैतिक अधिकारांची जाणीव आणि प्रत्यक्ष राजकारणातील सक्रिय सहभागी व्यक्ती, अशा दोन्ही प्रकारे स्त्रियांचा राजकारणात सहभाग वाढत आहे. शिक्षणामुळे त्याला अजूनच बळकटी व शाश्वती येत आहे. सद्यःस्थितीत कधी नव्हे एवढी, महिलांच्या राजकारणातील सहभागावद्दल जागृती निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे, आपला मतदान हक्क बजावण्यात स्त्रियांचे प्रमाण हे कित्येक ठिकाणी पुरुषांपेक्षा वरचढ असते. ही जागृती शिक्षणांमुळे आणि दूरदर्शन, वर्तमानपत्र, ट्विटर्स, फेसबुक्स, अशा माध्यमांच्या वापरामुळे शहरांप्रमाणेच, ग्रामीण भागातदेखील लक्षणीयरित्या वाढली आहे.

- ***समाजात उच्च दर्जा :***

  स्त्रियांना पुर्वीपासुनच भारतीय समाजात दुय्यम स्थान आहे. तिला फक्त 'चुल आणि मुल' या गोष्टीच सांभाळणे आवश्यक आहे, असेच तिच्या मनावर बालवयापासुन बिंबवले जाते. त्यांच्या कोणत्याच महत्त्वपुर्ण निर्णयाचा विचार केला जात नाही. साधे तिला कपडे, चपला जरी घ्यायच्या झाल्या तरी तिच्या आवडीनिवडीपेक्षा पालकच आपले स्वतःची आवडनिवड, तिच्यावर सतत लादत असतात. कित्येक साध्या बाबतीतसुद्धा तिला स्वातंत्र्य दिले जात नाही. तिला घरात व समाजात कुठल्याही प्रकारचे स्थान दिले जात नाही. परंतु, स्त्री साक्षर झाल्यानंतर ती तिचे स्वतःचे व आपल्या कुटुंबातील महत्त्वाचे निर्णयसुद्धा घेऊ शकते. 'निर्णय स्वातंत्र्य' हा खरं तर पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचा सुद्धा मुलभूत अधिकार आहे. स्त्री स्वावलंबी व स्वाभिमानी बनण्यास शिक्षण उपयुक्त ठरते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या सामान्य ज्ञानात वाढ होऊन, तिचा सर्वार्थाने विकास होऊ लागतो.

## १.१० महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान :

समाजातील कोणताही सामाजिक कार्यक्रम असो वा सण, उत्सव असो वा सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांच्या सहभागाशिवाय, त्या कार्यक्रमाला पुर्णत्व येत नाही, हे निश्चित ! एवढेच नव्हे तर, विवाहित स्त्रीला पुर्वीपासुनच, पुरुषाची अर्धांगिनी म्हणुन संबोधले गेले आहे. अथर्व वेदातील उल्लेखानुसार, वैदिक काळामध्ये महिला या पराक्रमी, कर्तबगार व कर्तृत्ववान म्हणुन नावारुपास आल्याचे दिसते. तर पाणिनींच्या काळात, महिलांना राजनैतिक अधिकारही प्राप्त झालेले होते. परंतु पुढील काळात, ही परिस्थिती हळुहळु बदलत गेली आणि महिलांचे 'चुल व मुल', एवढेच कार्य शिल्लक ठेवण्यात आले. महिलांनी नोकरी करणे तर दूरच राहिले, परंतु त्यांच्या शिक्षणावरसुद्धा बंदी घालण्यात आली. महिलांचे स्वातंत्र्य पुर्णतः हिरावून घेण्यात आले.

त्या काळातच, महात्मा जोतिबा फुलेंसारख्या ज्ञानसुर्याचा जन्म झाला आणि त्यांना साथ मिळाली ती त्यांची अर्धांगिनी सौ. सावित्रीबाई फुले यांची. त्या दोघांनी मिळुन अस्पृश्य शिक्षण आणि स्त्री शिक्षणासाठी आपले पुढील सर्व आयुष्य खर्ची घातले. या दोघांनी प्रतिगामी समाजाचा तीव्र विरोध पत्करुन, अतोनात हालअपेष्टा सहन करुन, प्रसंगी मारहाणीला व अपमानास्पद प्रसंगांना तोंड देत, आपले स्त्री शिक्षणाचे कार्य शेवटपर्यंत चालुच ठेवले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनीही, स्त्री शिक्षणासाठी, 'कर्वे स्त्री शिक्षण संस्थेची' स्थापना करुन, अनेक गरीब, होतकरु व गरजु स्त्रियांसाठी शिक्षणाची कवाडं खुली केली.

आता मात्र परिस्थिती पुर्णतः बदलल्याचे दिसते. वर्तमानकाळातील हे चित्र एवढे बदलले आहे की, प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने, किंबहुना काही ठिकाणी तर, पुरुषांच्यापेक्षा चार पाऊले पुढे जाऊन, आपले सामाजिक कर्तव्य व जबाबदारी उत्कृष्टरित्या व यशस्वीपणे पार पाडत आहेत. स्त्रियांच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल खाली स्पष्टीकरण दिले आहे.

- **स्त्रियांची सद्यःस्थिती :**

जगात २००२ च्या आकडेवारीनुसार, ३०८३ दशलक्ष महिला आहेत. त्यापैकी १६.३६ टक्के महिला एकट्या भारतात आहेत. जागतिक पातळीवरील स्त्री-पुरुष प्रमाण लक्षात घेतले तर असे दिसुन येते की, प्रत्येक १०० पुरुषांमागे ९९ महिला आहेत. विकसीत देशात हे प्रमाण प्रत्येक १०० पुरुषांमागे १०६ महिला एवढे असल्याचे दिसते. तर विकसनशील देशात हे प्रमाण १०० : ९७ इतके आहे. मात्र भारताचा विचार करता हे प्रमाण १०० : ९४ इतके आहे. भारताच्या बाबतीत जर विचार करायचा झाला तर ह्या अल्प प्रमाणाचे प्रमुख कारण म्हणजे भारतातील अंधश्रद्धा, चुकीच्या व अयोग्य चालीरिती, रुढी व परंपरा होत. सध्या बहुचर्चित असलेला प्रश्न म्हणजे, स्त्री भृण हत्त्या हा होय. जरी सरकारने गर्भ निदानाला कायदेशीररित्या बंदी घातलेली असली तरीसुद्धा ग्रामीण किंवा शहरी भाग असो वा सुशिक्षित किंवा अशिक्षित असो, मुलगी जन्माला येणार म्हणुन, त्या जीवाची हत्त्या, ती जन्माला येण्यापुर्वीच, तिच्या मातेच्या गर्भात केली जाते, ह्या महापापी कृत्याने भारताला ग्रासले आहे. त्यामुळेसुद्धा आज स्त्री-पुरुष प्रमाणातील असमतोल वाढल्याचे दिसुन येते. संपुर्ण जगाचा विचार करता, महिलांचे सरासरी आर्युमान ६९ वर्षे इतके आहे. विकसित देशात ते ७९ वर्षे तर विकसनशील देशात हे प्रमाण ६६ वर्षे आहे.

जागतिक पातळीवर ६० टक्के महिला गर्भनिरोधक साधनांचा वापर करतात. विकसित देशात हे प्रमाण ७३ टक्के, तर विकसनशील देशात ५७ टक्के आणि भारतामध्ये मात्र हे प्रमाण फक्त ४८ टक्के

असल्याचे सर्वेक्षणावरुन आढळुन आले आहे. त्यामुळेच आज भारताची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. जागतिक पातळीवर दर लाख बालकांमागे प्रसुतीसमयी मृत्यु पावणाऱ्या मातांचे प्रमाण ४०० एवढे आहे. अशा प्रकारे महिलांची अलीकडील एकुण परिस्थिती विचारात घेता, भारत हा अनेक बाबतीत मागसलेला असल्याचे आढळते.

- **स्त्रियांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान :**

महिलांच्या आर्थिक क्षेत्रातील योगदानाबाबत विचार करीत असताना, त्यांचे सामाजिक स्थानसुद्धा आपोआपच स्पष्ट होते. भारत हा देश पुरुषप्रधान आणि जुन्या रुढी परंपरा व चालिरितींनी ग्रासलेला देश आहे. हळुहळू अंधश्रद्धा निर्मुलन, सामाजिक जागृती, यांमुळे यात बदल घडत आहे, ही जमेची बाजू आहे. परंतु पुर्णतः अशा गोष्टींचे उच्चाटन होणे अशक्यच वाटते. त्याचप्रमाणे, महिलांचे कुपोषण व महिलांवरील अत्याचार, आजदेखील पुर्णपणे थांबलेले नाहीत, तरीसुद्धा या विपरित व प्रतिकुल परिस्थितीत भारतातील महिलांची आर्थिक क्षेत्रातील भुमिका उल्लेखनीय आहे.

समाजात कुटुंबाचे स्थान महत्त्वाचे असते. कुटुंब प्रमुख, हा आपल्या कुटुंबासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. थोडक्यात, जसा कुटुंब प्रमुख तसे कुटुंब असते. हेच चित्र समाज म्हणुन व्यापक व विस्तृत प्रमाणात स्पष्ट होते. भारताच्या संदर्भात विचार केला असता, सध्या ९ टक्के कुटुंबे ही मातृसत्ताक आहेत. भारतात अलीकडील काळात ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांचा श्रमदल सहभाग वाढत आहे. प्रत्येक क्षेत्रात हे प्रमाण वाढताना दिसते. तसेच, भारतातील संघटित सार्वजनिक क्षेत्रातील महिला रोजगारीचे प्रमाण वाढत आहेत. सार्वजनिक संघटित क्षेत्रात महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होत असल्या तरी एकुण महिलांच्या प्रमाणात ती खुपच कमी आहे. परिणामी, नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने, रोजगार मिळविण्याच्या उद्देश्याने, जास्तीतजास्त महिला खाजगी क्षेत्राकडे वळताना दिसत आहेत. आज अनेक मोठमोठ्या कारखान्यांमधुन, उद्योग व्यवसायांमधुन, तसेच, विदेशी कंपन्यांमधुन महिला श्रमिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. एवढेच नव्हे तर अनेक कुशल व निपुण भारतीय उच्चशिक्षित महिला जसे डॉक्टर्स, तंत्रज्ञ, संगणक अभियंते, अवकाश, इत्यादी क्षेत्रात गलेलठ्ठ पगारांवर विदेशात स्थायिक झालेल्या आहेत. त्या आपल्या पगारातील खर्च जाऊन, बाजुला पडणारा पैसा भारतात आपल्या कुटुंबियांना वेळोवेळी परकिय चलनाच्या स्वरुपात पाठवित असतात. त्यामुळे अप्रत्यक्षरित्या या महिलांमुळेसुद्धा, भारताच्या परकिय गंगाजळीत सातत्याने वाढ होत असते. अनेक महिलांचा यात समावेश आहे, हे विसरुन चालणार नाही.

थोडक्यात, अनेक महिला उत्पादन निर्मिती, उत्पन्न निर्मिती आणि भांडवल निर्मितीमध्ये महत्त्वाची भुमिका बजावत असल्याचे स्पष्ट होते.

- **स्त्रियांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान :**

  आर्थिक क्षेत्राबरोबर सामाजिक क्षेत्रातसुद्धा, महिलांनी फार पुर्वीपासुनच, सक्रिय सहभाग घेतल्याचे दिसते. ज्यावेळी स्त्री शिक्षण हे फार मोठे पाप समजले जात होते, त्याकाळात समाजाचा तीव्र विरोध स्विकारुन, प्रसंगी शेण व दगडांचा मारा सहन करुन, सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडे वाड्यात सर्वप्रथम मुलींसाठी शाळा सुरु केली. त्याचीच फळे आज आपण चाखत आहोत. त्याचाच परिणाम म्हणुन, आज महिला मुक्तपणे प्रत्येक क्षेत्रात संचार करु लागल्या आहेत. सावित्रीबाईंनी १८५३ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना करुन 'बालहत्या' बंद करण्यास ब्रिटिश शासनास भाग पाडले. समाजाची महिलांच्या संदर्भातील दृष्टि बदलण्यासाठी सुमारे १०० वर्षांपूर्वी बुलढाण्याच्या 'ताराबाई शिंदे' यांनी 'स्त्री-पुरुष समानता' हे पुस्तक लिहिले आणि स्त्री-पुरुष समानता समाजाला पटवुन दिली. या व अशा अनेक कर्तबगार, धाडसी महिलांचा सामाजिक क्षेत्रातील कार्याचा आढावा घेता आपल्या असे लक्षात की, आजसुद्धा भारतातील अनेक महिला सामाजिक कार्य करण्यात अग्रेसर आहेत. मेधा पाटकरांसारखी सर्वसामान्य कुटुंबातील उच्चशिक्षित महिला, आजसुद्धा 'नर्मदा बचाव' आंदोलनाच्या माध्यमातुन, धरणग्रस्तांच्या मदतीसाठी जीवाचे रान करीत आहे. आज महिलांच्या अनेक सामाजिक संस्था निर्माण झालेल्या असुन, त्या सर्व संस्थांच्या माध्यमातुन, अनेक महिला बचत गट कार्यरत आहेत. महिलांच्या या सर्व कामगिरीवरुन, कुणाही पुरुष क्रांतिकारकापेक्षा, महिलांची ही कर्तबगारी, कर्तृत्ववान कामगिरी कमी नाही, हे लक्षात येते.

- **स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील योगदान :**

  प्राचीन काळापासुनच महिलांचा राजकारणात सक्रिय सहभाग असलेला दिसुन येतो आणि तो आजतागायत टिकुन असल्याचेही स्पष्ट होते. वैदिक काळात मैत्रेयी व गार्गी या महिला राजकीय चर्चेत सहभागी होत असत. ज्या काळात, इंग्रजांविरुद्ध लढा पुकारण्यास पुरुष राज्यकर्ते पुढे येत नव्हते, त्या काळात, म्हणजे इ.स. १८५७ साली, झाशीची राणी लक्ष्मीबाई या नारीने '*मेरी झाँशी नही दुँगी*', असा नारा देत इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले आणि आपल्या प्राणाची आहुती दिली. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यासुद्धा एक निष्णात, कर्तबगार व कर्तृत्ववान, महिला राज्यकर्त्या होत्या. त्यांनी आपल्या राजकारणातील मुत्सद्येगिरीने संपुर्ण भारतीय राजकारणावर आपला ठसा उमटविला आहे. हिंदवी स्वराज्य संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या परमपुज्य व आदरणीय जिजामाता आणि शिवाजी महाराजांच्या सुनबाई ताराराणी साहेबांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर, हिंमतीने, करवीरच्या गादीची स्थापना केली.

आजच्या वर्तमानकाळातील अनेक स्त्रियादेखील, राजकारणात आपली वेगळी छाप पाडत आहेत. भारताच्या माजी पंतप्रधान, इंदिरा गांधी, यांनी खंबीर राजकारण करत, आपले सामर्थ्य सिद्ध केले. तसेच, उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री सुचेता कृपलानी, मायावती, तामिळनाडूच्या जयललिता आणि प. बंगालच्या ममता बॅनर्जी यांचे राजकारण कोण्याही पुरुष राजकारण्यापेक्षा कमी नाही, हे त्या सिद्ध करीत आहेत.

आज महिला आरक्षण विधेयकामुळे, राजकारणात, महिलांचे संख्याबळ वाढले आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनीही, पहिला 'भारतीय महिला राष्ट्रपती' हा बहुमान मिळवुन, जगभरात आपल्या देशाची प्रतिमा उंचावली आहे. सन २००१ मध्ये, जागतिक पातळीवर राजकारणात क्रियाशील असणाऱ्या महिलांचे प्रमाण १४ टक्के होते, तर भारतात हेच प्रमाण ९ टक्के होते. जगाच्या तुलनेत हे प्रमाण जरी कमी वाटत असले तरी कालपरत्वे त्यात प्रगती होत असल्याचे चित्र आज आपल्याला दिसते.

- **स्त्रियांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :**

एक स्त्री शिकली म्हणजे संपुर्ण कुटुंब शिकते. त्यामुळेच स्त्री शिक्षणाला फार महत्त्वाचे स्थान आहे. देशात ज्या प्रमाणात, महिलांनी उच्च शिक्षण घेऊन, डॉक्टर, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, अशा पदव्या संपादन केलेल्या असतात, त्याप्रमाणात देशाच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सहभाग उच्च दर्जाचा असतो. १९९५ मध्ये, बीजिंग येथे झालेल्या 'आंतरराष्ट्रीय महिला परिषदे'मध्ये ''समाजाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रियांचा संपुर्ण सहभाग व स्त्रियांचे पुर्णार्थाने सबलीकरण'' या विषयावर भर देण्यात आला होता. भारतामध्येसुद्धा बीजिंगच्या मसुद्यावर आधारित असा एक कृती कार्यक्रम तयार करण्यात आला. परिणामी, स्त्री शिक्षणात वाढ होण्यास सुरुवात झाली. आज समाजशास्त्र, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य, विधी, अभियांत्रिकी, संगणकिय, अवकाश, क्रिडा, पत्रकारिता, संगीत, सिनेसृष्टी व नाट्य, अशा विविध क्षेत्रात महाविद्यालयीन व उच्च शिक्षण घेणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे.

विकसनशील देशातील पारंपारिक दृष्टिकोनांमुळे, विकसीत देशांपेक्षा, अविकसित देशात, महिला निरक्षरतेचे प्रमाण फार मोठे आहे. आजसुद्धा जगातील ६५ दशलक्ष मुली शाळेत जात नाहीत. तरीसुद्धा, या सर्व अडचणींवर मात करीत, महिला, शिक्षण क्षेत्रात प्रगती करीत आहेत. अलीकडील काळातच मोठ्या प्रमाणात भारतीय महिला शैक्षणिक शिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन एस.टी. महामंडळात वाहकाची नोकरी कौशल्यतेने करीत आहेत. याच्याही पुढे जाऊन म्हणजे

परराज्यात तर दोन महिलांनी मिळुन, पुरुष केश कर्तनालयाचा व्यवसाय सुरु करुन, त्यात चांगले यश मिळविले. महिला सर्वच क्षेत्रात म्हणजे विद्यापीठातील कुलगुरुंपासुन ते संचालक, व्यवस्थापक अगदी महिला शिपायांपर्यंत सक्रिय आहेत. शिक्षणातीलच काय पण अन्य असे एकही क्षेत्र नाही की जिथे महिला कर्मचारी नाहीत.

अशा प्रकारे, वरील सर्व मुद्यांचा सखोल विचार केला, तर आपल्याला असे आढळुन येते की, देशाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, महिलांची सर्व क्षेत्रातील भुमिका, अतिशय महत्त्वाची तर आहेच, पण स्त्री शक्तीला कोणताही पर्याय, आज तरी अस्तित्वात नसल्याचे स्पष्ट होते. आधुनिक युगाच्या स्वयंचलित वाहनाची स्त्री व पुरुष ही दोन समान चाके आहेत, ज्यांद्धारे हा समाज गतीमान होईल.

## १.११ महिला आणि विकासाचा धोरणात्मक दृष्टिकोन :

आज महिलांच्या विकासासाठी वेगळ्या व स्वतंत्र धोरणाची गरज आहे, हे मान्य झाले आहे. 'महिला सबलीकरण', ही काळाची गरजच नव्हे तर आवश्यकता आहे. लिंगभेदावर आधारित, भारतीय कुटुंब समाजरचनेमुळे, स्त्रियांची सर्वच बाजुंनी कुचंबणा करण्यात आली. आजच्या युगात, सामाजिक परिवर्तन व स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळींचा शिक्षणाचा विस्तार, स्त्री-शिक्षणाचे वाढते प्रमाण, अर्थार्जनाच्या क्षेत्रात स्त्रियांचा शिरकाव, अशा सारख्या कारणांना व स्त्री संरक्षण कायद्याच्या वातावरणामुळे, स्त्रिया आता स्वतःचाही विचार आणि विकास करण्यास उत्सुक आहेत.

'स्त्रिया आणि तिचा विकास', या विषयाचा अभ्यास करताना त्याचे विविध हेतु, दृष्टिकोन व पैलू समजुन घेणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे -

- **कल्याणकारी दृष्टिकोन :**

देशाच्या विकासाचे उद्दिष्ट, हे कल्याणकारी राज्ये (Welfare States) निर्माण करण्याचे होते. विशेषतः, १९५० ते १९६० या कालावधीत, विकसनशील देशांमध्ये आखण्यात आलेले स्त्रीविषयीचे धोरण, हे स्त्री कल्याणकारी असे राहिले. या धोरणाचा उद्देश्य, स्त्रियांना सबल व सुदृढ बनविण्यासाठी विविध कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी, असा असल्याने, स्त्रियांची वंशवृद्धी व पुनरुत्पादनाची क्षमता, महत्त्वाची मानली गेली. त्यातुनच गरोदर मातांची काळजी, कुपोषणाविरुद्ध विविध योजना, कुटुंब नियोजनाचे विविध कार्यक्रम राबविण्यावर, शासनातर्फे भर देण्यात आला. स्त्री कल्याणाचा हा दृष्टिकोन आव्हानात्मक नसला तरी मुलभुत स्वरुपाचा असल्याने, आजही तितकाच समाजप्रिय आणि महत्त्वाचा मानला जातो.

- **समानतेचा दृष्टिकोन :**

  १९७६ ते १९८५ हे दशक, युनायटेड नेशन (युनो) ने 'आंतरराष्ट्रीय महिला दशक', म्हणुन जाहीर केले. स्त्रियांना विकास प्रक्रियेत समान स्थान मिळावे, या हेतुने अनेक कार्यक्रमांची आखणी होऊन, विकासाच्या प्रक्रियेत, स्त्रियांना सवलती व अधिकार देऊन, त्यांना सहाय्य करण्यावर भर देण्यात आला. या दृष्टिकोनासाठी, शासनाचा हस्तक्षेप आवश्यक मानुन, राजकीय आणि आर्थिक स्वायत्तता स्त्रियांना कशी लाभेल, याचाही सखोल विचार होण्याची मार्गदर्शक तत्त्वे सांगण्यात आली, जेणेकरुन, स्त्री व पुरुषातील असमानता कमी होईल. तसेच, स्त्रियांच्या दुय्यम दर्जाला आव्हान देण्यात आले. रोजगार आणि व्यवसायाच्या क्षेत्रातही स्त्रियांसाठी स्थान निर्माण करण्यात आले.

- **दारिद्र्यविरोधी दृष्टिकोन :**

  १९७० सालानंतर दुसरा दृष्टिकोन स्विकारण्यात आला आणि तो म्हणजे, दारिद्र्य हटविण्यासाठी विविध उपायोजनांवर भर देणे, हा होय. त्यातुनच स्त्रियांची उत्पादकता वाढुन, त्याचा स्त्रीला आणि पर्यायाने शासनालाही लाभ होईल, हा हेतु डोळ्यासमोर ठेवण्यात आला. दारिद्र्याची झळ सर्वप्रथम स्त्रियांना पोहचते. त्यामुळे त्या सर्वच क्षेत्रात मागे पडतात. गरीबी दूर झाल्याने, स्त्रियांची कार्यक्षमता वाढुन, त्या अधिकाधिक कामे करु शकतील. विशेषतः स्वयंसेवी संस्थांना, अशा दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या स्त्रियांच्या अर्थार्जनाच्या, लघु व कुटीर उद्योगांच्या माध्यमातुन, उत्पन्न वाढीच्या संधी वाढविण्याच्या हेतुने, तशा प्रकारच्या योजना आखण्यात आल्या.

- **कार्यक्षमता दृष्टिकोन :**

  महिलांची 'कार्यक्षमता' वाढविण्याच्या दृष्टिने, १९८० नंतरच्या काळात विशेष प्रयत्न सुरु झाले. कर्जबाजारीपणाचे आरिष्ट सुरु झाल्यामुळे, स्त्रियांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी, अनेक योजनांध्ये विविध मुद्दे स्पष्ट करण्यात आले. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान काम समान वेतन मिळावे, या मागणीला प्राधान्य देण्यात आले. नोकरी व अन्य उद्योग-व्यवसायांमध्ये स्त्रियांना त्यांची कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी, विविध योजनांमध्ये त्यांना सवलती व सुविधा देऊन, स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासांठी त्यांना विशेष संधी देण्यात आल्या.

- **सत्ता सक्षमीकरणाचा दृष्टिकोन :**

  महिलांचे सक्षमीकरण वा सबलीकरण, हा अलीकडच्या काळातील कळीचा विषय आहे. स्वयंपुर्णता, स्वावलंबनत्व, सक्षमता आणि आर्थिक सत्तेमध्ये सहभागाची स्त्रियांना संधी देणे, हा या मागील

हेतु आहे. सामाजिक अभिसरणाचा लाभ, स्त्रियांना होऊन, त्यांचा स्तर आर्थिकदृष्ट्या उंचावला जावा, कारण आर्थिक स्तर उंचावणे, हे कुटुंब व समाजात निर्णयावर सत्ता मिळविण्यासाठी उपयुक्त ठरु शकते. व्यवहार्य अर्थाने, स्त्री-पुरुष लिंगभेद कमी करण्यासाठी हा दृष्टिकोन निश्चितच परिणामकारक ठरेल.

स्त्रियांसाठी आर्थिक विकासाचा व सामाजिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न करण्यासाठीच, या धोरणाची आखणी करण्यात आली. अर्थात, त्यासाठी स्त्रियांना सहाय्यकारी असणारे विविध प्रकल्प, योजना व कार्यक्रम प्रत्यक्षात अंमलात येण्यासाठी प्रयत्न केले गेले. तरीसुद्धा स्त्रियांना सहाय्य करणारे प्रकल्प विचारात घेताना खालील मुद्दे प्रामुख्याने महत्त्वाचे मानले गेले :

- स्त्रियांच्या विविध भुमिका,
- लिंगभेद
- धोरणात दृष्टिकोनाची व्यापकता
- क्षेत्रीय मुद्दे
- स्त्री विषयी नियोजन. याअंतर्गत खालील बाबी महत्त्वाच्या आहेत.
  - धोरण ठरविणे
  - नियोजन करणे
  - अंमलबजावणी करणे
  - हस्तक्षेपाची क्षेत्रे
  - संधी उपलब्धतेच्या तरतुदी
  - जबरदस्ती अथवा बळजबरीच्या शक्यता
  - बळजबरीतुन स्त्रियांची सुटका करण्याचे मार्ग
  - सर्वच क्षेत्रांमध्ये स्त्रियांच्या शिरकावाची व्युहरचना.

खऱ्या अर्थाने, स्त्री-पुरुष भेद कमी होण्यासाठी, नियोजन करण्यासाठी, या दृष्टिकोनाचा अवलंब शासन, स्वयंसेवी संस्था, स्त्री चळवळीतील कार्यकर्त्यांनी करणे गरजेचे असते. 'जेंडर प्लॅनिंग' म्हणजे *नेहमीच्या साधारण विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रिया या महत्त्वाच्या मानल्या जात नाहीत आणि प्रत्येक स्तरावर नियोजन व आखणीमध्ये त्यांचा समावेश होत नाही. ही परिस्थिती बदलणे* म्हणजे 'जेंडर प्लॅनिंग' होय. प्रामुख्याने, लिंगभेदामुळे स्त्रियांना जे निर्बंध, नीतिमत्तेची दुटप्पी व विचारांची झळ, घरकामाचा अतिरिक्त भार व त्या कामाचे मोल अथवा महत्त्व न मानण्याची, कौटुंबिक व सामाजिक मानसिकता, स्त्री देहाचे महत्त्व व मातृत्वाचे स्त्रोत, गौण स्थान व कनिष्ठ दर्जातुन

मानसिक त्रस्तता, ताणतणाव व शारीरिक शोषण वगैरेंसारख्या स्थितीला सामोरे जावे लागते, त्यापासुन बंधनमुक्त करण्याचा दृष्टिकोन, हा सर्वात महत्त्वाचा दृष्ठिकोन आहे.

- **स्त्रियांची मुक्तता वा बंधमोचन आणि विकास दृष्टिकोन :**
  स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी व लिंगभेदातुन होणाऱ्या स्थितीतुन वर काढण्यासाठीची गरज लक्षात घेऊन, विकासाचे खालील महत्त्वाचे मुद्दे विचारात घ्यावे लागतात.

- विकासाचे धोरण व नियोजनात लिंगभेदविषयक जाणीवा व मुद्दे लक्षात घेणे गरजेचे आहे. स्त्री व पुरुष यांच्या कार्यक्षेत्र आणि सामाजिक व आर्थिक संसाधने, यांवरील अधिकारामधील फरक कमी करणे, हा विकासाचा प्रमुख हेतु असावा. शिवाय, स्त्री व पुरुषांना त्यांच्या कार्यशक्तीमधुन काम व सेवांमधुन मिळणाऱ्या लाभामध्ये असलेले फरक दूर होणे गरजेचे आहे. ते कसे दूर करायचे याचेही नियोजन व्हायला हवे. शेतमालाच्या किंमती, सार्वजनिक सेवांच्या तरतुदी, तांत्रिक व माहितीच्या सेवांची उपलब्धता, अशा गोष्टींमुळे स्त्रियांच्या सहभागाची व लाभार्थी म्हणुन जे अपेक्षित फायदे आहेत, त्यांपासुन वंचितता निर्माण होण्याची स्थिती उद्‌भवु शकते. त्यासाठी स्त्रियांसाठी आखलेल्या खास धोरणातुन विकासाचे लाभ मिळायला हवेत.

- स्त्रियांकडे पुरुषांपेक्षा अधिक लक्ष देण्याची गरज आहे. कारण विशिष्ट स्वरुपात स्त्रियांकडे लक्ष दिल्याशिवाय, नियोजनात 'व्यक्ती' म्हणुन त्यांचा दर्जा निश्चित होणार नाही. व्यक्ति म्हणुन स्त्रियांना स्थान दिल्याशिवाय, त्यांच्यातील व पुरुषांमधील भेद कमी होणार नाहीत. स्त्रियांना विकासामधील सहभाग मिळणे आणि लाभार्थी म्हणुन त्यांना लाभ मिळणे हे ही आवश्यक आहे.

- सामाजिक मुल्ये आणि मौल्यवान साधने, यांबाबत स्त्री-पुरुषांसाठी विभागणी करतानाही भेद जाणवतो. उत्पादन साधनांची मालकीसुद्धा स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी प्रमाणात व अल्पसंख्येने दिली जाते. शेतजमीन, घर, सुरक्षित रोजगार, विश्रांती किंवा विसावा, ऐषआराम आणि राजकीय प्रक्रियेत अथवा संसदेत सहभाग, यांबाबत स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी संधी व मालकी दिली जाते. अर्थात, अशा लिंगभेदातुन होणाऱ्या फरकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे आणि फरकाच्या या मानसिकतेमुळे स्त्रियांवर ज्या क्षेत्रात अन्याय होत आहे, त्यांवर नेमकेपणाने लक्ष देऊन, त्यांची त्यातुन मुक्तता व्हावी, असे विकासाचे धोरण आखले गेले पाहिजे. खरे तर लिंगभेदाच्या परिणामांचा शोध हा स्त्री-पुरुषांना विकासामुळे होणाऱ्या लाभातील फरकाबाबत घेणे गरजेचे आहे. असा परिणामांचा फरक हा वास्तव स्वरुपात लक्षात आला की, विकासाची धोरणे आखणे, त्यांचे योग्य

नियोजन करणे, आणि ती राबविण्यासाठी योग्य त्या दिशेने प्रयत्न करणे, हे आवश्यक आहे. स्त्री-पुरुषांचे स्थान, श्रमविभागणी, काम व कामाच्या जबाबदारीचे स्वरुप, कामासाठी मिळणारा मोबदला, दर्जा व स्थान, या मुद्यांच्या अनुषंगाने, स्त्री-पुरुषांची तुलनात्मक व सापेक्ष स्थिती जाणणे जरुरीचे आहे. या अभ्यासातुन मिळणारे लाभ खालीलप्रमाणे असतील.

- ***अधिक वास्तववादी धोरणे :***

  लिंगभेदानुसार केली गेलेली कामाची विभागणी, ही अधिक चांगल्या व योग्य प्रकारे समजुन घेणे आणि स्त्रियांचा कोणत्या प्रकारच्या, किती प्रमाणात, आणि कशा पद्धतीने, आर्थिक सहभाग घेणे आवश्यक आहे, याची काळजीपुर्वक तपासणी होणे गरजेचे आहे. त्याआधारे आखलेले स्त्रीविषयक धोरण, आर्थिक नियोजनाला अधिक सामर्थ्य देऊ शकेल.

- ***अधिक परिणामकारक धोरणे :***

  स्त्रियांना देण्यात येणारे काम, कामाच्या संधी, स्त्रियांवरील बंधने व बळजबरी, स्त्रियांना मिळणाऱ्या प्रेरणा व सवलती, त्यांचा सहभाग अशा बाबी, अत्यंत विश्वसनीय व बिनचुक पद्धतीने केले जावे. ते निर्धारित लक्ष्य गटांसाठी व्हावे, म्हणजे योग्य व परिणामकारकरित्या तशा निर्धारित स्त्रियांच्या गटासाठी आधारभुत धोरणे व प्रर्याप्त सांधनाचा योग्य वापर, त्यांच्या कार्यक्षमतेप्रमाणे करता येईल.

- ***अधिक समानतेची धोरणे :***

  स्त्रिया आणि पुरुषांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीमधील मुलभूत फरक जाणुन घ्यावा, त्यामुळे लाभाची विभागणी आणि धोरणांची अंमलबजावणी यांसाठी येणारा खर्च, यांचा ताळमेळ लागु शकेल. त्या आधारे, स्त्री-पुरुषांवर समान प्रभाव पडण्याची स्थिती निर्माण होऊ शकेल. स्त्रियांच्या विशिष्ट गटासाठी विकासाचे धोरण आखताना, त्यामध्ये असलेले अंतर, त्रुटी आणि कमकुवतपणा यांचाही शोध घेणे, आवश्यक ठरेल. कामगिरीच्या परिणामापुर्वी अंमलबजावणीच्या माध्यमातुन उद्‌भविणाऱ्या अडचणींचा विचार होणे गरजेचे आहे.

स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान समाजात मिळत नाही. खरे तर मानवनिर्मिती, मानवाच्या जीवनाचे व्यवस्थापन आणि सौख्य-समाधान यादृष्टिने स्त्रियांचा सहभाग हा महत्त्वाचा आणि अपरिहार्य आहे. पुढील पिढी निर्माण करणे, बाल संगोपन व पालन-पोषण, संस्कार, शिस्त, सामान्य व व्यवहार ज्ञान, सामाजिक मुल्यांची जपणुक व कालपरत्वे चुकीच्या व अयोग्य

चालीरितींपासुन त्यांची सोडवणुक, या व अशा संस्कारक्षम, आवश्यक, ज्ञानप्रदानतेचे महत्त्वपुर्ण काम स्त्रिया आपला प्रपंच करत असताना कळत व नकळतपणे आपल्या मुलाबाळांवर बिंबवत असतात. हे संस्कारांचे योगदान ज्ञानदानाइतकेच मोलाचे व आवश्यक आहे.

तसेच, वस्तु व सेवा उत्पादनातही स्त्रियांच्या कामाला पर्याय नाही. असे असतानाही विकासाच्या धोरणात, स्त्रियांचा स्वतंत्र विचार करुन, त्या अनुषंगाने, त्यांना योग्य तो लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती कृती करण्याकडे होणारे दुर्लक्ष हे अक्षम्य व निंदनीयच आहे. समस्त मानवजातीची निर्मितीही स्त्रियांच करतात. विकासाच्या माध्यमातुन गतीमान होणाऱ्या मुख्य प्रवाहापासुन स्त्रियांना वंचित ठेवण्यामुळे त्यांच्यावर अन्यायच होत आहे. त्यांची उपेक्षितता, ही खऱ्या अर्थाने संपुर्ण मानवाधिकारांची आणि मानवाच्या नैतिक मुल्यांची पायमल्ली आहे, विटंबना आहे, मनुष्य जातीला कलंक लावणारी घटना आहे. त्यामुळेच स्त्री–पुरुष समानाधिकार, समान हक्क, यांची धोरणे ही अधिक उचित, नेमकी, विश्वसनीय, पारदर्शक आणि समतोल असायला हवीत. त्यासाठी अधिक कार्यक्षम कार्यप्रणाली व यंत्रणा, विशिष्ट उद्देश्य साध्य करण्याची इच्छाशक्ति व त्याची अंमलबजावणी याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर, राजकीय वचनबद्धता, पुर्ततेचा अट्टाहास, सामाजिक अनुकुल परिस्थिती व प्रेरणादायी विचारसरणी, जास्तीत जास्त लाभार्थींना जास्तीत जास्त लाभ देण्याची इच्छाशक्ती, साधनसंपत्तीची समान वाटणी, अशा प्रकारच्या धोरणांची साखळी कार्यान्वित करुन, समानतेतुन सामाजिक न्याय प्रस्थापित करणे, ही आजच्या काळाची गरज आहे.

- ***स्त्रिया आणि विकास :***

  आर्थिक विकासामध्ये, स्त्रियांच्या सहभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, तरीदेखील, पाचव्या पंचवार्षिक योजनेत (१९७४ ते ७९) स्त्रियांकडे विकासातील कृतिशील सहभाग घेणारा घटक म्हणुन पाहिले गेले नव्हते. दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, आदि क्षेत्रांत स्त्रिया तेव्हादेखील पायाभुत काम करीत होत्या, तरी त्याचे संशोधन, मोजमाप केले गेले नव्हते. त्यामुळे मध्यमवर्गीय दृष्टिने स्त्रियांना सुयोग्य असे व्यवसाय देण्याची रीत पडली. अन्नधान्यासंदर्भात, स्वयंनिर्भरतेस, या टप्प्यावर राष्ट्रीय पातळीवर अग्रक्रम देण्यात आला. ग्रामीण भागातील स्त्रियांना शेतमजुर आणि ग्रामसेविका, अशा चौकटीत बसविले गेले. ग्राम सेविकांनी आपल्या हद्दितील स्त्रियांना कृतिशील बनविणे, त्यांना शिक्षण देणे, अशीच कामे करावीत, असे ठरविण्यात आले. परंतु या साऱ्याचे लक्ष्य अन्नधान्य उत्पादन हेच होते. शेती व्यवसायामध्ये असलेले स्त्रियांचे योगदान या टप्प्यावरही दुर्लक्षितच राहिले. इतकेच नव्हे, तर विकासाच्या या टप्प्यावर बिकट होत जाणारे स्त्रियांचे घरकाम, अपत्य संगोपन, पालनपोषण

व विकास, पाणी, जळण, चारा, या प्रश्नांकडे शासनाकडुन कानाडोळा केला गेला. या टप्प्यालाही स्त्री प्रश्नांसंदर्भात निर्णय घेण्यात राज्यसंस्था अपयशी ठरली.

१९८० ते १९८५ च्या काळातील, सहाव्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांचे शिक्षण, रोजगार, आरोग्य, या तीन मुलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याची राजकीय रणनीति आखली गेली. या टप्प्यावर प्रथमच स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य असले पाहिजे, याची जाणीव शासनाला झाल्याचे दिसुन येते. जमीन, घर आणि अन्य आर्थिक एकके, यांचे मालमत्ता म्हणुन, हस्तांतरण करताना, नवरा आणि बायको यांना कायदेशीररित्या एकत्र मालकी द्यावी, यावरही भर देण्यात आला. अगदी तळा गाळातील पातळीवरही स्त्रियांना निर्णय घेण्यासाठी प्रभावी सहभाग मिळाला पाहिजे, याकडेही लक्ष वेधले गेले. स्त्रियांची बेरोजगारी, कुपोषण आणि आरोग्य, या गोष्टी लक्षात घेऊन, नियोजनही करण्यात आले. सातव्या पंचवार्षिक योजनेत हा सूर अधिक प्रभाविपणे मांडुन, विकासामध्ये स्त्रिया खंबीरपणे व आत्मविश्वासाने, आपल्या क्षमताशक्तीच्या बळांवर सहभागी व्हाव्यात, असा प्रयत्न करण्यात आला.

स्त्रियांसाठी 'राष्ट्रीय परिप्रेक्ष्य नियोजन', १९९८ ते २००० या काळामध्ये केले गेले. त्याच काळातील विकास प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग विरुद्ध लिंगभाव, संवेदनक्षम विकास, या परिप्रेक्ष्यांमध्ये दुमत झाले होते. या काळात ३९ स्त्री संघटनांनी आपले असे मत नोंदविले की, अजुनही विकास विषयक जे नियोजन केले जाते, त्यामध्ये स्त्रिया समान पायावरील सहकारी म्हणुन, निर्णायक शक्ती म्हणुन, कर्त्या माणसाच्या रुपात राष्ट्रीय विकासात येऊ शकत नाहीत, या गोष्टीकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. नाही तर याही टप्प्यावर स्त्रियांसाठी परिपुर्ण दृष्टिकोनातुन केवळ आभासच निर्माण केला जाईल. आधीच्या किमान गरजांच्या चौकटीत जो दया-करुणेचा सूर आहे, तो जर बदलायचा असेल तर, आर्थिक क्षेत्रातील व्यापक प्रक्रिया व व्यापक क्षेत्राशी दारिद्रय निर्मुलनाचा प्रश्न जोडला पाहिजे. स्त्रीवादी अभ्यासकांनी आणि कार्यकर्त्यांनी असंघटित कार्यक्षेत्रातील स्त्रियांच्या कामाविषयीचे सुक्ष्म तपशील १९८८ च्या अहवालात प्रसिध्द केले. परंतु या तंत्रज्ञानविषयक धोरणे, परवाने, कर्ज, प्रशिक्षण, बाजारपेठ, कच्चा माल, तसेच, व्यापक प्रक्रिया म्हणुन विक्रीविषयक धोरणे, शहरीकरण, तंत्रज्ञानातील बदल या सर्वांशी जोडुन स्त्री प्रश्नांचा विचार झाला पाहिजे.

या तिसऱ्या टप्प्यावर स्त्रियांसाठी परिपुर्ण दृष्टिकोन म्हणुन जो विकास झाला, त्यातील महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे होते.

- इंधन, चारा व पाणी यांच्या पुरवठ्याची हमी.
- स्त्रियांपाशी असणाऱ्या रोजगाराला सबळ करण्यासाठी त्यांना कौशल्य, प्रशिक्षण, कर्ज आणि बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.
- प्रगत तंत्रज्ञानामुळे स्त्रियांच्या रोजगारावर परिणाम होणार असेल तर यासंदर्भात संरक्षण देणे.
- स्त्री स्थानिक बाजारपेठेच्या गरजेनुसार नव्या रोजगारांची निर्मिती करणे.
- स्त्रियांना तात्पुरत्या कंत्राटी कामांमुळे भोगावी लागणारी असुरक्षितता लक्षात घेऊन त्या संदर्भात संरक्षण करणे.
- निवास, स्वच्छतागृह, अपत्य संगोपन, यात मदत करणे.
- औद्योगिक संरक्षक कायदे करणे.

अभ्यासकांचे असे मत आहे की, ग्रामीण भागातील ८७ टक्के आणि शहरातील २० टक्के स्त्रिया आजही अंगमेहनतीची, काबाडकष्टाची कामे करतात. त्यांना नवनवीन तंत्रज्ञान आणि बाजारपेठ, यांमधुन व्यवस्थेच्या पातळीवर वगळले जाते. आजही बऱ्याच ठिकाणी स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी वेतनही दिले जाते. एकदा स्वयंचलित तंत्रज्ञान आले की, स्त्रिया संबंधित क्षेत्रातुन बाहेर फेकल्या जाणार, असे मत १९८० नंतर मांडण्यात येऊ लागले. नव्या आर्थिक धोरणाच्या काळातसुद्धा, गरीब स्त्रिया मुळातच विषम पायावर बाजारपेठेत प्रवेश करतात, त्यांच्याकडे द्यावे तेवढे लक्ष दिले जात नाही. तसेच, विकास प्रक्रियेत स्त्रिया रोजगार, आरोग्य, साक्षरता, पोषक आहार, या सर्व बाजुंनी वंचित तर असतातच, या बरोबरच, कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची मोठी जबाबदारी त्यांच्याच खांद्यावर असते, असे विधान करण्यात आल्याचे लक्षात घेतले पाहिजे.

स्त्रियांचे सबलीकरण किंवा सक्षमीकरण, या संकल्पनेचा उदय, १९७० च्या मध्यावर, स्त्री चळवळीतुन झाला. सेन आणि ग्रोन, या अभ्यासकांनी, नैरोबी, येथील परिषदेसाठी १९८५ साली जे पुस्तक प्रसिद्ध केले ते नैरोबी येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठीच होते. तेव्हापासुन 'स्त्रियांचे सबलीकरण किंवा सक्षमीकरण,' या शब्दाचा आंतरराष्ट्रीय वापरही सुरु झाला. ''विकासाची कोंडी आणि पर्यायी दृष्टि, तिसऱ्या जगातील स्त्रियांची परिप्रेक्ष्ये'' असे सार्थ शीर्षक असलेल्या या पुस्तकात, स्त्रियांनी आपल्याला सक्षमीकरण म्हणजे नेमके काय म्हणायचे आहे आणि त्यातुन लिंगभावविषयक (स्त्री-पुरुष सत्तासंबंध) परिवर्तन कसे घडेल, याविषयी स्पष्ट मांडणी केली आहे.

'सक्षमीकरण' ही संकल्पना, विकासविषयक चर्चाविश्वात गेल्या १०-१५ वर्षांत सतत वापरली जात आहे. या शब्दाची एकच अशी अधिकृत व्याख्या नाही. परंतु *''दुर्बल किंवा ओरबाडले गेलेले*

*समाजातील गट पुन्हा एकदा संसाधने आणि निर्णयशक्ती यांवर नियंत्रण मिळवुन आणि वाटा मिळवुन सक्षम होणे''*, असा अर्थ मात्र या 'सक्षमीकरण' शब्दामागे नक्की आहे. दडपलेल्या वर्गामध्ये स्त्रियांचे दुर्बल होणे अधिकच तीव्र असते, हे सत्य सर्वांनी स्विकारायला सुरुवात केल्यामुळे 'स्त्रियांचे सक्षमीकरण' या शब्दाला आता *''सामाजिक न्यायासाठी, समतेसाठी आणि पुरुषांच्या जन्मजात श्रेष्ठत्वाच्या कल्पनांविरुद्ध स्त्रियांनी दिलेला झगडा किंवा सबलता,''* असा अर्थ प्राप्त झालेला आहे. सत्ता किंवा सबलता, या संकल्पनांच्या केंद्रस्थानी निवड करण्याची क्षमता असते. तरीही प्रत्येक व्यक्तीत निवड करण्याची क्षमता असतेच असे नाही तर त्यासाठी योग्य परिस्थिती असणेही आवश्यक असते, हे लक्षात घेतले पाहिजे. जी निवड स्त्रिया करतील, त्या निवडीला परिवर्तनाच्या दृष्टिने अर्थ असला पाहिजे आणि त्यातुनच सामाजिक विषमतेला शह देण्याची क्षमताही असली पाहिजे.

सामाजिक संरचनांमधुन व्यक्तीच्या कर्तृत्वाला आकार मिळत असतो. याचे उदाहरणच जर द्यावयाचे झाले तर, जागतिकीकरणाच्या झंझावातात, स्त्रिया जेव्हा एक आकर्षक मालमत्ता ठरतात. तेव्हा वेगवेगळ्या मार्गांनी, वेश्या व्यवसायाला उत्तेजन दिले जाते. आता निवड म्हणुन काही स्त्रियांनी वेश्या व्यवसाय स्विकारणे अथवा काही स्त्रियांनी गृहिणी होऊन संस्कृती रक्षणाची चौकट स्विकारणे, या दोन्ही निवडी स्वातंत्र्यामागे सक्षमीकरण नाही. तसेच, स्त्रियांना फक्त कर्ज मिळण्याची हमी अथवा राखीव जागांमधुन राजकीय सहभाग किंवा समान शिक्षणाची संधी दिली, तर तेवढे सक्षमीकरणासाठी सहज पुरेसे आहे, असे मानणेही चुकच आहे. कोणत्याही संसाधनाचे आणि संधीचे प्रत्यक्षात रुपांतर करणे आणि समाजानेही ते स्वातंत्र्यशील मानणे, ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. यासाठी वेगवेगळ्या थरांतील, जातींतील, धर्मांतील स्त्रिया आपल्या अस्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा अर्थ कसा लावतात, ते समजुन घेणे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात, सक्षमीकरणाचा तयार फॉर्म्युला करणे घातक ठरते. विशेषतः, खुल्या बाजारपेठेमध्ये जुगारी पैसा आणि हिंसाचार यांनाच मान्यता मिळु लागली आहे, अशा काळात विवाह करणे अथवा न करणे, परित्यक्ता असणे वा एकटे राहणे, कोणत्याही अर्थाने, स्थावर मालमत्ता नसणे किंवा असणे, तर त्या नात्यातील पुरुषांच्या दमदाटीला, बळजबरीला, धाकटपटशाला बळी जाणे, अशा अनेक आंतरविरोधांनी भारतीय स्त्री जीवन चिरफाळले जात आहे. अशा वेळी राज्यसंस्था ही दमदार इच्छाशक्ती असणारी आणि चिकित्सक दृष्टि असणारी, तसेच, सर्वसामान्य माणसाशी इमान राखणारी असली पाहिजे. लिंगभाव संवेदनक्षम राज्यसंस्था आणि तसाच नागरी समाज निर्माण करण्यासाठी, जागतिकीकरणाच्या झंझावातात, उखडुन न जाण्याची काळजी घेण्यासाठी भारतातील स्त्री प्रश्नांची जडणघडण समजुन घेणे अतिशय गरजेचे आहे.

- ***सबलीकरणाचे घटक :***

  **महिला सबलीकरण अनेक बाबींनी अपेक्षित असले तरी सक्षमीकरणाचे प्रमुख घटक पुढील कोष्टकाच्या माध्यमातुन सहज स्पष्ट होतात.**

**सक्षमीकरणाचे घटक**

- व्यक्तिविकास (स्वतःसाठी)
  - सुदृढ आरोग्य
  - शिक्षण
  - आर्थिक स्वावलंबन
- व्यक्तिविकास (समाजाभिमुख)
  - जागृती व जाणीव
    - कर्तव्यांची जाणीव
    - अधिकारांची जाणीव
    - कायद्याची जाणीव
  - नेतृत्त्व विकास
    - निर्णयक्षमता वृद्धि
    - क्षमता वृद्धि
    - संपत्ती ठेवा
  - संघटन
    - सर्वांना संघटीत करण्याचे कौशल्य
    - संघटित करण्याची वृत्ती

**वरील कोष्टकांमध्ये आलेल्या घटकांचे विश्लेषण खालीलप्रमाणे :**

- **स्वतःसाठी (व्यक्तिविकास) :**
  - ***सुदृढ आरोग्य :***

    **स्त्रिया आपल्या स्वतःच्या आहाराबाबत व आरोग्याबाबत जागृत नसतात. वास्तविक, स्त्रीचे शारीरिक व मानसिक आरोग्य व्यवस्थित असेल, तरच ती, आपल्या कुटुंबातील अन्य सदस्यांच्या आहाराकडे व आरोग्याकडे नीट लक्ष देऊ शकेल. आहारावर बहुतांश गोष्टी निर्भर करतात. जीवनसत्व, खनिज पदार्थयुक्त सकस, चौरस व मर्यादित आहार, नियमीत वेळा, जेवताना प्रसन्न वातावरण, घरात मोकळी व खेळती हवा, भरपुर प्रकाश, नियमीत व्यायाम, ह्या वातावरणाशी संबधीत गोष्टींनी कोणाही व्यक्तिचे आरोग्य निरोगी व सुदृढ राहु शकते. त्यामुळे स्त्रीसह घरातील अन्य सदस्यांना कोणतेही काम करण्यास शारीरिक व मानसिक ताकद मिळते व कोणतेही कार्य व्यवस्थित व ठराविक वेळेत पुर्ण होते. तसेच, कार्यक्षमता, कार्यकुशलता साधुनच कर्मविकास साधता येतो. त्यातुनच आर्थिक विकास आणि त्याबरोबरच सर्वांगीण विकास साधला जाऊन सबलीकरणाची प्रक्रिया पुर्ण होण्यास मदत मिळते.**

- *शिक्षण :*

  महिलांच्या सर्वांगीण सबलीकरणासाठी 'शिक्षण' हे अतीमहत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे व्यावहारिक कौशल्ये, उद्योजकता, सुसंवाद, सामाजिक जडणघडण, निर्णयक्षमता, असे विविध गुण अंगी बाणतात. त्यामुळे महिलांना उच्चशिक्षण, तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण मिळाल्यास, त्या रोजगाराभिमुख होतील आणि त्यातुनच महिलांचे सबलीकरण शक्य होईल.

- *आर्थिक स्वावलंबन :*

  महिलांचे खऱ्या अर्थाने सबलीकरण त्यांचे 'आर्थिक स्वावलंबन' झाल्यानंतरच होईल. त्या कमवत्या झाल्या, तर त्यांचे आर्थिक स्वावलंबन होईल. त्यामुळे त्यांचा कौटुंबिक निर्णय प्रक्रियांमधील सहभागही वाढेल. ग्रामीण भागातील महिलांसाठी 'स्वयंसहायता बचत गट' हे एक चांगले माध्यम आहे.

- **समाजाभिमुख (व्यक्तिविकास) :**
  - *जाणीव व जागृती :*
    - कर्तव्याची जाणीव :

      महिलांना कन्या, पत्नी व माता, या भुमिकेतुन आपले कर्तव्य पार पाडावे लागते. या निसर्गचक्रातुन जाताना तिला स्वतःचे गुण, क्षमता, कौशल्य, यांची जाणीव परिस्थितीनुसार, कालपरत्वे होत असते. त्याप्रमाणे आपल्या कृतीतुन हे गुण वेळोवेळी तिला प्रदर्शित करावे लागतात.

    - *अधिकारांची जाणीव :*

      स्त्रीने स्वतःच्या अधिकारकक्षा ओळखुन, अधिकारवाणीने काम केले पाहिजे. स्वतःचे आरोग्य सांभाळणे, त्यासाठी उत्पन्नातुन काही भाग खर्च करुन स्वास्थ्य टिकविणे, मतदानाचा अधिकार वेळोवेळी बजावणे, वेळ पडल्यास मालमत्तेवरील आपल्या कायदेशीर हक्कांसाठी लढणे, तेव्हाच ती सबल झाली असे म्हणता येईल.

    - *कायद्याची जाणीव :*

      शासकीय पातळीवर महिलांसाठी जे कायदे केले आहेत, त्या कायद्यांची जाणीव व वेळप्रसंगी अंमलबजावणी केल्यास, ती सबल झाल्याचे सिद्ध होईल. महिलांसाठी

असणाऱ्या कायद्याची अंमलबजावणी करुन, स्वतःवरील अन्याय दुर करणे, म्हणजे सबल होणे होय. उदाहरणार्थ : हुंडाबळी, वडिलोपार्जित संपत्तीत वाटा, विवाह वय, द्विभार्या प्रतिबंध कायदा, पोटगी कायदा, यासाठी जाणीवपुर्वक कर्तव्यदक्ष व जागृत राहण्याची गरज आहे. त्यासाठी स्त्रीकडे नेतृत्व धैर्य असणे आवश्यक आहे.

- *नेतृत्व विकास :*

  नेतृत्व विकास होणे म्हणजे इतरांबरोबर पुढाकाराने काम करणे. तसेच, स्वतःच्या प्रयत्नाने प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन, अनुकूल परिणाम घडवुन आणण्यासाठी स्वतः पुढे होऊन हिरीरीने काम केले, तरच तिच्यात नेतृत्वाचे गुण विकसित होतील.

- *निर्णयक्षमता वृद्धि :*

  नेतृत्व विकासासाठी महत्त्वाचा गुण म्हणजे निर्णय घेण्यासाठी लागणारा प्रबळ आत्मविश्वास. आपण घेतलेल्या निर्णयाबद्दल किंवा घेत असलेल्या निर्णयाबद्दल असलेला आत्मविश्वास हा परिस्थितीजन्य अनुभवांवरुनच येत असतो.

- *क्षमता वृद्धि :*

  प्रत्येक माणसाला शिक्षण व प्रशिक्षण यातुन सबलता वाढविण्याची संधी असते. नेतृत्व करण्यासाठी संवाद कौशल्य, टिपणी कौशल्य, महितीचे कौशल्य, नियोजन, व्यवस्थापन इ. गुण कौशल्याची क्षमता विकसीत करावी लागते, तरच महिलेचे सबलीकरण होऊ शकते.

- *संपत्ती ठेवा :*

  महिलांच्या सबलीकरणाला अचुक निर्णयक्षमतेबरोबरच, आर्थिक पाठबळ जर असेल तर मिळालेल्या संधीचा ती योग्य फायदा उठवु शकते. सामाजिक सबलीकरणा बरोबरच वित्तीय सबलीकरण सोपे असते.

- *संघटन :*

  महिला सबलीकरणामधील 'संघटन' हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्यासाठी पाठबळ आवश्यक असते आणि पाठबळ तेव्हाच मिळते, जेव्हा तुमच्याकडे उत्तम नेतृत्व करण्याची प्रतिभा असते. त्यासाठी मधुर वाणी, सुसंवाद साधण्याची कला, दुसऱ्याला

समजुन घेऊन, आपलेसे करण्याचे वाक्‌चातुर्य, शारिरिक हावभाव, दुसऱ्याच्या मनातील ओळखण्याचे कसब, त्याच्या भुमिकेत जाऊन स्वतः विचार करणे, हे गुण अंगी बाणणे आवश्यक असते.

- *सर्वांना संघटित करण्याचे कौशल्य :*
  महिलांना एकत्रित करण्याचे कौशल्य आत्मसात करावे लागते. ते शिक्षण व विशेष प्रशिक्षणातुन, अनुभवानेच प्राप्त होऊ शकते. त्यासाठी कठोर परिश्रम व चिकाटी या स्वभाव गुणांची आवश्यकता असते.

- *संघटित करण्याची वृत्ती :*
  सर्वांना विविध कौशल्य वापरुन संघटित केल्यानंतर, सामुहिक कृती आराखडा तयार करुन, त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे व कसोशीने करावी लागते.

सबलीकरणाचे वरील विविध घटक आत्मसात करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण, अनुभव, जबाबदारीची जाणीव, संघर्ष करण्याचे सामर्थ्य, प्रामाणिकता, सामाजिक वातावरण, अशा अनेक प्रक्रियेतुन टप्प्याटप्प्याने, संयमाने व निर्धाराने सबल होत पुर्णत्व सिद्ध करावे लागते.

## १.१२ स्वयंसहायता बचतगटांद्धारे महिलांचे सबलीकरण :

आर्थिक बचतीचे महत्त्व व गरज लक्षात घेता, असे दिसुन येते की, महिला या मुळातच काटकसरी, चौकस, संशयी, बोलघेवड्या, लाघवी, समोरच्या व्यक्तीच्या पोटात शिरुन, आपल्याला हवी ती माहिती काढुन घेणाऱ्या, प्रवाहाच्या दिशेने वाहवत जाणाऱ्या, चंचल आणि संवेदनशील स्वभावाच्या असतात. *स्वतःच्या अवगुणांना स्वतःच्या फायद्यासाठी, गुणांमध्ये कधी व कसे परावर्तित करायचे, हे त्यांना चांगलेच जमते,* कारण ती त्यांना मिळालेली दैवी देणगीच आहे. व्यावहारिक पातळीवर हेच अवगुण गुणांमध्ये त्या चांगल्या प्रकारे परावर्तित करु शकतात. त्यामुळे बहुतेक मालाच्या विक्रीसाठी महिला विक्रेत्याच असतात. आपला माल समोरच्या व्यक्तीच्या गळी उतरविण्याचे कसब त्यांनाच जमु शकते. पुरुषांना ते कधीच जमणार नाही.

महिलांना काटकसरीतुन बचतीची सवय जडावी, त्या सुदृढ व निकोप व्हाव्यात, त्या कार्यकुशल व क्रियाशील व्हाव्यात, त्यांच्या ज्ञान, कौशल्या व कठोर परिश्रमातून, त्या स्वावलंबी व्हाव्यात, त्यांच्या विषयीचा पुरुषी दृष्टिकोन बदलावा, त्यांच्याकडे समाजाने आदराने व माता-भगिनीच्या

नात्याने पहावे, त्यांना समाजात समानतेचे स्थान मिळावे व त्यांच्या बळाचा फायदा, विकास प्रक्रियेत व्हावा, अशा विविध उद्देश्यांपायी जो उपक्रम राबविला गेला आहे, त्याचे नाव आहे 'महिला स्वयंसहायता बचत गट'. याचा गर्भीतार्थ खाली दिला आहे.

| | | |
|---|---|---|
| म | = | महिलांचे सबलीकरण करणारा |
| हि | = | हिताची जपणुक करणारा |
| ला | = | लाभाचे समान वाटप करणारा |

| | | |
|---|---|---|
| स्व | = | स्वयंस्फूर्तीने स्थापन होणारा |
| यं | = | यत्किंचितही मनात किंतु नसणारा |
| स | = | सहकार्यातून प्रगती साधणारा |
| हा | = | हातात हात मिळवुन काम करणारा |
| य | = | यक्षप्रश्नांची सोडवणुक करणारा |
| ता | = | तातडीच्या कर्जाची गरज भागविणारा |

| | | |
|---|---|---|
| ब | = | बचतींमधुन उत्कर्ष साधणारा |
| च | = | चलनाची देवघेव शिकविणारा |
| त | = | तळागाळातील महिलांना एकत्र आणणारा |

| | | |
|---|---|---|
| ग | = | गटातील सदस्यांचे हित जोपासणारा |
| ट | = | टंचाईच्या वेळी मदतीचा हात देणारा |

- **स्वयंसहायता बचत गट संकल्पना :**

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी अनेक योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. परंतु गेल्या २५ वर्षात, महिला सक्षमीकरणावर भर देऊन पुरुष व स्त्रिया यांच्यात समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने स्वयंसहायता समुह चळवळ जोमाने सुरु झाली. ग्रामीण भागातील दारिद्रय, विशेषतः, महिलांचे दारिद्रय, वर्षानुवर्षे चालत आलेल्या रुढी-परंपरा, चालीरिती, अंधश्रद्धा, यांमुळे महिलांची स्थिती खालावलेली आहे. तसेच, असंघटितपणा, शिक्षणाचा अभाव, बेरोजगार व आरोग्य यांकडे दुर्लक्ष, यांमुळे त्यांचे दारिद्रय वाढतच गेले आहे. यासाठी महिलांना संघटित करुन परिणामकारक काम करण्याचे महत्त्वाचे शस्त्र म्हणजे 'स्वयंसहायता बचत गट' होय.

स्वयंसहायता गटाची ही चळवळ आर्थिक प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी असली तरी ती महिलांच्या वैयक्तिक, सामाजिक व आरोग्यदृष्ट्या प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठीदेखील आहे. त्यामुळे महिलांचे सबलीकरण वा सक्षमीकरण स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातुन होण्यास काही अंशी हातभार लागत आहे.

- **स्वयंसहायता बचत गटाची व्याख्या :**

स्वयंसहायता समुह संकल्पनेची व्याख्या करणे अत्यंत कठीण बाब आहे. या संकल्पनेकडुन अपेक्षाही वेगवेगळ्या व अनेक आहेत. स्वयंसहायता गटांची चळवळ, महिला बचत गट, समुह गट, शेजार गट, सुक्ष्मवित्त गट, स्वल्पवित्त समुह, स्वावलंबी बचत गट, काटकसर कर्ज गट, अशा निरनिराळ्या संकल्पनेतुन, चळवळ जोमाने सुरु असली तरी, काही महत्त्वाच्या यत्कालिन व्याख्या पुढीलप्रमाणे :

- *''ज्या समुहात १० ते २० सभासदांची निवड करुन, नियमित बचतीतुन एकमेकांच्या गरजा, अडचणी, जीवनमुल्ये उंचाविण्यासाठी लागणाऱ्या वस्तुंच्या खरेदीसाठी कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य केले जाते, उद्योगधंदा उभारला जातो, सर्वानुमते निर्णय घेऊन, संघटन शक्ती वाढविली जाते. परस्पर सहकार्य, सहभाग नेतृत्त्व व कर्तव्य, विचारांची देवाणघेवाण, सातत्यपुर्ण व प्रयत्नशील सदस्यांच्या समुहाला, स्वयंसहायता बचत गट म्हणतात.''*


- *''प्रादेशिक समानता असलेल्या, समविचारी गरजा, समान अपेक्षा असलेल्या १० ते २० महिलांनी स्वल्प बचत करुन, बचतीचा विनियोग उपभोगण्यासाठी, कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या आणि लोकशाही मार्गाने संघटन करणाऱ्या समुहास, स्वयंसहायता बचत गट, असे म्हणतात.''*

- *''जीवनातील नवनव्या आव्हानांना व जबाबदाऱ्यांना पेलण्यासाठी, क्षमता विकसित करणारा सुसज्ज संच म्हणजे स्वयंसहायता समुह होय.''*

- **स्वयंसहायता बचत गटाचे व्यवस्थापन :**

स्वयंसहायता बचत गटाची अंमलबजावणी व व्यवस्थापन केंद्र राज्य, जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर असते. प्रत्येक पातळीवर स्थायी समित्या असतात. स्वयंसहायता बचत गटाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यवाहीसाठी सदैव सज्ज असते. त्या यंत्रणेचे कोष्टकात्मक स्वरुप खालीलप्रमाणे :

## स्वयंसहायता बचत गटाचे रचनात्मक व्यवस्थापन




वरील कोष्टकाप्रमाणे, स्वयंसहायता बचत गटाचे सुत्रबद्ध आणि पद्धतशीरपणे व्यवस्थापन चालते. समाजातील विषमता कमी करण्यासाठी, विविध विकास योजनांच्या माध्यमातुन, शासनातर्फे भरपुर प्रयत्न केले जात आहेत. स्त्री सबलीकरणाच्या दृष्टिकोनातुन, अनेक योजनांद्धारे, समाजात परिवर्तनदेखील घडत आहे. सबला व्यक्ती आपल्या सभोवतालचे वातावरण बदलुन, शाश्वत विकास करतात, त्यामुळेच कमकुवत महिला घटकांना स्थायी स्वरुपात शाश्वत आर्थिक स्त्रोत निर्माण केल्यास, त्यांचे सबलीकरण, अधिक व्यापक स्वरुपात आणि परिणामकारकरित्या यशस्वी होऊ शकते. गेल्या १५-२० वर्षांपासुन, स्वयंसहायता महिला बचत गटांच्या माध्यमातुन महिलांचे सबलीकरण करण्याचे विशेष प्रयत्न केले जात आहेत. यातुन महिलांचे समान सबलीकरण होईल, असे मात्र  निक्षुन सांगता येत नाही कारण प्रत्येक स्वयंसहायता गटाची आर्थिक, सामाजिक व मानसिक परिस्थिती, मनुष्य स्वभावाच्या भिन्नतेवर आधारित असते. तरी अशाही परिस्थितीत राज्यातील महिला बचत गटांद्धारे, विविध स्तरांवर महिलांचे सबलीकरण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

- **आर्थिक सबलीकरण :**

पुर्वीपासुनच स्त्रियांच्या कामाचा दर्जा, परिस्थिती, या गोष्टी समाजात हीन दर्जाच्या मानल्या गेल्या आहेत. प्रथम स्त्रियांना समजुन घेऊन, स्त्रियांचे कार्य कौशल्य केंद्रीभुत मानुन, त्यास प्राधान्य देत, त्यांच्या कामाचा, त्यागाचा विचार केल्यास, सबलीकरणास खरी सुरुवात होईल. आणि त्यामुळेच, स्त्रियांमध्ये आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, सकारात्मकता, स्वावलंबीत्व, निर्णयक्षमता, धाडसी वृत्ती निर्माण होण्यास मदत होईल. स्वतंत्र उद्योग-व्यवसाय उभा करणे, स्त्री असो वा पुरुष, कोणालाही जोखमीचेच वाटते. परंतु स्वयंसहायता गटांमार्फत, महिला धाडसाने, आत्मविश्वासाने त्यांना भावणारे, त्यांना व्यवस्थितरित्या जमणारे उद्योग सुरु करु शकतात. कारण त्यासाठी आवश्यक असणारे व्यवसाय प्रशिक्षण, भांडवल उभारणी, कच्चा माल, यंत्रसामग्री, विक्री व्यवस्था, कर्जफिड, अशा गोष्टी बचत गटांद्वारे उपलब्ध होतात. त्यामुळे गरजु व महत्त्वाकांक्षी महिलांना, या संधीचा योग्य प्रकारे लाभ उठविता येतो. त्यातुनच महिलेच्या सबलीकरणास सुरुवात होते. लाभार्थी महिलेला आपल्या मुलाबाळांच्या आरोग्याची, शिक्षणाची, कुटुंबाचा घर खर्च, कर्जफिड व बचतीची तरतुद या उद्योग-व्यवसायातुन मिळालेल्या आर्थिक उत्पन्नातुन व्यवस्थित करता येते. सामुहिक शक्ती वाढवुन, रोजगाराची निर्मिती व व्याप्ती लाभार्थी महिला वाढवु शकते. कर्जाची रक्कम फेडली जाते, बचत करण्याची सवय लागते, अशा प्रकारे तिचे आर्थिक सबलीकरण या विविध महिला बचतगटांच्या माध्यमातुन साधले जाते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत, रोजगाराच्या संधी कमी होत असताना, स्वयंसहायता गट, अशा पद्धतीने रोजगार निर्मितीत वाढ करीत आहे. त्याद्वारेच, महिलांचे आर्थिक सबलीकरण, या स्वयंसहायता बचत गटांद्वारे केले जात आहे.

- **सामाजिक सबलीकरण :**

पुर्वीपासुन चालत आलेल्या समाजातील जुन्या चालीरिती, रुढी-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, यांच्या बंधनामध्ये अडकलेल्या स्त्रीचे, सामाजिक खच्चीकरण, मोठ्या प्रमाणात वर्षानुवर्षे चालुच आहे. या सामाजिक बांधिलकीमुळे, आजच्या स्त्रीचा स्वभाव कमकुवत, अंधश्रद्धाळु बनला आहे. तिला इतकी वर्ष कुटुंबात व समाजात मिळत असलेली दुय्यम, न्युनतम व हीन वागणुक, हे तिच्या अबलतेचे प्रमुख कारण आहे. स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळापासुन, शिक्षणाच्या, समाजसुधारणेच्या माध्यमातुन, अनेक समाजसुधारकांनी महिलांचे सामाजिक बंधन शिथील करण्यास सुरुवात केलेली आहे.

सध्याच्या काळातील स्वयंसहायता महिला बचत गट, महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेमध्ये आज, अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावताना आपल्याला दिसत आहे. या गटांमुळे त्या त्या विभागातील महिलांचे संघटनात्मक एकत्रीकरण सुरु झाले आहे. खेडोपाडी, आदिवासी दुर्गम भागांप्रमाणेच, तालुक्याच्या ठिकाणी गावातल्या देवळात, वेशीवर, माळरानावर त्या त्या ठिकाणच्या महिला एकत्र जमुन सभा, परिसंवाद, चर्चासत्रे घेऊ लागल्या आहेत. वचत गटांच्या माध्यमातुन निर्माण होत असलेल्या स्वयंसहायता, रोजगार निर्मिती, उद्योग-व्यवसायांची निर्मिती, व्यवसाय नियोजन, व्यवसाय प्रशिक्षण, व्यवसाय पद्धती, इत्यादी विषयांवर, या महिला एकत्र येऊन निर्णय घेऊ लागल्या आहेत. महिलांना आता आपल्या अस्तित्वाची, आपल्या मुलभूत हक्क व अधिकारांची, आपल्या कर्तव्यांची, जबाबदारींची, आपल्या कार्यक्षमतेची, कार्य कौशल्याची, स्वयंपुर्णतेची, स्वाभिमानाची, स्वावलंबनत्वाची, जाणीव होऊ लागल्यामुळे, स्त्री-पुरुषांमधील असमानतेची दरी आता कमी होऊन, समाजामध्ये स्त्रियांनाही उच्च दर्जा व आदर प्राप्त होऊ लागला आहे. त्यामुळे स्त्रियांवरील अत्याचार, हुंडाबळी, मारहाण, असे निंदनीय, अमानवी प्रकार, काही प्रमाणात का होईना पण कमी झाले आहेत. स्त्रिया साक्षर व सुशिक्षित होऊ लागल्यामुळे, त्यांच्यात सुसंस्कृतपणा, निर्णयक्षमता, व्यवहार ज्ञान, सामाजिक सुधारणांची बांधिलकी वाढत आहे.

समाजात जनजागृती होत असुन, बचत गटाच्या माध्यमातुन एकत्र येण्यामुळे विचारांची देवाण-घेवाण, कामात सुसूत्रता, कामाचे सुनियोजन व आखीव कार्यपद्धती, यांमुळे स्त्रियांची मानसिक, आर्थिक भरभराट होऊ लागली आहे. आपल्या कायदेशीर हक्क, अधिकार व मागण्यांसाठी दबावगट निर्माण झाल्यामुळे, स्त्री हितासाठी चळवळी, उपोषणे, धरणे आंदोलन, अशा लोकशाही मार्गांचा अवलंब स्त्रिया करु लागल्या आहेत. बचत गटांच्या माध्यमातुन होत असलेली, महिला सबलीकरणाची, सक्षमीकरणाची यशस्वी वाटचाल, हे सामाजिक सबलीकरणाचेच द्योतक असल्याचे चित्र आज आपल्याला दिसते.

- **राजकीय सबलीकरण :**

स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातुन महिला आता राजकारणातदेखील सक्रिय सहभागी होऊ लागल्या आहेत. या बचत गटांमध्येच संघटन, नेतृत्व, व्यवस्थापन, निर्णयक्षमता, राजकीय डावपेच, मुत्सदेगिरी, कौशल्य, अशा विविध गुणात्मक शिक्षणाचे धडे महिलांना आपोआपच मिळू लागले आहेत. त्यामुळे त्या पंचायतराज संस्थांचा कारभार सुरळीतपणे पार पाडत आहेत. राजकीय व्यासपीठावर त्यांच्या व्यापक विचारांचा व अचुक निर्णयक्षमतांचा सन्मान व आदर होत असल्यामुळे राजकारणातदेखील स्त्रियांना मानाचे स्थान प्राप्त होत आहे.

- **पंचवार्षिक योजनेतील महिला सबलीकरणाची उद्दिष्ट्ये :**

**स्वातंत्र्योत्तर काळात देशाचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी, केंद्र शासनाने, नियोजन मंडळ स्थापन करुन, दर पाच वर्षात करावयाच्या विकास कामांची उद्दिष्ट्ये ठरवुन, ती उद्दिष्ट्ये पाच वर्षात साध्य करण्यासाठी, पंचवार्षिक योजनांची आखणी केली. भारतातील प्रत्येक पंचवार्षिक योजनेची उद्दिष्ट्ये आणि त्यामधील महिला सक्षमीकरणासाठी निर्धारित केलेली उद्दिष्ट्ये खालील तक्त्यात दिली आहेत.**

**तक्ता क्र. १.३**

**पंचवार्षिक योजनेतील महिला सबलीकरणाची उद्दिष्ट्ये**

| *पंचवार्षिक योजनेचा कालावधी* | योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये | *महिला सक्षमीकरणासाठीची उद्दिष्ट्ये* |
|---|---|---|
| *पहिली पंचवार्षिक योजना १९५१ – १९५६* | शेतीविकासाबरोबरच औद्योगिक प्रकल्प उभारणी आणि सार्वजनिक क्षेत्राचा विकास. | *महिला कल्याणकारी योजनांची आखणी केली. महिला मंडळ, महिला संघटना, केंद्रिय सामाजिक महिला मंडळ, एकात्मिक महिला मंडळ, एकात्मिक महिला विकास मंडळ यांची स्थापना. (हे उद्दिष्ट मुलभूत उद्दिष्टांमध्ये विशेष निर्देशित केलेले नाही.)* |
| *दुसरी पंचवार्षिक योजना १९५६ – १९६१* | देशाचे जलद गतीने औद्योगिकीकरण घडवून आणणे. मुलभूत व अवजड उद्योगांच्या बाबतीत देशाला स्वयंपुर्ण बनविणे. | *महिला सक्षमीकरणासाठी विस्तृत प्रमाणावर शेती विकास कार्यक्रम राबविणे.* |
| *तिसरी पंचवार्षिक योजना १९६१ – १९६६* | शेती व औद्योगिक क्षेत्रामध्ये सुसंबंध प्रस्थापित करुन मुलभूत आणि अवजड उद्योगांच्या विकासावर भर देणे. | *महिलांना शैक्षणिक सुविधांची उपलब्धता देऊन त्यांचा विकास साधणे.* |
| *चौथी पंचवार्षिक योजना १९६९ – १९७४* | पुर्वीचे प्रकल्प पुर्ण करणे. पर्यायी वस्तुंचे उत्पादन वाढविणे. नवीन उद्योगांची स्थापना. व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण. | *महिलांच्या शैक्षणिक विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणे.* |
| *पाचवी पंचवार्षिक योजना १९७४ – १९७९* | स्वावलंबन व सामाजिक न्यायासह विकास. २१ खाजगी उद्योगांची परवाना पद्धतीतुन मुक्तता. आभियांत्रिकी उद्योगांचा विकास. | *सुरक्षित उत्पन्न, बेरोजगार आणि संरक्षणासाठी महिला कल्याण आणि विकास प्राधिकरणाची स्थापना.* |

| *पंचवार्षिक योजनेचा कालावधी* | योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये | *महिला सक्षमीकरणासाठीची उद्दिष्ट्ये* |
|---|---|---|
| *सहावी पंचवार्षिक योजना १९८० - १९८५* | निर्यातप्रधान आभियांत्रिकी उद्योगांचा विकास. संशोधन आणि तंत्रज्ञान विकास. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील उत्पादनात वाढ. | *महिलांच्या कल्याणातुन विकास साधणे. आरोग्य, शिक्षण, रोजगारातुन महिला सक्षमीकरण करणे.* |
| *सातवी पंचवार्षिक योजना १९८५ - १९९०* | उपभोग्य वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण. उत्पादनात वाढ. तांत्रिक प्रगतीद्धारा औद्योगिक आणि उपभोग्य वस्तुंचे उत्पादन वाढविणे. निर्यातप्रधान उद्योगांचा विकास. रोजगार निर्मितीवर भर. | *स्त्री-पुरुष समानतेच्या भावनेतुन महिलांचे सक्षमीकरण. महिला हक्कांची जागृती. रोजगारासाठी आवश्यक असणारी कौशल्ये प्रशिक्षणाद्धारे विकसित करणे.* |
| *आठवी पंचवार्षिक योजना १९९२ - १९९७* | सन १९९१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण आखले. प्रत्यक्ष परकिय धोरण. वीज निर्मितीसाठी एन्रॉन प्रकल्प. | *पंचायत राज धोरणाद्धारे महिलांचे सक्षमीकरण करणे.* |
| *नववी पंचवार्षिक योजना १९९७ - २००२* | औद्योगिक उत्पादन वाढीचा वेग ८ टक्के ठरविला. सार्वजनिकआणि खाजगी उद्योगांसाठी विशेष खर्चाची तरतुद. | *राष्ट्रीय महिला धोरण २००१ जाहीर. महिलांना आरक्षण देण्यासाठी विशेष कार्यक्रमाची आखणी.* |
| *दहावी पंचवार्षिक योजना २००२ - २००७* | औद्योगिक विकास साधण्यासाठी खाजगी उद्योग क्षेत्रावर भर-भांडवल प्रधान उत्पादन तंत्राच्या सहाय्याने प्रगती. विशेष आर्थिक क्षेत्रांची (सेझ) निर्मिती. | *महिला सक्षमीकरणासाठी भारत सरकारने जाहीर केलेल्या धोरणांद्धारे महिला विकास साधणे. महिला व बाल विकास धोरणांची अंमलबजावणी.* |
| *अकरावी पंचवार्षिक योजना २००७ - २०१२* | जागतिकीकरणाद्धारे बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये वाढ. पर्यावरण जागृती. रस्ते, वाहतुकीची साधने, वीज निर्मिती विकास. | *स्त्री भृण हत्या विषयक कायदे. सरकारी योजनांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ मिळविण्यासाठी महिलांना ३३ टक्के आरक्षण जाहीर.* |
| *बारावी पंचवार्षिक योजना २०१२ - २०१७* | पर्यावरण जागृती. वीज, रस्ते निर्मिती, रस्त्यांचा विकास. | *ग्रामीण क्षेत्रामध्ये महिलांना रोजगार प्राप्त होण्यासाठी राष्ट्रीय उपजिविका अभियान (एन्.आर.एल्.एम्.) जून २०११ पासुन या अभिनव योजनेसाठी २१ हजार कोटी रुपयांची शासनाची महिलांसाठी तरतुद.* |

**तक्ता क्र. १.४**
**पंचवार्षिक योजना काळातील महिलांची तुलनात्मक शैक्षणिक स्थिती**

| वर्ष | महिला साक्षरता (टक्के) | पुरुष साक्षरता (टक्के) | एकुण साक्षरता (टक्के) | महिला साक्षरतेमधील दहा वर्षातील वाढ (टक्के) | महिला–पुरुष साक्षरता दरातील अंतर (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| १९५१ | ८.८६ | २७.१६ | १८.१३ | -- | १८.३० |
| १९६१ | १५.३४ | ४०.४० | २८.३१ | ६.४८ | २५.०६ |
| १९७१ | २१.९७ | ४५.९५ | ३४.४५ | ६.६३ | २३.९६ |
| १९८१ | २९.२९ | ५६.५० | ४३.६७ | ७.८८ | २६.६५ |
| १९९१ | ३९.२९ | ६४.१३ | ५२.२१ | ९.४४ | २४.८४ |
| २००१ | ५४.१६ | ७५.८५ | ६५.३८ | १४.८७ | २०.८९ |
| २०११ | ६५.४६ | ८२.१४ | ७४.०४ | १८.१२ | १६.६८ |

*स्त्रोत : कुरुक्षेत्र मासिक, नवी दिल्ली, ऑगस्ट २०१३, पृ. क्र. १८*

वरील तक्ता क्र. १.४ वरुन असे लक्षात येते की, सन २००१ च्या तुलनेत, सन २०११ या वर्षात महिला साक्षरतेचे प्रमाण भारतात ११.३ टक्क्यांनी वाढले आहे. तसेच, सन २००१ च्या तुलनेत, सन २०११ मध्ये महिला व पुरुष साक्षरता दरातील अंतर भारतात ४.२१ टक्क्यांनी कमी झाले आहे, ही एक समाधानाची बाब आहे. त्यामुळे महिला सबलीकरणाच्या कार्यक्रमामुळे, शिक्षणाच्या माध्यमातुन, महिलांचे सबलीकरण होत असल्याचे स्पष्ट होते.

## १.१५ सारांश :

प्रस्तुत प्रकरणात महिला सबलीकरणाच्या व्याख्या, स्वरुप, तत्त्वे, महिला सबलीकरण योजनेची उद्दिष्ट्ये, महिला सबलीकरणाच्या दिशा, त्याची गरज, आवश्यकता, महिला सबलीकरण आणि शिक्षणाचा संबंध, महिलांचे विविध क्षेत्रातील योगदान, महिला आणि विकासाचा धोरणात्मक दृष्टिकोन, स्वयंसहायता बचत गटांद्धारे, महिलांचे सबलीकरण, अशा सर्व घटकांचे विश्लेषण केले आहे.

पुढील दुसऱ्या प्रकरणात, संशोधन पद्धती आणि त्यातील घटकांचा आढावा घेतला आहे.

- **संदर्भसूची :**


- *डॉ. शिंदे ज.रा. , डॉ. अमृतकर प्रशांत ,* 'समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या', प्रकाशन क्रमांक – २६, पृ. क्र. १२५, १२९, १३०, १३१.
- *चौधरी संदिपकुमार ,* 'शिक्षण आणि समाज', योजना, एप्रिल–जून २००६, पृ. क्र. ५४, ५५, ५६.
- *चौधरी संदिपकुमार,* 'महिला सशक्तीकरणात शिक्षणाची भुमिका', पृ. क्र. ५४, ५५, ५७, ५८.
- *चौधरी संदिपकुमार,* 'शिक्षण आणि समाज', योजना, एप्रिल–जून २००७, पृ. क्र. ४८.
- *मांजरे आर.एम्.,* 'महिला सबलीकरणाच्या दिशा', योजना, जानेवारी–मार्च २०० , पृ. क्र. ६६, ६७, ६८.
- *मोडक विश्वनाथ आवा,* 'हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेची साठ वर्षे', पुणे, १९९६, पृ. क्र. ७.
- *डॉ. साळुंके आर.एस्., डॉ. गावंडे जी.बी.,* योजना, सप्टेंबर २००५, पृ. क्र. ३०.
- *डॉ. दास्ताने संतोष,* 'महाराष्ट्र', २००८, पृ. क्र. ५४.
- *सुतार विद्या ,* 'महिला विकासाचा प्रमुख आधारस्तंभ', योजना, एप्रिल–जून २००६, पृ. क्र. ३५, ३६.
- *डॉ. पाटील लीला ,* 'स्त्रिया आणि विकासाचा धोरणात्मक दृष्टिकोन', योजना, डिसेंबर २००४, पृ. क्र. ३९, ४०.
- *चौधरी राजेश,* 'महिला बचत गट', हस्तपुस्तिका, चौधरी लॉ प्रकाशन, २०११, जळगांव–पुणे.
- *लोकराज,* 'महिला दिन विशेष', मार्च २०१०, पृ. क्र. ९.
- *माहिती पुस्तिका,* सन २०१२–१३, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ७०.
- *रेगे शर्मिला, भागवत विद्युत , (१९९४),* 'स्त्री विकासाची गुंतागुंत', विकास अध्ययन केंद्र, मुंबई.
- 'महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा', महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुबंई.
- *राजपूत धोंडिरामसिंह,* 'बचत गटातुन महिलांचे सबलीकरण', स्त्री मासिक, ऑगस्ट २००८, पृ. क्र. १९.
- *चौगुले सुमती,* 'महिला सबलीकरणाची नवी दिशा', इंदुजा प्रकाशन, २००५, पृ. क्र. ५९, ६०.
- *घाणेकर वि.वि.,* 'स्वयंसहायता बचत गट', २००६, पृ. क्र. २१, २२.
- *भागवत विद्युत,* 'पर्यायी समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान', स्त्री मासिक, मार्च–एप्रिल २००८, पृ. क्र. ३६, ३७.
- *भागवत विद्युत,* 'स्त्रियांचा विकास, कल्याण की सक्षमीकरण', स्त्री मासिक, मार्च–एप्रिल २००८, पृ. क्र. ३२, ३३, ३४.

- *श्रीवास्तव मयांक, (२०११),* 'महिला सशक्तीकरण – सामाजिक बदलाव के लिए आवश्यक', कुरुक्षेत्र मासिक, अरावली प्रकाशन, अंक १०, नई दिल्ली, पृ. क्र. १८.
- *मुलाणी एम्. यु.,* 'महिला स्वयंसहायता बचत गट', डिसेंबर २००६, डायमंड प्रकाशन.
- सकाळ, २ ऑक्टोबर २००८, 'पुणे जिल्हा राज्यात पहिला', पृ. क्र. १.
- सकाळ, १0 ऑक्टोबर २०....., 'बचत गटात नव्या क्रांतीचे सामर्थ्य', पृ. क्र. १.
- लोकसत्ता, १९ सप्टेंबर २००८, 'महिला बचत गटांचा विजय', पृ. क्र. १.


. . . . .

# प्रकरण – २

# संशोधन पद्धती आणि संदर्भ साहित्याचा आढावा

*प्रकरण दुसरे*

# संशोधन पद्धती आणि संदर्भ साहित्याचा आढावा

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २.१ | प्रस्तावना | ६२ |
| २.२ | संशोधन विषयाची निवड | ६४ |
| २.३ | संशोधन विषयाची आवश्यकता | ६६ |
| २.४ | संशोधनाची उद्दिष्ट्ये | ६७ |
| २.५ | संशोधनाची गृहितकृत्ये | ६७ |
| २.६ | संशोधन अभ्यासाचा कालावधी | ६७ |
| २.७ | संशोधन पद्धती | ६८ |
| २.८ | तथ्य संकलन | ७० |
| २.९ | संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा | ७२ |
| २.१० | प्रकरणानुसार प्रबंधाची मांडणी | ७३ |
| २.११ | संदर्भ साहित्याचा आढावा | ७४ |
| ● | संदर्भ ग्रंथ सूची | 94 |


. . . . .

## २.१ प्रस्तावना :

विकसनशील देशाचा विकास आणि महिलांचा विकास, यांचा अत्यंत जवळचा व प्रत्यक्ष संबंध आहे. भारताची निम्मी लोकसंख्या महिलांची असुन, त्यांच्या सबलीकरणासाठी केंद्रशासन आणि राज्यशासन सतत प्रयत्नरत आहेत. महिलांना त्यांच्या हक्क व अधिकारांची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. तसेच, त्यांचे मुलभूत हक्क व अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी व त्यांना संरक्षण देण्यासाठी, अनेक घटनात्मक कायदेही तयार करण्यात आले आहेत. महिलांच्या शिक्षणाचे प्रमाण वाढविणे, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, आर्थिक व्यवहार आणि संपत्तीमध्ये सहभागी करणे, अशी अनेक उद्दिष्ट्ये महिला सबलीकरणासाठी आवश्यक आहेत.

भारत सरकारने २००१ हे वर्ष 'महिला सबलीकरण वर्ष' म्हणुन जाहीर केले. त्या निमित्ताने महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचा जो आढावा घेतला गेला, त्यात काही सकारात्मक आणि नकारात्मक बाबी दिसुन आल्या. त्यामध्ये भारतातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी केलेली सकारात्मक प्रगती केंद्रस्थानी ठेऊन, तत्कालीन पंतप्रधानांनी 'स्त्री-शक्ती पुरस्कार' सुरु केला. तसेच, १९७५ हे साल, संयुक्त राष्ट्रसंघात 'अ' दर्जाचे स्थान असलेल्या, 'आंतरराष्ट्रीय लोकशाही फेडरेशन' ने आणलेल्या ठरावानुसार 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणुन घोषित करण्यात आले. तर ८ मार्च हा दिवस जगभरात 'जागतिक महिला दिन' म्हणुन दरवर्षी साजरा केला जातो. हे सर्व वर्ष, दिन साजरे करण्यामागे महिलांचे सबलीकरण, हा प्रमुख हेतु असल्याचे दिसते. लिंगभेदविरहीत विचारशक्ती जागृत करुन, स्त्री व पुरुष या दोघांनी मिळुन, नवे तत्वज्ञान विकसित केल्यामुळेच, हवे असलेले सकारात्मक बदल घडुन येतील.

नकारात्मक बाबींमध्ये लक्षणीय बाब म्हणजे मागासवर्गीय महिला या देशातील लोकसंख्येचा महत्त्वाचा भाग असुन, या महिलांना 'स्त्री' म्हणुन आणि 'मागास' म्हणुन, अशा दोन्ही बाजुंनी त्रास सोसावा लागतो. या मागासवर्गीय महिला अशिक्षित असल्यामुळे सर्वांगाने अविकसित राहिल्या आहेत. अशा वेळी सामाजिक व आर्थिकदृष्टीने या महिलांचा विकास करणे, अत्यंत गरजेचे असल्यामुळेच, केंद्रशासन, महाराष्ट्र शासन व स्थानिक शासन प्रयत्नशील आहे. महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेत अनेक घटकांचा समावेश आहे. त्याअंतर्गत आर्थिक, सामाजिक, राजकिय, आरोग्य, शैक्षणिक, असे सर्व घटक समाविष्ट असुन, या सर्व घटकांचे, महिला सबलीकरणासाठी महत्त्व ओळखुन, महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी विविध योजनांची आखणी करुन, त्यांची अंमलबजावणी केल्याचे दिसुन येते.

भारतीय राज्यघटनेने बहाल केलेला 'समानतेचा मुलभूत हक्क' हा महिलांच्या विकासाचा भक्कम पाया आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९७५-८०) महिलांसंबंधीच्या तरतुदींमुळे बदलाची प्रक्रिया गतीमान झाली. कारण या काळात प्रथमच विकास प्रक्रियेत चालना देण्याची क्षमता स्त्रीवर्गामध्ये आहे, यावर विशेष भर देण्यात आला. त्यामुळे १९९० साली राष्ट्रीय स्तरावर 'राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना झाली. तर महाराष्ट्र राज्याने जानेवारी १९९३ मध्ये या आयोगाची स्थापना केली. समाजाच्या दुर्बल घटकांच्या मुलभूत गरजांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'महिला व बालविकास' हा स्वतंत्र विभाग जून १९९३ मध्ये स्थापन केला.

महिला व बालविकास विभागातंर्गत, महिला विकासाच्या, विविध योजना राबविण्यात येत असुन, सर्व नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व शासन, महिला सबलीकरणासाठी, सर्व स्तरांवरील वार्षिक व पंचवार्षिक योजनांची आखणी करताना दिसतात. विविध स्तरावरील महिला व बालविकास समित्यांकडुन या योजनांचा समन्वय साधण्यात येतो. त्या त्या पातळीवरील ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगरपालिका या संस्थांकडुन, योजनांचा नियमित आढावा घेण्यात येतो. भारत संघराज्य महिला सबलीकरणामध्ये आघाडीवर असुन, देशाचा विकास आणि प्रगती साधण्यासाठी, सर्व महिलांचे सबलीकरण होणे, अत्यंत गरजेचे आहे. महिलांच्या सबलीकरणासाठी विविध क्षेत्रात सार्वजनिक, सरकारी आणि खाजगी संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी, शासन सर्वेतोपरी प्रयत्नशील असल्याचे दिसुन येते.

आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने, दिनांक २४ फेब्रुवारी १९७५ रोजी 'महिला आर्थिक विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली. महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व व महामंडळाची या क्षेत्रातील तज्ञता व कौशल्य लक्षात घेऊन, महाराष्ट्र शासनाने दिनांक २० जानेवारी २००३ रोजी महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखरसंस्था' म्हणुन घोषित केले. या महामंडळाच्या अखंड विकास प्रक्रियेतुन महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करण्याचा हेतु, काही प्रमाणात साध्य झाल्याचे दिसुन येते. आज मितीस, महाराष्ट्र शासनाच्या विविध विकास योजनांमुळे, महिलांचे सर्वांगाने सबलीकरण होताना दिसुन येत आहे. महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकिय सबलीकरणामध्ये, महाराष्ट्रशासनाच्या विविध योजनांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

प्रस्तुत संशोधन अभ्यासात, महाराष्ट्र शासनाने, महिला बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्यामार्फत महिला सबलीकरणासाठी राबविलेल्या एकुण योजनांपैकी, महत्त्वपुर्ण अशा आठ योजनांचा अभ्यास केलेला आहे.

## २.२ संशोधन विषयाची निवड :

'महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या निवडक योजनांचा चिकित्सक अभ्यास (पुणे जिल्ह्यापुरता मर्यादित) कालावधी २०००-०१ ते २००९-१०' हा विषय संशोधनासाठी निवडण्याची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे :

- 'महिला सबलीकरण' याचाच अर्थ, महिलेला सबल करणारी, सशक्त करणारी, म्हणजेच महिलेची दुर्बलता नष्ट करणारी, अर्थात, तिच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक स्वत्वाची तिला ओळख पटवुन, तिच्यात स्वतःबद्दलची जागरुकता निर्माण करुन, त्या दृष्टीने तिला सशक्त करणारी एक संकल्पना होय.
- महिलांचे सबलीकरण म्हणजे त्यांची आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात झालेली प्रगती. महिलांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या विविध योजनांचे योगदान कशा प्रकारचे आहे, हे जाणुन घेण्यासाठी, त्याचा सर्वांगाने अभ्यास करण्यासाठी, हा महत्त्वाचा विषय निवडण्यात आला आहे.
- महाराष्ट्र शासनाकडुन दरवर्षी महिलांच्या विकासासाठी किती प्रमाणात खर्च केला जातो. विविध विकास योजनांसाठी कार्यक्रम अंदाजपत्रकाची आखणी कशी केली जाते, तसेच, कोणत्या प्रशासकीय सुधारणा करण्यात आल्या, हे तपासण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांमुळे, गेल्या १० वर्षात, महिलांच्या सबलीकरणात नेमका काय बदल झाला, किती योजनांना यश मिळाले, किती योजना अपयशी ठरल्या, हे अभ्यासण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.
- शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, सर्व महिलांसाठी सारख्याच असतात का? मागासवर्गीय महिलांना 'विशेष घटक' या सदरांतर्गत, काही खास सुविधा पुरविल्या जातात का? अशा अनेक प्रश्नांची उकल व्हावी, या हेतुने हा विषय निवडण्यात आला.
- महाराष्ट्र शासन, महिला विकासासाठी ज्या योजना राबविते, त्यांची प्रशासकीय संरचना कशी आहे, राज्यस्तरावर तसेच, जिल्हास्तरावर, कशा पद्धतीने कामकाज चालते, लाभार्थी महिला व शासन यांना कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागते, त्यातुन योग्य तो मार्ग काढुन, या योजनांना कसे यशस्वी केले जाते, या सर्व घटकांचा विचार होणे आवश्यक वाटल्यामुळे, सदर विषयाची निवड करण्यात आली.
- विकसनशील देशाला विकसित देशांच्या यादीत नेण्यासाठी प्रत्येक घटकाची, प्रत्येक क्षेत्राची प्रगती योग्य दिशेने व सम प्रमाणात होणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन प्रत्येक क्षेत्राचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी आवश्यक ती आर्थिक मदत व त्या अनुषंगाने लागणाऱ्या अनेक सुविधा उपलब्ध करुन, प्रगतीचा वेग वाढविण्याचा हेतु सफल करण्याचा प्रयत्न करते. महाराष्ट्र

शासनाने, महिला विकासासाठी अनेक योजना राबविण्यास सुरुवात केलेली असुन, त्यासाठी गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर विविध योजनांची सविस्तर माहिती देणारी केंद्रे स्थापन केल्याचे आढळते. तसेच, महिला कल्याण आणि विकास कार्यक्रमासाठी जनजागृतीचा कार्यक्रम, महिला विकासाच्या आवश्यकतेबद्दल लोक प्रतिनिधी आणि विविध संस्थांच्या कर्मचारी वर्गाला विशेष प्रशिक्षण देऊन, महिला विकास साधण्याचा सर्वेतोपरी प्रयत्न, शासनाकडुन केला जात आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे महिलांचे सबलीकरण कसे व किती प्रमाणात साध्य झाले, याचा अभ्यास करण्यासाठी हा संशोधन विषय निवडला आहे.

- विविध क्षेत्रात महिलांच्या स्वयंसहायता गटांची स्थापना करुन, त्यांची कार्यक्षमता, कार्यकौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी, शासनाकडुन विशेष प्राधान्य दिले जात आहे. याअंतर्गत, आदिवासी महिला, मागासवर्गीय महिला, अपादग्रस्त महिला आणि ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर व सबलीकरणावर शासन विशेष भर देत आहे. थोडक्यात, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी, महाराष्ट्र शासन नवनवीन योजनांची आखणी करुन, त्यांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न कसा करत आहे, यांचा अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.
- 'महिला सक्षमीकरण' हा एखादा कार्यक्रम किंवा प्रकल्प नसुन, ही एक प्रदीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सहभागी होणारी महिला, खऱ्या अर्थाने सबल व सक्षम झाली आहे, असे तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा ही महिला स्वतःसाठी व आपल्या कुटुंबासाठी स्वतः नियोजन करुन, त्यावर योग्य तो निर्णय घेऊन, त्याची व्यवस्थितरीत्या अंमलबजावणी करुन, तिला अपेक्षित असलेले उद्दिष्ट कसे साध्य करु शकेल, याचा शोध घेण्यासाठी संशोधकाने सदर संशोधन विषयाची निवड केली आहे.
- संशोधक स्वतः एक मागासवर्गीय, सुशिक्षित व स्वावलंबी महिला असल्यामुळे, तिला ज्या अडचणींना तोंड द्यावे लागले, तिला ज्या सुविधा मिळाल्या, त्यामुळे तिची झालेली प्रगती लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या विविध योजनांची माहिती, इतर इच्छुक महिलांपर्यंत पोहचविण्यासाठी व त्यांना विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी, संशोधकाला हा अभ्यास विषय निवडणे सार्थ वाटले. तसेच, प्रशासकीय समस्या व महिलांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, शासनाला सुचविलेल्या शिफारशी प्रयत्नपुर्वक मांडण्याचा हा एक प्रयत्न असल्याने, या विषयाची निवड संशोधकाने केली आहे. महिला शिक्षणाचा विचार करताना, एकुण महिलांच्या शिक्षणामध्ये, महाराष्ट्र शासनाची भुमिका अभ्यासण्यासाठी, प्रशासकीय संरचना समजुन घेण्यासाठी, संशोधकाने सदर विषयाची निवड केली आहे.

## २.३ संशोधन विषयाची आवश्यकता :

- उपरोक्त संशोधनामुळे, नवीन संशोधकांना 'महिला सबलीकरण' या विषयांतर्गत महिलांसाठी उपलब्ध असलेल्या घटनात्मक कायदेशीर तरतुदी, महिलांचे मुलभूत हक्क व अधिकार, स्त्रियांच्या विविध मुक्ती चळवळींचा आढावा, इत्यादी विषयांच्या माहितीचा स्त्रोत म्हणुन, हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांवर संशोधन केल्यामुळे, समाजातील महिलांना या योजनांची व्यापक व उपयुक्त माहिती मिळेल. देशाचा विकास होण्यासाठी, समाजातील सर्व घटकांचा प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. समाज व शासन, ही एकाच विकास रथाची दोन चाके असुन, ती समान गतीने व समतोल साधत मार्गोत्क्रमण करतील तर सामाजिक विकासाचा पल्ला सहज गाठता येईल आणि त्यातुन समाज व शासन या दोहोंचाही उत्कर्ष साधला जाईल, याची जाणीव शासन व समाजाला होण्यासाठी या विषयाची विशेष आवश्यकता वाटते.
- महिला विकासाच्या ज्या योजना, महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जातात, त्या योजनांचे यशापयश, त्यासंबंधी सुचविलेल्या शिफारशी, महिला विकासातुन महिलांचे सबलीकरण साधण्यासाठी अत्यंत मोलाच्या आहेत.
- गेल्या दहा वर्षाच्या कालावधीत म्हणजेच २०००-०१ ते २००९-१० दरम्यान, महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी सुरु केलेल्या विविध योजनांचा (वस्तु लाभ, अर्थसहाय्य) नेमका किती उपयोग झाला, हे या संशोधनातुन काढलेल्या निष्कर्षावरुन समजणार आहे.
- समाजातील विविध घटकांमध्ये, मागासवर्गीय महिला, अनेक बाबतीत अतिशय दुर्बल व कमकुवत असल्याचे, अनेक अहवाल परिक्षणांवरुन आढळुन आलेले आहे. या महिलांच्या सबलीकरणासाठी, सर्वांगीण विकासासाठी 'विशेष घटक योजना' राबविल्या जात असुनसुद्धा, सदर योजनांची माहिती नसल्यामुळे, या महिलांना त्या योजनांचा फायदा घेता आला नाही. परंतु या महिलांचा सर्वांगीण विकास साधण्याचा शासन अविरत प्रयत्न करीत आहे. त्यामुळे विकासाची प्रक्रिया येत्या काळात नक्कीच यशस्वी होईल, अशी अपेक्षा वाटते. देशातील सर्वच महिलांना विकासाची संधी उपलब्ध होईल व त्यांच्यात स्वावलंबी व स्वयंसिद्ध बनण्याची प्रेरणा निर्माण होऊन, त्यांची प्रगती होईल, हा आशावाद मनाशी बाळगुन, हा संशोधन अभ्यास विषय संयुक्तिक वाटतो.
- संशोधकाने संशोधनासाठी, पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यांची निवड केल्यामुळे, त्या तालुक्यातील महिला लाभार्थींचा झालेला विकास, त्यांच्या समस्या, योजनेच्या अंमलबजावणीतील व कार्य पद्धतीतील त्रुटी, यांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला असल्यामुळे, या विषयाचा अभ्यास महत्त्वपुर्ण व आवश्यक वाटतो.

- प्रस्तुत संशोधनातील विविध निष्कर्ष, सुचक व संयुक्तीक शिफारशी, राज्य शासनाला प्रचलित योजनेत योग्य त्या सुधारणा करण्यासाठी उपयुक्त तर ठरतीलच, शिवाय शासनाच्या नवीन योजना साकार व सुफल होण्यासाठी मार्गदर्शक ठरतील, याबद्दल संशोधक आशावादी आहे.

## २.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये :

- महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागांतर्गत, जिल्हा परिषदा, महिला आर्थिक विकास महामंडळांच्या निवडलेल्या योजनांचा प्रभाव व परिणाम अभ्यासणे. तसेच, पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर, इंदापूर आणि बारामती या निवडलेल्या चार ग्रामीण तालुक्यातील, महिला लाभार्थींचा सखोल व पुरक अभ्यास करणे.
- महिलांसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची रचना व त्यांची कार्यपद्धती कशी चालते, यांचा शोध घेणे.
- महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या योजनांचा लाभ किती लाभार्थी महिलांना व किती प्रमाणात झाला यांचा आढावा घेणे.
- विविध शासकीय योजनांच्या कार्यप्रणालीत येणाऱ्या अडचणी वा त्रुटी, त्यामधील विसंगती व समस्यांचा अभ्यास करणे आणि त्यात योग्य व अनुरुप बदल सुचविणे.
- महिला विकासाची वाटचाल व सद्यःस्थितीचे वास्तव अभ्यासताना, आर्थिक व सामाजिक निकषांचा समन्वय साधण्याच्या हेतुने अभ्यास करणे.
- शासनाच्या निवडक योजनांवर अभ्यासाच्याआधारे योग्य व समर्पक सुचना व शिफारशी करणे.
- महिलांच्या विविध समस्या व त्यांच्या सुधारणांबाबत शासनाचा हेतु अभ्यासणे व संविधानातील कायदेशीर तरतुदींचा उहापोह करणे.

## २.५ संशोधनाची गृहितकृत्ये :

- महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने योग्य अशी प्रशासकीय संरचना निर्माण केली आहे.
- महिला सबलीकरणासाठी या विविध योजनांमुळे महिलांच्या विकासासाठी हातभार लागला आहे.
- गेल्या दहा वर्षांत म्हणजेच २०००-०१ ते २००९-१० या कालावधीत, मागासवर्गीय महिलांसाठी पुरविल्या गेलेल्या योजनांची व्याप्ती वाढल्याचे दिसते. परंतु, या सर्वच योजना, मागासवर्गीय महिलांपर्यंत पोहचल्याचे दिसत नाही.

## २.६ संशोधन अभ्यासाचा कालावधी :

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी २०००-०१ ते २००९-१० हा कालावधी निवडण्यात आला आहे. शासनाने २००१ हे 'महिला सबलीकरण वर्ष' म्हणुन जाहीर केले. परंतु महिलांचे सबलीकरण हे

एका वर्षात होणे अशक्य असल्याने, शासनाने किमान एक दशकाचा कालावधी ठेवणे पर्याप्त वाटते. त्यामुळेच संशोधकाने २०००-०१ ते २००९-१० या दहा वर्षांचा कालावधी प्रमाण मानला आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिला सबलीकरण हा एखादा कार्यक्रम किंवा प्रकल्प नसुन, ती एक प्रदीर्घ चालणारी प्रक्रिया आहे, प्रवाह आहे.

## २.७ संशोधन पद्धती :

- **नमुना निवड :**

सामाजिक संशोधनात, नमुना निवडपद्धतीचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. जेव्हा संशोधनाचे कार्यक्षेत्र व्यापक असते आणि समाजातील सर्व घटकांची, समुदायाची, समुहाची, कुटुंबांची, व्यक्तींची योग्य, माहिती प्राप्त करणे हे श्रम, वेळ, पैसा यांचा विचार करता, आवाक्याबाहेरचे असल्यामुळे, कोणाही संशोधकास शक्य होत नाही, अशा वेळी 'नमुना निवड पद्धती' उपयोगात आणली जाते.

नमुना निवड पद्धतीचे दोन प्रकार पडतात.

- संभाव्यता नमुना निवड पद्धती (Probability Sampling)
- असंभाव्यता नमुना निवड पद्धती (Non-Probability Sampling)

समग्रातील सर्व एककांच्या निवडीची संभाव्यता ही सारखी म्हणजेच समान असते. अशा नमुना निवड पद्धतीला 'संभाव्य नमुना निवड पद्धती' असे म्हणतात.

ज्यावेळी समग्रातील सर्व एककांची नमुन्यामध्ये निवड घेण्याची शक्यता किंवा संभाव्यता नसते, तेव्हा त्या पद्धतीला 'असंभाव्यता नमुना निवड पद्धती' असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात, नमुन्याची निवड करण्यासाठी, संशोधकाने संभाव्यता व असंभाव्यता, या दोन्ही नमुना निवड पद्धतींचा वापर केलेला आहे. एखाद्या विस्तीर्ण प्रदेशातुन, विखुरलेल्या लोक संख्येतुन, नमुना निवडीचे कार्य करणे अत्यंत कठीण व खर्चिक असते. त्यामुळे या संशोधनात संशोधकाने 'बहुस्तरीय नमुना निवड' (Multi-stage Sampling) पद्धतीच्या आधारे नमुना निवड केलेली आहे.

पुणे जिल्ह्यातील एकुण १४ तालुक्यांपैकी, ४ तालुक्यांची, म्हणजेच (२८.५७ टक्के) क्षेत्र अध्ययनासाठी निवडले आहे. तसेच, प्रत्येक तालुक्यातील १० गावे निवडुन, प्रत्येक गावातील १० महिला लाभार्थी अशा एकुण ४०० महिला लाभार्थींकडुन, प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलीत केली आहे. वरील लाभार्थी संख्या, नमुना निवड प्रक्रियेतुन अभ्यासासाठी निवडण्यात आली असुन, तालुक्यातील ज्या गावात लाभार्थी संख्या जास्ती आहे, अशाच गावांची निवड संशोधन अभ्यासासाठी केली आहे.

- **प्रथम स्तर :**

  सर्वप्रथम संशोधनाच्या अध्ययन समग्राला, अनेक सजातीय क्षेत्रात विभाजित करुन, ही विभागणी समान, भौगोलिक क्षेत्रफळावर अथवा तेथील लोकांच्या किंवा समाजाच्या, समान गुणधर्मावर आधारलेली असते. या प्रक्रियेमध्ये संशोधकाने पुणे जिल्ह्याची निवड केली आहे.

- **द्वितीय स्तर :**

  संशोधकाने या स्तरामध्ये 'साधा यादृच्छिक नमुना निवडपद्धती'च्या (Simple Random Sampling Method) सहाय्याने, पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर, इंदापूर आणि बारामती या चार तालुक्यांची निवड केली आहे. त्यापैकी खेड, जुन्नर हे अविकसीत तालुके तर इंदापूर व बारामती हे विकसीत तालुके आहेत.

- **तृतीय स्तर :**

  तृतीय स्तरांतर्गत, संशोधकाने, प्रत्येक तालुक्यातील दहा गावांची नमुना निवड, 'साधा यादृच्छिक पद्धती'च्या सहाय्याने केली आहे.

- **चतुर्थ स्तर :**

  या शेवटच्या स्तरावर 'साधा यादृच्छिक नमुना निवड पद्धती'च्या सहाय्याने खेड, जुन्नर, इंदापूर आणि बारामती या चार तालुक्यातील, प्रत्येकी दहा गावातील, दहा महिला लाभार्थी निवडले असुन तालुकानिहाय नमुना निवड गावांची नांवे खालीलप्रमाणे आहेत.

पुणे जिल्ह्यातील अविकसीत अशा खेड तालुक्यातील निवडलेल्या दहा गावांमध्ये कडूस, कन्हेरसर, सांगुर्डी, कान्हेवाडी, खालुंबरे, चाकण, नायफाड, राक्षेवाडी, डेहणे, सरावडी, या गावांचा समावेश असुन, जुन्नर तालुक्यातील निमगिरी, बल्लाळवाडी, तळेरान, खामगांव, आर्वी, बोतारडे, तेजूर, वडज, घाटघर, चावंड, ही गावे निवडण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे, विकसीत अशा इंदापूर तालुक्यातील

पळसदेव, बीजवडी, मदनवाडी, गंगावळण कळशी, डाळज नं. १, पिंपरी खु., सणसर, अथुर्णे, बोराटवाडी, काटी, निमगांव केतकी, ही गावे संशोधन अभ्यासासाठी निवडली असुन, बारामती तालुक्यातील करंजेपूल, माळेगांव बुद्रुक, पळशी, को-हाळे बु., लोणी भापकर, माळवडी, काटेवाडी, तरडोली, सायबाची वाडी, खराडवाडी, या निवडक दहा गावांचा समावेश करण्यात आला आहे.

परंतु संशोधकाच्या प्रत्यक्ष निदर्शनास आलेल्या काही महत्त्वपुर्ण अडचणींमुळे, प्रसंगी 'सहेतुक नमुना निवड पद्धती' चाही (Purposive Sampling) काही गावांमध्ये वापर करावा लागला आहे. म्हणजेच या ठिकाणी संशोधकाने, 'असंभाव्यता नमुना निवडपद्धती' चा वापर केला आहे.

## २.८ तथ्यसंकलन :

प्रस्तुत संशोधन मुख्यत्वे प्राथमिक स्त्रोतावर जास्ती आधारित आहे. तरीही प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर संशोधनासाठी करण्यात आलेला आहे. संशोधनासाठी 'तथ्य संकलन' अत्यावश्यक असुन, संपुर्ण संशोधन हे 'तथ्य' या संकल्पनेवर आधारित आहे. संकलित तथ्यांचे वर्गीकरण करुन, अध्ययन विषयाशी संबंधित संकल्पना तयार केल्या आहेत. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने तथ्य संकलनासाठी खालील स्त्रोतांचा वापर केलेला आहे.

- *प्राथमिक स्त्रोत :*

प्राथमिक स्त्रोत म्हणजे संशोधकाने पहिल्यांदाच स्वतः तथ्य संकलित करणे होय. प्राथमिक तथ्य संकलित करण्यासाठी, संशोधक स्वतः प्रत्यक्ष ठिकाणी जातो व संबंधित घटनांशी वा संबंधीत व्यक्तींशी संपर्क साधुन, प्रश्नावलीद्वारे आवश्यक ती आकडेवारी व अन्य संबंधित माहिती संकलित करतो. प्राथमिक तथ्य संकलनात संशोधकाने संशोधन अभ्यासांतर्गत खालील स्त्रोतांचा अवलंब केला आहे.

- अनुसूची :

'अनुसूची' ही एक प्रकारची प्रश्नावलीच असते. या अंतर्गत, संशोधक उत्तरदात्याकडे जाऊन, त्याच्याकडुन आवश्यक ती माहिती घेऊन ही प्रश्नावली स्वतः भरतो. अनुसूचीद्वारे अशिक्षित उत्तरदात्यांकडुनसुद्धा आवश्यक ती तथ्ये प्राप्त केली जातात. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने, अशिक्षित लाभार्थी महिलांकडुन आवश्यक असलेली माहिती संकलित करुन, अशा प्रकारची प्रश्नावली स्वतः भरली आहे.

- **मुलाखत :**

  संशोधकाने लाभार्थी महिला, महिला व बालकल्याण विभागातील, पुणे जिल्हा परिषदेतील, पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी यांना प्रत्यक्ष भेटुन, त्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याद्वारे विविध महिला विकास योजनांबद्दलची त्यांची मते व योग्य त्या सूचना प्राप्त झाल्या. सामाजिक संशोधनात, तथ्यसंकलनाच्या सर्व पद्धतींमध्ये, मुलाखतीची पद्धत, ही सर्वात महत्त्वाची व आवश्यक असते, कारण या पद्धतीत मुलाखत घेणारा उत्तरदात्याच्या मनातील हेतु, त्याच्या भावना, त्याचे विचार समजुन घेण्याचा जास्तीतजास्त प्रयत्न करतो.

- **प्रश्नावली :**

  सदर विषयाच्या संशोधनासाठी संशोधनकर्त्याने तथ्य संकल्पनेसाठी आवश्यक अशी प्रश्नावली तयार केली आणि ती लाभार्थी महिलांकडुन, तसेच, प्रकल्प अधिकारी, विशेष कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी, यांच्याकडुन भरुन घेतली. त्यामुळे विस्तृत संशोधन क्षेत्रातील तथ्य प्राप्त करणे शक्य झाले. *(महिला लाभार्थी प्रश्नावली आणि प्रकल्प अधिकारी प्रश्नावली, परिशिष्टात प्रस्तुत करण्यात आलेली आहे )*

- **संख्याशास्त्रीय पद्धतीचा उपयोग :**

  संबंधीत प्रश्नावलीमधुन मिळालेली आकडेवारी व आवश्यक ती माहिती, काही संख्या शास्त्रीय प्रक्रियांच्या आधारे, योग्य पद्धतीने मांडणे आवश्यक असते. त्यामुळेच तथ्य संकलनात अचुकता व पारदर्शकता येते. अशा संख्याशास्त्रीय पद्धतीचा वापर, प्रस्तुत संशोधन अभ्यासात, काटेकोरपणे करण्यात आलेला आहे. अभ्यासासाठी संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण करण्यासाठी, विविध सांख्यिकीय साधनांचा व तंत्रांचा यथायोग्य उपयोग करुन, आवश्यक त्या ठिकाणी आलेख, तक्ते, आकृत्यांचा वापर करुन, त्यांचे स्पष्टीकरण दिलेले आहे. त्याचप्रमाणे, उपलब्ध आकडेवारीची सरासरी, टक्केवारी, गुणोत्तर प्रमाण, वृद्धिदर, इत्यादी सांख्यिकीय पद्धतींचा वापर, योग्य पद्धतीने या संशोधन अभ्यासात करण्यात आलेला आहे.

- **दुय्यम स्त्रोत :**

  संशोधनासाठी आवश्यक असणारी दुय्यम सामग्री, संशोधनाशी संबंधीत अन्य प्रबंध, विविध शोधनिबंध, वेळोवेळी प्रकाशित होणारी नियतकालिके, मासिके, महिला विशेषांक, परिपत्रके, संदर्भ ग्रंथ, पुस्तके, महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल, पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, शासकीय गॅझेटस्, वर्तमानपत्रे, विविध शासकिय अहवाल, शासनाचे कार्यक्रम

अंदाजपत्रके, शासनाच्या संबंधित विभागांकडुन व कार्यालयाकडुन मिळविलेली उपयुक्त माहिती, संगणकीय माध्यमातुन चालणारे इंटरनेट, सोशल मिडिया, अशा विविध स्त्रोतांमधुन, आवश्यक ती माहिती, संशोधन अभ्यासांतर्गत गोळा करण्यात आलेली आहे. संशोधन विषयाची विविध पुस्तके, लिखित सामग्री, प्राप्त करण्यासाठी, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, गोखले इन्स्टिट्युट, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जयकर ग्रंथालय, स्त्री अभ्यास केंद्र, अर्थशास्त्र विभागाच्या ग्रंथालयातील संदर्भग्रंथ साहित्याचा वापर, तसेच, इंटरनेट वरुन संकेत स्थळांवरील उपलब्ध माहितीचाही यथायोग्य उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात आला आहे.

## २.९ संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

- ***संशोधनाची व्याप्ती :***

प्रस्तुत संशोधनासाठी, पुणे जिल्हा हे कार्यक्षेत्र निवडलेले आहे. पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर, इंदापूर आणि बारामती ह्या चार तालुक्यांमधील, प्रत्येकी दहा गावांची निवड अभ्यासकार्यासाठी करण्यात आली आहे. महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाशी संबंधित विविध २० योजनांपैकी ४० टक्के, म्हणजे साधारण आठ योजना, प्रस्तुत अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या आहेत. सदर योजनांचा महिला सबलीकरणासाठी किती उपयोग झाला आहे, योजनांची व्याप्ती व स्वरुप किती व कसे वाढले आहे, इत्यादी बाबींचा अभ्यास संशोधकाने आपल्या संशोधनात केलेला आहे.

संशोधन अचुक, सखोल व सविस्तर व्हावे, यासाठी संशोधकाने २०००-०१ ते २००९-१० असा दहा वर्षांचा कालावधी निवडला आहे. कारण महिला सबलीकरण, हा एखादा प्रकल्प अथवा योजना नाही, तर ही एक दीर्घकाल, पद्धतशीर चालणारी प्रक्रिया आहे, हे जाणुन संशोधकाने या दहा वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीचा विचार केला आहे.

- ***संशोधनाच्या मर्यादा :***

अभ्यासाचे मर्यादित क्षेत्र आणि प्राप्त झालेली माहिती व आकडेवारीच्या त्रुटी, यांचा अवलंब करता, या संशोधन अभ्यासातील निदर्शनास आलेल्या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

- संशोधनासाठी २०००-०१ ते २००९-१० असा १० वर्षांचा मर्यादित कालावधी घेण्यात आला आहे.
- संशोधनाचे कार्यक्षेत्र हे पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर, इंदापूर आणि बारामती, या चार तालुक्यातील प्रत्येकी दहा गावांतील दहा लाभार्थींपुरतेच मर्यादित आहे. याचाच अर्थ, प्रत्येक तालुक्यातुन फक्त १०० लाभार्थी, म्हणजेच, चारही तालुक्यातुन मिळुन, एकुण ४०० लाभार्थींचा अभ्यास करण्यात आला आहे.

- संशोधकाने महाराष्ट्र शासनाच्या महिला विकासाच्या एकुण योजनांपैकी, महिला सबलीकरणाशी संबंधित व निगडीत अशा एकुण आठ योजनांचाच अभ्यास केला आहे.
- महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांची दुय्यम माहिती, प्रस्तुत कालावधीत जरी अभ्यासली असली तरी, लाभार्थी महिलांशी निगडीत असलेल्या प्रश्नावलीद्वारे, प्राथमिक माहिती प्राप्त करुन घेताना संशोधकाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. कारण मर्यादित १० वर्षांच्या कालावधीतील लाभार्थी महिला या अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असल्यामुळे, त्यांनी संबंधीत योजनांची कोणतीही लेखी नोंद अथवा पुरावा सांभाळुन ठेवलेला नसल्यामुळे, काही निवडक वर्षे विचारात घ्यावी लागली आहेत. त्यामुळे 'नमुना निवड पद्धती' वापराच्या मर्यादा, या संशोधनास लागू पडतात.

## २.१० प्रकरणांनुसार प्रबंधाची मांडणी :

कोणत्याही प्रकारचा संशोधन प्रबंध प्रस्तुत करताना, संशोधन पद्धतीमध्ये प्रकरणानुसार मांडणी करणे फक्त आवश्यकच नसते तर ते पर्याप्त असते. त्यामुळेच निवडलेल्या विषयाचा अभ्यास व मांडणी योग्य पद्धतीने होते. प्रस्तुत संशोधन प्रबंधाची प्रकरणानुसार केलेली मांडणी खालीलप्रमाणे–

- *प्रकरण पहिले : महिला सबलीकरण*

  या प्रकरणांतर्गत महिला सबलीकरणाबद्दलच्या विविध मान्यवर अभ्यासकांच्या व्याख्या, त्याचे स्वरुप, तत्वे, महिला सबलीकरणाकरीता राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय योजनांची उद्दिष्ट्ये, त्यांची दिशा, गरज व व्याप्ती, इत्यादी मुद्दे विचारात घेऊन, त्यांची सुसूत्र व सुसंबद्ध मांडणी केलेली आहे.

- *प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती आणि संदर्भ साहित्याचा आढावा*

  सदर प्रकरणात, संशोधन विषयाची पार्श्वभुमी स्पष्ट होण्यासाठी, संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन विषयाची निवड, त्याची आवश्यकता, संशोधनाचा कालावधी, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, संशोधनाच्या विविध पद्धती, नमुना निवड, अभ्यासाची व्याप्ती आणि मर्यादा, सांख्यिकीय साधनांचा करण्यात येणारा वापर व संदर्भ साहित्याचा आढावा, अशा मुलभूत घटकांचे विश्लेषण केले आहे.

- *प्रकरण तिसरे : स्त्रियांच्या चळवळी आणि त्यांचे घटनात्मक हक्क*

  प्रस्तुत प्रकरणात, भारताच्या स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातत्र्योत्तर काळातील स्त्री मुक्ती चळवळी, समकालीन स्त्री सबलीकरण चळवळी, स्त्री चळीवळीपुढील आव्हाने, तसेच, महिलांचे घटनात्मक

हक्क व आधिकार, महत्त्वाच्या कायद्यांची माहिती, मागासवर्गीय (अनुसूचित जाती व जमाती) महिलांसाठीचे कायदे, महिलांच्या हित रक्षणार्थ घटनात्मक तरतुदी, अशा विविध घटकांचा आढावा घेण्यात आला आहे.

- *प्रकरण चौथे : पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन आणि महिला विकासाच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा*

  पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी, भौगोलिक व प्राकृतिक रचना, भौगोलिक स्थान, पुणे जिल्हा तालुकानिहाय क्षेत्रफळ, जिल्हा प्रशासन, लोकसंख्या, प्रशासकीय विभाग, वीज, रस्ते, दळण-वळणाची साधने, पुणे जिल्ह्यातील विविध बँका, पतसंस्था, वित्तसंस्था, जिल्ह्यातील दारिद्र्य आणि बेरोजगारीची समस्या, विविध क्षेत्रातील रोजगार विषयक स्थिती, अशा विविध समाजानुकुल घटकांचा आढावा, या प्रकरणात घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, महिला विकास व महिला सबलीकरणाशी संबंधीत महिला आणि बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे प्रस्तुतीकरण, या प्रकरणात करण्यात आले आहे.

- *प्रकरण पाचवे : उपलब्ध सामग्रीचे विश्लेषण*

  सदर प्रकरणात, लाभार्थी महिलांकडुन प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या, सांख्यिकीय माहितीचे विश्लेषण प्रस्तुत करण्यात आले आहे.

- *प्रकरण सहावे : निष्कर्ष आणि शिफारशी*

  संशोधन अभ्यासातून निदर्शनास आलेले प्रमुख निष्कर्ष व संभाव्य शिफारशींचा समावेश, या प्रकरणात करण्यात आला आहे.

## २.११ संदर्भ साहित्याचा आढावा :

### अ) पीएच्.डी. प्रबंध :

- *पाटोळे सुलभा, (२००२),* "उद्योजकता विकासाचा शासकीय, निम-शासकीय योजनांचा अभ्यास," *पीएच्.डी. प्रबंध,* पुणे विद्यापीठ, यांनी आपल्या अभ्यासात उद्योजक महिला, सरकारी अधिकारी, स्वायत्त व ऐच्छिक संस्थेतील महिला यांच्या रचनात्मक कार्य पद्धतीचा आधार घेतला आहे. त्यांच्या अभ्यासाचे प्रमुख केंद्र पुणे व पिंपरी-चिंचवड हे होते. त्यांच्या अभ्यासाचा मुख्य उद्देश्य महिला उद्योगांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांचा अभ्यास करणे हा होता. त्यांनी

त्यांच्या अभ्यासात पुढील निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

- महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, उद्योगधंद्यासाठी लागणारे भांडवल, अनुदान, कर्जाची उपलब्धता, तज्ञाचे सल्ले, अशा गोष्टींचे मार्गदर्शन करणे.
- महिला उद्योजकांमध्ये तरुण युवतींचे प्रमाण अधिक असुन, तुलनेने ५० वर्षे वयोगटातील महिलांचे प्रमाण कमी असल्याचे नोंदविले आहे.
- महिलांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे, परंतु, कौटुंबिक व व्यावसायिक जबाबदाऱ्या, ताणतणाव, या व अशा विविध कारणांमुळे त्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन काम करण्यास तयार होत नाहीत, असे नमुद केले आहे.

सुलभा पाटोळे यांच्या संशोधनातुन आढळणारे काही महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

- विविध योजनांच्या मान्यतेमुळे मागासवर्गीय महिलांचा फायदा झाला आहे.
- शासनाच्या योजना बऱ्याच आहेत, परंतु त्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण दिले जात नाही.
- ज्या महिला लाभार्थींनी विविध योजनांचा लाभ घेतलेला आहे, त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याचे आढळते.
- वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, अशा माध्यमांचा उद्योजक महिलांना, त्यांच्या उद्योगाची जाहिरात करण्यासाठी फारसा उपयोग न झाल्याचे निष्कर्षांवरुन दिसुन येते.

- *कृष्णन एम्. के., इम्रान, (२००३),* **"Women Entrepreneurs in Kerala,"** *पीएच्.डी. प्रबंध,* महात्मा गांधी विद्यापीठ, केरळ, यांच्या अभ्यासाचा उद्देश्य, महिलांना मिळणाऱ्या आर्थिक शासकीय योजनांची माहिती व कर आकारणीबद्दल महिलांमध्ये जागृती निर्माण करणे, असा होता. त्यांच्या संशोधन अभ्यासाची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे :

- व्यवसाय करताना महिला उद्योजकांना येणाऱ्या विविध अडचणी व समस्यांची चाचणी करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करणे.
- केरळ राज्यातील महिला उद्योग-व्यवसायातील उत्पादनांच्या दर्जाचा अभ्यास करणे.
- उद्योग व्यवसायांत येणाऱ्या अनेक अडचणींचा अभ्यास करणे.
- केरळ राज्यातील महिलांना उद्योग व्यवसायांचे महत्त्व पटवुन देऊन, त्यांच्यामध्ये उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी जागृती निर्माण करणे.

कृष्णन्, यांच्या निरीक्षणांमधुन त्यांनी मांडलेले काही प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे :

- महिला उद्योजकांना विकास साधण्यासाठी शासनाकडुन योग्य तो पाठिंबा मिळत नाही.

- महिला उद्योजकांच्या अपयशाचे प्रमुख कारण म्हणजे सदोष व्यवस्थापन, व्यवस्थापनाची कमतरता होय.
- अल्पशिक्षणामुळे व्यवस्थापन कौशल्यांची महिला उद्योजकांमध्ये कमतरता भासते.

महिलांच्या आर्थिक विकासासाठी, शिक्षण, आरोग्य, इत्यादि, गोष्टींचा विकास करणे गरजेचे आहे. सन १९९०-२००० पासुन, सरकारच्या महिला सक्षमीकरणाच्या धोरणामुळे, महिलांचे सक्षमीकरण, सबलीकरण आणि आर्थिक विकासामध्ये उल्लेखनिय वाढ झाल्याचे दिसते.

- *झिमरे अलका, (२००६),* "A Socio-Economic Study of Women Entreneurpeurs in Pune Districts," *पीएच्.डी. प्रबंध,* टिळक विद्यापीठ, पुणे, यांच्या संशोधनात, पुणे जिल्ह्यातील महिला उद्योजकांची निवड करण्यात आली असुन, त्याअंतर्गत, संशोधकाने प्रश्नावलीच्या माध्यमातुन माहिती संकलित केली आहे. स्वयंरोजगार हा संशोधनाचा प्रमुख उद्देश्य असल्याचे त्यांनी आपल्या संशोधनात मांडले आहे. उच्चजातीय पार्श्वभुमी असलेल्या महिलांना आर्थिक व सामाजिक अडचणींचा विशेष त्रास होत नाही, मात्र, तुलनेने, अशिक्षित, अल्पशिक्षित, मागासवर्गीय, महिलांना विविध सामाजिक, आर्थिक, अडचणींना सामोरे जावे लागते, असा संशोधकाचा ठाम विश्वास असल्याचे संशोधन अभ्यासाच्या निष्कर्षांवरुन दिसुन येते.

- *जाधव छाया, (२००८),* "एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा सन १९९०-१९९५ या कालखंडातील अभ्यास व मुल्यमापन (विशेष संदर्भ - आंबेगांव तालुका, जिल्हा - पुणे)," पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, यांच्या संशोधन अभ्यासातील प्रमुख उद्देश, महाराष्ट्र शासनाकडुन अनुसूचित जमातींसाठी राबविण्यात येत असलेल्या, विविध योजनांचा प्रभाव व परिणाम तपासणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ किती आदिवासी महिला लाभार्थींना व किती प्रमाणात झाला यांचा उहापोह करणे, विविध योजनांच्या कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी, त्रुटी, विसंगती व समस्यांचा अभ्यास करणे, निवडलेल्या आदिवासी कुटुंबांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास घडवुन आणण्यासाठी अभ्यासाच्या आधारे सूचना व शिफारशी करणे, असे असल्याचे आढळते.

- *मुलाणी एम्. यु., (२००७),* "The role of Help Group in the Socio-Economic Empowerment of Women with reference to Indapur and Baramati Taluka of Pune District", *पीएच्.डी. प्रबंध,* या शोध प्रबंधामधील, संशोधन पद्धती, या प्रकरणामध्ये, बारामती

व इंदापूर तालुक्यातील, यादृच्छिक नमुना निवडपद्धतीने, नमुना निवड करुन, महिला बचत गटाचे विश्लेषण केले आहे. तसेच, सहाव्या प्रकरणामध्ये, पुणे जिल्ह्यातील, इंदापूर आणि बारामती तालुक्यातील महिला बचत गटांची स्त्री सबलीकरणातील भुमिका स्पष्ट केली आहे.

- *इंगोले पद्मावती संजय , (२०११),* "महिला स्वयंसहायता बचत गटाची स्त्री सक्षमीकरणातील भुमिका : पुणे जिल्ह्याचा सुक्ष्म अभ्यास," पीएच्.डी. प्रबंध, पुणे विद्यापीठ, यांनी आपल्या अभ्यासात, स्त्री सक्षमीकरणाची व्याख्या, भारतातील स्त्रियांची एक नवी ओळख, संशोधन पद्धती, तसेच, पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश करुन, त्या त्या तालुक्यांतील बचत गटांचा सखोल अभ्यास करुन, स्त्री सक्षमीकरणामध्ये महिला स्वयंसहायता बचत गटाची काय भुमिका आहे, याचे सविस्तर विवेचन, निष्कर्ष व योग्य त्या शिफारशी देऊन केले आहे.

**ब) एम्.फिल्. प्रबंध :**

- *चौधरी प्रतिभा बबनराव, (२००७),* "बाभूळगांव तालुक्यातील स्वयंसहायता बचत गट चळवळी अंतर्गत महिलांच्या आर्थिक विकासाचे अध्ययन (२००३-२००६)" .समान ध्येयाने प्रेरित होऊन दारिद्रय निर्मुलन व स्त्री सबलीकरणासाठी कार्य करणारा समुह म्हणजे स्वयंसहायता समुह होय. वाढती लोकसंख्या, दारिद्रय, रोजगार संधीचा अभाव, इत्यादिंमुळे दारिद्रयाचा प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. दारिद्रय निर्मुलनाचे प्रभावी अस्त्र म्हणुन महिला बचत गटांकडे पाहिले जाते. सन् १९९९ ते २००६ पर्यंत एकुण ३४२ बचत गट स्थापन झाले. त्यापैकी २८० महिला बचत गट असुन, अभ्यासासाठी २८ बचत गटांची (१० टक्के) निवड करण्यात आली आणि त्याअंतर्गत एकुण ११० महिलांकडुन प्रश्नावली भरुन घेण्यात आली. अभ्यासकाने ज्या उद्देश्यांना अनुसरुन अभ्यास केला, त्यामध्ये बाभूळगाव तालुक्याचे भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक स्वरुप जाणुन घेणे, बचत गट चळवळीतील संबंध अभ्यासणे, बचत गटाच्या कार्यात येणाऱ्या विविध समस्या व अडचणींचा आढावा घेणे, तालुक्यातील महिलांच्या आर्थिक विकासात स्वयंसहायता बचत गटाचे योगदान वाढावे म्हणुन त्यावर उपाययोजना सुचविणे, दारिद्रय निर्मुलन व महिला सबलीकरण तसेच, स्वयंसहायता बचत गटांची भुमिका विशद करणे, बचत गटांबाबत शासन व बँकांची भुमिका काय आहे हे अभ्यासणे, अशा महत्त्वाच्या मुद्यांचा समावेश होतो.

- *काटोले प्रशांत , (२००७),* "स्त्रियांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान - अमरावती जिल्ह्याच्या संदर्भात विशेष अध्ययन". प्रस्तुत संशोधनात, अमरावती जिल्ह्यातील महिलांच्या

विकासाचा शासकीय व निमशासकीय योजना अभ्यासणे, अमरावती जिल्ह्यातील विविध योजनांमध्ये महिलांचा सहभाग अभ्यासणे, विविध योजनांमुळे लाभार्थी महिलांच्या रोजगारवाढीत कसा बदल झाला, यांचा आढावा घेणे, विविध योजनांतर्गत दिलेल्या प्रशिक्षणामुळे महिलांच्या रोजगार प्राप्तीच्या क्षमतेत कितपत वाढ झाली, हे अभ्यासणे, विविध योजनांमधील लाभार्थी महिलांच्या नमुना पाहणीवरुन, त्यांच्या जीवनात झालेल्या सर्व प्रकारच्या बदलांचा आढावा घेणे, विविध प्रकारच्या योजनांद्धारे, महिलांच्या एकंदर विकासासाठी जे प्रयत्न केले जातात, त्यामधील समस्यांचे अध्ययन करणे, स्त्री रोजगाराच्या वाढीबाबत उपरोक्त योजनांच्या धोरणांचा आढावा घेणे, अशा विविध पैलुंचा अभ्यास करण्यात आला आहे.

- *पंडितराव तायनाथ वैजनाथ, (२००८),* "परभणी शहरातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात बचत गटांचे योगदान – कालावधी २००२–०३ ते २००६–०७." ग्रामीण व शहरी भागात नवनवीन स्वयंसहायता बचत गट सुरु आहेत. ग्रामीण भागामध्ये दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील व्यक्तींच्या अंगी विविध कार्य करण्याचे कौशल्य असते. परंतु, त्या कौशल्याचा योग्य रितीने उपयोग करण्यासाठी आर्थिक घटकाची गरज असते. ही गरज बचत गटांच्या माध्यमातुन भागविली जाऊ शकते. वरील कालावधीमध्ये, परभणी शहरातील महिला बचत गटांची संख्या ४६८ होती. २००६ साली या प्रकल्पांतर्गत, १३५ महिला बचत गट निर्माण झाले, असे एकुण ६०३ बचत गटांमधुन अभ्यासकाने, प्रस्तुत लघु शोध प्रबंधाच्या अभ्यासासाठी, एकुण बचत गटांच्या १५ टक्के म्हणजे ९० महिला बचत गटांची निवड केली. त्या निवडीसाठी, अभ्यासकाने बचत गटांची स्थापना, सभासद संख्या आणि त्यांचे कार्य, या निष्कर्षांचा आधार घेतला.

- *बागुल गजानन गंगाधर, (२००९),* "ठाणे जिल्ह्यातील, मोरवाडा तालुक्यातील, महिला बचत गटांची रोजगार निर्मितीतील भुमिका (२००२–२००७)". स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या कल्याणासाठी अनेक शासकीय योजना कार्यान्वित करण्यात आल्या.महिला बचत गटांच्या रुपाने देशातील कोट्यावधी महिलांच्या आर्थिकच नव्हे तर समग्र भवितव्याला आकार देण्याचे काम अनेक शासकीय योजनांच्या माध्यमातुन सुरु आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासाची निवड करताना मोरवाडा तालुक्यातील ३२८ महिला बचत गटांपैकी १० टक्के म्हणजे ३३ महिला बचत गटांची निवड करण्यात आली. नमुना निवड पद्धतीने १२ महिला बचत गटांची निवड करुन, प्रत्येक गटातील १० सदस्य यांप्रमाणे, एकूण १२० महिला लाभार्थींची प्रश्नावली भरुन घेण्यात आली. संशोधन अभ्यासाच्या प्रमुख उद्देशांतर्गत, मोरवाडा तालुक्यातील महिला बचत गटांचा अभ्यास करणे, सदर योजनेअंतर्गत, किती महिलांना प्रत्यक्ष लाभ झाला त्यांचा शोध घेणे, बचत गटातील महिलांना व्यवसायासाठी

बँका व सरकारी अनुदान, या संदर्भात अभ्यास करणे, महिला बचत गटांनी किती रोजगाराची निर्मिती केली त्याचे अध्यायन करणे, अशा अनेक गोष्टींचा अभ्यास करण्यात आला आहे.

- *मारकड वैशाली प्रभाकर, (२०११), एम्.फिल्. प्रबंध,* "स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजनेअंतर्गत, स्वयंसहायता बचत गटाद्वारे महिलांचे सबलीकरण," या प्रबंधामध्ये, स्वर्णजयंती ग्राम योजनेअंतर्गत, स्थापन करण्यात आलेल्या महिला बचत गटांमुळे महिलांचे आर्थिक, सामाजिक सबलीकरण होत आहे व पर्यायाने ग्रामीण विकास होत असुन, देशाच्या विकासास गती मिळत असल्याचे स्पष्ट होते.

क) पुस्तके :

- *यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे, (यशदा), (२००२),* "महिला व बाल विकास धोरण आणि निर्णय : १९७५ ते जानेवारी २००२ – एक दृष्टिक्षेप", प्रथम आवृत्ती २००२, या पुस्तकामध्ये, महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांच्या योजना व त्या योजनांचे शासन निर्णय, धोरणे, अधिनियम, इत्यादींची माहिती दिली आहे. तसेच, महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण, १९९४, महिला धोरण २००१, इत्यादींची सविस्तर माहिती दिली आहे.

- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा, (२००६),* "स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण", प्रकाशक – क्रान्तीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, या पुस्तकात स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण, या विभागामध्ये स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, इत्यादी, स्त्रिसंबंधीच्या विषयांचा अभ्यास केला आहे. तसेच, याअंतर्गत लिंगभेदातुन स्त्रियांवर होणाऱ्या अत्त्याचारांच्या संकल्पनांची चर्चाही करण्यात आली आहे. शिक्षण, समानसंधी, स्त्रियांची विविध कारणांसाठी होणारी हिंसा व अवहेलना ही स्त्रियांवरील पुरुषसत्ताक नियंत्रणाचे संख्यात्मक साधन असुन त्याला जात, धर्म, वर्ण, वर्ग, यांनुसार वेगवेगळे पैलु असतात, याचा आढावा घेण्यात आला आहे.

- *चौगुले सुमती, (२००५),* "महिला सबलीकरणाची नवी दिशा", या पुस्तकात, महिला सबलीकरणाच्या दृष्टिकोनातुन एकुण सात प्रकरणे करण्यात आली आहेत. यामध्ये महिला सबलीकरणाची सूत्रे, मी कोण? माझा जन्म कशासाठी? मानवजन्माची कहाणी, श्रेष्ठ कोण – स्त्री की पुरुष? संघर्षाचा सूत्रधार कोण? एक समाज कि परिस्थिती? न्यायदेवतेची न्यायासाठी हाक व आपण सारेच आनंदयात्री, या प्रकरणांचा समावेश उत्तम पद्धतीने करण्यात आला आहे.

तसेच, स्त्री सबलीकरणाची सूत्रे व स्त्री शक्ती जागृतीची गरज ही काव्यात्मक स्वरुपात अतिशय सुंदर रितीने मांडण्यात आली आहे.

- *मुलाणी एम्. यु. (२००६),* लेखकाने आपल्या "महिला स्वयंसहायता वचत गट" या पुस्तकातील सहाव्या प्रकरणात, महिला सबलीकरणासाठी केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची थोडक्यात माहिती दिली आहे. यामध्ये स्वयंसिद्धा, स्वशक्ती, कामधेनू योजना, महिलांसाठी उद्योग, शिक्षण, रोजगार विषयक कार्यक्रम, इत्यादी योजनांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. सातव्या प्रकरणामध्ये, पुणे जिल्ह्यातील इंदापूर व बारामती तालुक्यातील यशस्वी बचत गटांचे मनोगत विचारात घेण्यात आले आहेत.

- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा, (२००६),* "भारतातील स्त्रिया : एक ओळख", या पुस्तकात 'भारतीय स्त्रिया – एक सांख्यिकी आलेख' या प्रकरणात, विविध सांख्यिकीय निर्देशकांच्या आधारे, स्त्रियांच्या स्थानाचे आकलन करण्याचा प्रयत्न केला आहे. दुसऱ्या प्रकरणात, स्त्रियांविषयक विविध अहवाल, धोरणे आणि आयोग, यांची चर्चा केली आहे. स्त्रियांचा सक्षमीकरणा संदर्भात झालेला बदल आणि विकास निर्देशित करण्याचा प्रयत्नही यामध्ये करण्यात आला आहे.

- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा , (२००७),* "स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना", या पुस्तकात स्त्रियांच्या संघटना, चळवळी, परिवर्तन आणि विकासासाठी स्त्रियांनी दिलेल्या लढ्यांचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे. आधुनिक भारतातील स्त्रियांच्या चळवळींमधील स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील, वेगवेगळ्या टप्प्यांमधील सातत्य आणि खंड, यांचा वेध या पुस्तकातुन घेण्यात आला आहे. स्वातंत्र्यपुर्व काळातील स्त्रियांच्या चळवळींबाबतचे पहिले प्रकरण, समकालीन स्त्री चळवळीच्या वारशांचा वेध घेते. समकालीन स्त्री चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बिगर सहकारी संघटनांचा उदय, विशेषतः बचत गट, या प्रकरणाच्या केंद्रस्थानी आहेत. स्त्रियांना समाज परिवर्तनाचे व विकासाचे, विकासाच्या कर्त्या म्हणुन, स्त्री चळवळी कशा पद्धतीने पुढे आणतात, यांचे विश्लेषण या विभागात केले आहे.

- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा. (२००७),* "स्त्रिया, कायदा आणि राजकारण", सदर पुस्तकातील पहिल्या प्रकरणात, संविधानातील तरतूदी, स्त्रियांसंदर्भातील कायदे आणि कौटुंबिक कायदे, यांबद्दल सविस्तर विवेचन केले आहे. तसेच, दुसऱ्या प्रकरणात, 'कायदे विषयक मोहीमा आणि परिवर्तन', याअंतर्गत विद्यार्थ्यांना स्त्री चळवळीने चालविलेल्या कायदेविषयक मोहीमांची ओळख करुन

देण्याचा प्रयत्न केला आहे. तिसऱ्या प्रकरणात, 'लिंगभाव व मानवी हक्क', या अंतर्गत मानवी हक्कांच्या इतिहासाचा आढावा घेऊन, स्त्रियांचे हक्क हे मानवी हक्क चर्चा विश्वाचा भाग कसे आणि कधी झाले, यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. पुस्तकाच्या अंतीम, चौथ्या प्रकरणात, 'स्त्रियांचा राजकारणातील सहभाग आणि स्त्रियांसाठी आरक्षण', याविषयीची सविस्तर चर्चा केल्याचे दिसते.

## ड) लेख /मासिके /शोध निबंध :

- *सहस्त्रबुद्धे नयना, (१९९८),* "महिला धोरणाचा आढावा – भारतीय स्त्री शक्ती", ७ नोव्हेंबर, १९९८ च्या या लेखात, महिला धोरणाचा प्रथम मसुदा १९९४ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केला. त्याचबरोबर, जागतिक पातळीवर, १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' तसेच, '१९७५ ते १९८५ – महिला दशक,' म्हणुन जाहीर झाले आणि सर्वत्र महिलांविषयक मागण्यांसाठी ठोस व हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले. महिला चळवळ व्यापक होत गेली. १९९४ चे 'महिला धोरण' जाहीर होण्यापुर्वी आणि त्यानंतरच्या काळातही, महिला संघटनांनी, संबंधीत महिला धोरणामध्ये अनेक दुरुस्त्या व सुचना शासनाला सुचविल्या. या बाबतचा आढावा या लेखात घेतला आहे. विकास ही सतत चालणारी प्रक्रिया आहे, त्याची संकल्पना करणे, विविध कार्यक्रमांची व योजनांची आखणी करणे व त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे, या तिन्ही पातळ्यांवर स्त्रियांची अंकुश शक्ती उभी करणे, हे आव्हान स्त्री संघटनेपुढे असल्याचे या लेखात योग्य पद्धतीने मांडले आहे.

- *डॉ. कोठेकर मनिषा , (१९९८),* "पक्ष संघटनेतील महिलांचे स्थान – दशकपुर्ती – भारतीय स्त्री शक्ती", ७ नोव्हेंबर, १९९८. उपरोक्त शोधनिबंधात, 'महानगरपालिका निवडणुक प्रक्रिया : स्त्रियांच्या दृष्टिकोनातुन अभ्यास', १९९७ मध्ये प्रकाशित झालेल्या या अहवालात, महिलांच्या सक्षम राजकीय सहभागासाठी, भारतीय स्त्री शक्तीने, महिला संघटनांच्या भुमिकेविषयी मांडलेले विचार नमुद केले आहेत. तसेच, राजकीय पक्ष संघटनेतील महिलांच्या सहभागाचे पैलु, याअंतर्गत, पक्ष संरचनेत महिला, महिला आघाडी, इत्यादी विषयीचे विचार स्पष्ट केले आहेत. महत्त्वाच्या पदांवर असलेल्या स्त्रिया व प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेमध्ये महिलांचा अपेक्षित सहभाग दिसत नसल्याचेही यात विशेष नमुद केले आहे.

- *डॉ. नानिवडेकर मेधा , (१९९८),* "भारतीय स्त्रीशक्ति", ७ नोव्हेंबर १९९८, च्या 'स्त्रियांची सामर्थ्यशीलता', या लेखात लेखिकेने, स्त्रियांचे सबलीकरण हा गेल्या काही वर्षात शासकीय धोरण, योजना, आंतरराष्ट्रीय संस्थांचे विविध उपक्रम, इत्यादींचा अग्रक्रमाचा विषय झाला असल्याचे नमुद केले आहे. तसेच, स्त्रियांची सामर्थ्यशीलता व जागतिक संदर्भातील सामर्थ्यशीलता,

तसेच, एकात्म मानवतावादी दृष्टिकोन, स्त्रियांच्या सामर्थ्य शीलतेसाठी कसा पोषक आहे, या बाबत सविस्तर विवेचन लेखिकेने सदर लेखात केल्याचे आढळते.

- *भागवत विद्युत, (२००२),* "स्त्रिया आणि विकास", सदर लेखात, जागतिकीकरणात स्त्रीला मिळणाऱ्या रोजगाराचे स्वरुप कसे आहे, हे स्पष्ट केले आहे. स्त्री कमी वेतनात जास्ती कष्ट करते. संघटनात्मक नेतृत्वाचा तिच्याकडे अभाव असल्यामुळेच, ती स्त्री कामगार संघटना करण्याच्या भानगडीत पडत नाही. 'आज्ञाधारक कामगार' म्हणुन स्त्री अधिक चांगले काम करते. भारतासारख्या विकसीनशील देशातील स्त्रिया दारिद्र्याचे तत्पर व्यवस्थापन करु शकतील, म्हणुनच स्त्रियांसाठी रोजगार, कार्य कुशलतेबरोबरच प्रतिष्ठा, हक्काची विश्रांती आणि सक्तीची रजा, संस्कृती आणि अधिकार, याद्धारे स्त्री दारिद्र्याचे प्रमाण स्वतःच कमी करु शकते.

- *आवळे जयवंतराव, मंत्री, महिला आणि बालविकास, सामाजिक न्याय, महाराष्ट्र शासन, (२००२),* "महिला धोरणाच्या अंमलबजावणीत महिला व बाल विकास विभागाची भुमिका", मार्च २००२, यशदा, यशमंथन – महिला विशेषांकातील, सदर लेखात, मंत्री महोदयांनी महिला धोरण जाहीर करुन, शासनाने महिला विकासाची उद्दिष्ट्ये स्पष्ट केली आहेत. मात्र ही उद्दिष्ट्ये स्पष्ट करण्यासाठी कार्यक्रमांची अंमलबजावणी सक्षमपणे व परिणामकारकरित्या होणे आवश्यक आहे, या संदर्भात, योग्य नियोजन व सातत्य, यांचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी महिला व बालविकास विभागाकडे सोपविण्यात आल्याचे सांगितले आहे. या संदर्भात, सर्व महिला विकासाच्या योजनांवर नियंत्रण ठेवणे आणि वेळोवेळी त्यांचा आढावा घेणे, आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे. या सर्व योजनांचा आढावा घेऊन, कालबाह्य योजना बंद करणे आणि आवश्यक तेथे योजनांमध्ये कालपरत्वे, योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक असल्याचेही नमुद केले आहे.

- *पाटील आर. आर., मंत्री, ग्रामविकास, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, (२००२),* "ग्राम विकासात महिलांचे स्थान व योगदान", मार्च २००२, यशदा, यशमंथन – महिला विशेषांकातील सदर लेखात, माननीय मंत्री महोदयांनी ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायतराज संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवले असल्याचे स्पष्ट केले आहे. महिलांना नुसते आरक्षण देऊन, शासनामध्ये त्यांना एखादे पद देऊन शासनाची जबाबदारी संपणार नसल्याचे मान्य केले आहे. तर महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले आहे.

- *डॉ. मुंदडा विमलाताई, राज्यमंत्री, महिला व बालकल्याण, महाराष्ट्र शासन, (२००२),* "महिला विकास योजना : कल्याणकारी ऐवजी विकासात्मक हव्यात", यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२ च्या या लेखात, महिलांसाठी असणाऱ्या योजनांचे स्वरुप केवळ कल्याणकारी ठेवले तर महिला कधीच स्वावलंबी होऊ शकणार नाहीत. त्यासाठी त्या योजनांचे स्वरुप विकासात्मक करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. यासाठी दहाव्या पंचवार्षिक योजनेत, कालबाह्य योजना बंद करुन, त्यामध्ये विविध सुधारणा सुचविण्यात आल्या आहेत. २००१ हे वर्ष 'महिला सक्षमीकरण वर्ष' म्हणुन घोषित करण्यात आले होते. केवळ एका वर्षात महिलांचे सक्षमीकरण होऊ शकत नाही. त्या करीता, महिला सक्षमीकरण 'दशक' तरी जाहीर करण्यात यावे, अशी मागणी विविध महिला संघटनांकडुन होत असल्याचे या लेखात स्पष्ट केले आहे. महिला सक्षमीकरणात महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे व या पुढील काळातही तो अग्रेसरच राहिल, अशी ग्वाही मंत्री महोदयांकडुन देण्यात आली आहे.

- *ॲड. सामंत-प्रभावळकर निर्मला, अध्यक्षा, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई, (२००२),* यशदा, यशमंथन महिला विशेषांक, मार्च २००२. सदर लेखात महिलांमध्ये असणारा शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, बेरोजगारी आणि यथायोग्य पुर्नवसनाचा अभाव, फसवणुक, ही लैंगिक शोषणाची प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट केले आहे. लैंगिक शोषण करणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यासाठी योग्य ती पावले आयोगाने उचललेली असुन, त्यांचे योग्य ते परिणाम लवकरच दिसुन येतील, अशी खात्री अध्यक्ष महोदयांनी या लेखातुन दिल्याचे आढळते.

- *पाटील रजनीताई , अध्यक्षा, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई, (२००२),* महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म) चे "उडान", यशदा, यशमंथन महिला विशेषांक, मार्च २००२, या लेखात, मा.वि.म. ने आपल्या २५ वर्षांच्या कार्यानुभवाच्या शिदोरीवर एक क्रान्तीकारक निर्णय घेतला आहे. महिलांची सर्वतोपरी क्षमतावृद्धी हाच महिलांच्या सक्षमीकरणाचा मुलभूत पाया असुन यापुढे महिलांसाठी फक्त व्यावसायिक योजना न राबविता, महिलांच्या सर्वांगीण विकासात्मक योजना राबविण्याचा निर्धार केला असुन, त्या अनुषंगाने 'उडान' प्रकल्पाची घोषणा अध्यक्ष महोदयांनी, या लेखातुन केल्याचे आढळते.

- *रंगनाथन् व्ही., (२००२), मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व अध्यक्ष, नियामक मंडळ,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२. "महिला विकासामध्ये प्रशासनाचा सहभाग व जबाबदाऱ्या", या लेखात, कोणत्याही योजना राबविताना, शासकीय अधिकारी व कर्मचारी, यांनी

भावनिकदृष्ट्या सहभागी झाले पाहिजे, अन्यथा कागदोपत्री नुसती आकडेवारी दिसते, प्रत्यक्षात मात्र, लाभार्थींपर्यंत योजनांचे लाभ पोहचत नाहीत, असेच दिसुन येते. राज्यपातळीवर विविध विभागांमध्ये 'समुह कृती संगम' घडवुन आणला तरच योजनांचे फलित जिल्हा, तालुका व ग्रामस्तरांवर प्रत्यक्ष पोहचल्याचे दिसेल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे महिला सबलीकरणावर जास्तीत जास्ती भर देणे, हे महाराष्ट्र शासनाचे प्रमुख उद्दिष्ट असुन, हे उद्दिष्ट स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातुन पुर्ण करता येऊ शकते, असे स्पष्टीकरण मुख्य सचिवांनी दिल्याचे दिसते.

- *ठेकेकरा टी. एफ्., (२००२), व्यवस्थापकीय संचालिका, महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.), मुंबई,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२. "महाराष्ट्रातील स्वयंसहायता बचत गटाच्या चळवळीमध्ये, महिला आर्थिक विकास महामंडळाचे (मा.वि.म.) योगदान", उपरोक्त विषयानुसार, मा.वि.म.ने महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा या प्रकल्पांतर्गत १७१ गावांमध्ये जवळपास ५,००० स्वयंसहायता बचत गट बनविले. या गटांमुळे महिलांमध्ये लक्षणीय बदल घडुन आल्याचे दिसुन आले. त्यानुसार, पुढील कामांची दिशा काय राहणार आहे, या बाबत या लेखात विवेचन केले आहे.

- *गाडगीळ मेधा, (२००२), आयुक्त, एकात्मिक बाल विकास योजना, महाराष्ट्र शासन, मुंबई,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२. "स्त्री – एक अद्भुत शक्ती", या संदर्भानुसार कुठल्याही समाजाचा, धर्माचा वा पंथाचा, खऱ्या अर्थाने, विकास व्हावयाचा असेल तर तो केवळ महिलांच्या विकासातुनच शक्य आहे. मात्र, महिलांची नैतिकता, धडाडी, समंजसपणा आणि सहनशीलतेकडे आजही दुर्लक्षिले गेले आहे, हे वास्तव आहे, याचे विवेचन या लेखात केले आहे.

- *गोरडे वासुदेव, (२००२), महिला व बाल कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२. "महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण – सन १९९४ ते २००१ : एक प्रवास", या लेखामध्ये पहिल्या धोरणामध्ये, महिलांविरोधी अत्याचाराचे निर्मुलन करण्यासाठी पावले उचलणे, समान हक्कांची प्रस्थापना करणे, महिलांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आणि सहकारी संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे, यांवर भर दिला होता. सन २००१ च्या धोरणामध्ये, महिलांना केंद्रस्थानी धरुन, महिला संरक्षण, विविध योजनांचे नियोजन, महिला ग्रामसभा, इत्यादींवर भर देण्यात आला.

- *मोहिते मालन, (२००२), अध्यक्षा, जिल्हा परिषद, सांगली,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२, "महिला व राजकारण", सदर लेखामध्ये, भारत ही एक महासत्ता होण्याचे स्वप्न पुर्ण करायचे असेल, तर येथुन पुढील काळात स्त्रियांना अर्थकारण आणि समाजकारणाबरोबरच, राजकारणातही, समान संधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. एवढेच नव्हे तर, त्यांना आर्थिक व शैक्षणिक बाबतीत स्वावलंबी व सक्षम बनविले पाहिजे. त्यासाठी स्त्रियांना योग्य त्या संधी व सवलती उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे, असे मत मांडले आहे.

- *डॉ. कोठारी सुधा, (२००२), सदस्या, कार्यकारी समिती - यशदा व अध्यक्षा - चैतन्य संस्था, राजगुरुनगर, जिल्हा पुणे,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२, "स्वयंसहाय्य गट व महिलांचे आर्थिक सबलीकरण", सदर लेखामध्ये, स्वयंसहाय्य गटांद्वारे, महिलांचे आर्थिक सबलीकरण होण्यात मोठा हातभार लागत असल्याचे स्पष्ट केले आहे. विविध संस्थाच्या सहयोगाने गेल्या १० वर्षात, महाराष्ट्रात ही चळवळ जम धरु पहात आहे. हे कार्य अधिक जोमाने करण्यासाठी अजुन मेहनत घेणे आवश्यक आहे, असे मत या लेखात व्यक्त केले आहे.

- *प्रा. डॉ. वाडकर अलका, (२००२), मानसशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२. "सर्वकष महिला विकास", उपरोक्त लेखामध्ये, भावनिक संसारबंध, कौटुंबिक एकी व सामाजिकदृष्ट्या मान्य वर्तन, यांसाठी स्त्री आपला बळी देत असते. तिची कार्यक्षमता, अचाट सहनशक्ती, अभिक्षमता, सृजनशीलता, तिचे स्वतःचे अस्तित्व सिद्ध करु शकत नाही, हे दुर्दैवी म्हणावे लागेल. स्त्री मध्ये असलेला नेतृत्वगुणांचा अभाव, निर्णयक्षमता व सामाजिक कौशल्य कमतरता, सोशिकता, ह्या गोष्टीच स्त्री सबलीकरणातील सर्वात मोठे अडथळे ठरत असल्याचे, लेखिकेने स्पष्ट केले आहे.

- *तुरकर चंद्रसेन, (२००२), सचिव, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन,* यशदा, यशमंथन, महिला विशेषांक, मार्च २००२, "महिला विकासात आंतरराष्ट्रीय संस्थाची भुमिका", उपरोक्त विषयानुसार, सदर लेखामध्ये, विकसनशील व अविकसित देशांमध्ये विविध विकासाच्या व कल्याणकारी योजना राबविण्याकरीता, आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संस्था आर्थिक मदत करीत असल्याचे सांगितले आहे. महिला विकासात आंतरराष्ट्रीय संस्थांची भुमिका काय आहे, याचा उहापोह, या लेखात केल्याचे आढळते.

- *ताडेलकर जयश्री, (२००३), संशोधन सहायक, यशदा,* यशमंथन, मार्च २००५, "महिला लोक प्रतिनिधींना आवश्यक असणारी कौशल्ये", सदर विषयानुसार, उपरोक्त लेखामध्ये, राजकारणात कार्य करणाऱ्या, महिला प्रतिनिधींनी त्यांच्या कामकाजात नवख्या असुनदेखील, पंचायत राज संस्थामध्ये आपला वेगळा ठसा उमटविल्याचे नमुद केले आहे. परंतु अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी, महिला प्रतिनिधींनी, आपली कार्य कौशल्ये वाढविण्याचे उपाय सुचविले आहेत.

- *तुरकर चंद्रसेन, (२००३), अप्पर सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,* मार्च २००३, "महिला सक्षमीकरण : जाणीव व जागृती", उपरोक्त विषयानुसार, सदर लेखामध्ये, ग्रामीण व शहरी भागातील महिलांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी, आरोग्य व स्वच्छता, आहार व आरोग्यशास्त्र, महिलांचे मुलभूत हक्क व अधिकार आणि महिला विकास योजना, स्वयंसहायता बचत गट व पंचायतराज प्रशिक्षण, इत्यादी विषयांवर चित्रफित तयार करण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. या चित्रफिती स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने, गावोगावी दिखविण्यात येणार असल्याचे नमुद केले आहे.

- *प्रा. कुलकर्णी विजय,* यांनी स्वयंसहाय्यता बचत गटांवर "बचतगट", हा संदर्भ ग्रंथ २००६ लिहिला. त्यामध्ये, बचत गटांचे स्त्री सक्षमीकरणातील भुमिकेच्या दृष्टिकोनातुन विविध प्रकरणे आहेत. महिला स्वयंसहायता बचत गटाचा अर्थ अतिशय सोप्या आणि सुस्पष्ट समीकरणात्मक भाषेत मांडला आहे. तो असा – S + C + I + IGS + HRD + CD = MHG याचाच मराठीत अर्थ – बचत + पत + विमा + उत्पन्न वृद्धि + मानवी विकास + सामुदायिक विकास = परस्परावलंबी समुह.

- *कदम प्रभा भास्करराव, (२००६),* यांनी दिनांक २६ ते २८ नोव्हेंबर २००६ या कालावधीत, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या, श्रीरामपुर, येथील तिसाव्या राष्ट्रीय अधिवेशनात शोध निबंध सादर केला. तसेच, "स्त्री सक्षमीकरणात महिला बचत गटाचे योगदान : सातारा जिल्ह्याचा सुक्ष्म अभ्यास" या विषयावर पीएच्.डी. प्रबंध सादर केला असुन, सदर प्रबंधामध्ये, संशोधकाने, लिंगभेदातुन उद्‌भविणारे स्त्री प्रश्न, स्त्री सक्षमीकरणाची गरज आणि स्वरुप, बचत गटांचा उदय व विकास, आणि सातारा जिल्ह्यातील महिला बचत गट, महिला बचत गटात येण्यापुर्वी व गटात आल्यानंतर, स्त्रियांमधील झालेले आर्थिक व सामाजिक बदल, यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

- *डॉ. भागवत विद्युत, (२००६),* महिला सबलीकरण विशेषांक, "सक्षमीकरण : संकल्पना आणि व्यवहार", या लेखामध्ये, सक्षमीकरण वा सबलीकरण, ही संकल्पना, तसेच, सत्ता म्हणजे नेमके

काय, या संकल्पनेशी सक्षमीकरण कसे निगडीत आहे, यांचे विवेचन केल्याचे दिसते. त्याचप्रमाणे, स्त्रियांच्या दृष्टिने समानता, समता, न्याय्य असलेला समाज निर्माण करणे म्हणजे नेमके कोणत्या अर्थाने स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे यांचे स्पष्टीकरण अतीशय मार्मिक पद्धतीने केले आहे.

"सक्षमीकरण", ही संकल्पना प्रथम १९६० मध्ये, अमेरिकेतील कृष्णवर्णीय, जहाल गटांनी मांडली. लेखकाने सदर लेखात, सक्षमीकरणाच्या अनेक व्याख्या देऊन, त्यांचे उत्तम विश्लेषण केले आहे. सक्षमीकरणाचा विचार घेऊन शिक्षण, साक्षरता, आरोग्य, पोषण, प्रशिक्षण, रोजगार, कायदे विषयक सुधारणा, अशा सर्व क्षेत्रात विविध योजना राबविण्याचा राज्यकर्त्यांचा जो उद्देश्य आहे, तो अतिशय महत्त्वाचा, मोलाचा व अत्यावश्यक असल्याचे नमुद केले आहे.

- *जगताप किशोर, (२००७),* यांच्या "Implication on Poverty Alleviation Under Swarnjayanti Gram Swarozgar Yojana (SGSY) : A Critical Evaluation Study in Pune District (2007)", या शोधनिबंधामध्ये, पुणे जिल्ह्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजने (SGSY) अंतर्गत, स्वयंरोजगाराचा अभ्यास करण्यात आला आहे. त्याअंतर्गत, महिला बचत गटांना या योजनेतुन उपलब्ध झालेला वित्तपुरवठा, अनुदान व स्वयंरोजगार निर्मितीचा आढावा, या शोधनिबंधामध्ये घेण्यात आला आहे.

- *कुलकर्णी एच्, व्ही., (२००८),* यांच्या "बचत गटांतुन स्वयंनिर्भरता", या लेखात, लेखकाने बचत गटांच्या चळवळीने ग्रामीण भागाचा चेहरामोहरा कसा बदलला आहे, हे प्रत्यक्ष दाखले देऊन दाखविले आहे.  बचत गटांमुळे महिलांची आर्थिक प्रगती कशी होते, त्यांचा आत्मविश्वास कसा वृद्धिंगत होतो, यांचे विश्लेषण सदर लेखात पद्धतशीरपणे केल्याचे आढळते.

- *भागवत विद्युत, (२००८),* "पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान", या लेखामध्ये लेखकाने पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान दाखविताना, मध्ययुगीन काळातील स्त्रियांचे स्थान, १९ व्या शतकातील स्त्रीचे स्थान, गांधीयुग काळातील स्त्रियांचे स्थान, स्वतंत्र भारतातील स्त्रीचे स्थान, १९६० ते १९७० या दशकातील स्त्रियांचे स्थान, अशा विविध कालावधीत समाजामध्ये असलेले स्त्रियांचे स्थान कसे होते यांचे विविध पुरावे व दाखले देऊन स्पष्टीकरण केले आहे. तसेच, कालपरत्वे, तिच्यामध्ये होणाऱ्या स्वाभाविक व सामाजिक बदलांमुळे, तिचा समाजातील दर्जा कसा उंचावत व खालावत गेला, यांचे समर्पक व विवेचनात्मक विश्लेषण सदर लेखात आहे.

- *भागवत विद्युत, (२००८),* "स्त्रियांचा विकास कल्याण की सक्षमीकरण", या लेखामध्ये लेख प्रस्तुतकर्त्याने, अलीकडच्या काळात स्त्रियांची, स्त्री समस्यांची विशिष्ट प्रकारे का होईना, पण राज्यकर्ता वर्ग, अभिजन वर्ग आणि प्रसार माध्यमे यांच्याद्वारे मोठ्या प्रमाणावर बदल होत आहेत. म्हणजे एकीकडे स्त्री प्रशंसा, स्त्रियांचा बोलबाला वाढवला जात आहे तर दुसरीकडे स्वतःच्या मुलभूत हक्कांसाठी राज्यकर्तांचे, समाजाचे लक्ष वेधुन घेणाऱ्या स्त्रियांची होणारी मुस्कटदाबी, स्त्री चळवळीतील क्षीणता व दुर्बलता, आर्थिक व सामाजिक बाबतीत, स्त्रियांची झालेली दुरावस्था व अगतिकता, स्त्रियांच्या कामांचे स्वरुप आणि त्यामध्ये तगुन राहण्यासाठी चालविलेली अयशस्वी धडपड, पंचवार्षिक योजनांचा प्रत्यक्ष स्त्रियांना झालेला लाभ, त्यातुन झालेला त्यांचा विकास, अशा विविध प्रश्नांच्या आधारे आपले विचार प्रस्तुत केले आहेत.

- *राजपूत धोंडीरामसिंह, (२००८),* "बचत गटांतुन महिलांचे सक्षमीकरण", या लेखामध्ये लेखकाने, बचतगटांच्या माध्यमातुन महिलांचे होणारे सबलीकरण व सक्षमीकरण, याविषयी विचार मांडताना, गटाच्या माध्यमातुन महिलांनी उच्च टप्पा गाठल्याचे मत व्यक्त केले आहे. बचत गटाच्या माध्यमाद्वारे, शहर व ग्रामीण भागातील अनेक महिला स्वावलंबी झालेल्या असुन, त्या मोठमोठ्या स्त्री उद्योजक बनल्याचे दाखलेही दिले आहेत. बचत गट म्हणजे महिलांना सशक्त, सबळ व सक्षमीकरणासाठी मिळालेले वरदान असल्याचे लेखकाचे प्रामाणिक मत आहे.

- *वाळिंबे शिल्पा, (२००८),* "मिळुन साऱ्याजणी", या लेखामध्ये स्त्री शक्तीच्या एकजुटीचे महत्त्व विशद केले आहे. महिलांना आत्मसम्मान मिळवुन देण्याच्या जाणिवेतुन त्यांचे सक्षमीकरण व सबलीकरण करण्याच्या विचारातुन महिला एकत्र आल्यानंतर त्या काय करु शकतात, त्यांच्यामध्ये असलेली स्त्री शक्ती समाजात सर्वांगाने कसे बदल घडवु शकते, आणि हे घडुन येण्यासाठी महिलांचे संघटन कसे गरजेचे आहे, असे अनेक विचार लेखिकेने या लेखात मांडले आहेत.

- *सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स्, (सप्टेंबर १९, २००८),* या सर्व दैनिकांमधील लक्षवेधी बातमीच्याद्वारे, महाराष्ट्र राज्यातील महिला स्वयंसहायता बचतगटांना शासन ४ टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देणार असल्याची घोषणा, तत्कालीन मुख्यमंत्री, विलासराव देशमुख, यांनी औरंगाबाद येथे केली, तेव्हा साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधले गेले. मुख्यमंत्र्यांच्या या धाडसी निर्णयामध्ये, महिला आर्थिक विकास महामंडळ, ग्रामविकास विभाग, नाबार्डमार्फत स्थापन करण्यात आलेल्या बचतगटांना, त्यांचा स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी घेतलेल्या कर्जावरील ४ टक्के व्याज स्वतः बचत गटांनी भरावे व उर्वरित व्याज रकमेपैकी, ७ टक्के रक्कम शासन भरेल, असे नमुद करण्यात आले.

- *ओमासे संजय, (२००८),* "स्वयंसहायता बचत गट", या लेखामध्ये, ग्रामीण भागातील महिलांसाठी बचत गट हे अत्यंत महत्त्वाचे साधन असल्याचे मत लेखकाने मांडले आहे. त्यामुळे बचत गट सभासदाला नियमितपणे बचत करण्याची सवय लागते व अशा बचतीचा फायदा सभासदाला दीर्घकाळपर्यंत करुन घेता येऊ शकतो. स्वयंसहायता गटांच्या माध्यमातुन वाढत जाणारे महिलांचे सबलीकरण आणि पर्यायाने घडुन येणारा ग्रामीण विकास, स्वयंसहायता गटांच्या विकासाचे द्योतक मानावे लागेल. केंद्र शासनाच्या विविध महिला सबलीकरण व सक्षमीकरणाच्या योजनांमुळे ग्रामीण विकास व महिलांचा विकास वेगात होत असल्याचा दावासुद्धा लेखकाने केल्याचे दिसते.

- *प्रा. आढाव विलास, (२००८),* "महिला साक्षरता आणि विकास", या लेखामध्ये, मागासवर्गीय समाजात, पुरुषांपेक्षा महिलांचे निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे, जिथे निरक्षरता, तिथे गरीबी आणि जिथे गरीबी तिथे शोषण, असे समीकरणच मांडण्यात आले आहे आणि ते वास्तवार्थाने सत्यपण आहे. दलित महिलेचे शोषण हे एकुण तीन पद्धतीने होते, प्रथम ती महिला म्हणुन, दलित म्हणुन आणि तिसरे म्हणजे निरक्षर, असा स्पष्ट आशय ये लेखात मांडला आहे.

- *गांगुर्डे किशोर, (२००८),* "स्वयंपुर्णतेची सरस दिशा", सदर लेखामध्ये, लेखकाने, 'महालक्ष्मी सरस – २००७ प्रदर्शन व पुरस्कार सोहळा', या विषयी आपले मत व्यक्त केले आहे. या सोहळ्यामध्ये १७ राज्यांचा सहभाग होता. ३०० स्वयंसहायता गटांचे स्टॉल्स्, ८०० कुशल कारागिरांची कलात्मक उत्पादने आणि त्यातुन सव्वा कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे प्रतिपादन लेखकाने केले आहे. सन २००६–०७ मध्ये, देशभरात स्वयंसहायता बचत गटांना ८०० कोटी रुपयांचा अर्थपुरवठा 'नाबार्ड' आणि इतर बँकांतर्फे करण्यात आला, तर २००७–०८ या वर्षी, हा अर्थपुरवठा १०,००० कोटी रुपयांवर जाईल असा अंदाज लेखक या लेखात व्यक्त करतात. स्वयंसहाय्यता बचत गटांना, सवलतीच्या दराने, कर्जपुरवठा करण्याची भुमिका स्विकारणार असल्याचे, तत्कालीन उपमुख्यमंत्री, मा. आर.आर. पाटील यांचे वक्तव्यदेखील लेखकाने आपल्या लेखात विशेष नमुद केले आहे.

- *दिवटे मोहन, (२००८),* "दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना शासकीय योजनांबद्दलच्या माहितीचा अभाव आहे", उपरोक्त विषयानुसार, लेखकाने आपले मत मांडताना असे सांगितले की, भारत हा खेड्यांचा देश आहे. त्यामुळे खेड्यांमध्ये (ग्रामीण भागात) जास्ती लोक राहतात व अशा लोकांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण जास्ती आहे. या कुटुंबात राहणाऱ्या व्यक्ती या शिक्षणापासुन वंचित राहिल्याने त्यांच्यात साक्षरतेचा अभाव व अज्ञान असल्यामुळे, बऱ्याच कुटुंबांना शासकीय योजनांची माहितीच मिळत नाही. परिणामी, अशा लोकांमध्ये आर्थिक दारिद्र्यतादेखील दिवसेंदिवस वाढताना दिसुन येते.

शासकीय योजनांचा लाभ न मिळाल्यामुळे, त्यांच्यात शासनाच्या विविध योजनांबद्दल असलेला नकारात्मक दृष्टिकोन तीव्र होऊन, ते अशा योजनांकडे पाठ फिरविताना दिसुन येतात. त्यामुळे त्यांचा आर्थिक विकास होत नाही आणि शासनाच्या योजनांचा लाभ त्यांना मिळत नाही.

- *जीवनतारे केवल, (२००८),* "तृप्तीची अनुभूती", सदर लेखातुन, लेखकाने विधान भवन परिसरात चार महिला बचत गटांनी एकत्र येऊन चालविलेल्या लज्जतदार, चवीष्ट पदार्थांच्या उपहारगृहाविषयी माहिती पुरविली आहे. त्यात लेखकाने महिला बचत गटांचा हा स्तुत्य उपक्रम वाखाणण्याजोगा असल्याचे नमुद केले आहे. हे उपहारगृह हिवाळी अधिवेशनास उपस्थित असलेल्या राजकीय, सामाजिक लोकप्रतिनिधींच्या पसंतीस विशेष उतरण्याचे प्रमुख कारण म्हणजे या बचत गटांमधील महिलांनी स्वहस्ते बनविलेले विविध चवीष्ट, गरमागरम पदार्थ सर्वांचीच मने जिंकुन गेले. त्यामुळे या महिलांनी त्यांचा आत्मविश्वास व कार्यानुभव वाढल्याचे स्पष्ट केले.

- *बागल राजेंद्र, (२००८),* "स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजना", उपरोक्त संदर्भानुसार, केंद्र शासनामार्फत, स्वर्णजयंती ग्राम रोजगार योजना, दिनांक १ एप्रिल १९९९ पासुन कार्यान्वित झाल्याचे नमुद केले आहे. लेखकाने सदर योजनेविषयी माहिती देताना, काही महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत. सदर योजनेचा मुख्य उद्देश स्वयंसहायता गटांची स्थापना करणे, असा असल्याने या योजनेच्या माध्यमातुन, राज्यात मोठ्या प्रमाणात स्वयंसहायता बचत गटांची स्थापना करण्यात आल्याचे नमुद केले आहे. या योजनेद्वारे स्थापन केलेल्या स्वयंसहायता गटांची संख्या व त्यातुन मिळणारा रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीतील त्या महिलांचा सहभाग महत्त्वपुर्ण असल्याचे दिसुन येते. स्वयंरोजगार योजनेच्या माध्यमातुन निर्माण झालेल्या दारिद्रय रेषेखालील, आदर्श व सक्षम स्वयंसहायता गटांना प्रोत्साहित करण्यासाठी "राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार" देण्याचे राज्यशासनाने दिनांक १ मे २००६ घोषित केले.

- *देवकर वंदना, २००९,* "भारतीय स्त्री – एक मागोवा", या लेखात, लेखिकेने 'स्त्रियांचे समाजातील बदलते स्थान', या शीर्षकांतर्गत, रामायणाचा काळ, उत्तर वेदकाळातील स्त्री जीवन, मनूचा काळ, मध्ययुगीन स्त्री जीवन, अंधार युग, ब्रिटीश काळ, स्वातंत्र्योत्तर काळ, अशा काळातील स्त्री जीवनाचा आढावा घेतला आहे. भारतीय स्त्री जीवनाचा इतिहास बदलण्याचे कार्य काही वर्षांपासुन चालु झाले आहे, ते आजपर्यंत चालुच आहे. मात्र या कार्याची गती काळानुसार बदलत चालली असल्याचे, लेखिकेने खास नमुद केले आहे.

- *एच्. सुधीर, २००९,* "महिलांच्या राजकीय सबलीकरणाकडे : एक अनुभव", प्रस्तुत लेखात, लेखकाने महिलांचे सबलीकरण, ही एक प्रक्रिया असल्याचे सांगुन, त्याद्धारे, महिलांना संसाधनाचे नियंत्रण, बौद्धिक आणि मानव संसाधनांशी त्याच्या आवाक्यात आणण्याचे कार्य कसे केले जाते, हे स्पष्ट केले आहे. महिलांचे राजकीय सबलीकरण, हा एक संपुर्ण सबलीकरणाचा एक भाग आहे. भारत संघराज्य, महिला सबलीकरणामध्ये आघाडीवर आहे. भारतीय राज्यघटनेच्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीमागे महिलांना निर्णय प्रक्रियेत राखीव जागा ठेवणे, हा मुळ उद्देश होता. सदर घटनादुरुस्ती म्हणजे राजकीय क्षेत्रातील महिला सबलीकरण प्रक्रियेतील, एक धाडसाचे पाऊल असल्याचे नमुद केले आहे.

- *महाले पंडित, (२०१०),* "बचतगटाच्या माध्यमातुन गावाचा विकास," सदर लेखात, सिन्नर तालुक्यातील निमगांव देवपूर, येथील सरपंच महिला, श्रीमती संगीता मुरडनर, यांनी गावाच्या विकासकार्यात महत्त्वपुर्ण भुमिका पार पाडत, त्यांच्या गावातील महिलांना एकत्र करुन, तेथे बचत गटाची स्थापना केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आज अनेक बचतगट गावात सुरु आहेत. या अंतर्गत, गावात अद्ययावत शौचालये बांधण्यात येत आहेत. 'अहिल्याबाई' व 'यशोदा', या बचत गटांकडे प्राथमिक शाळा व विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराची जबाबदारी असुन, अन्य बचत गटांकडे गावातील पायाभुत सुविधांकडे लक्ष पुरविण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. ह्या गावातील महिला सामाजिक क्षेत्रात विशेष प्रगती करीत असुन, त्यांनी राजकीय क्षेत्रातदेखील भाग घ्यायला सुरुवात केली आहे.

- *शिंदे सुनील, (२०१०),* "ग्रामीण महिलांच्या आर्थिक विकासात बचत गटांची भुमिका आणि त्यांचे महत्त्व", भारतीय राज्यघटनेमध्ये, महिलेला पुरुषांच्या बरोबरीने दर्जा दिलेला आहे. तसेच, १९९१ मध्ये, ७३ व्या घटना संशोधनाद्धारे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, महिलांना ३३ टक्के आरक्षण लागु केले आहे. परंतु ग्रामीण भागात महिलांचा समाजामध्ये पाहिजे तेवढा सहभाग नाही. ग्रामीण भागातील महिला आजही फक्त 'चूल आणि मूल' यातच अडकलेली दिसते. भारत सरकारने महिलांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्याचे आढळते. अलीकडच्या काळात, महिला व बाल विकास विभागामार्फत, महिलांसाठी अनेक योजना राबविल्या जातात. गेल्या दहा वर्षांत, राज्यात २ लाखांहुन अधिक बचत गटांची स्थापना झाली असुन, त्यात महिला बचत गटांची संख्या १,६१,८७२ एवढी आहे. त्यापैकी ४३,२५४ महिला बचत गटांनी आर्थिक उपक्रम सुरु केले आहेत. महिला बचत गटांना शासनाकडुन ४ टक्के व्याज दराने विविध योजनांद्धारे आतापर्यंत ७२२ कोटी रुपयांचे अनुदान तर १,२८२ कोटी रुपयांचे कर्ज देण्यात आले आहे.

- *फौजिया खान, (२०१०),* "बचत गटांचे शिवार प्रदर्शन", या लेखात, 'दिलासा संस्था' आणि 'मधुरांगण व्यासपीठ' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या व 'नाबार्ड' च्या सहयोगाने संपन्न झालेल्या, महिला बचत गटांच्या, शिवार प्रदर्शनाचे उद्घाटन, तत्कालीन राज्यमंत्री, फौजिया खान, यांच्या हस्ते झाले. त्यावेळी राज्यमंत्री म्हणाल्या की, *"महिला बचत गटांनी विक्री व्यवस्थापनाचे तंत्र आणि जाहिरातीची कला अवगत केल्यास, महिला बचत गटांच्या उत्पादनाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ प्राप्त होईल".*

- *गुरव जयंत, यशदा - संचालक, पुणे, (२०१०),* "पंचायतराज संस्थांमधील महिलांचे स्थान", यशदा, यशमंथन, जानेवारी-मार्च २०१० च्या, महिला विशेष त्रैमासिकातील, सदर लेखात, भारतातील २३ राज्यातील पंचायतराज व्यवस्थेतील महिलांचे स्थान, या संख्यात्मक व गुणात्मक सर्वेक्षणातुन, विविध राज्यांची महिला सक्षमीकरणाकडे होणारी वाटचाल अभ्यासताना, महिलांना अद्यापही राजकीय, सामाजिक व आर्थिक पाठबळ देणे कसे गरजेचे आहे, तसेच, महिलांच्या सक्षमीकरणामध्ये महाराष्ट्र इतर राज्यांच्या तुलनेत कुठे आहे, याचे विवेचन करण्यात आले आहे.

- *प्रा. डॉ. देशमुख निलिमा , संचालिका, महिला व अध्ययन विकास केंद्र, नागपूर, (२०१०),* "महिला आरक्षण विधेयक : एक सोनेरी पाऊल", यशदा, यशमंथन, एप्रिल-जून २०१० च्या, महिला विशेष त्रैमासिकातील उपरोक्त लेखात, राज्यसभेत महिला आरक्षण विधेयकाला मंजुरी मिळाल्याने, गेल्या अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याचे दिसते. हे आरक्षण विधेयक, भारतातील महिला सबलीकरणाच्या व सक्षमीकरणाच्या दिशेने पडलेले एक विधायक व यशस्वी पाऊल असल्याचे प्रतिपादन, लेखिकेने आपल्या लेखात केले आहे. तसेच, या विधेयकाची गरज, इतर देशांमधील महिलांची राजकीय व सामाजिक स्थिती, याबाबत सविस्तर माहिती लेखिकेने प्रस्तुत लेखात विषद केली आहे.

- *प्रा. डॉ. कस्तुरे-वाडकर प्रभा, (२०१०),* "महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण : फलश्रुती", यशदा, यशमंथन, ऑक्टोबर-डिसेंबर २००९, पान क्र. २२ ते २४, या लेखात, महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. या राज्याने महिलांच्या विकासासाठी अनेक कार्यक्रम राबविले, त्याबरोबरच, महिलाविषयक धोरणांची आखणी करुन, महिलांच्या सक्षमीकरणात मोलाची भुमिका बजावली. या महिला धोरणाचा महिलांच्या हितासाठी कसा व किती उपयोग झाला, अशा अनेक बाबींचा अभ्यास करुन, त्याचे संक्षिप्त विवेचन लेखिकेने या लेखात मांडले आहे.

- *झनक सुभाष, महिला व बाल कल्याण मंत्री, (२०१०),* "महिलांच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य", लोकराज्य मासिक, मार्च २०१०, सदर लेखात, मंत्री महोदयांनी, महिला सक्षमीकरणासंदर्भात, लोकराज्याशी साधलेल्या खास संवादात, महिलांच्या विकासासाठी विविधस्तरावर, महिलांच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येऊन, त्यास गती देण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ,नाबार्ड, ग्राम विकास विभाग, स्वर्णजयंती ग्राम विकास योजना, जल स्वराज्य या प्रकल्पांतर्गत, पाच ते सहा लाख बचत गटांची राज्यभर स्थापना, अशा विविध कार्यक्रमांचा आणि योजनांचा आढावा, या लेखातुन मंत्री महोदयांनी घेतल्याचे दिसते.

- *प्रा. खान फौजिया, महिला व बाल कल्याण राज्यमंत्री, (२०१०),* "विकासात स्त्रियांचे स्थान अद्धितीय," लोकराज्य मासिक, मार्च २०१०, सदर लेखात, राज्यमंत्री महोदयांनी, महिलांचे सक्षमीकरण करताना, त्यांना स्वतःच्या पायांवर उभे करण्याबरोबरच, त्यांना घटनेने दिलेले मुलभूत हक्क मिळावेत, त्यांचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा सुधारावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची, जानेवारी १९९३ मध्ये स्थापना करण्यात आल्याचे सांगितले. तसेच, महिलांच्या क्षमता विकसित करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, त्यांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढविणे, यांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली, अशा अनेक बाबींचा उल्लेख केल्याचे आढळते.

- *फडके-आंधळे वर्षा , (२०१०),* "महिलांना सक्षम करणारा आयोग", लोकराज्य मासिक, मार्च २०१०, या लेखात, लेखिकेने, महिलांचा आर्थिक, सामाजिक व राजकीय दर्जा उंचावण्यासाठी, तसेच, महिला सक्षमीकरणासाठी, राज्य शासनाने स्थापन केलेल्या, राज्य महिला आयोगाच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती प्रस्तुत केली आहे. राज्य महिला आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये म्हणजे स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करुन, योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करणे, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करणे, अशा विविध गोष्टींशी संबंधीत असलेल्या सर्व बाबींवर, शासनाला सल्ला देण्याचे महत्त्वपुर्ण कार्य, राज्य महिला आयोग करीत असल्याचे सांगितले आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


- *Government of India,* **'Gazetteer of Bombay State', Poona District, Government Central Press, Bombay, 1954, pp. 1.**
- *Sadhu A.N. and Singh Amarjit,* **'Research Methodology in Social Sciences', Himalaya Publishing House, 1st Edition, 1999, Page Nos. 2, 7 and 10.**
- *आगलावे प्रदिप,* 'संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे', २000, विद्या प्रकाशन, नागपूर.
- *कुलकर्णी विजय,* 'बचतनामा', २000, पृ.क्र. ४६, ५१, १०१ ते १०७, १२३, १२४.
- *महिला व बाल विकास धोरण आणि निर्णय,* '१९७५ ते जानेवारी २00२ – एक दृष्टिक्षेप', महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
- *यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,* पुणे, यशमंथन, जानेवारी–मार्च २00२.
- *महाजन शांताराम गजानन, (लेखक व संपादक),* 'पुणे शहराचा ज्ञानकोष', खंड १, प्रथम आवृत्ती, २00४, पृ. क्र. ५–६.
- *महाजन शांताराम गजानन, (लेखक व संपादक),* 'पुर्वोक्त', २00४, पृ. क्र. २८१–२८२.
- *Krishnaswami O.R. and M. Ranganathan,* **'Methodology of Research in Social Sciences', Himalaya Publishing House, Second Revised Edition, 2005, pg. 1.**
- *डॉ. बोरुडे रा.र.,* 'संशोधनपद्धतीशास्त्र', पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २00५, पृ. क्र. २.
- *चौगुले सुमती,* 'महिला सबलीकरणाची नवी दिशा', २00५, इंदुजा प्रकाशन, पृ. क्र. १, २, ५९.
- *मुलाणी एम्. यु.,* 'महिला स्वयंसहायता बचत गट', डिसेंबर २00६, डायमंड प्रकाशन.
- *घाणेकर वि.वि.,* 'स्वयंसहायता बचत गट', २00६, पृ. क्र. २१.
- *Kothari C.R.,* **'Research Methodology, Methods and Techniques', New Age International Publishers, 2nd Edition, 2007, Page Nos. 3, 4, 94 and 111.**
- *भागवत विद्युत,* 'पर्यायी समाजव्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान', स्त्री मासिक, मार्च–एप्रिल २00८, पृ. क्र. ३६.
- *भागवत विद्युत,* 'स्त्रियांचा विकास, कल्याण की सक्षमीकरण', स्त्री मासिक, मार्च–एप्रिल २00८, पृ. क्र. ३२.

- *राजपूत धोंडिरामसिंह,* 'बचत गटातुन महिलांचे सबलीकरण', स्त्री मासिक, ऑगस्ट २००८, पृ.क्र. १९.
- *महाराष्ट्र शासन,* 'उपरोक्त', २०११, पृ. क्र. १.
- *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी,* अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११-१२, पृ. क्र. १४.
- ***Gupta Santosh,*** **'Research Methodology and Statistical Techniques', page 4.**
- ***Dr. Borse M.N.,*** **'Research Methodology : Modern Methods and New Techniques', page 1.**

**संकेतस्थळे : (websites)**

- ***www.yashada.com***
- ***www.maharashtra.gov.in***
- ***www.economywatch.com***


.....

# प्रकरण – ३
# स्त्रियांच्या चळवळी
# आणि त्यांचे घटनात्मक हक्क

*प्रकरण तिसरे*

# स्त्रियांच्या चळवळी आणि त्यांचे घटनात्मक हक्क

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **३.१** | **स्वातंत्र्यपुर्व काळातील भारतातील स्त्री चळवळी :** | **९८–१०४** |
| ३.१.१ | प्रस्तावना | ९८ |
| ३.१.२ | एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळ | ९८ |
| ३.१.३ | समाजसुधारणा आणि स्त्रीप्रश्न | ९९ |
| ३.१.४ | विसाव्या शतकातील राष्ट्रीय चळवळ | १०० |
| ३.१.५ | डाव्या चळवळीतील स्त्रिया | १०३ |
| ३.१.६ | जातीव्यवस्था विरोधी चळवळ आणि स्त्रिया | १०३ |
| **३.२** | **स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री चळवळी :** | **१०५–११५** |
| ३.२.१ | प्रस्तावना | १०५ |
| ३.२.२ | १९७० नंतरची 'नवी' स्त्री चळवळ | १०६ |
| ३.२.३ | स्त्री चळवळींपुढील जमातवादाचे आव्हान | १०८ |
| ३.२.४ | समकालीन भारतातील स्त्री चळवळ : १९९० नंतरचा प्रवास | १०९ |
| ३.२.५ | स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या बिगरशासकीय संघटनांमध्ये वाढ | १११ |
| ३.२.६ | स्त्री चळवळीसमोरील आव्हाने | ११४ |
| **३.३** | **स्त्रियांचे घटनात्मक हक्क :** | **११५–१२५** |
| ३.३.१ | प्रस्तावना | ११५ |
| ३.३.२ | महिलांचे हक्क | ११६ |
| ३.३.३ | स्त्रियांकरीता कायदे आणि संविधानातील विशेष तरतुदींचा समावेश | ११९ |
| ३.३.४ | दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे | १२४ |
| **३.४** | **महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण :** | **१२५–१२९** |
| ३.४.१ | प्रस्तावना | १२५ |
| ३.४.२ | राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० | १२६ |
| ३.४.३ | महाराष्ट्र राज्य महिला आयोग | १२७ |
| ३.४.४ | महिला धोरणासंदर्भात शासकीय दृष्टिकोन | १२८ |
| ३.४.५ | महिलांच्या अडचणी सोडवु शकण्याऱ्या यंत्रणा | १२९ |
| • | **संदर्भसूची** | **१३०–१३१** |


. . . . .

## ३.१ स्वातंत्र्यपुर्व काळातील भारतातील स्त्री चळवळी :

### ३.१.१ प्रस्तावना :

भारतातील स्त्री चळवळीला, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकातील चळवळीच्या इतिहासाचा वारसा लाभला आहे. या सर्व चळवळी स्त्री संदर्भात होत्या. स्त्री चळवळी संदर्भात, समाज सुधारणा आणि राष्ट्रवादी चळवळींचा विचार करण्याबरोबरच कामगार चळवळ, जातीविरोधी चळवळ, यांसारख्या भिन्न चळवळींमधुन, स्त्री प्रश्नांवर झालेल्या मंथनाचे, या चळवळींमधील स्त्रियांच्या सहभागाचेही विश्लेषण करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यपुर्व काळातील स्त्री चळवळींवर वसाहतवादी राजवट आणि आधुनिकता, तसेच, राष्ट्रवादी विचारसरणीचा मोठा प्रभाव होता. १९७० आणि १९८० च्या दशकात, भारतात जी स्वायत्त स्त्रीवादी चळवळ सुरु झाली, तिच्या मुळाशी ब्रिटीश साम्राज्यवादी काळातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक बदलांच्या चौकटीत झालेल्या स्त्रीविषयक जडणघडणीची जाणीव होती. त्या दृष्टिने, समकालीन स्त्री चळवळ समजुन घेण्यासाठी स्वातंत्र्यपुर्व काळ फार महत्त्वाचा आहे. त्यामुळेच स्त्री चळवळीच्या संदर्भातील या कालखंडातील विविध दृष्टिकोनांचा आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

### ३.१.२ एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळ :

स्त्रीविषयक परिवर्तनाची सुरुवात कल्याणकारी दृष्टिकोनातुन झाली. १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळ, प्रामुख्याने, सती, बालविवाह, पडदा प्रथा, यांसारख्या स्त्रियांशी निगडित प्रथांवर केंद्रित होती. ब्रिटीश राजवटीतील नव्याने उदयाला आलेल्या अभिजन व मध्यम वर्गाच्या स्वअस्मितेच्या उभारणीत या मुद्यांचे महत्त्वाचे योगदान होते. कारण या मुद्यांच्या अनुषंगाने घर आणि घराबाहेरील विश्व, कुटुंब आणि कुटुंबाबाहेरील विश्व, तसेच स्त्री आणि पुरुष अशा व्याख्या नव्याने केल्या गेल्या. या काळातील व स्त्री विषयक सुधारणा प्रामुख्याने, आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचाच एक भाग म्हणुन झालेल्या दिसतात.

१९ व्या शतकातील स्त्री प्रश्नांची जडणघडण आधुनिकता आणि राजकीय सत्तेच्या संदर्भात झालेली दिसते. ब्रिटिशांनी 'भारतीय स्त्रियांचे कैवारी' या भुमिकेतुन स्त्री विषयक सुधारणा केल्या. परंतु त्या करताना, स्त्री विषयक कळवळ्यापेक्षा, स्वतःचे श्रेष्ठत्व आणि वर्चस्व सिद्ध करण्याचाच हेतु त्यात जास्ती होता. दुसरीकडे, नव्याने उदयाला आलेल्या अभिजन वर्गातील पुरोगामी नेत्यांनी स्त्री विषयक रानटी प्रथा बंद करण्यासाठी जी सुधारणा चळवळ हाती घेतली, त्यातही स्त्रियांचा दर्जा सुधारण्यापेक्षा, आधुनिकताच सिद्ध करण्यास त्यांनी प्राधान्य दिले होते. या काळात स्त्रियांची दडपणूक करणाऱ्या मुलभूत संरचनांना आव्हान दिले गेले नाही. आधुनिकता, राष्ट्रवाद आणि

प्रगतीच्या नव्या विचारसरणीतुन 'स्त्रियांची उन्नत्ती' हा एक महत्त्वाचा निर्देशांक मानला गेला. त्यामुळेच समाजसुधारणा चळवळीत कायदेशीर सुधारणांवर अधिक भर देण्यात आला.

१८२९ मध्ये 'सती प्रथा' कायद्याने बंद करण्यात आली तर १८५६ मध्ये 'विधवा पुर्नविवाहा'चा कायदा करण्यात आला. दुसरीकडे औपचारिक शिक्षणाच्या माध्यमातुन, नवी सुशिक्षित, जबाबदार स्त्री निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु झाला. १८२०-७० या काळात ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसॉटिकल सोसायटी, यांसारख्या समाजसुधारक संघटनांचे नेतृत्व शहरी, उच्चवर्गीय, उच्चजातीय पुरुषांकडेच असले तरी त्यांच्यामुळे अनेक स्त्रियांना या सुधारणांचे फायदे मिळाले. मुंबई, पुणे, मद्रास येथे झपाट्याने स्त्री शिक्षण सुरु झाले. पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी, सरलादेवी, हेमावतीबेन, अशा स्त्री समाज सुधारकांनी आपापल्या परीने पुरुषसत्ताक नियंत्रणाला आव्हान दिले.

१८६८ मध्ये 'आमार-जीवन' हे आत्मचरित्र लिहणाऱ्या, राशसुंदरीदेवी, या पहिल्या भारतीय स्त्री होत. १८८३ मध्ये कादंबिनी बसू व चंद्रमुखी बसू, यांनी कलकत्ता विद्यापीठातुन पहिली कला शाखेची पदवीधर (बी.ए.) होण्याचा मान मिळविला. *(संदर्भ - History of Doing, 1993)* समाज सुधारणांचा लाभ काही मुठभर स्त्रियांनाच मिळाला. १९ व्या शतकातील समाजसुधारणा चळवळीने झपाट्याने हिंदु उच्च जातीतील स्त्रियांचेच प्रश्न हाताळलेले दिसतात. ब्रिटिश राजवटीमुळे निर्माण झालेल्या नव्या आर्थिक व सामाजिक बदलांमुळे फायदा मिळविणाऱ्या, नव्याने उदयास आलेल्या नवशिक्षित, उच्च व मध्यम वर्गातील एका गटाने जरी या सुधारणांना पाठिंबा दिला होता तरी दुसरीकडे भारतीय परंपरेच्या पुनरुज्जीवनाचा प्रयत्न करणारा दुसरा गटही त्यांचवेळी निर्माण झाला होता. पुनरुज्जीवनाच्या प्रयत्नातही स्त्री प्रश्नांचाच आधार घेतला गेला. या विचारसरणीने, भारतीय परंपरेचा अर्थ 'हिंदु परंपरा' असा घेत, सर्व समस्यांचा उगम मुस्लिम आक्रमणात व आक्रमणकर्त्यांत आहे, असे मत मांडले. मुस्लिम आक्रमणांपुर्वी 'सुवर्णयुगीन' भारतात सर्व प्रकारची सुबत्ता, समृद्धी व स्वातंत्र्य होते, सर्व वाईट प्रथांचा शिरकाव नंतर झाला आहे आणि म्हणुनच त्या 'गौरवशाली' वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन, पुर्नबांधणी करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन करण्यात आले.

### ३.१.३ समाज सुधारणा आणि स्त्री प्रश्न :

सतीविरोधी चळवळीतुन प्रकर्षाने जाणवते की, स्त्री हितापेक्षा ब्रिटिशांच्या वसाहतवादी राजवटी विरुद्ध बचावात्मक प्रतिक्रियेचा जास्ती अविष्कार त्यात होता. या संपुर्ण आंदोलनात 'ब्राह्मणी शास्त्र' सुत्रांच्या आधारे 'सती प्रथा' कशी निराधार व अग्राह्य आहे, हेच दाखविण्यात आले. स्त्री

शिक्षणाची चळवळदेखील उदयोन्मुख मध्यमवर्गानेच, पाश्चिमात्य वातावरणाशी मिळतेजुळते घेण्याच्या प्रक्रियेचाच एक भाग होती. तसेच, विधवा पुर्नविवाहाची आकडेवारी तपासली तर असेच दिसते की, हा कायदा संमत झाल्यानंतरच्या काही वर्षातच जे पुर्नविवाह झाले, ते प्रामुख्याने, बालविधवांचेच होते. उच्चवर्णीय 'कौमार्य भंग' झालेल्या विधवांचे पुर्नविवाह होऊ शकले नाहीत. ल्युसी कॅरोल यांच्या मते, विधवा पुर्नविवाह कायद्यामुळे, स्त्रियांवरील कर्मठ नियंत्रणे जास्तच घट्ट झाली. १८५६ च्या विधवा पुर्नविवाह कायद्यानुसार, पुर्नविवाह करणाऱ्या स्त्रीचे मृत पतीच्या मालमत्तेवरील सर्व हक्क संपुष्टात येत होते. याचा वापर करुन काही ठराविक जातींमध्ये व समुदायांमध्ये जिथे पुर्वी विधवेला तसेही पुर्नविवाहाचे हक्क होते, तिथे विधवांना संपत्तीतुन हुसकावून लावले गेले. त्यांचे पतीच्या संपत्तीवरील सर्व अधिकार संपुष्टात आणण्यासाठी, काही आदिवासी जाती-जमातींनी, स्वतःला या कायद्याच्या अधिकाराखाली येतो, असे सोयीस्कररित्या सिद्ध केल्याचे अनेक दाखले आहेत. याचाच अर्थ, या कायद्यामुळे विधवांच्या अधिकारांची किंमत देऊन, अनेक बिगर हिंदु समुदायांना, हिंदु प्रथा स्विकारण्याचा सोयीचा अवसर मिळाला.

हिंदु स्त्रियांना हा पुर्नविवाहाचा अधिकार केवळ पतीच्या मृत्युनंतरच दिला गेला होता. ब्रिटिशांचे भारतातील प्रथांबद्दलचे ज्ञान, हे प्रामुख्याने, हिंदु ब्राह्मणी शास्त्रांवर आधारित असल्यामुळे १८६० च्या सुमारास, अनेक कोर्ट निकालात घटस्फोट बेकायदेशीर ठरविण्यात आले. उच्चवर्णीय जाती सोडल्या तर अनेक जातींमध्ये घटस्फोटाची प्रथा होती, हे ब्रिटिश न्यायालयांनी आणि प्रशासकांनी सोयीस्कररित्या दुर्लक्षिले.

### ३.१.४ विसाव्या शतकातील राष्ट्रीय चळवळ :

विसाव्या शतकात राष्ट्रवादी चळवळीने जोर धरल्यानंतर, स्त्री प्रश्नांच्या मांडणीमध्ये अनेक बदल झाल्याचे आढळते.

- ***वसाहतवाद, राष्ट्रवाद आणि स्त्रिया :***

  ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतीयांच्या व्यक्तिगत जीवनात हस्तक्षेप न करण्याचे धोरण ठेवले होते. घर, कुटुंब व स्त्रियांशी निगडित असलेले विषय खाजगी, व्यक्तिगत आणि गोपनीय असल्यामुळेच, भारतीय परंपरेचे द्योतक मानले गेले. भारतीय स्त्रियांकडे या विचारसरणीत एक विशिष्ट नैतिकतेचे द्योतक म्हणुन पाहिले गेले. पतिव्रता, पत्नी, आई, अध्यात्मिक शक्तीचे प्रतिक असलेली भारतीय स्त्री, ही भारत राष्ट्राचेही प्रतिक बनली. त्यामुळे या प्रक्रियेत घर आणि कुटुंबाची तिच्या भोवतीची चौकट अधिक बळकट झाली. समुदायाच्या नैतिकतेचे, प्रतिष्ठेचे, प्रतिनिधित्व करणारी स्त्री, आपसुकच, राष्ट्र-जात-जमात आणि कार्याच्या अवस्थेत आणखीनच बंदिस्त झाली. लिंगभाव

आधारित विषमतेच्या जाणीवेवर गरीब-श्रीमंत, उच्चवर्णीय-दलित अथवा अल्पसंख्यांक-बहुसंख्यांक असण्याचाही परिणाम स्त्री जातीवर झाला. येथुनच जात-जमात, वांशिकतेच्या आधारावर होणाऱ्या शोषणाविरुद्ध सामाजिक चळवळी पुढे यायला सुरुवात झाली आणि आधुनिक राष्ट्रवादाच्या उभारणीत शहरी उच्चवर्णीय-उच्चवर्गीय स्त्रिया आणि इतर स्त्रिया, असा भेदभाव निश्चित झाला.

- *स्त्रियांच्या संघटना :*

समाजसुधारणा चळवळीतुन झालेल्या स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे डॉक्टर्स, वकील, शिक्षक आणि विचारवंत स्त्रियांची पहिली पिढी भारतात निर्माण झाली. १९ व्या शतकाच्या अखेरीस, ब्राह्मो समाज, आर्य समाजाच्या प्रभावाखाली मद्रास, मुंबई, बंगाल, अशा विविध प्रांतात, सुशिक्षित स्त्रियांच्या अनेक सुधारणावादी संघटना अस्तित्वात आल्या. भारतातील शहरी भागात लक्षणीय संख्येत स्त्रियांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संघटना सुरु झाल्या. १९०७ च्या आसपास, स्त्रियांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या महिला, सेवा समाज, भगिनी समाज, आर्य महिला समाज, अंजुमन्-ए-इस्लाम-ख्वाताईन-ए-इस्लाम, चमनबाई प्रसुतिगृह व बालकल्याण समिती, यांसारख्या अनेक संघटना प्रस्थापित झाल्या होत्या.

१९१०-२० च्या दशकात, राष्ट्रीय पातळीवर स्त्रियांच्या संघटना उभारण्याचे पहिले प्रयत्न सुरु झाले. १९१७ मध्ये, ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखाली (Indian Women's Association) 'भारतीय स्त्री संघटने'ची स्थापना झाली. स्त्रियांमध्ये मनोनिग्रह, निःस्वार्थीपणा, त्याग भावना, हे गुण जन्मतःच असल्यामुळे, स्वराज्य चळवळीत स्त्रियांचा राजकीय सहभाग महत्त्वाचा असल्याचे बेझंट यांनी, १९१७ मधील, कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणात खास नमुद केले. याच अधिवेशनात बोलताना सरोजिनी नायडु यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या पूरक भुमिकेचे समर्थन केले. स्त्रियांच्या चळवळीतील या टप्प्यावर, आपल्या हक्कांसाठी, राजकीय पातळीवर प्रयत्न करणे आणि घटनात्मक संरक्षण मिळविणे आवश्यक आहे, असे मानणारा, समान हक्कांचा आग्रह धरणारा मतप्रवाह, याच काळात उदयाला आला.

१९२४ मध्ये स्त्री चळवळीतील विविध मतप्रवाह आणि विचारांचे समावृत्त प्रतिनिधीत्व करणारी संघटना म्हणुन (AIWC - All India Women's Conference) 'आखिल भारतीय महिला परिषदे'ची स्थापना झाली आणि या महिला परिषदेनेदेखील याच समान हक्काचा आग्रह धरला. शिक्षणाच्या मागणीचा विस्तार करुन, सहशिक्षणाची, नवीन मागणी करण्यात आली. तसेच, कायदेशीर सुधारणा,

मालमत्तेचे समान अधिकार, आर्थिक समानतेमध्ये विधवांसाठी निवृत्ती वेतन, पतीच्या उत्पन्नात अधिकार, याचबरोबर, गर्भपाताचा हक्क, यांसारख्या अनेक नवीन मागण्या करण्यात आल्या. परिषदेने स्त्री शिक्षणासारख्या मध्यममार्गी सुरक्षित विषयांवर काम करावे, अशी एक महत्त्वाची भुमिका घेतली तर स्त्रियांच्या सर्व प्रश्नांवर काम केले पाहिजे, अशी परिषदेची दुसरी भुमिका होती. एक प्रभावी दबावगट, म्हणुन काम करणाऱ्या परिषदेचे नेतृत्व मात्र उच्चजातीय-उच्चवर्गीयांकडेच राहिले. या काळातील परिवर्तनाचे फायदे या विशिष्ट वर्गातील स्त्रियांनाच मिळाले.

१९४० च्या सुमारास स्वातंत्र लढ्याने जोर धरलेला असतानाच, स्त्री चळवळींपुढे ही, देशाचे स्वातंत्र्य हा प्राथमिक मुद्याच राहिला. राजकीय स्वातंत्र्याबरोबरच स्त्री-पुरुष असमानता आपोआपच संपुष्टात येईल, असा आशावाद स्वातंत्र्य चळवळीत निर्माण झाला. राष्ट्रवादी स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव एवढा होता की, स्त्री स्वातंत्र्याचा प्रश्न या काळात जवळपास सुटल्यातच जमा धरला गेला.

- *गांधींच्या चळवळीतील स्त्रियांचा सहभाग :*

१९३० पासुन, गांधीजींच्या नेतृत्वाखालील 'असहकार' आणि 'सविनय कायदेभंगा'च्या जन आंदोलनात हजारो स्त्रियांनी भाग घेतला. सुधारणावादी व पुनरुज्जीवनवादी नेत्यांनी स्त्रियांच्या ज्या त्यागी प्रतिमेवर भर दिला होता, तीच प्रतिमा गांधीजींनीदेखील वापरली. त्यांनी ह्या प्रतिमेला हिंदु संस्कृतीच्या चौकटीतुन बाहेर काढले आणि 'भारत मातेची' एक नवीन प्रतिमा निर्माण केली. *''गांधीजींनी या देशातील स्त्रियांना एक नवीन जाणीव, आत्मविश्वास आणि घराबाहेरील जगात आदराचे स्थान मिळवुन दिले,''* असे मधु किश्वर म्हणतात. त्यातुनच कृतीहिन, सुधारणांचा विषय असलेल्या स्त्रिया सुधारणावादी, कृतीशील कार्यकर्त्या झाल्या. १९२० च्या सुमारास, स्त्री चळवळीत स्त्रियांच्या श्रमाचे नवे स्थान निर्माण झाले. राष्ट्रीय चळवळीत जेव्हा स्त्रियांच्या रोजगारीचा प्रश्न चर्चेला आला, तेव्हा स्त्रियांचे श्रम पुरुष श्रमाच्या तुलनेत दुय्यम धरले गेले. १९२८-२९ च्या मुंबई गिरणी कामगार संपात, स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी होत्या.

भारतात १९३० सालानंतर, कम्युनिस्ट विचारांच्या मंडळींनी, स्त्री प्रश्नासंदर्भात भुमिका घेण्यास सुरुवात केली. गोदावरी गोखले (परुळेकर) व श्रीमती भालेराव यांनी 'भारतीय सेवक संघ' (Servants of India Society) च्या महिला विभागाची स्थापना करुन, स्त्री कामगारांच्या प्रश्नांवर मोठे काम केले. राष्ट्रीय चळवळीतील स्त्री नेतृत्वाने, स्त्रियांच्या वेतनासाठीच्या श्रमांकडे 'अनैसर्गिक' म्हणुन पाहिल्यामुळे त्यांनी संरक्षक कायद्याची मागणी केली.

### ३.१.५ डाव्या चळवळीतील स्त्रिया :

डाव्या विचारवंतांनी, 'वर्ग व्यवस्थेला' शोषणाचे मुळ कारण मानले. जात, लिंग, इत्यादी अधिसंरचनेचा भाग असल्यामुळे, नव्या वर्ग लढ्यातुन, स्त्रियांचे व्यवस्थापनात्मक दुय्यमत्व नष्ट होईल, असा आशावादही ठेवला. काँग्रेसच्या ब्रिटिश साम्राज्यवादाबद्दलच्या मवाळ व अस्थिर धोरणांमुळे अनेक स्त्रिया अपेक्षाभंगामुळे, नाराजीने कम्युनिस्ट पक्षाकडे वळल्या. त्यापैकी अहिल्याबाई रांगणेकर, कनक मुखर्जी, इला भट्टाचार्य, विनय रणदिवे, यांसारख्या अनेक स्त्रिया काँग्रेसच्या राष्ट्रवादी चळवळीतुन नंतर साम्यवादी विचारसरणीकडे आकर्षित झाल्या. त्यावेळी कम्युनिस्ट पक्ष आदिवासी, भुमीहिन, गिरणी कामगार, अशा शोषित समुहांबरोबर काम करत होता.

पुढे १९७० च्या दशकात सुरु झालेल्या, अनेक जनआंदोलनात, याच चळवळीतील स्त्रियांचा मोठा सहभाग होता. साम्यवादी पक्षावर घातली गेलेली बंदी, १९४८ मध्ये झालेली गांधी हत्या, १९६२ चे भारत- चीन युद्ध आणि त्यानंतरची १९७५ ची आणीबाणी, या काळात पक्षाच्या कार्यकर्त्यांना खूपच खस्ता खाव्या लागल्या. कामगारांच्या हक्कांसाठी लढताना याच स्त्रियांनी लिंगभाव आधारित असमानतेच्या आर्थिक व राजकीय मुद्यांबरोबर संघटनात्मक कार्य करण्याचा प्रयत्न केला.

१९७५ च्या आणीबाणीनंतर बंगाल, केरळ, तामिळनाडु, दिल्ली, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश व त्रिपुरामधील डाव्या संघटनेतील स्त्रियांना राष्ट्रीय पातळीवरील नव्या संघटनेची गरज वाटली. त्यातुनच १९८१ मध्ये, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेची (All India Democratic Women's Association [AIDWA]) ची स्थापना झाली. काँग्रेसच्या राजकीय दडपशाहीविरुद्ध लोकांना विशेषतः स्त्रियांना लोकशाही हक्कांसाठी संघटित करणे, हे त्यावेळी AIDWA चे प्रमुख उद्दिष्ट होते. *(संदर्भ - जनवादी आंदोलनांमधील स्त्रिया, २००९.)*

### ३.१.६ जातीव्यवस्था विरोधी चळवळी आणि स्त्रिया :

- ***महात्मा फुले यांची स्त्रीप्रश्नांविषयक मांडणी :***

महात्मा फुले यांच्या ब्राह्मणी व्यवस्थेच्या टिकात्मक परीक्षणात 'स्त्री प्रश्न' हा महत्त्वाचा मुद्दा होता. ब्राह्मण वर्चस्वाला शह देण्यासाठी, फुल्यांनी स्त्रिया आणि शुद्रांच्या शिक्षणावर भर दिला. ऑमवेट यांच्या मते, '*स्त्री-पुरुष विषमता जातीच्या उतरंडीशी जोडुन, स्त्रियांचा प्रश्न एकुण समाज परिवर्तनाचा अंगभुत भाग मानण्याचे श्रेय, महात्मा फुले यांचे आहे.*' महात्मा फुले यांनी 'बालहत्या प्रतिबंधक गृहाची' स्थापना करुन, स्वतः 'अनौरस' मुलगा दत्तक घेऊन, हा प्रश्न स्त्रियांच्या अनैतिकतेचा नसुन, त्यांच्या लैंगिकतेवरील संरचनात्मक नियंत्रणाचा आहे, हे स्पष्ट केले.

सत्यशोधक ताराबाई शिंदे यांची 'स्त्री-पुरुष तुलना' ही पुस्तिका १८८२ मध्ये प्रसिद्ध झाली. या पुस्तिकेत स्त्रीदास्याचा प्रश्न ताराबाई शिंदे यांनी नेमकेपणाने मांडला.

- ***डॉ. आंबेडकर यांची स्त्री प्रश्नांसंदर्भात मांडणी :***

  १९२७ चा 'महाड सत्याग्रह' आणि १९५६ सालचे 'धर्मांतर', या दोन ऐतिहासिक महत्त्वपुर्ण घटनांमधील कालखंड हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेला दलित चळवळीचा महत्वाचा टप्पा आहे. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. उर्मिला पवार व मीनाक्षी मून यांनी संपादित केलेल्या 'आम्हीही इतिहास घडविला', या पुस्तकात, आंबेडकर चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाची नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे. देवदासी निर्मुलन, धर्मांतराबाबत दलित समाजात जागृती, शिक्षणाचा प्रसार, दारुबंदी, असे अनेक मुद्दे स्त्रियांनी हाती घेतले. या स्त्रियांनी जाहीर सभा भरविल्या, मोर्चांचे नेतृत्व केले, आंबेडकरी चळवळीतील महिलांच्या विविधांगी कार्याचे व कर्तृवाचे दर्शन या पुस्तकातील कथनांमधुन घडते.

  तसेच, प्रतिमा परदेशी, सरोज कांबळे, यांनी आंबेडकरांच्या स्त्रीमुक्तीविषयक विचारांचा पाठपुरावा केला आहे. अस्पृश्यता निवारण, हा केवळ पुरुषांचा नाही तर स्त्रियांचा ही प्रश्न आहे, असे आंबेडकरांना वाटत होते. याचे कारण ब्राह्मण स्त्रियांना 'शील व मातृत्व' या संदर्भात मिळणारी प्रतिष्ठादेखील दलित स्त्रियांना नाकारली जाते. डॉ. आंबेडकरांनी हिंदु धर्म चिकित्सा, धर्मांतराचा निर्णय, दलित स्त्रियांसाठी ज्ञानार्जनाचा व संघटित होण्याचा त्यांनी धरलेला आग्रह आणि स्वतंत्र अस्मिता घडविण्याचा सल्ला, या सर्वांतुन त्यांची स्त्रीमुक्तिविषयक भुमिका स्पष्ट होते.

  स्त्रियांचे शोषणाचे नाते, पुरुषसत्ताक व्यवस्था व जाती व्यवस्थेच्या उतरंडीशी आहे, हे पक्के ओळखलेल्या डॉ. आंबेडकरांनी प्रागतिक कायद्याच्या आधारे, भारतातील स्त्री प्रश्नांची कोंडी सोडविण्याचा प्रयत्न केला. शर्मिला रेगे यांच्या मते, *'दलित चळवळ व स्त्रीवादी चळवळ, या दोन्ही महत्त्वपुर्ण सामाजिक चळवळींमध्ये, दलित स्त्रियांच्या प्रश्नाचे उत्तर शोधुन, त्यांच्या जातीच्या उतरंडीतील संरचनात्मक शोषणाकडे दुर्लक्ष केले.'*

- ***पेरियार आणि आत्मसन्मान चळवळीची स्त्रीप्रश्नविषयक मांडणी :***

  १९२६ सालात, तामिळनाडुमध्ये श्री. पेरियार यांच्या नेतृत्वाखाली, समाजसुधारणेसाठी आत्मसन्मान चळवळ सुरु झाली. पेरियार यांच्या मते, *'जातीय विषमतेवर काँग्रेसने राष्ट्रीय एकात्मतेचे पांघरुण घालुन, धर्म व जातीच्या नावाखाली चालु असलेल्या शोषणाकडे दुर्लक्ष केले'*. त्यामुळेच पेरियार

यांच्या 'आत्मसन्मान' चळवळीत, शास्त्र पुराणांवर आधारित हिंदु मुलांना, तसेच ब्राह्मणांच्या वर्चस्वाला मोडीत काढले. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. मालमत्तेसंदर्भात स्त्रियांचे हक्क, श्रम, घटस्फोट, पुर्नविवाह आणि संतती नियमनासारख्या स्त्रियांच्या अनेक प्रश्नांवर या चळवळीत आवाज उठविला. पेरियार यांनी, स्त्री प्रश्नाकडे राष्ट्राच्या प्रगतीचा मानदंड म्हणुन न पाहता स्त्रियांना खरे स्वातंत्र्य मिळावे, म्हणुन कुटुंब नियोजनासारख्या आधुनिक विचारांचा स्विकार व प्रसार केला. पेरियार यांनी कौमार्य, पतीव्रत्य, यांसारख्या संकल्पनांतील फोलपणा उघड केला. तसेच, विधवा पुर्नविवाहाचा प्रसार केला.

## ३.२ स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री चळवळी :

### ३.२.१ प्रस्तावना :

भारतातील स्त्री चळवळ म्हणजे भारतातील स्त्रियांनी त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी व त्यांच्या हक्कांसाठी केलेली चळवळ होय. ह्या आकलनातील मर्यादा आज व्यवस्थित स्पष्ट झाल्या आहेत. मुळातच, भारतीय स्त्री म्हणुन एकसंध गट आहे, असे मानणे चुकीचे आहे. भारतीय स्त्री, जात, वर्ग आणि समुह, अशा स्तरीकरणाच्या भिन्न भिन्न पातळ्यांवर विभागली गेली आहे. आजच्या भारतीय स्त्री चळवळीची बैठक म्हणजे लिंगभावांवर आधारित विषमतेची जाणीव आहे.

१९७० ते १९८० च्या दशकात, भारतात जी स्वतंत्र स्त्रीवादी चळवळ सुरु झाली, तिच्या मुळाशी वसाहतवादी काळातील वादविवाद व चढाओढ यांबरोबरच तत्कालिन आर्थिक-सामाजिक बदलांच्या संदर्भात स्त्री प्रश्नांची झालेली जडणघडण व त्या अनुषंगाने निर्माण झालेली जाणीव आहे. भारतातील स्त्री चळवळीचा मागोवा, स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळ, अशा दोन्ही टप्प्यात स्वतंत्रपणे घ्यावा लागतो. वसाहत काळात कुटुंबातील स्त्रियांचे स्थान, त्यांच्या संदर्भातील दृष्ट प्रथा-परंपरा, त्याचबरोबर, श्रमिक म्हणुन असलेले प्रश्न आणि जातीव्यवस्थेतुन होणारे त्यांचे शोषण, हे प्रमुख मुद्दे होते. या काळात स्त्रियांच्या स्वतंत्र संघटना स्थापन व्हायला सुरुवात झाली आणि स्त्रिया विभिन्न चळवळीत कृतिशीलपणे सहभागी होऊ लागल्या.

१९७० नंतर स्त्री चळवळीला पुन्हा एकदा संघर्षात्मक कृतीची धार आली. 'समानता कोणासाठी?', हा प्रश्न स्त्री चळवळीला तीव्रतेने भेडसावु लागला, आणि लिंगभाव, वर्ण, जात आणि धर्म यांच्यातील संबंध प्रकर्षाने समोर आले. अनेक आंदोलनांच्या स्वरुपात पसरलेल्या भारतीय स्त्री चळवळीतील हे समान सूत्र, हेच स्त्रीचे बलस्थान आहे, याच बहुविधतेमुळे चळवळीला सामर्थ्य मिळाले.

### ३.२.२ १९७० नंतरची 'नवी' स्त्री चळवळ :

- ***स्वातंत्र्यानंतरचा आशावाद :***

  स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, स्त्री-पुरुष असमानता आपोआप संपुष्टात येईल, ह्या आशावादातुन स्त्री चळवळीतील संघर्षाची जागा संघटना व संस्थांनी घेतली. शासनानेसुद्धा महिला मंडळे आणि कल्याणकारी सुधारणावादी कार्यक्रमांचा पुरस्कार केला. या काळात समाजवादी महिला सभा (१९५१), भारतीय महिला फेडरेशन (१९५४), श्रमिक महिला संघ, महिला दक्षता समिती, यांसारख्या संघटना निर्माण झाल्या. १९५५ पर्यंत स्वतंत्र भारतात, स्त्रियांच्या प्रगतीसाठी अनेक कायदे संमत झाले. शिक्षण, प्रशासन, अशा अनेक नव्या क्षेत्रात, स्त्रियांसाठी विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या. अनेक स्त्रीवादी कार्यकर्त्यांना शासकीय यंत्रणेत सहभागी करुन घेतले गेले.

  १९५० च्या दशकात, भारतीय स्त्री चळवळीतील लढाऊपणाचा जोर कमी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे, कायदेशीर सुधारणा व कल्याणकारी विकास कार्यक्रमांमधुन स्त्रियांची परिस्थिती बदलण्यासाठी, राज्यसंस्था प्रयत्न करेल, असा त्यांना आशावाद होता. १९६० नंतर मात्र, हा आशावाद फोल असल्याची जाणीव स्त्रियांना झाली आणि त्याचा परिणाम म्हणुन, स्त्री चळवळींनी पुन्हा एकदा जोर पकडला.

- ***जनआंदोलनातील स्त्रियांचा सहभाग :***

  १९८९ साली स्त्री शक्ती संघटनेने, तेलंगणा चळवळीतील स्त्रियांच्या अनुभव कथनावर आधारित, '**We were making History**', (आम्ही इतिहास घडवत होतो.) हे पुस्तक संपादित केले. या स्त्रियांनी, त्यांना तेलंगणा चळवळीचे आकलन कसे झाले, त्यांच्या आयुष्यात चळवळीचे स्थान काय होते, हे सांगताना, चळवळीतील त्यांच्या सहभागामुळे संघर्षाचे स्वरुप अप्रत्यक्षरित्या कसे बदलत गेले, याचेही कथन या पुस्तकात केले आहे.

  १९७० च्या दशकात असे अनेक नवे पर्याय पुढे आले. सर्वोदय चळवळ, साम्यवादी चळवळ, अशा अनेक चळवळींतुन लोकांना जागृत करुन, त्यांच्या मुलभूत हक्कांसाठी लढे उभारले गेले. सर्व पर्यायी विकास कार्यात, जन आंदोलनात व लढ्यात, मध्यमवर्गातील व कामगारवर्गातील स्त्रियांनी मोठ्या संख्येने व लढाऊ बाण्याने भाग घेतला. या सर्व आंदोलनांचे नेतृत्व प्रामुख्याने, जरी पुरुषांकडे होते तरी या सहभागामुळे स्त्रियांना आपल्यातील संघटित शक्तीची जाणीव झाली आणि या आंदोलनातुनच पुढे अनेक स्त्री वादी गट निर्माण झाले.

गुजरातमध्ये १९७२ मध्ये 'इला भट' यांच्या नेतृत्वाखाली, 'Self-Employed Women's Association' (SEWA), या स्वयंरोजगारी स्त्री संघटनेची स्थापना झाली. असंघटित क्षेत्रात, अतिशय असुरक्षित वातावरणात काम करणाऱ्या कष्टकरी महिलांना SEWA च्या माध्यमातुन तांत्रिक प्रशिक्षण, संघटन व जीवनमान सुधारण्याच्या संधी मिळाल्या. असंघटित क्षेत्रातील स्त्रियांशी संबंधित असुनही, मोठ्या प्रयत्नांनी SEWA ला 'कामगार संघटना' म्हणुन मान्यता मिळाली. SEWA साठी विकास म्हणजे शोषणापासुन मुक्ती, कामाची हमी आणि बढतीच्या संधी असा क्रम होता. *(संदर्भ – स्त्री संघर्षाची नवी रुपे, १९८२)*

जयप्रकाश नारायणांच्या विचारसरणीने प्रेरित होऊन, १९७८ मध्ये गुजरातमध्ये 'नवनिर्माण चळवळ' सुरु झाली. या चळवळीत सामुदायिक उपोषणांपासुन, प्रभातफेरी व अभिरुप न्यायालयांपर्यंत, अनेक अभिनव पद्धतींचा वापर करण्यात आला. ही चळवळ गुजरातेत चांगलीच फोफावली व पुढे या चळवळीने 'भारतीय राज्यसंस्थेच्या अपयशाकडे लक्ष वेधणारी चळवळ' असे व्यापक व विस्तारित रुप धारण केले. 'पुरुषसत्ताक शोषणापासुन स्त्रियांची मुक्ती', हा या चळवळीचा एकात्म भाग होता. अर्थात, नंतरच्या काळातील स्त्री वादी प्रयत्नांची बीजे, या आंदोलनातुनच पेरली गेली, हे मात्र नाकारता येणार नाही.

- *स्वायत्तता आणि स्त्रीवादी राजकारण :*

१९६० व १९७० च्या दशकात, विविध जन आंदोलनातील स्त्रियांच्या सहभागातुन स्त्री वादी जाणीव तयार झाली होती आणि या जाणिवेतुनच कुठल्याही संघटनेच्या माध्यमातुन स्त्री प्रश्न हाताळताना येणाऱ्या औपचारिक संरचना, पक्षीय हित यांच्या मर्यादाही स्पष्ट होत गेल्या. १९७० च्या या दशकात, विशेषतः, संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष', म्हणुन घोषित केल्यानंतर, स्त्रीवादी चळवळीत लक्षवेधी घडामोडी घडल्या. शहादा चळवळ आणि महागाईविरोधी आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर, माओवादी विचारसरणीने प्रेरित होऊन, पुण्यात 'पुरोगामी स्त्री संघटने'ची स्थापना झाली तर मुंबईत 'स्त्री मुक्ती संघटना' उदयाला आली. त्यानंतर देशभरात अनेक स्त्री संघटनांची स्थापना झाली. या स्वायत्त, तसेच, पक्षीय स्त्री संघटनांनी ८ मार्च हा 'आंतरराष्ट्रीय महिला दिन', स्त्री मुक्तीचे प्रतिक, म्हणुन भारतातही साजरा करायला सुरुवात केली.

याच सुमारास, स्त्री वादी आणि दलित चळवळींमध्ये महत्त्वाचा संबंध निर्माण होऊ लागला. दलित चळवळीतील स्त्रियांनी 'महिला समता सैनिक दला'ची स्थापना केली. १९९० च्या दशकात, ग्रामीण चळवळींपासुन स्त्रीवादी प्रबोधनाची सुरुवात झाली होती. कायदेशीर हस्तक्षेप आणि जन

प्रबोधनावर या आंदोलनात भर दिला गेला. याच काळातील स्त्री चळवळीत या शहरी स्त्रीवादी गटांचे वर्चस्व होते. १९७५ च्या सुमारास 'गर्भपात' हा स्त्री-चळवळीतील महत्त्वाचा मुद्या झाला. स्त्रीवादी गटांनी लोकशाही आणि मानवी हक्कवादी गटांबरोबर केलेल्या प्रयत्नातुन, लिंग परिक्षणावर बंदी आणणारा कायदा, महाराष्ट्रात १९८८ मध्ये, तर देशात १९९४ मध्ये संमत करवुन घेतला गेला *(संदर्भ : स्त्री संघर्षाची नवी रुपे, १९९२)*.

आज भारतातील स्त्री चळवळीत स्वायत्त गटांनी व्यापक व सामाजिक समतेच्या चळवळींशी स्वतःला जोडुन घेऊन, विशिष्ट परिस्थितीच्या व अनुभवाच्या पातळीवर भिन्न असणाऱ्या स्त्रियांमध्ये समन्वय साधण्याची गरज आहे. १९८० पासुन शासकीय आणि आंतरराष्ट्रीय निधिंचा ओघ, या गटांकडे वळल्यानंतर, यातील बऱ्याचशा संघटना ह्या 'स्वयंसेवी सायत्त संस्था' (NGO) या स्वरुपात काम करत आहेत.

स्त्रियांच्या सक्षमीकरणाची संकल्पना, शासकीय कार्यक्रमात व अहवालात केवळ नावापुरती वापरली जाते. शासनाच्या स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ केवळ बालविवाह रोखुन, लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याच्या मोहिमेपुरताच मर्यादित असतो, ह्याची जाणीव झाल्यानंतर, स्त्रीवादी गटांनी 'संघर्षा' ऐवजी 'विकास' ही आपल्या राजकारणाची दिशा ठरवली. मात्र आंतरराष्ट्रीय निधीचा वापर केल्याने, काही ठराविक, त्यांच्या स्त्रीवादाच्या व्याख्येत बसतील, असेच प्रकल्प, योजना व कार्यक्रम घेण्याची बंधने येतात, याचीही जाणीव हळुहळु स्त्रियांना होऊ लागली.

### ३.२.३ स्त्री चळवळींपुढील जमातवादाचे आव्हान :

१९८० च्या सुमारास, स्त्रीवादी विचारांना प्रतिशह देण्याच्या हेतुने, परंपरावादी गटसमुहांनी अनेक मुद्यांचा वापर केला. वाढत्या जमातवादाच्या संदर्भात, स्त्रीवादी विचारसरणीवर होणाऱ्या टिकेचा सूर चढत गेला, हे लक्षात घेतले, तर स्त्री चळवळीपुढील जातीय अस्मितेच्या राजकारणाचे आव्हान स्पष्ट होते. १९८० नंतर स्त्रीवादाला आव्हान देणाऱ्या शक्ती संघटित झालेल्या दिसतात. वाढत्या जमातवादाच्या या कालखंडात, स्त्रीवादी चळवळींची भाषा आणि घोषणा वापरुन, जमातवादी शक्तींनी, स्त्रियांना पारंपारिक 'हिंदु स्त्री' म्हणुन जगण्याचा हक्क आहे, असा आग्रह धरुन, स्वतःच्या महिला आघाड्या उभारायला सुरुवात केली.

शासकीय व राजकीय पातळीवर व्यक्ती-व्यक्तींमधील संबंधात, एक धार्मिक चौकट असते, हे मान्य करुन, घटनेने दिलेल्या हक्कांपेक्षा धर्मावर आधारलेल्या व्यक्तिगत कायद्याचे, महत्त्व मान्य

केले गेले. स्त्रिची प्रतिमा, परंपरा व धर्माच्या चौकटीत उभारण्यात आली. सती जाण्याच्या हक्कांची भाषा वापरली गेली. परंपरा आणि आधुनिकतेच्या नव्या वादात, स्त्रीवादी चळवळींकडे संशयाने व दुराव्याने पाहिले गेले आणि चळवळीला मोठा धक्का बसला. त्याचवेळी संघटित होण्यासाठी आवाज उठविण्याची गरज लक्षात आली. जमातवाद आणि धार्मिक अस्मितेच्या पुनरुज्जीवनाचे मोठे आव्हान चळवळीपुढे आहे, याची जाणीव प्रखर झाली. समान नागरी कायदा व लोकसभेतील आरक्षणाच्या मुद्यांवर स्त्रीचळवळीत एकमत नव्हते. याचे कारण, तिच्यातील भेद आणि बहुविधता, पुर्वी नव्हते इतके ठळक व स्पष्ट झाले होते. पक्षीय गट, स्वायत्त गट, कुठल्या तरी मुद्याला धरुन काम करणारे गट, अशा स्वरुपात आजची स्त्री चळवळ विस्कटलेल्या अवस्थेत असल्याचे दिसते. त्यामुळेच जात, वर्ग, धर्म यांच्याशी निगडित अस्मितेतील भिन्नतेच्या पलिकडे जाण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा, त्या योग्य प्रकारे हाताळुनच स्त्रियांच्या हक्कांसाठी लढणे गरजेचे आहे.

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या बदलांचा सर्वाधिक परिणाम स्त्रियांना भोगावा लागत आहे, हे आता स्पष्ट होत आहे. त्यामुळे भारतातील स्त्री चळवळींपुढे 'जागतिकीकरण' व 'स्त्रियांचे उदारीकरण', असे नवीन आव्हान उभे आहे. आज भारतात एकही एकसंध स्त्री चळवळ अस्तित्वात नाही. ती अनेक आंदोलनाच्या माध्यमांतुन विखुरलेल्या अवस्थेत कशीबशी कार्यरत आहे. या आंदोलनांमध्ये वैचारिक, सामाजिक बैठक, स्पष्ट राजकीय भुमिका, धडाडीचे राजकीय नेतृत्व, कार्यक्षम शासकीय यंत्रणा व प्रशासकीय संस्थांची परिणामकारक अंमलबजावणी यांची उणीव जाणवते. स्थानिक आणि प्रादेशिक पातळ्यांवर संख्यात्मक, रचनात्मक काम करणारे अनेक गट निर्माण झाल्यामुळे, स्त्री चळवळींमध्ये एकसंधपणा, एकसुत्रीपणा व एकजुटतेचा अभाव दिसुन येतो.

### ३.२.४ समकालीन भारतातील स्त्री चळवळ – १९९० नंतरचा प्रवास :

समकालीन भारतातील स्त्री चळवळीच्या प्रवासात '१९९० चा टप्पा' हे अतिशय महत्त्वाचे वळण ठरले आहे. या दशकात, जागतिकीकरण व आर्थिक उदारीकरण, या दोन मुद्यांच्या संदर्भात, नव्या आर्थिक धोरणांची अंमलबजावणी सुरु झाली. त्याचबरोबर, उजव्या शक्तींच्या बळकटीकरणाची प्रक्रियाही सुरु झाली. मंडल आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने, 'जातीनिहाय चर्चा' अतिशय कळीचा मुद्या ठरल्या. मंडल आयोगाची इतर मागासवर्गीय जातींना आरक्षण देण्याची शिफारस मंजुर झाल्याने, भारतीय राजकारणाचा चेहरामोहराच बदलला. प्रादेशिक पातळीवरील 'कनिष्ठ' जातीच्या अनेक राजकीय पक्षांना राष्ट्रीय राजकारणामध्ये महत्त्व प्राप्त झाले. दलित स्त्रियांच्या स्वायत्त संघटनांचा उदय आपल्याला या संदर्भात बघावा लागेल. या सर्व प्रक्रियांचा स्त्री चळवळींवर खोलवर परिणाम झालेला दिसतो.

शाहबानो व रुपकँवर घटनांनतर, स्त्री चळवळीला नवीन आव्हानांना सामोरे जावे लागले. जमातवादी राजकारणाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन, स्त्रिया आणि समुह, यांच्यामधील गुंतागुंतीच्या अंर्तसंबंधांचा अभ्यास करण्याची गरज चळवळीला भासु लागली. या पार्श्वभुमीवर १९९० नंतरच्या स्त्री चळवळीचे स्वरुप बदललेले दिसुन येते. नवीन आर्थिक धोरणांच्या छायेत सरकार कल्याणकारी भुमिकेतुन घेत असलेली माघार, हा स्त्री चळवळीसाठी महत्त्वाचा मुद्या ठरला आहे. प्रादेशिक व जागतिक पातळीवर जागतिकीकरणाविरोधातील चळवळीमध्ये स्त्रिया महत्त्वाची भुमिका बजावत आहेत.

- *दलित स्त्रियांच्या स्वायत्त संघटनांचा उदय :*

दलित व बहुजन स्त्रियांच्या राजकीय सहभागाला आणि संघटनांना अतिशय समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. दलित-बहुजन स्त्रियांच्या संघटनांचा इतिहास लिहायचा झाला तर त्याची सुरुवात ही महात्मा जोतिबा फुले यांच्या शुद्रातीशुद्र व स्त्रीमुक्तीच्या संकल्पनेपासुन करावी लागेल. फुले यांनी केलेल्या स्त्री प्रश्नांच्या मांडणीचे वैशिष्ट्य असे आहे की, त्यामध्ये वेगवेगळ्या जाती व समुहांमधील स्त्रियांची होणारी पिळवणुक, एकमेकांना छेद देणारी ब्राह्मणी पुरुषसत्ता यांची चिकित्सा नेमकेपणाने केलेली दिसते. ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरुष तुलना', हा निबंध, स्त्रियांच्या दुय्यमत्वाविरुद्ध लिहिलेला तर्कशुद्ध युक्तीवाद आहे. यातुनच ताराबाईंची जाती व लिंगभावाच्या उतरंडींची सूक्ष्म समज बघायला मिळते.

आंबेडकरी चळवळीपासुनच दलित स्त्रिया सार्वजनिक क्षेत्रात सहभागी झाल्या होत्या. १९३० पासुन पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या सभा, परिषदा भरविण्यावर भर होता. स्त्री चळवळीच्या इतिहासाला वारसा आहे, ज्याचा संदर्भ आणि समकालीन परिस्थितीचा आढावा घेत, चिकित्सा करत, जाती विरोधी लढ्यांपासुन प्रेरणा घेत, ९० च्या दशकात, दलित स्त्रियांच्या स्वायत्त संघटनांचा उदय झाला.

१९७० सालानंतर भारतात स्त्री चळवळींनी डोके वर काढायला सुरुवात केली. या चळवळीने स्त्री वादी प्रश्न आणि विविध मुद्दे उपस्थित केले आणि *''जे जे खाजगी, ते ते राजकीय''* अशी घोषणा दिली. जरी स्त्रीवादी सर्वसमान अनुभवाबाबत बोलत होते तरी त्यात उच्च जातीय स्त्रियांचे अनुभवच केंद्रस्थानी धरले गेले होते. मंडल आयोगाविरोधातील आंदोलनात उच्च जातीतील स्त्रियांचा मोठ्या प्रमाणात सक्रिय सहभाग होता. केवळ 'कनिष्ठ' जातीच जातीयतेबद्दल, जातीच्या अस्मितेबद्दल बोलतात, आणि 'उच्चजाती' या आदिम अस्मितांच्या पलिकडे गेल्या आहेत, या दाव्याला धक्का बसला. दलित स्त्रीवादी अभिव्यक्ती व ज्यांनी दलित व स्त्री चळवळीची जी चिकित्सा केली, त्यातुन

'लिंगभावावरील जात' व 'जातीपरोक्ष लिंगभाव' या संकल्पनांना यातुन आव्हान मिळाले. १९७० नंतर उभारलेले स्त्री वादी संघर्ष हे सिद्धांकन आणि व्यवहाराच्या पातळीवर, एक विशिष्ट प्रकारचा 'ब्राह्मणी स्त्रीवाद' बनुन राहिले, असे विविध दलित स्त्री संघटनांच्या जाहिरनाम्यांमध्ये व लिखाणांमध्ये अधोरेखित केले गेले. याचाच अर्थ, स्त्री चळवळीने अल्पसंख्यांक, दलित किंवा आदिवासी स्त्रियांचे प्रश्न घेतले नाहीत, असे नाही, परंतु हे करीत असताना स्त्री वादी परिप्रेक्ष्य, रणनीति आणि नेतृत्व मात्र उच्चवर्णीय व शहरीच राहिले.

१९९० च्या दशकात, दलित स्त्रियांच्या स्वायत्त संघटनांमध्ये वाढ झाली. सर्व स्त्रिया या एकसारख्या नसतात, सर्व स्त्रियांचे शोषण हे एकसमान व एकाच प्रकारचे नसते, वेगवेगळ्या स्त्रियांचे शोषण, हे वेगळे नाही तर ते परस्परांसंबंधीसुद्धा आहे. जाती-वर्ग-समुहाच्या चौकटीत बंदिस्त स्त्रिया, जाती-वर्ग-समुहांच्या अस्मितांना जास्त महत्त्व देतात व त्यामुळे स्त्रियाच एकमेकींचे शोषण करताना दिसतात. काही वेळा तर वर्ण व जातींच्या संदर्भात असे दिसते की, गोऱ्या, उच्च जातीय स्त्रिया या काळ्या, कनिष्ठ जातीतील पुरुषांचेसुद्धा शोषण करतात.

१९९६ पासुन, महाराष्ट्रात 'महाराष्ट्र दलित महिला संघटने' सारख्या संघटना एकत्र आल्याचे दिसते. २५ डिसेंबर १९९६ या दिवशी, चंद्रपूर मध्ये भरलेल्या 'भारतीय विकास वंचित दलित महिला परिषदेत' डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या व स्त्रियांच्या शोषणाला मान्यता देणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले, तो दिवस 'भारतीय स्त्री मुक्ती दिन' म्हणुन साजरा करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. जाती व्यवस्थेला घडवीत व ती टिकवुन ठेवण्यात स्त्री प्रश्न गाभ्याशी आहे, या विश्लेषणातुन हा प्रस्ताव मांडण्यात आला होता. १९९३ साली स्थापन झालेली 'नॅशनल फेडरेशन ऑफ दलित विमेन' (NFDW), ही राष्ट्रीय पातळीवरील एक प्रमुख संघटना आहे. NFDW सारख्या संघटना वेगवेगळ्या व्यासपीठांवर दलित स्त्रियांच्या प्रश्नांना व त्यांच्या वेगळ्या अनुभवांना ऐरणीवर आणण्यासाठी प्रयत्न करतात. त्यासाठी दलित स्त्रियांची स्थिती आणि दर्जा जाणुन घेण्यासाठी संशोधन करणे, त्या संशोधनातील निष्कर्षांच्या आधारे धोरणात्मक व कृती कार्यक्रमात बदल घडवुन आणण्याचा प्रयत्न करणे (Advocacy) अशा प्रकारची कामे या संघटना करतात.

### ३.२.५ स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या बिगर शासकीय संघटनांमध्ये वाढ :

- ***बिगर शासकीय संघटनांच्या संख्येत वाढ होण्याची कारणे :***

९० च्या दशकात एकंदरीतच बिगर शासकीय संघटनांच्या संख्येत आणि विशेषतः स्त्रियांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संघटनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली दिसते. ही संकल्पना मात्र नवीन नाही.

कल्याणकारी राज्याने आपल्या सर्व प्रजेसाठी अन्न, वस्त्र, निवारा, रोजगाराच्या संधी या मुलभूत गरजा उपलब्ध करुन देणे, ही सर्वतोपरी राज्याची जबाबदारी असते. यात सर्व स्तरातील जाती-धर्म-वर्ग यातील स्त्री- पुरुष-आबालवृद्ध यांचा समावेश होतो. इथे ज्येष्ठ-कनिष्ठ, प्रथम-दुय्यम, काळा-गोरा, असा भेदभाव करुन चालत नाही. त्याचप्रमाणे, एखाद्या राज्याच्या शासनाचीसुद्धा अशीच जबाबदारी असायला पाहिजे. प्रजेमध्ये स्त्री, पुरुष, बालके यांबरोबरच दलित, आदिवासी हे गटदेखील मोडतात. केवळ दुय्यमत्व व दडपणुकीमुळे, नैसर्गिकरित्या दुर्बल मानले गेलेले व समाजाच्या विकास प्रक्रियेत व राज्य बांधणीत मागे राहिलेलेसुद्धा यात सहभागी होऊ शकतात. मग या दुर्बल गटांसाठी विशेष सेवा व खास कल्याणकारी योजना राबविणे, हे सुद्धा सरकारचेच उत्तरदायित्व मानले गेले. त्यामुळे सामाजिक सुरक्षिततेसाठी अनेक योजना, अन्न सुरक्षिततेसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था राबविणे, इत्यादी सर्व पसारा राज्यसंस्थेच्या कर्तव्याचाच भाग मानला गेला.

स्त्री चळवळी गतीमान होण्यामागचे एक प्रमुख कारण म्हणजे डाव्या पक्षांना व संघटनांना स्त्रियांनी दिलेले आव्हान हे होय. या गटांनी विकेंद्रित, लोकशाही, सहभाग तत्वावर आधारित, निर्णयप्रक्रिया अवलंबविण्याचा निर्णय घेतला. त्यापैकी बहुतेक संघटना या पुर्णतः स्वयंसेवी होत्या. परंतु १९९० च्या दशकात, याला एक नवीन वळण मिळाले, एक नवीन पर्याय निर्माण झाला. आणि तो पर्याय होता बिगरशासकीय संघटनांचा. या संघटनांच्या संख्येत झालेल्या लक्षणीय वाढीमुळे, ह्या गटांनी स्त्रियांचा आणि एकुणच समाजाच्या सर्वच प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित करुन, सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी अनुदान घ्यायला सुरुवात केली.

बिगरशासकीय संघटनांची ही मोर्चेबांधणी, राज्याची भुमिका मर्यादित ठेऊ इच्छिणाऱ्या आणि बाजारपेठेला जास्तीत जास्त मोकळीक मिळावी, अशी मागणी करणाऱ्या नवउदारमतवादी विचारसरणीला पुरक होऊ लागली. परिणामी, ९० च्या दशकात, बिगरशासकीय संघटना उदयास आल्या, त्या केवळ शासनाला पुरक भुमिका बजाविणाऱ्या नव्हत्या तर आता त्या राज्यसंस्थेच्याऐवजी स्वतः काम करणार होत्या. राज्यसंस्थेने माघार घेतल्यामुळे, शिक्षण, आरोग्य, अशा क्षेत्रांमध्ये निर्माण झालेली पोकळी भरुन काढण्याचे त्यांचे लक्ष्य होते. या संघटनांचे ध्येय सामाजिक बदल हे नव्हते तर आवश्यक तेथे ती सेवा पुरविणे हे होते. धोरणांमध्ये बदल घडवुन आणण्यापेक्षा त्यांचा जोर, धोरणांचे मुल्यमापन करण्यावर होता. या संस्था मोठ्या प्रमाणात सकारात्मक विकास कार्यक्रम राबविताना दिसत होत्या. सामाजिक संशोधनाच्या बाबतीत, या संस्थासुद्धा आज मोठ्या प्रमाणात कार्यरत असल्याचे दिसते. काही वेळा शासनाच्या बरोबरीने तर संधी मिळेल तेव्हा, शासनाच्या ऐवजी या संस्था लोकांच्या गरजा भागविण्याचा प्रयत्न करताना आपल्याला दिसतात.

- *स्त्रियांना संघटित करणाऱ्या नव्या वाटा :*

१९९० च्या दशकात स्त्री सबलीकरणासाठी राज्य शासनाने विविध योजना, कार्यक्रम आखुन त्यांची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. त्यापैकी एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे 'महिला सामख्य' शिक्षणाच्या माध्यमातुन सक्षमीकरण साधणे, हा महिला सामख्य कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश्य होता. 'स्त्री विकास कार्यक्रम' (Women Development Programme [WDP]) या राजस्थानात ठरलेल्या कार्यक्रमावर 'सामख्य' आधारित होता. विविध गावांमधील स्त्रियांना प्रशिक्षण देऊन त्यांना ग्रामपातळीवर कार्यकर्ता बनविणे व त्यांच्यामार्फत गावातील स्त्रियांना संघटित करणे, त्यांच्या गरजा व प्रश्नांना प्राधान्य देऊन कार्यक्रम आखणे, असे या योजनेचे उद्दिष्ट होते. शिक्षणाचा हेतु मात्र योजनेच्या गाभ्याशीच राहिला. महिला सामख्य संघातील स्त्री जेव्हा पंचायतीत निवडुन येते, तेव्हा निवाऱ्याच्या, पाण्याच्या, सांडपाणी निचऱ्याच्या, IRDP, DWCRA सारख्या शासकीय योजनांच्या फायद्याच्या, गरीब स्त्रियांच्या गरजा काही प्रमाणात पुर्ण होतात. *(संदर्भ : Violence of Development, 2002.)*

स्वयंसहायता गट (Self-help Groups) किंवा ज्यांना बचत गट म्हणुन संबोधले जाते, ते या बदलाच्या लाटेतील एक घटक आहेत. स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, बचतगट, हे स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे उत्तम साधन आहे. 'महिला सर्वांगीण उत्कर्ष समिती' (मासूम) ही पुण्यातील एक बिगर शासकीय संस्था आहे. पुरंदर तालुक्यातील माळशिरस या गावात संस्थेने १९८७ साली आपले कार्य सुरु केले. आरोग्य आणि हिंसा या दोन महत्त्वाच्या मुद्यांवर संस्था आपले लक्ष केंद्रित करते. बचतगटामुळे स्त्रिया एकत्र आल्या आहेत आणि स्वतःचे सबलीकरण घडवुन आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

सक्षमीकरणाचा अर्थ, स्त्रिया स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकतील, यासाठी स्त्रियांच्या आंतरिक उर्जांना, त्यांच्या क्षमतांना जागविणे, असा लावला जातो. सक्षमीकरणाच्या चर्चाविश्वाद्वारे जरी स्त्रियांवर लक्ष केंद्रित केले गेले असले तरी त्यात स्त्रियांना दुय्यमत्व बहाल करणाऱ्या संरचनांची चिकित्सा किंवा त्या बदलण्यासाठी संघर्ष, हे काही अभिप्रेत नाही. सक्षमीकरणाच्या कार्यक्रमात स्त्रियांची मानसिकता बदलण्यावर भर दिला जातो. परंतु, मानसिकता संरचनांमधुन घडतात, या तत्वाचा सदर कार्यक्रमात विचार केला जात नाही.

- ***जागतिकीकरणाविरोधी स्त्रियांच्या चळवळी :***

आर्थिक पुर्नरचना कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे राज्यसंस्थेने कल्याणकारी आणि सामाजिक क्षेत्रातुन घेतलेली माघार होय. सत्तेच्या उतरंडीवर, सर्वात निम्न स्थानावर असलेल्या स्त्रियांवर याचे परिणाम तीव्रतेने होत आहेत. जागतिकीकरणामुळे एकीकडे कसेतरी जगुन, तगुन राहण्याचे संघर्ष तीव्र झाले आहेत, तर दुसरीकडे स्त्रियांच्या हिंसेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ग्लोबल ऑफ विमेनचे 'Bread and Roses' असे ब्रीदवाक्य होते. जगभरातील लाखो स्त्रिया, मोर्चे, स्वाक्षरी मोहिम, अशा माध्यमांतुन या आंदोलनात सहभागी झाल्या. स्त्री चळवळीने यातुन दाखवुन दिले की, 'दारिद्रयरेषा', ही संकल्पनाच मुळात समस्याप्रधान आहे. स्त्री चळवळीने, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेसारख्या संघटनेने, या व्यवस्थेला पुन्हा सार्वत्रिक बनवुन, व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यावर भर दिला आहे, ज्याद्वारे, जास्तीतजास्त गरीबांपर्यंत या योजनांचा फायदा पोहचु शकेल. सार्वत्रिक वितरण व्यवस्थेतील बदलांचा सर्वात जास्त फटका हा गरीब स्त्रियांच्या आरोग्य व पोषणदर्जाला बसला आहे. बिगर शासकीय संघटनांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे, अनेक स्त्रियांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्याचा फायदा होतो आहे. ह्या सकारात्मक विकास कार्यामुळे अनेक स्त्रिया लाभार्थी म्हणुन फायद्यात आहेत.

### ३.२.६ स्त्री चळवळीसमोरील आव्हाने :

९० चे दशक हे स्त्री चळवळीकरीता आव्हानात्मक ठरले. चळवळीअंतर्गत ताणतणाव स्पष्ट झाले व स्त्री चळवळ ही एकजिनसी गोष्ट नसुन, विभिन्न रणनीति व भुमीदृष्टी आहेत हे समोर आले.

- ***जमातवादी शक्तींचे आव्हान :***

रुपकँवर आणि शाहबानो प्रकरणांमध्ये, हिंदु आणि मुसलमान, या दोन्ही समुहांनी, आपली राजकीय ताकद पणाला लावुन, आपली राजकीय अस्मिता सिद्ध करण्यासाठी, स्त्रियांना त्यांच्या धार्मिक अस्मितेच्या जोरावर विभाजीत करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदु जमातवादामुळे आपल्या धार्मिक अस्मितेवर घाला घातला जातो आहे, या असुरक्षिततेच्या भावनेमुळे आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे अल्पसंख्यांक स्त्रियांवरसुद्धा 'स्त्री' या अस्मितेपेक्षा, धार्मिक अस्मिता जपण्याची सक्ती व बळजबरी केली जाऊ लागली. स्त्रीवादावर आणि स्त्रीवादी कार्यकर्त्यांवर पाश्चिमात्य संस्कृतीची जाण नसलेल्या, अशी टिका झाली. याखेरीज 'हिंदु', 'सच्ची' मुसलमान स्त्री होणे म्हणजे स्त्रीवाद नाकारणे, असे समीकरण बनले. १९९२ च्या रामजन्मभुमी वादाच्या वेळी असो किंवा गुजरात, मुंबईतील जातीय दंगलींमध्ये असो, स्त्रियांचा जमातवादी संघटनांमधील वाढता सहभाग, हा स्त्री चळवळीसाठी न पेलवणारे आव्हान बनला आहे, हे निश्चितपणे मान्य करावेच लागेल.

स्त्री चळवळीने, स्त्रियांच्या राजकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील सहभागाला, नेहमीच एका सकारात्मक बाजुने बघितले गेले आहे. उजव्या विचारसरणीच्या संघटनांमधील स्त्रियांच्या सहभागाला कुटुंबातुन व त्यांच्या समाजातुन पाठींबा मिळतो कारण हा सहभाग पुरुषसत्ताक, जमातवादी व जातीच्या संरचनांना बळकटी देण्याचे काम करतो. स्त्री चळवळीचे संपुर्ण सामाजिक परिवर्तनाचे स्वप्न पुर्ण व्हावयाचे असेल तर चळवळीला इतर लोकशाही, परिवर्तनवादी चळवळींच्या बरोबर, सुसंवादाने, चर्चेने सोडवावे लागेल, तरच कार्याची फलश्रुती होईल.

## ३.३ स्त्रियांचे घटनात्मक हक्क :

### ३.३.१ प्रस्तावना :

स्त्रियांसाठी फायदेशीर असणाऱ्या काही विशेष कायद्यांमधील तरतुदी, स्त्रियांचे हक्क व अधिकार यांबाबत माहिती विचारात घेणे आवश्यक आहे. नागरिक म्हणुन स्त्रियांना समानाधिकार असला तरीही लिंग, समानता यांबाबत त्यांच्या विशेष समस्या आहेत. संविधानातील बंधनात, या संदर्भात प्रतिबिंब पडलेले दिसते. संविधानातील तरतुदी, या कायद्यातील दुरुस्तीचासुद्धा पाया आहेत. सर्व कायदे व कायद्यातील तरतुदी, हे संविधानाच्या दृष्टिने वैध आहेत आणि त्यामुळेच संविधानातील बंधने स्त्रियांना विशेष अधिकाराच्या तरतुदींमधुन हेच सुचित करतात, की, इतर कायदे किंवा तरतुदींना संविधानाच्या संमतीची आवश्यकता असते.

'कायदा', हा स्त्रियांच्या सक्षमीकरणातील एक हत्यार असला तरी त्यामधुन स्त्रियांचे दुय्यमत्वच सुचित झाल्याचे दिसते. त्यामुळेच या संदर्भात कायदा आपले विरोधाभासी स्वरुप दाखवितो. येथे गुंतागुंतीचे आणि क्लिष्ट, सूक्ष्म प्रकार दिसुन येतात. ज्याअंतर्गत, कायद्यातुन लिंग, गृहित, संबंध आणि भुमिका खूप बळकट होताना आढळते. यामधुनच स्त्रियांची भुमिका आणि अस्मिता ही बायको किंवा माता म्हणुन रचली जाते. त्यांना निष्क्रिय, दुर्बल व दुय्यम आणि ज्यांना संरक्षणाची गरज आहे, असे दाखविले जाते. त्याचवेळी कायदा हे असे क्षेत्र आहे, जिथे या भुमिका आणि अस्मितांना आव्हान दिले जाते. कायद्याच्या क्षेत्रामध्ये अनेक समाजसुधारक आणि स्त्रीवादी कार्यकर्ते यांनी आधीच्या स्त्रियांच्या भुमिका आणि अस्मितांवरील वर्चस्ववादी आकलनाऐवजी त्या अधिक परिपुर्ण आणि समान नागरिक असल्याचे दाखविले. त्यामुळेच सामाजिक परिवर्तनाच्या मर्यादा आणि शक्यता, अशा दोन्ही बाजू कायदा दाखवितो.

राज्यघटनेतील कलम १४ नुसार, भारताच्या कोणत्याही भुप्रदेशात, कोणाही व्यक्तीला, कायदा किंवा कायद्याची सुरक्षितता कोणत्याही राज्याद्वारे नाकबुल केली जाऊ शकत नाही. भारतातील

संविधानिक तरतुदींच्या प्रामाणिकतेसाठी कायद्याद्वारे समान संरक्षण म्हणजे समान परिस्थिती, समान वागणुकीच्या पद्धतीचे तत्त्व न्यायालयाच्या माध्यमातुन अंमलात आणले जाते. त्यामुळे कलम १४ हे 'सारखेपणा' या तत्त्वावर आधारित कार्य करते. याचाच अर्थ, जर एखादी व्यक्ती दुसऱ्यासारखी असेल तर कायद्यांतर्गत त्याला समान वागणुक दिली जाईल.

### ३.३.२ महिलांचे हक्क :

कायद्यानुसार प्राप्त झालेले, महिलांचे काही महत्त्वाचे मुलभूत हक्क खालीलप्रमाणे होत –

- महिलांना जीवन, स्वातंत्र्य आणि शारीरिक सुरक्षिततेचा हक्क घटनेने दिला आहे.
- कोणत्याही महिलेला दास किंवा गुलाम म्हणुन ठेवले जाणार नाही. महिलांच्या व्यापारास बंदी असेल.
- महिलांचा छळ केला जाणार नाही किंवा क्रूर, अमानवी कृत्य आणि अपमानास्पद वागणुक किंवा शिक्षा तिला दिली जाणार नाही.
- महिलांच्या आत्मसन्मान आणि प्रतिष्ठेवर हल्ला केला जाणार नाही. अशा हस्तक्षेत्र व हल्ल्याविरुद्ध कायद्याच्या संरक्षणाचा हक्क आहे.
- सज्ञान स्त्रियांना वंश, राष्ट्रीयत्व, धर्म यांच्या कोणत्याही बंधनाशिवाय विवाह करण्याचा आणि कुटुंब बसविण्याचा अधिकार आहे. विवाह विषयक समान हक्क तिलाही आहेत. विवाहास इच्छुक स्त्रीला मुक्त आणि तिच्या पूर्ण संमतीनेच तिचा विवाह होईल.
- प्रत्येक स्त्रीला स्वतःला तसेच दुसऱ्याबरोबर संयुक्तपणे मालमत्ता धारण करण्याचा हक्क आहे.
- प्रत्येक स्त्रीला स्वतःचे मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्कात कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय आपली मते बनविण्याचा हक्क समाविष्ट आहे. माहिती मागविणे, कळविणे आणि देणे, यांबाबत स्वातंत्र्याचा समावेश आहे.
- प्रत्येक स्त्रीला आपल्या देशाच्या सरकारमध्ये प्रत्यक्ष वा मुक्तपणे निवडलेल्या प्रतिनिधींमार्फत भाग घेण्याचा पुर्ण अधिकार आहे.
- प्रत्येक स्त्रीला रोजगाराचा हक्क, रोजगाराच्या मुक्त निवडीचा, समान कामासाठी समान वेतनाचा हक्क आहे.
- प्रत्येक स्त्रीला शिक्षणाचा हक्क आहे. शिक्षणाचा हेतु मानवी व्यक्तीमत्वाचा संपुर्ण विकास करणे हा आहे.
- प्रत्येक स्त्रीला समाजाच्या सांस्कृतिक जीवनात मुक्तपणे सहभागी होण्याचा पुर्ण हक्क आहे. वैज्ञानिक प्रगती आणि त्याचे फायदे यात हिस्सा प्राप्त करण्याचा पुर्ण हक्क आहे.
- अठरा वर्षांखालील व्यक्ती किंवा गर्भवती स्त्रीस मृत्युदंडाची शिक्षा दिली जाणार नाही.

त्याचबरोबर, कायद्यामधील, कलम ७ ते १६ पर्यंत, स्त्रियांविरुद्ध कोणकोणत्या क्षेत्रातील भेदभावाचे उच्चाटन राज्याने केले पाहिजे, यांचा उल्लेख आहे. तसेच, कोणत्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे, हे सुद्धा यात नमुद केले आहे.

- कलम – ७ : निवडणुकीत मतदान करण्याचा व निवडणुकीला उमेदवार म्हणुन उभे राहण्याचा, त्याचप्रमाणे, सरकारमध्ये आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये सहभागाचा हक्क.
- कलम – ८ : आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधीत्व व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये सहभागाचा हक्क.
- कलम – ९ : नागरिकत्वाचा हक्क (स्त्रीचे नागरिकत्व पतीच्या नागरिकत्वावर, पतीच्या मर्जीवर, स्त्रीच्या वैवाहिक दर्जावर अवलंबुन नसावे. याबाबतचा निर्णय स्त्रीच घेऊ शकते.)
- कलम – १० : सर्व प्रकारच्या शिक्षणाचा हक्क, सर्व पातळ्यांवर स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करणारे शिक्षण, आरोग्य, कुटुंब कल्याणाची माहिती व सल्ला मिळविण्याचा हक्क.
- कलम – ११ : रोजगाराचा हक्क (वेतन, फायदे, सामाजिक सुरक्षितता, वैवाहिक स्थिती व गर्भावस्थेच्या आधारावर भेदभाव नसणे.)
- कलम – १२ : आरोग्य सेवा मिळविण्याचा हक्क.
- कलम – १३ : कुटुंबाला मिळणाऱ्या सवलती व फायदे, बँकेकडून कर्ज व आर्थिक सहाय्य, तसेच, क्रिडा, मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागाचा हक्क.
- कलम – १४ : ग्रामीण स्त्रियांचा विशेष विचार, या कलमात केला आहे. ग्रामीण विकास प्रक्रियेत सहभागाचा, आरोग्य व कुटुंब नियोजन सेवा, सामाजिक सुरक्षितता, शिक्षण व साक्षरता, शेतीमध्ये सहभाग, चांगल्या राहणीमानाचा हक्क.
- कलम – १५ : कायद्यासमोर समानतेचा, न्याय प्रक्रियेत समान वागणुकीचा, संचार स्वातंत्र्य व निवासाचे ठिकाण ठरविण्याचा हक्क.
- कलम – १६ : विवाहाचा व कौटुंबिक नात्यासंदर्भातील हक्क. याअंतर्गत, इच्छेनुसार जोडीदार निवडणे, लग्न करणे, पालक म्हणुन समानता, संपत्तीची मालकी व व्यवस्थापन वगैरे हक्कांबरोबरच मुलांची संख्या व त्यातील अंतर ठरविण्याचा हक्क. स्त्रियांच्या पुनरुत्पादनाच्या हक्काला मान्यता देणारा हा एकमेव करारनामा आहे.

या करारातील कलम १७ ते २२ मध्ये, 'सॉडॉ समिती'ची (Convention on the Elimination of all forms of Discrimination Against Women [CEDAW]) स्थापना व कार्यवाहीबद्दल माहिती आहे. "*स्त्रियांविरुद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावांचे उच्चाटन करण्याविषयीचा करारनामा,*" असे याचे मराठी रुपांतर आहे. कलम २३ ते ३० मध्ये, प्रामुख्याने, कराराच्या प्रशासकीय

कार्यवाहीबाबत उल्लेख आहे. 'सॉडॉ' या समितीने काही महत्त्वाच्या विषयांवर सर्वसाधारण शिफारशी केल्या आहेत. उदा. स्त्रियांवरील हिंसा, समान कामासाठी समान वेतन, स्त्रिया आणि आरोग्य, इत्यादी. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १८ डिसेंबर १९७९ या दिवशी हा करारनामा स्विकारला. ३ सप्टेंबर १९८१ या दिवशी, सदर करारनाम्याची अंमलबजावणी सुरु झाली. आतापर्यंत जगातील १७४ देशांनी या कराराला अधिकृतपणे संमती दर्शविली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'आर्थिक सामाजिक परिषदे'ने १९४६ मध्ये, स्त्रियांचे हक्क व त्यांच्या परिस्थितीवर देखरेखीसाठी एक आयोग स्थापन केला होता. (या आयोगाच्या ३० वर्षांच्या कामाचे फलित म्हणजेच 'सॉडॉ' होय.) स्त्रियांच्या विकासासाठी झालेल्या प्रयत्नातुन अनेक करारनामे, जाहिरनामे, तयार झाले. (उदा. स्त्रियांच्या राजकीय हक्काचा करारनामा, १९५४, आणीबाणी व सशस्त्र यादवीमध्ये स्त्रिया आणि मुलांच्या संरक्षणाचा जाहिरनामा, १९७६ इ.) मात्र स्त्रियांवर होणाऱ्या सर्व प्रकारच्या भेदभावाचे उच्चाटन करणारा व स्त्रियांचे हक्क मांडणारा, असा सर्वसमावेशक 'सॉडॉ' अत्यंत महत्त्वाचा आहे. मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा, १९४८, नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६, आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा, १९६६, यांमध्ये लिंगाधारित भेदभाव असता कामा नये, असे नमुद केले होते. त्यामध्ये स्त्रियांच्या हक्कांबाबतचा स्वतंत्र तपशील नव्हता. त्यामुळे स्त्रियांच्या स्थितीविषयक आयोगाला वेगळ्या करारनाम्याची आवश्यकता वाटली.

'सॉडॉ' ने स्त्रियांच्या मानवी हक्कांकडे सर्व देशातील सरकारांचे लक्ष वेधले. समान हक्कांची समर्पक व्याख्या या करारात असुन, ते कसे मिळवावेत, याबद्दलही त्यात मार्गदर्शन आहे. या करारनाम्याला अधिकृत संमती दिलेल्या देशांनी त्यांची अंमलबजावणी करुन, स्त्रियांना मुक्तपणे हक्कांचा उपभोग घेता येईल, अशी परिस्थिती आपापल्या देशांत निर्माण करण्याची खात्री देण्याचे बंधन आहे. भेदभावांचे उच्चाटन व्हावे, यासाठी राज्यांच्या जबाबदारीचा कलम २,३, व ४ मध्ये उल्लेख केला आहे. त्यात राज्यघटनेत स्त्री-पुरुष समानतेच्या तत्वाचा अंतर्भाव, भेदभाव थांबविण्यासाठी, आवश्यक तेथे कायद्यात सुधारणा, शासनाने स्वतः भेदभाव न करणे, वगैरे मुद्यांचा समावेश आहे.

- ***रोजगाराचा हक्क आणि महिला सबलीकरण :***

रोजगाराच्या हक्कात पुरेशा मोबदल्याचा हक्क, कामासाठी योग्य व अनुकूल वातावरणाचा हक्क आणि कामगाराची आवड, शिक्षण व कौशल्यानुसार काम निवडण्याच्या संधीचा हक्क, यांचाही समावेश होतो. महाराष्ट्रात अकुशल, सज्ञान व शारीरिक मेहनतीच्या कामासाठी तयार असणाऱ्या

व रोजगाराची मागणी करणाऱ्या व्यक्तीला रोजगार पुरविणे, ही रोजगार हमी कायद्यानुसार शासनाची जबाबदारी आहे. सन्मानाने जगण्याच्या हक्काशी रोजगाराचा हक्क अपरिहार्यपणे जोडलेला आहे.

- *रोजगार हमी कायद्यामधील करारनामे व कलमे –*

  भारतीय राज्यघटना, कलम ३९ (अ), राष्ट्राला अशी सूचना करते की, 'राष्ट्र आपल्या योजना, अशा प्रकारे आखेल व राबवेल–सर्व नागरिकांच्या, स्त्री व पुरुषांना समानतेने, पुरेशा उपजिविकेच्या साधनांच्या हक्काचे संरक्षण केले जाईल'.

  कलम ४१ नुसार, राष्ट्रांच्या संसाधनांच्या मर्यादित व विकासाच्या पातळीवर, प्रत्येकाच्या कामाच्या हक्काची व बेरोजगारीच्या काळात सामाजिक सुरक्षिततेची तरतुद करणे, ही राष्ट्रांची जबाबदारी आहे. तसेच, महिलांचे संसाधनांवरील हक्क हे त्यांच्या सबलीकरणाचे महत्त्वाचे पाऊल आहे. नव्या क्षमतांसाठी महिलांची क्षमताबांधणी आवश्यक आहे. 'केवळ रोजगार देणे', या चौकटीत न अडकता 'हक्कांच्या दृष्टिकोनातुन उपजिविका व त्यातुन रोजगार निर्मिती,' असा विचार झाला पाहिजे.

### ३.३.३ स्त्रियांकरिता कायदे आणि संविधानातील विशेष तरतुदींचा समावेश :

राज्य शासनाला कलम १५ (३) अंतर्गत, स्त्रियांच्या उन्नतीसाठी कायद्यांव्दारे अनेक तरतुदी देण्यात आल्या आहेत. त्यापैकी, स्त्रियांच्या दृष्टिने महत्त्वाच्या असलेल्या कायद्यांच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

- संविधानातील कलम ३९ (अ) शासनाला स्त्री आणि पुरुषांच्या समान श्रमासाठी समान वेतन देण्याची सूचना करते.
- कुटुंबातील स्त्री सदस्यांना गुन्हेगारी Criminal Procedure Code (CPC) चा वापर केला जाऊ नये.
- स्त्रियांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागांची तरतुद संविधानिकदृष्ट्या वैध आहे.
- विशेष विवाह कायद्याच्या ३६ व्या सेक्शननुसार, फक्त बायकांसाठीच देखभालीची परवानगी दिली जाते.
- व्याभिचाराच्या शिक्षेतुन स्त्रियांना वगळ्यात आले आहे.
- भारतीय दंड संहिता विधानाच्या, पोटकलम ५४, नुसार स्त्रियांवर हल्ला करणाऱ्याला शिक्षा करण्यात येते.
- कलम ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार ग्रामीण आणि शहरी शासकीय संस्थांमधून स्त्रियांकरीता एक तृत्यांश (१/३) जागा आरक्षित ठेवल्या पाहिजेत.

- संविधानाचे ४२ वे कलम, कामाच्या ठिकाणची स्थिती आणि बाळंतपणाच्या तरतुदींकडे राज्य शासनाने लक्ष ठेवण्याचा निर्देश करते. त्यासाठी "**The Maternity Benefit Act, 1961**" चा कायदा केला आहे.

'कायदा', हा सुद्धा स्त्रियांच्या सक्षमीकरणातील एक प्रबळ घटक आहे. उदा. हिंदु वारसा कायदा, २००५, हिंदु स्त्रीला (यात हिंदु, बौद्ध, जैन किंवा शीख यांचा समावेश होतो.) ज्यामध्ये हिंदु विवाहित मुलीला पुर्वजांच्या वारसा आणि कृषीसंदर्भातील संपत्तीत समान अधिकार देतो. कायद्यातील बदलामुळे मुलींना समान दर्जा मिळाला, हे लिंग समानतेसाठी, एक पुढचे पाऊल असुनसुद्धा स्त्रियांना संपत्तीवर अधिकार मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते.

- *महिलांसाठीचे कायदे :*

भारत स्वतंत्र झाल्यावर १९५० मध्ये, डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात बनलेल्या, भारतीय राज्यघटनेत स्त्रियांना व पुरुषांना समान मानले गेले. स्त्रियांना सर्व समान हक्कांची हमी या राज्यघटनेने दिली. यामध्ये मतदानाच्या हक्काचासुद्धा समावेश आहे. सगळेच मुलभूत अधिकार व हक्क हे स्त्रियांना व पुरुषांना समानतेने देण्यात आले. स्त्रियांना मतदानाबरोबरच, राजकीय सहभागाचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा, इत्यादी हक्क मिळाले. पण त्याच बरोबर, स्त्रियांचे ऐतिहासिक शोषण लक्षात घेऊन, राज्यघटनेत स्त्रियांना विशेष सवलती देण्याची व त्या अनुषंगाने सकारात्मक सहेतु कृती करण्याची मुभा राज्यसभेला देण्यात आली. कलम १५८ (३) नुसार, स्त्रियांना स्वातंत्र्य, सुरक्षितता, समानता, हे हक्क पुरुषांप्रमाणेच देण्यात आले.

भारताने मानवी हक्कांच्या संवर्धनाच्या यंत्रणा म्हणुन 'राष्ट्रीय मानवी आयोग' आणि ''राष्ट्रीय महिला आयोगा'ची स्थापना केली आहे. या आयोगांनी वेळोवेळी स्त्रियांच्या हक्क उल्लंघनाच्या प्रश्नांवर हस्तक्षेप केला आहे. कायदेविषयक अधिकारांची मागणी, हा भारतीय स्त्री चळवळीचा मुख्य भाग राहिलेला आहे. भारतीय संविधानातील कलम १५, हे धर्म, वंश, जात, लिंग व ठिकाण, यावरुन विषमता निषिद्ध करते. तथापि, कलम १५ (३) राज्याला स्त्रिया व बालकांसाठी विशेष तरतुद करण्याची परवानगी देते आणि कलम १५ (१) या अविषमतेच्या तरतुदीच्या तत्त्वाला अपवाद म्हणुन व्यापक प्रमाणात विश्लेषण करते. असे असुनही कलम १५ (३) आणि कलम १५ (४) हे संविधानातील विषमतेच्या नियमांना अपवाद आहेत. कलम १५ (३) हे राज्याला स्त्रियांकरीता विशेष तरतुदी करण्यास सक्षमता देते आणि न्यायालयास संविधानिक तरतुदींना उचलुन धरण्याला पाठिंबा दर्शविते.

- *कामगार स्त्रियांचे अधिकार व हक्कासंबंधीचे कायदे :*
    - मातृत्व लाभासंबंधीचा कायदा, १९६१.
    - कारखाने कायदा, १९४८.
    - खाण कायदा, १९५२.
    - करार मजुर (नियोजन व निर्मुलन) कायदा, १९७०.
    - किमान वेतन कायदा, १९४८.
    - शेती-मळा लागवड कामगार कायदा, १९५१.
    - विडी-सिगार कामगार (कामाचे नियम) कायदा, १९६६.
    - वेठबिगार प्रथा (प्रतिबंध) कायदा, १९७६.
    - कामगारांसाठी नुकसान भरपाई कायदा, १९२३.
    - वेतन प्रदान कायदा, १९३६.
    - राज्य कामगार विमा कायदा, १९४८.
    - चित्रपट व नाट्य कामगार (नोकरी नियमन) कायदा, १९८१.
    - आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार (नोकरीच्या अटी व नोकरी नियमन) कायदा, १९७९.
    - समान वेतन कायदा, १९७६.
    - बालकामगार (प्रतिबंध व नियमन) कायदा, १९८६.
    - स्त्रियांच्या लैंगिक छळ प्रतिबंधासंबंधीचे नियम.

- *दलित आणि मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे :*
    - नागरी अधिकारांच्या संरक्षणासंबंधीचा कायदा, १९५५.
    - अनुसूचित जाती व जमाती (एस्.सी. आणि एस्.टी.)
    - अत्याचार प्रतिबंध कायदा, १९८९.

- *अपंग व्यक्तिंसाठीचे कायदे :*
    - अपंग व्यक्ती (हक्क, समान संधी व पूर्ण सहभाग) कायदा, १९९५.
    - मानसिक आरोग्य कायदा, १९८७.
    - न्याय कायदा, १९९९.

- ***इतर महत्त्वाचे कायदे :***
  - कुटुंब न्यायालये कायदा, १९८४.
  - हिंदु अज्ञानत्व व पालकत्व कायदा, १९५६.
  - राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९०.
  - महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
  - राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००६.
  - विधीसेवा प्राधिकरण कायदा, १९८७.
  - माहितीचा अधिकार, २००५.
  - बालन्याय कायदा, २०००.
  - अर्भकासाठीचे कृत्रिम दुग्ध व अन्य अन्न पदार्थ (निर्मिती, वाटप आणि पुरवठा नियमन) कायदा, १९९२.
  - भिक्षा प्रतिबंधक कायदा, १९५९.
  - अभिभोक्ता /वकिलांसाठीचा कायदा, १९६१.
  - अनाथालये व धर्मदाय गृहांसाठीचा (देखरेख व नियमन) कायदा, १९६०.

वरील सर्व महिलांसाठी असणारे कायदे आहेत. कायदा, हा सुद्धा स्त्रियांच्या सक्षमीकरणातील एक प्रभावी घटक आहे. संशोधकाने उपरोक्त विषयाचे संशोधन करताना, सर्व महिलांसाठी असणारे कायदे नमुद केले असले तरीही, संशोधनाचा विषय विचारात घेऊन, महिला सबलीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या निवडक कायद्यांचीच सखोल मांडणी केलेली आहे.

- ***किमान वेतन कायदा, १९४८ :***
  ***(कामगार स्त्रियांच्या अधिकार व हक्कासंबंधी)***

शासनाने कामगारांना किमान वेतन निश्चित करुन देण्याची कायदेशीर जबाबदारी संविधानाने नितीनिर्देशक तत्त्वाद्धारे स्पष्ट केली आहे. किमान वेतन कायदा, पुढील उद्योग-व्यवसायांना लागु होतो. कायद्यात दिलेल्या अनुसूचीप्रमाणे खालील उद्योग-व्यवसायांना हा कायदा लागु होतो.

- शाल, गालिचे विणण्याचे कारखाने.
- डाळ, आटा वा तांदुळाच्या गिरण्या.
- तंबाखु, विडी-सिगारेट वळण्याचे कारखाने.
- चहा, कॉफी, रबर व सिंकोनाच्या मळ्यातील कामगार.
- स्थानिक पालिकेतील कामगार.

- तेल गिरणी, बांधकाम व्यवसाय, दगड-विटा व्यवसाय, खाण निर्मिती व्यवसाय, परिवहन उद्योग, कातडी-चामडे व्यवसाय, सर्व प्रकारच्या खाणींचे उद्योग-व्यवसाय, रेल्वे गोदामातील कामगार, रेल्वेतील सामान चढ-उतार करणारे कामगार, रेल्वे साफ-सफाई कामगार, मुंबई दुकाने व व्यवसाय कायद्यांतर्गत येणारी सर्व दुकाने, उपहारगृहे, खानावळी, आरामगृहे, इत्यादी.
- छपाई व प्रकाशन संबंधित सर्व व्यवसाय.
- कापडगिरणी व कापूस जिनिंग कारखाने.
- काचेचा व्यवसाय, सिमेंट कारखाने.
- अशासकीय आरोग्य केंद्रे, इस्पितळे, औषधाची दुकाने.
- शेतकीसंबंधीत व्यवसाय, दुग्ध व कुक्कुटपालन व्यवसाय.
- वन्य संपत्तीचे व्यवसाय (लाकूडतोड व त्यापासून बनणारे फर्निचर व्यवसाय).
- मधमाशा संगोपन, मध प्रक्रिया व्यवसाय.

किमान वेतनाची रक्कम, काम करणाऱ्या व्यक्तीच्या वयावरुन ठरविले जाते. त्यामध्ये वयोमर्यादा १४ वर्षांखालील व्यक्तीसाठी, १४ ते १८ वर्षे वयोगटातील व्यक्तीसाठी अशी असते.

- *वेठबिगारी प्रथा (प्रतिबंध) कायदा, १९७६ :*
  - वेठबिगारी ही एक प्रकारची गुलामगिरीच आहे. श्रीमंत लोक कमी पैसे देऊन शेतात वा दुसरीकडे अशा कामगारांकडुन कामे करवुन घेतात. कधी कधी त्यांना पैसेही देत नाहीत. अगदी कमी अन्न किंवा धान्य देतात. जेणेकरुन मजुर कसेबसे जिवंत राहतील. थोडक्यात, आयुष्यभर त्या कामगाराकडुन अशा प्रकारचे काम कमी पैशांमध्ये करवुन घेणे, म्हणजे 'वेठबिगारी' होय.
  - त्याचप्रमाणे, एकाद्या व्यक्तीने श्रीमंत माणसाकडुन पैसे किंवा धान्य उधारीवर घेतले असेल व ती व्यक्ती त्याची परतफेड करु शकत नसेल, तर त्या व्यक्तिने त्या श्रीमंत माणसाकडे विनामोबदला काम करणे, ही सुद्धा वेठबिगारीच ठरु शकते. काही वेळा तर कर्ज घेतलेल्या व्यक्ति आपल्या सर्व कुटुंबासह त्या श्रीमंत व्यक्तीकडे आयुष्यभर असे काम करीत असतात.
  - काम करण्यासाठी विशिष्ट जातीच्या आधारे, त्या जातीतील व्यक्तीवर जबरदस्ती करणे म्हणजेसुद्धा वेठबिगारीच ठरते.
  - वेठबिगार म्हणुन कोणत्याही व्यक्तीला कामावर ठेवणे हा कायद्याने गुन्हा आहे.
  - थोडक्यात, विनामोबदला काम करवुन घेणे, हे बेकायदेशीर असुन तो गुन्हा ठरतो.

*वेठविगारीतुन मुक्ततेसाठी कायद्याची मदत मिळु शकते :*

- ज्या कर्जासाठी एखाद्याला वेठबिगारी करावी लागली, त्याला ते कर्ज फेडण्याची गरज नसते, म्हणजे जुन्या कर्जापासुन त्या व्यक्तिची ताबडतोब मुक्तता होते.
- जर संबंधित व्यक्तीने वेठबिगाराच्या विरोधात कर्जफिडीसाठी न्यायालयात तक्रार केली, तर तो दावा न्यायालयात फेटाळला जाऊन, निकाल मजुराच्या बाजुनेच लागतो.

### ३.३.४ दलित व मागासवर्गीय स्त्रियांसाठीचे कायदे :

- *नागरी अधिकारांच्या संरक्षणासंबंधीचा कायदा, १९५५ :*
    - भारतीय संविधानाने अस्पृश्यतेची प्रथा नष्ट केली. त्याचा मागोवा घेण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे.
    - कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये वा देवस्थानामध्ये प्रार्थनेसाठी अस्पृश्यतेच्या वा जाती धर्माच्या आधारे प्रवेश नाकारणे.
    - अस्पृश्यतेच्या वा जातीच्या आधारे दुकाने, उपहारगृहे, सार्वजनिक मनोरंजनाची स्थळे, सार्वजनिक धर्मशाळा, स्मशानभूमी, नदी, घाट, पाण्याचे नळ, टाक्या, तलाव, रस्ते, अशा ठिकाणी कोणाही व्यक्तीस प्रवेश नाकारणे.
    - जातीच्या आधारे नोकरी वा उद्योग-व्यवसायासाठी अडथळा आणणे.
    - अस्पृश्यतेच्या आधारावर, कुठल्याही दवाखान्यात वा इस्पितळात प्रवेश न मिळणे.
    - अस्पृश्यतेमुळे एखादी वस्तु विकण्यावर बंदी घालणे.
    - अस्पृश्यतेच्या आधारे, भेदभाव करुन, त्या जातीच्या व्यक्तिकडुन सक्तीने भंगीकाम, मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे किंवा मेलेल्या जनावरांच्या कातडीपासुन चामडी तयार करण्याची कामे करुन घेणे.

वरीलपैकी कोणत्याही अपराधासाठी, संबंधित व्यक्तिला, प्रथम वेळेस सहा महिन्यांपर्यंत कारावास व रु. ५०० पर्यंत दंड होऊ शकतो. असाच अपराध त्याने पुन्हा केल्यास, एक वर्षापर्यंत कारावास व ५०० रुपये दंड होऊ शकतो. तोच अपराध तरीही त्याने पुन्हा तिसऱ्यांदा केला तर संबंधीत गुन्ह्यासाठी, त्याला दोन वर्षांपर्यंत कारावास व १,००० रुपये दंड ठोठावला जाऊ शकतो. या कायद्याअंतर्गत, गुन्हा दाखल करण्यासाठी न्यायालयाचे शुल्क लागत नाही. तसेच, जी व्यक्ती स्वतः एखादा उद्योग-व्यवसाय करुन माल विकते, पण अस्पृश्यतेच्या आधारे, दुसऱ्यास तो माल विकण्यास वा तो व्यवसाय करण्यास अडथळा आणते अथवा प्रतिबंध करते, त्या व्यक्तीचा तो उद्योग-व्यवसाय कायमचा बंद होऊ शकतो.

- ***अनुसूचित जाती व जमातीसाठी (एस्.सी., एस्.टी.) अत्याचार प्रतिबंध कायदा, १९८९ :***

  अनुसूचित जाती व आदिवासी समाजातील व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करणे, हा या कायद्याचा प्रमुख उद्देश्य आहे.

  कोणत्याही अनुसूचित जाती वा जमातीच्या वा आदिवासी नसलेल्या व्यक्तीने, अनुसूचित जाती वा जमातीच्या व्यक्तीसोबत खाली दिलेल्या कृती केल्यास त्या जबाबदार व्यक्तीस पाच वर्षांपर्यंत कारावास व ठराविक रकमेपर्यंत दंडही होण्याची तरतूद या कायद्यात केली आहे.

  - जबरदस्तीने अखाद्य पदार्थ खाऊ घालणे.
  - अत्याचार वा अपमान करण्यासाठी विष्ठा, कचरा, घाण दलिताच्या घरात टाकणे.
  - अमानवीय वाटेल अशा पद्धतीने दलिताचे तोंड रंगविणे, त्याच्या तोंडाला काळे फासणे किंवा त्याला विवस्त्र करुन त्याची धींड काढणे.
  - बेकायदेशीरपणे त्याची जमीन बळकावणे.
  - दलिताला मिळालेली जमीन परस्पर दुसऱ्याला दान करणे वा विकणे.
  - दलिताला त्याचा मतदानाचा अधिकार पार पाडु न देणे.
  - दलिताला गुलाम वा वेठबिगार बनविणे.
  - दलित व्यक्तीच्या नांवे न्यायालयात खोटे खटले दाखल करणे.
  - शासकीय अधिकाऱ्यास खोटी माहिती पुरवुन दलिताला विनाकारण त्रास देणे.
  - अनुसूचित अथवा आदिवासी स्त्री किंवा मुलीस छेडणे किंवा त्यांचा अवमान होईल, असे एखादे कृत्य करणे.

## ३.४ महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण :

### ३.४.१ प्रस्तावना :

महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव दूर करण्यासाठी, संयुक्त आमसभेने सन १९७९ मध्ये 'महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरण' हा ठराव संमत केला. महिलांबाबत भेदभाव दूर करुन, त्यांना न्याय व्यवस्थेत समानतेचे तत्त्व समाविष्ट करण्यासाठी या ठरावावर स्वाक्षरी करुन, अनुमती दिलेल्या सर्व देशांना हे धोरण बंधनकारक आहे.

भारत सरकारने ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती करुन, नागरी व ग्रामीण संस्थांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश (१/३) आरक्षण राखुन ठेवण्याचा निर्णय घेतला. महिला सक्षम झाल्या तर समाजाचा

विकास होतो, आणि विकसीत समाजाचे राष्ट्रही विकसीत व बलवान होऊ शकते. त्याकरीताच, भारत सरकारने २० मार्च २००१ पासुन, महिलांसाठी राष्ट्रीय धोरण स्विकारले. या धोरणाचा मुख्य उद्देश्य महिलांचा राजकीय, तसेच सामाजिक क्षेत्रात सहभाग, त्यांना संरक्षण, त्यांच्या वैयक्तिक व आर्थिक उन्नतीसाठी, विविध योजना व विकास प्रकल्प राबविणे, त्यांच्या क्षमतेचे संवर्धन, आणि या सर्वांसाठी अनुकूल अशी वातावरण निर्मिती करणे.

महिलांना केंद्रस्थानी मानुन या धोरणांतर्गत, महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक धोरणे, योजना, विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यासाठी लागणारा निधी, शासनाच्या प्रत्येक विभागाच्या अंदाजपत्रकात समाविष्ट केला आहे. शासकीय योजना व कार्यक्रमांच्या आखणीत, नियोजन आणि अंमलबजावणीत, महिलांना समाविष्ट केले गेले आहे. सामाजिक, आर्थिक दर्जाचे विश्लेषण करताना, पुरुष आणि स्त्री अशी स्वतंत्र विभागणी केली आहे. आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात, महिला सक्षमीकरणाला, देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वाचे योगदान असल्याने, त्यासाठी खास निधीची उपलब्धता, या धोरणातुन केली आहे. महिला घरकामाचाही राष्ट्रीय उत्पन्नात समावेश केला आहे. ग्रामीण भागातील महिलांना सक्षम केल्यास, उत्पादकता व रोजगारात भर पडण्यासाठी महिला बचत गटांना प्राधान्य देऊन, कंत्राटी पद्धतीने शेती व शेती–व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन या धोरणाद्धारे देण्यात आले आहे. महिला साक्षरता प्रमाण वाढविण्यासाठी, स्वयंसहाय्य महिला गटांच्या माध्यमातुन, महिलांना विविध कार्य कुशलतेचे प्रशिक्षण शिर्बीरे व मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. उच्च शिक्षण व तंत्रज्ञानात ३० टक्के आरक्षण देऊन, महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी, विविध क्षेत्रातील व्यावसायिक शिक्षणासाठी, या धोरणाद्धारे राज्य शासनाकडुन अनुदानाच्या स्वरुपात विशेष प्रोत्साहन दिले जाते.

### ३.४.२ राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० :

महिला हक्कांचे रक्षण करण्यासाठी, त्यांच्यावरील अन्यायाचे निवारण करण्यासाठी, केंद्र व राज्य शासनांनी राष्ट्रीय व राज्यनिहाय कायदे केले आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना, राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० च्या कलम २० नुसार, दिनांक ३१ जानेवारी १९९२ रोजी झाली आहे. हा कायदा समाजातील सर्व स्तरातील महिलांच्या विकासासाठी, संरक्षणासाठी, मुलभूत हक्क व आधिकारांसाठी लागू आहे. महिलांसाठी कार्य करणारा हा आयोग देशात सर्वोच्च स्थानी आहे. हा आयोग, महिलांचा समान सहभाग, स्त्री–पुरुष समानता, समान कामासाठी समान वेतन आणि महिलांच्या हक्कांचे रक्षण करुन त्यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन प्रदान करतो.

महिलांच्या तक्रारींची दखल घेऊन, त्या दूर करण्यासाठी, हा आयोग विविध प्रकारे उपाययोजना करतो. महिलांना समाजात योग्य दर्जा व समान हक्क मिळावा, त्यांना प्रतिष्ठेने व आदराने जीवन जगता यावे यासाठी हा आयोग सदैव प्रयत्नशील राहुन सरकारला महिलांच्या समस्यांवर शिफारशी सुचविण्याचे महत्त्वाचे कार्य करतो. हे कार्य हा आयोग राष्ट्रीय महिला आयोग कायदा, १९९० च्या कलम २० नुसार करत असतो.

### ३.४.३ महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा, १९९४ :

भारतीय राज्यघटनेने महिलांना समान हक्क दिले आहेत. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी महिलांचा सामाजिक दर्जा उंचाविण्यासाठी, महिलांना विकासाच्या सर्व क्षेत्रात संरक्षण देण्यासाठी, महाराष्ट्रशासनाने, जून १९९४ पासुन महिला धोरण जाहीर केले. हे धोरण जाहीर करण्यासाठी, जानेवारी १९९३ मध्ये स्थापन झालेल्या, राज्य महिला आयोगाने, या बाबतीत पुढाकार घेतला. महिला विकाससंदर्भातील कायद्यात किंवा प्रशासनात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करण्यासाठी, हा आयोग सूचना करतो. महिलांविषयी धोरण आखणारे भारतात, महराष्ट्र हे प्रथम राज्य आहे. या धोरणाचा दर तीन वर्षांनी आढावा घेण्याची तरतुद या कायद्यामध्ये केली आहे.

महिलांवरील अन्यायाचे निराकरण करुन, त्यांच्या विकासाला नवी चालना, नवी दिशा देण्यासाठी, महिलांना सामाजिक दर्जा व समान हक्क देऊन, त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या हेतूने, हा आयोग कार्य करतो. या आयोगाची प्रमुख वैशिष्ट्ये, महिलांना शारीरिक, मानसिक व भावनिकरित्या सक्षम व सशक्त बनवुन, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवुन, त्यांचा सर्वांगीण विकास घडविणे ही आहेत. या आयोगात प्रामुख्याने, महिलांच्या सक्षमीकरणासाठी खालील मुद्यांचा विचार करण्यात आला आहे.

- शासकीय नोकऱ्यांमध्ये ३० टक्के राखीव जागा, पंचायती व नगरपालिकांमध्ये ३० टक्के राखीव जागा, महिला व बालवैधानिक समित्यांमध्ये ७० टक्के सदस्यांच्या जागा महिलांसाठी आरक्षित ठेवल्या जातात. तसेच, ग्राम महिला सभा, स्थापन केल्या आहेत.
- महिला विकासासाठी तळमळीने व कुशलतेने कार्य करणाऱ्या महिला व संस्थाना दरवर्षी, 'आहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्रदान करण्यात येतो.
- तंत्रनिकेतन व आय.टी. क्षेत्रात महिलांसाठी अनुक्रमे २० टक्के ते २५ टक्के जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत.

- या आयोगाद्धारे, महिला बचत गटांच्या माध्यमातुन पाच लाख महिला सक्षम व आर्थिकदृष्ट्या सबल झाल्या आहेत.
- शेती व्यवसायाला पूरक उद्योग-व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी, आयोगातर्फे ५० टक्के निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- हा आयोग राष्ट्रीय आयोगाच्या अधिपत्याखाली काम करीत असल्यामुळे, महिला उद्योजकांना वित्तीय पत पुरवठा सवलतीच्या दरात उपलब्ध करुन दिला जातो.

या आयोगाने दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत, सन २००२-२००७ या कालावधीत, २९ कोटी रुपयांची तरतुद करुन, त्या रकमेची महिला सक्षमीकरणासाठी अंमलबजावणी केली आहे.

### ३.४.४ महिला धोरणा संदर्भात शासकीय दृष्टिकोन :

भारतीय संविधानात कलम १२ ते ३५ मध्ये, देशातील प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत हक्कांची तरतुद केली आहे. देशातील पुरुषांप्रमाणेच, महिलादेखील या हक्काचा लाभ उठवु शकतात. या हक्कामध्ये समानतेचा, शिक्षणाचा, स्वातंत्र्याचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, शोषणा विरुद्ध आवाज उठविण्याचा समावेश होतो.

कलम १४ नुसार, भारतीय नागरिकांना समान संरक्षण देण्यात आले आहे. स्त्रियांसाठी विशेष तरतुदी करण्यास राज्याला प्रतिबंध असणार नाही, असे १५ व्या कलमात स्पष्ट केले आहे. महिलांसाठी शैक्षणिक सवलती, शिष्यवृत्ती, वसतिगृहे, निराधार महिलांना आर्थिक सहाय्य, अशा अनेक योजना शासनाने अंमलात आणल्या आहेत. महिलांच्या हक्कांच्या रक्षणासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक कायदेसुद्धा केले आहेत.


कलम १६ (२) नुसार, पुरुषांबरोबर महिलांना समान संधी देण्यात आली आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम ३६ ते ५१ अंतर्गत, राज्याच्या धोरणाविषयक मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत. त्यातील बहुतेक तत्वे महिलांशी संबंधीत आहेत. कलम ३९ मध्ये, स्त्री-पुरुषांना समान काम-समान वेतन, तसेच, त्यांचे समान स्वास्थ्य, भौतिक, नैतिक, पिळवणुकींपासुन संरक्षण, यांविषयी तरतुद करण्यात आली आहे. कलम ४२ मध्ये, कामाबाबत न्याय व उचीत परिस्थिती उपलब्ध करण्याविषयी तरतुद आहे. १९९३ साली ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करुन, स्त्रियांना प्रत्येक ठिकाणी एक तृतीयांश (१/३) जागा आरक्षित, राखीव ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सध्या शहरी व ग्रामीण भागात १४ लाख महिला प्रतिनिधींना जनप्रतिनिधीचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

*भारतीय संविधानामधील महिलांसाठी तरतुदी :*

- कलम – १४ : कायद्यामध्ये सक्षम समानता देणे.
- कलम – १५ (१) : महिला व बालकांसाठी विशेष सुविधा.
- कलम – १६ : भेदभाव न करता नोकरीमध्ये समानता.
- कलम – ३९ (घ) : समान कार्यासाठी – समान वेतन.
- कलम – ३३० : ८४ व्या संशोधनातुन लोकसभेमध्ये महिला आरक्षण.
- कलम – ३३२ : ८४ व्या संशोधनातुन विधानसभेमध्ये महिला आरक्षण.

### ३.४.५ महिलांच्या अडचणी सोडवु शकणाऱ्या यंत्रणा :

महिलांना असलेल्या हक्कांची अंमलबजावणी करुन, त्यांना न्याय मिळवुन देण्याचा आणि त्यांच्या तक्रारींची दाद घेणाऱ्या, काही संस्था व यंत्रणा कार्यरत आहेत. याखेरीज, कायद्यानुसार कार्य करणाऱ्या न्यायालयांसारख्या किंवा महिलांच्या प्रश्नांना विशेष प्राधान्य देऊन अडचणी सोडविणाऱ्याही यंत्रणा आहेत. त्या खालीलप्रमाणे :



## संदर्भसूची :


- *Forbes, Geraldine, (1996),* **'The New Cambridge History of India : Women in Modern India', Cambridge University Press, New Delhi.**
- *भागवत विद्युत, (२००४),* 'स्त्री प्रश्नांची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- *देहाडराय सरिता, (२००९),* 'जनवादी चळवळीच्या स्त्रिया : कथानके आणि आवाज', क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री-अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.
- *गीया व्ही., (२००९),* 'स्वाभिमान विवाहाची कथा आणि त्याचे पुढे काय झाले?', भाषांतर : स्वाती देहाडराय, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री-अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.
- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा, (२००९),* 'स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना', क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री-अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.
- *गांधी नंदिता, शहा नंदिता, (१९९२),* 'स्त्री संघर्षाची नवी रुपे', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
- *Lingam, Lakshmi, (2002),* **'Taking Stock : Women's Movement at the State in Gujrat', Shah (Ed.), 'Social Movements and the State,' Sage Publication, New Delhi.**
- *Vedt Om, Gail, (1993),* **'The Women's Movement in Reinventing Revolution', M.E. Sharpe, New York.**
- *आलोचना (संपादकिय), (२००२),* 'दलित स्त्री अस्मितेचा अविष्कार व दिशा', आलोचना, पुणे.
- *Rao, Anupama, (ed.), (2003),* **'Gender and Caste : Contemporary Issues in Indian Feminism', New Delhi, Kali for Women.**


## संदर्भ :


- *चौधरी राजेश, (२०११),* 'महिला बचत गट', हस्तपुस्तिका, चौधरी लॉ प्रकाशन, जळगांव-पुणे.
- *डॉ. देसाई श्री.मु., डॉ. सौ. भालेराव निर्मल, (२०१२),* 'भारतीय अर्थव्यवस्था', निराली प्रकाशन, पुणे.
- *श्रीवास्तव मयांक, (२०११),* 'महिला सशक्तीकरण – सामाजिक बदलाव के लिए आवश्यक', कुरुक्षेत्र मासिक, अरावली प्रकाशन, अंक १०, नई दिल्ली, पृ. क्र. १८.
- *डॉ. बाचल वि.मा., (२०१०),* 'भारतीय राज्यघटना आणि राजकीय व्यवहार', के. सागर प्रकाशन, पुणे.
- *प्रा. कुलकर्णी बी. वाय्., (२००८),* 'भारतीय शासन आणि राजकारण', विद्या प्रकाशन, नागपूर.
- 'महिला धोरण – २००१', *(२०१०),* महाराष्ट्र शासन, महिला विकास मासिक, महाराष्ट्र तांत्रिक शिक्षण मंडळ, अहमदनगर पृ. क्र. ३४-३५.

- *आगलावे प्रदिप, (२०००),* 'संशोधन पद्धती शास्त्रे आणि तंत्रे', प्रथम आवृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. ३१.

- *योजना मासिक,* जानेवारी, २००८, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई, पृ. क्र. १४.

- 'महिला आणि बालविकास धोरण आणि निर्णय (१९७५ ते जानेवारी २००२) – एक दृष्टिक्षेप', यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा) पुणे, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. क्र. ३४०, ३४१, ३४४, ३६६, ३९९.

- *तुरकर चंद्रसेन, (२०१०),* 'महिला : कायदे आणि अधिकार', यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे, पृ. क्र. २९, ३०, ९९, १००, १०१, १५६, १५७, १५८, १६९, १७९, १८१, १८२, २०२.

- 'मानवी हक्क व हक्काधारित दृष्टिकोन : प्रशिक्षण मार्गदर्शिका–२००८', यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, यशदा, पुणे, पृ. क्र. २९, ४१, १२९, २१४, २१५.

- 'महिला दिन विशेष', लोकराज्य, मार्च २०१०, पृ. क्र. ९.

- 'माहिती पुस्तिका : सन २०१२–२०१३', महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ६३, ६४, ७१, ७२,

- 'यशमंथन', यशदा, मार्च २००२, पुणे.

- 'महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा', महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुबंई.

- *देहाडराय स्वाती, तांबे अनघा , (२००९),* 'स्त्रिया, कायदा आणि राजकारण', प्रकाशक – क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री–अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ. क्र. ४, ५, ९, १०, ५३, ७७.

- *रेगे शर्मिला, भागवत विद्युत , (१९९४),* 'स्त्री विकासाची गुंतागुंत', विकास अध्ययन केंद्र, मुंबई.

- *Mathew P.D., Bakshi P.M. (1998),* 'Women and The Constitution', Legal Education Series, Indian Social Institute, New Delhi.

- *Nair Janaki, (1996),* 'Women and Law in Colonial India : A Social History', New Delhi : Kali for Women.

- *Dhanda Amita and Parashar Archana (eds.), (1999),* 'Engendering Laws', Lacknow : Eastern Book Company.


.....

# प्रकरण – ४

# पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन आणि महिला विकासाच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा

*प्रकरण चौथे*

# पुणे जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन आणि महिला विकासाच्या महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा आढावा

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | प्रस्तावना | १३५ |
| ४.२ | पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी | १३५ |
| ४.३ | पुणे जिल्ह्याची भौगोलिक आणि प्राकृतिक रचना : | १३६ |
| ४.३.१ | पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान | १३६ |
| ४.३.२ | पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ | १३९ |
| ४.४ | जिल्हा प्रशासनातील प्रशासकीय विभाग | १४० |
| ४.५ | पुणे जिल्ह्याची लोकसंख्या आणि ग्रामीण-शहरी प्रमाण | १४३ |
| ४.६ | पुणे जिल्ह्यातील बँका आणि वित्तसंस्था | १४६ |
| ४.७ | पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य, बेरोजगारी आणि विविध क्षेत्रातील रोजगाराची स्थिती : | १४६ |
| ४.७.१ | पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य आणि बेरोजगारी | १४६ |
| ४.७.२ | पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील रोजगाराची स्थिती | १४७ |
| ४.८ | महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांचा आढावा : | १४७ |
| ४.८.१ | प्रस्तावना | १४७ |
| ४.८.२ | महिलांसाठी सनद | १४९ |
| ४.८.३ | महिलांच्या सक्षमीकरणासाठी निधी | १५० |
| ४.८.४ | महिला सक्षमीकरण समिती | १५१ |
| ४.८.५ | जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बाल कल्याण समित्यांचे कार्य व निधी | १५३ |
| ४.८.६ | महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.) | १५५ |
| ४.८.७ | पुणे महानगरपालिकेची नागरवस्ती विकास योजना विभाग | १५८ |
| ४.८.८ | महिला व बाल विकास विभागातील एकुण योजनांचा तपशील | १६१ |
| ४.८.९ | जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा तपशील | १६४ |
| ४.८.१० | महिला आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजनांचा तपशील | १६६ |

| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.९ | **संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या आठ शासकीय योजनांचा तपशील :** | १६७ |
| ४.९.१ | विविध व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना देण्यात येणारे विद्यावेतन (आय्.टी.आय्., नर्सिंग व टेलिफोन ऑपरेटर) | १६७ |
| ४.९.२ | स्वयंरोजगार योजनेअंतर्गत महिलांना व्यक्तिगत आर्थिक सहाय्य | १६९ |
| ४.९.३ | कामधेनु योजना | १७० |
| ४.९.४ | ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीनचा लाभ | १७२ |
| ४.९.५ | मुलींना संगणकाचे प्रशिक्षण देणे | १७७ |
| ४.९.६ | ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे | १७९ |
| ४.९.७ | ग्रामीण भागातील महिलांना फॉल-पिकोचे मशीन पुरविणे | १८० |
| ४.९.८ | महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (मा.वि.म.) स्वयंसहायता गटावर आधारित विविध योजनांचा आढावा | १८३ |
| | अ) महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम | १८३ |
| | ब) रमाई महिला सक्षमीकरण योजना | १८४ |
| | क) स्वयंसिद्धा योजना | १८५ |
| | ड) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना | १८५ |
| ४.१० | **पुणे जिल्ह्यातील २००९-२०१० सालातील स्वयंसहायता महिला बचत गटांची प्रगती** | १९० |
| ● | **संदर्भसूची** | १९१ |


. . . . .

## ४.१ प्रस्तावना :

संशोधकाने संशोधनासाठी ''महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या निवडक योजनांचा चिकित्सक अभ्यास (पुणे जिल्ह्यापुरता मर्यादित) कालावधी २०००-०१ ते २००९-१०'', हा विषय निवडला आहे. पुणे जिल्ह्यातील एकुण १४ तालुक्यांपैकी बारामती, इंदापुर, जुन्नर आणि खेड, या चार तालुक्यांचे क्षेत्र अध्ययनासाठी निवडले आहे. तसेच, प्रत्येक तालुक्यातील १० गावे निवडुन, प्रत्येक गावातील १० महिला लाभार्थी, अशा एकुण ४०० महिला लाभार्थी, नमुना निवड प्रक्रियेतुन, अभ्यासासाठी निवडण्यात आल्या आहेत.

पुणे जिल्ह्यातील शासकीय महिला विकास योजनांचा लाभ घेतलेल्या महिला लाभार्थींचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला असुन, त्या अनुषंगाने, संशोधन परिपुर्ण होण्यासाठी, निवडलेल्या पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक महिती, प्रस्तुत प्रकरणात मांडण्यात आली आहे. सदर माहितीच्या आधारे, सर्वप्रथम, पुणे जिल्ह्याची सर्वसाधारण स्थिती कशी आहे, हे जाणुन घेणे आवश्यक आहे.

## ४.२ पुणे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभुमी :

पुणे जिल्हा हा पुरातन आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला असुन, पुणे शहराला महाराष्ट्राची 'सांस्कृतिक राजधानी' आणि 'विद्येचे माहेरघर' म्हणुन स्वातंत्र्यपुर्व काळापासुनच ओळखले जाते. पुणे शहर हे पुर्वी कसबे पुणे, पुण्यपूर, पुनवडी, अशा विविध नावांनी ओळखले जात होते. दुसऱ्या शतकातील शिलालेखात सध्याचे पुणे हे नांव 'पुनाटा' असे आढळते, तर राष्ट्रकुट राजवटीच्या काळात त्याला 'पुनवडी' या नावाने ओळखले जात असे. पुणे हे नांव 'पुण्य' या अर्थी निर्माण झाले असावे. मुळा आणि मुठा, या दोन नद्यांच्या संगमाच्या तीरावर वसलेल्या, आताच्या पुण्याला मोगलांच्या काळात 'कसबे पुणे' या नावाने संबोधले जात होते.

पुर्वी पुणे हे आंध्र, चालुक्य, राष्ट्रकुट राजवटींचा भाग होते. मध्ययुगात यादव व त्यानंतर बहामनी, निजामशाही, आदिलशाही आणि ब्रिटिश, या राजवटी पुण्याने जवळुन पाहिल्या आहेत. इसवी सनाच्या आठव्या शतकातील, शके ६८०, म्हणजेच इ.स. ७५८ मधील राजा कृष्णराजाच्या १६ ऑक्टोबर, ७५८ या दिवसाच्या ताम्रपटावरुन, पुणे हा शासन व्यवस्थेतील एक 'विषय' (प्रांत) होता आणि पुणे हे 'त्या' विषयाचे (प्रांताचे) केंद्र होते. १८१८ साली, पेशव्यांच्या पराभवानंतर मराठा राजवटीचा अंत होऊन, पुणे येथे ब्रिटिशांचे साम्राज्य स्थापन झाले. त्यानंतर महात्मा फुले यांनी आपली पत्नी, सावित्रीबाई यांच्या मदतीने तेव्हाच्या पुणे शहरातील, भिडे यांच्या वाड्यात

मुलींसाठी पहिली प्राथमिक शाळा सुरु केली. त्याचवेळी म्हणजे स्वातंत्र्यपुर्व काळात, न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या मार्फत, स्वातंत्र्य लढ्याची सुत्रे गुप्तपणे, पुण्यातुनच हालविली जात असत. ब्राह्मणेतर चळवळीचे प्रमुख केंद्र पुण्यातील 'जेधे मिशन' येथुन चालत असे.

भारताच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात व स्वातंत्र्य लढ्यात अग्रेसर असणारे अनेक नेते, विचारवंत, लेखक, कवी, चित्रपट निर्माते, इतिहास संशोधक, याच पुण्याच्या मातीत निपजल्याचे दिसुन येते. त्यामध्ये प्रामुख्याने, गोपाळ हरि देशमुख (लोकहितवादी), न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ आगरकर, गोपाळ गणेश आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, बाळ गंगाधर टिळक, भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे, विष्णुशास्त्री चिपळुणकर, अशा ज्येष्ठ समाजसुधारक, स्वातंत्र्य चळवळीतील मान्यवरांचा समावेश होतो. स्वातंत्र्योत्तर काळात, २६ जानेवारी १९५० या दिवशी, प्रथमच, भारतात संघराज्य शासन व्यवस्थेची निर्मिती झाली आणि त्याच दिवशी मुंबई राज्यांतर्गत, पुणे जिल्हा नावारुपास आला. १ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हापासुन पुणे जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील एक प्रमुख जिल्हा म्हणुन ओळखला जाऊ लागला. आज मितीस, पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि विद्येचे माहेरघर, म्हणुन जगभर ओळखले जाते. त्याचप्रमाणे एक महत्त्वाचे औद्योगिक आणि माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र, म्हणुन पुणे झपाट्याने विकसीत होत आहे.

## ४.३ पुणे जिल्ह्याची भौगोलिक व प्राकृतिक रचना :

महाराष्ट्र राज्याचे कोकण, उत्तर महाराष्ट्र (नाशिक), पश्चिम महाराष्ट्र (पुणे), मराठवाडा (औरंगाबाद), अमरावती आणि विदर्भ (नागपूर) असे एकुण सहा भौगोलिक व प्रशासकीय विभाग पडतात. त्यापैकी पुणे जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्र या विभागाच्या अंतर्गत येतो. पुणे जिल्ह्याची भौगोलिक आणि प्राकृतिक रचना पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र राज्याचा नकाशा पृष्ठ क्र. १३७ वर प्रस्तुत करण्यात आला आहे.

### ४.३.१ पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :

पुणे जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार हा १७.५०° ते १९.२४° उत्तर अक्षांश आणि ७३.२०° ते ७५.१०° पुर्व रेखांश असा आहे. पुणे जिल्हा हा समुद्र सपाटीपासुन, सरासरी ५०० मीटर उंचीवर असुन त्याचे पुर्व–पश्चिम अंतर १५० किलोमीटर आहे. पुणे जिल्ह्याच्या भौगोलिक स्थानाचा नकाशा पृष्ठ क्र. १३८ वर प्रस्तुत करण्यात आला आहे.

प्रस्तुत नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे, पुणे जिल्हा, महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम दिशेला आहे. त्याच्या उत्तरेस व पुर्वेस अहमदनगर जिल्हा असुन, आग्नेयेस सोलापुर, दक्षिणेस सातारा, पश्चिमेस रायगड आणि वायव्येस ठाणे जिल्हा आहे. प्राकृतिक रचनेनुसार, पुणे जिल्ह्याचे पश्चिमेस घाटमाथा (डोंगराळ भाग), मावळ (टेकड्यांचा उंचसखल प्रदेश) आणि पुर्वेकडील पठारी प्रदेश, असे तीन भाग पडतात. पुणे जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर हरिश्चंद्र डोंगर रांगा असुन, पश्चिमेस दऱ्या-खोऱ्यांनी व घनदाट अरण्याने वेढलेल्या सह्याद्री पर्वताच्या उंच व लांबलचक रांगा आहेत. या बरोबरच पुणे जिल्ह्यात शिंगी, कळसुबाई, भीमाशंकर, अशी उंच डोंगराळ प्रदेशाची सदाहरित अरण्ये आहेत. पुणे जिल्ह्यांतर्गत जुन्नर, आंबेगांव, मावळ, मुळशी, वेल्हे, भोर, हे सहा तालुके घाटमाथ्यावर असुन, उर्वरित आठ तालुके आणि मावळातील काही भाग या पठारी भागात येतात.

### ४.३.२ पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ :

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,६८० चौरस किलोमीटर असुन, त्यापैकी, पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ १५,६४२ चौरस किलोमीटर इतके आहे. पुणे जिल्ह्याचे क्षेत्रफळ, महाराष्ट्र राज्याच्या एकुण क्षेत्रफळाच्या ५ टक्के असुन, पुणे जिल्ह्याचा क्षेत्रफळ व्याप्तीच्या बाबतीत, महाराष्ट्रात दुसरा क्रमांक लागतो. पुणे जिल्ह्यात एकुण लहानमोठे असे १४ तालुके असुन, त्यांच्या क्षेत्रफळाची व्याप्ती पुढील पानावर तक्ता क्र. ४.१ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र. ४.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे, पुणे जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १५,६४२ चौरस किलोमीटर असुन शिरुर तालुक्याचा १,५५७ चौ.कि.मी. (९.९७ टक्के) क्षेत्रफळ व्याप्तीच्या बाबतीत, जिल्ह्यात प्रथम क्रमांक लागतो. त्याखालोखाल, इंदापूर १,४६८ चौ.कि.मी. (९.४० टक्के), जुन्नर १,३८४ चौ.कि.मी. (८.८६ टक्के) आणि बारामती १,३८३ चौ.कि.मी. (८.८५ टक्के) या तालुक्यांची व्याप्ती व टक्केवारी दिसुन येते. त्याच बरोबर, वेल्हे तालुक्याचे क्षेत्रफळ ४९७ चौ.कि.मी. (३.२० टक्के) तर त्या खालोखाल, म्हणजे सर्वात न्युनतम क्षेत्रफळ १८४ चौ.कि.मी. पुणे शहाराचे असुन क्षेत्रफळाचे शेकडा प्रमाण केवळ ०.७७ टक्के असल्याचे दिसते.

तक्ता क्र. ४.१

पुणे जिल्ह्याचे तालुकानिहाय क्षेत्रफळ

*(क्षेत्रफळ चौरस किलोमीटरमध्ये)*

| अनु. क्र. | तालुका | क्षेत्रफळ | गावांची संख्या | क्षेत्रफळाचे शेकडा प्रमाण (%) | क्षेत्रफळानुसार तालुक्यांची क्रमवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | *बारामती* * | *१,३८३* | *११७* | *८.८५* | *४* |
| २. | *इंदापूर* * | *१,४६८* | *१४३* | *९.४०* | *२* |
| ३. | *जुन्नर* * | *१,३८४* | *१८३* | *८.८६* | *३* |
| ४. | *खेड* * | *१,४००* | *१८८* | *८.७९* | *५* |
| ५. | आंबेगांव | १,०४३ | १४३ | ६.६८ | १० |
| ६. | शिरुर | १,५५७ | ११७ | ९.९७ | १ |
| ७. | मावळ | १,१३१ | १८७ | ७.२४ | ८ |
| ८. | मुळशी | १,०३९ | १४४ | ६.६५ | ११ |
| ९. | हवेली | १,३३७ | १०८ | ८.५५ | ६ |
| १०. | पुणे शहर | १८४ | ०० | ०.७७ | १४ |
| ११. | दौंड | १,२९० | १०३ | ८.२६ | ७ |
| १२. | पुरंदर | १,१०४ | १०८ | ७.०६ | ९ |
| १३. | वेल्हे | ४९७ | १३० | ३.२० | १३ |
| १४. | भोर | ८९२ | १९५ | ५.७१ | १२ |
| पुणे जिल्हा एकुण | | १५,६४२ | १,८८६ | १००.०० | २ |

*स्त्रोत : पुणे जिल्हा – सामाजिक व आर्थिक समालोचन, १९९९–२०००, पृ. क्र. १*
*पुणे जिल्हा – सामाजिक व आर्थिक समालोचन, २०११, पृ. क्र. १–२.*
** संशोधनासाठी निवडलेले तालुके.*

## ४.४ जिल्हा प्रशासनातील प्रशासकीय विभाग :

पुणे जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय पुणे येथे आहे. पुणे हे महाराष्ट्र राज्याची राजधानी असलेल्या मुंबई या शहरापासुन रेल्वेने १९२ कि.मी. तर खुष्कीच्या मार्गाने म्हणजे मुंबई–बंगळुरु राष्ट्रीय महामार्गाने १६० कि.मी. अंतरावर आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्र राज्याची एकुण लोकसंख्या ११,२३,७२,९७२ एवढी होती. त्यापैकी पुणे जिल्ह्याची एकुण लोकसंख्या ९४,२६,९५९ एवढी असुन, ती महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंख्येच्या ८.३९ टक्के इतकी आहे. तसेच, पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमीटरला ६०३ व्यक्ती अशी आहे, तर महाराष्ट्र राज्याची लोकसंख्येची घनता प्रति चौरस किलोमीटरला ३६५ व्यक्ती इतकी आहे.

पुणे जिल्ह्यात एकंदर १४ तहसील असुन, ते पुढीलप्रमाणे होत :

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | जुन्नर | (२) | आंबेगाव | (३) | शिरुर |
| (४) | खेड (राजगुरुनगर) | (५) | मावळ | (६) | मुळशी |
| (७) | हवेली | (८) | पुणे शहर | (९) | दौंड |
| (१०) | पुरंदर | (११) | वेल्हे | (१२) | भोर |
| (१३) | बारामती | (१४) | इंदापूर | | |

वरील तालुक्यांच्या क्षेत्रफळाची, जिल्ह्यामधील एकुण क्षेत्रफळाशी तुलनात्मक आकडेवारी पाहता, शिरुर तालुक्याचे क्षेत्र हे सर्वात मोठे म्हणजे १० टक्के तर पुणे शहर तालुक्याचे क्षेत्र हे सर्वात अल्प म्हणजे केवळ १ टक्का असल्याचे दिसते. त्याच बरोबर आंबेगाव, पुरंदर, मुळशी आणि मावळ या तालुक्यांचे क्षेत्र अनुक्रमे ७ टक्के, दौंड ८ टक्के, इंदापूर, बारामती, हवेली, खेड व जुन्नर यांचे क्षेत्र प्रत्येकी ९ टक्के तर भोर व वेल्हा या दोन तालुक्यांचे क्षेत्र ६ टक्के व ३ टक्के असल्याचे आढळते.

पुणे जिल्ह्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिका असुन, खडकी, देहुरोड येथे कॅन्टोन्मेंट बोर्ड (कटक मंडळे) आहेत. तसेच, खेड (राजगुरुनगर) तालुक्यात आळंदी, पुरंदर तालुक्यात सासवड व जेजुरी, मावळ तालुक्यात तळेगांव दाभाडे व लोणावळा आणि भोर, दौंड, बारामती, शिरुर, जुन्नर आणि इंदापूर तालुक्यांमध्ये, प्रत्येकी एक, याप्रमाणे, एकुण ११ नगरपालिका अस्तित्वात आहेत. पुणे शहर वगळता, उर्वरित १३ तालुक्यात पंचायत समित्या आहेत. पुणे जिल्ह्यात एकुण १,८६६ खेडी असुन, त्यापैकी १८ खेडी ओसाड आहेत. पुणे जिल्ह्यात डिसेंबर २०१० अखेर १,४०७ ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या.

प्रशासकीय सोयी व सुलभतेसाठी, पुणे जिल्ह्याचे तीन उपविभाग करण्यात आले आहेत. प्रशासकीय विभागाचे मुख्यालय आणि त्यात समाविष्ट होणारे तालुके, यांचा तपशील खालील तक्ता क्र. ४.२ वरुन स्पष्ट होतो.

तक्ता क्र. ४.२

पुणे जिल्ह्यातील प्रशासकीय विभाग

*(१५ ऑगस्ट २०१२ पर्यंत)*

| अनु. क्र. | उपविभाग | मुख्यालय | समाविष्ट तालुके |
|---|---|---|---|
| १. | पुणे | पुणे शहर | पुणे शहर, हवेली, भोर, वेल्हे, मावळ आणि मुळशी. |
| २. | खेड | खेड (राजगुरुनगर) | खेड, आंबेगाव, जुन्नर आणि शिरुर. |
| ३. | बारामती | बारामती | बारामती, इंदापूर, दौंड आणि पुरंदर. |

*स्त्रोत : संचालक, फलोत्पादन संचालनालय, महाराष्ट्र शासन, पुणे. वर्ष २०१३, पृ. क्र. १०.*

वरील तक्ता क्र. ४.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पुणे, खेड आणि बारामती, अशा तीन उपविभागांचा समावेश पुणे जिल्ह्यातील प्रशासकीय विभागात होतो. १५ ऑगस्ट २०१२ पासुन राज्यात १५० उपविभाग स्थापन झाले असुन, प्रत्येक उपविभागामध्ये दोन तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

नव्या संरचनेप्रमाणे, पुणे जिल्ह्यात एकुण सात उपविभाग प्रस्थापित करण्यात आले असुन, त्यांचा तपशील पुढील तक्ता क्र. ४.३ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता क्र. ४.३

पुणे जिल्ह्यातील प्रशासकीय विभाग

*(१५ ऑगस्ट २०१२ नंतर)*

| अनु. क्र. | उपविभाग | मुख्यालय | समाविष्ट तालुके |
|---|---|---|---|
| १. | पुणे | पुणे शहर | पुणे शहर, हवेली. |
| २. | मावळ | वडगांव मावळ | मावळ, मुळशी. |
| ३. | बारामती | बारामती | बारामती, इंदापूर. |
| ४. | जुन्नर | जुन्नर | जुन्नर, आंबेगांव. |
| ५. | भोर | भोर | भोर, वेल्हे. |
| ६. | खेड | खेड (राजगुरुनगर) | खेड, शिरुर. |
| ७. | पुरंदर | सासवड | पुरंदर, दौंड. |

*स्त्रोत : दैनिक लोकसत्ता, ''राज्यात १५ ऑगस्ट २०१२ पासुन, १५० नवे उपविभाग,'' खास प्रतिनिधी, दि. ६ जुलै, २०१२, पृ. क्र. १.*

## ४.५ पुणे जिल्ह्याची लोकसंख्या आणि ग्रामीण–शहरी प्रमाण :

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत, मानवी संसाधनाला अनन्यसाधारण महत्त्व असते. लोकसंख्येचा आकार, कामकरी लोकसंख्येचे प्रमाण, मानवी भांडवलाचा दर्जा आणि गुणवत्ता, अशा घटकांवर स्थानिक प्रदेशाचा विकास अवलंबुन असतो. असे जरी असले तरी, अतिरिक्त लोकसंख्येमुळे बेरोजगारी, बेकारी, दारिद्रय, जागेची कमतरता, अशा विविध समस्या निर्माण होऊन, नागरी विकासाच्या प्रक्रियेत अनेक अडचणी आणि समस्या निर्माण होतात.

पुढील पृष्ठ क्र. १४४ वरील तक्ता क्र. ४.४ मध्ये भारत, महाराष्ट्र आणि पुणे जिल्ह्यातील २००१ आणि २०११ सालांमधील लोकसंख्येच्या महत्त्वाच्या निर्देशांकाची तुलनात्मक स्थिती दर्शविली आहे.

### *लोकसंख्येचे ग्रामीण–शहरी प्रमाण :*

२०११ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्र राज्याच्या एकुण लोकसंख्येपैकी ५४.८० टक्के जनता ग्रामीण भागातील असुन, ४५.२३ टक्के जनता शहरी (नागरी) भागात राहते. २००१ सालात हेच प्रमाण अनुक्रमे, ५७.५७ टक्के आणि ४२.४३ टक्के इतके होते. राष्ट्रीय स्तरावर २००१ ते २०११ या कालखंडात, ग्रामीण भागात राहणाऱ्या जनतेचे प्रमाण ७२.२० टक्क्यांवरुन घटुन ते ६८.८० टक्क्यांपर्यंत खाली आल्याचे दिसते. तर याच कालखंडात, शहरी (नागरी) भागातील लोकसंख्येचे प्रमाण वाढुन २७.८० टक्क्यांवरुन ३१.२० टक्क्यांपर्यंत पोहचल्याचे दिसते. प्रस्तुत कालखंडातील, पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे शेकडा प्रमाण ४१.९२ टक्क्यांवरुन कमी होऊन ते ३९.१० टक्क्यांवर पोहचल्याचे आढळते तर ग्रामीण भागातुन शहरी भागात जाण्याचा ओढा असल्यामुळे, शहरी भागातील लोकसंख्येचे हे प्रमाण ५८.८० टक्क्यांवरुन वाढुन ६०.९१ टक्क्यांवर पोहचल्याचे दिसते.

थोडक्यात, पुणे जिल्ह्यातील शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे शेकडा ६०.९१ टक्के हे प्रमाण संपुर्ण भारताच्या आणि महाराष्ट्राच्या तुलनेत सर्वाधिक असल्याचे आढळते. शहरी (नागरी) लोकसंख्येच्या बाबतीत, पुणे जिल्ह्याचा राज्यात चौथा क्रमांक लागतो. पुणे जिल्ह्यातील पुणे शहर तालुक्यातील, नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण शेकडा ९९.०९ टक्के असुन, हवेली तालुक्यात हेच प्रमाण शेकडा ७४.८७ टक्के आढळते. तर मावळ तालुक्यातील हे प्रमाण ८०.९३ टक्के असुन, इंदापूर तालुक्यात हेच प्रमाण शेकडा ९३.४० टक्के असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे, ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण तालुकानिहाय मुळशी तालुका ९३.७४ टक्के, आंबेगांव तालुका ९३.५५ टक्के, जुन्नर तालुका ९३.३१ टक्के आणि शिरुर तालुक्यात ९१.३१ टक्के असल्याचे दिसते. इतर तालुक्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे आढळते.

तक्ता क्र. ४.४

पुणे जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीची तुलनात्मक स्थिती (२००१ आणि २०११)

| अनु. क्र. | तपशील | साल २००१ | | | साल २०११ | | | साल २००१ ते २०११ या कालखंडातील बदल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १. | क्षेत्रफळ (चौरस किलोमीटर) | ३२,८७,२६३ | ३,०७,७१३ | १५,६४२ | ३२,८७,२७३ | ३,०७,७१३ | १५,६४२ | काही नाही | काही नाही | काही नाही |
| २. | एकुण लोकसंख्या (हजारात) | १,०२,८७,३७ | ९,६८,७९ | ७२,३३ | १,२१,०१,९३ | ११,२३,७२ | ९४,२६ | १८,१४,,५६ | १,५४,९३ | २१,९३ |
| ३. | लोकसंख्येची घनता (चौरस किलोमीटर) | ३२५ | ३१५ | ४६२ | ३८२ | ३६५ | ६०३ | ५७ | ५० | १४१ |
| ४. | ग्रामीण लोकसंख्येचे शेकडा प्रमाण (%) | ७२.७० | ५७.५७ | ४१.९२ | ६८.८० | ५४.८० | ३९.१० | उणे ३.९ | उणे २.७७ | उणे २.८१ |
| ५. | शहरी लोकसंख्येचे शेकडा प्रमाण (%) | २७.३० | ४२.४३ | ५८.०८ | ३१.२० | ४५.२३ | ६०.९० | ३.९० | २.८० | २.८१ |
| ६. | स्त्री-पुरुष प्रमाण सर्व वयोगट (दर हजारी) | ९३३ | ९२२ | ९१९ | ९४० | ९२५ | ९१० | ७ | ३ | उणे ९ |
| ७. | स्त्री-पुरुष प्रमाण (वय वर्षे ६ पर्यंत) (दर हजारी) | ९२७ | ९१३ | ९०२ | ९१४ | ८८३ | ८७३ | उणे १३ | उणे ३० | उणे २९ |

पुढे चालु ...

तक्ता क्र. ४.४ (पुढे चालु ...)

पुणे जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीची तुलनात्मक स्थिती (२००१ आणि २०११)

| अनु. क्र. | तपशील | साल २००१ | | | साल २०११ | | | साल २००१ ते २०११ या कालखंडातील बदल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा | भारत | महाराष्ट्र | पुणे जिल्हा |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| ८. | साक्षरतेचे शेकडा प्रमाण (%) (वय वर्षे ७ व त्यावरील वयोगट) | ६४.८३ | ७६.८८ | ८०.४५ | ७४.०४ | ८२.९१ | ९२.७२ | ९.२१ | ६.०३ | १२.२७ |
| ९. | कर्ती लोकसंख्या टक्केवारी (%) | ३९.१० | ४२.५० | ४०.८५ | ५४.४० | ५९.६० | उपलब्ध नाही | १५.३० | १७.१० | उपलब्ध नाही |
| १०. | वयोगट रचना (वय वर्षे ० ते ६ पर्यंत) | १५.९३ | १४.११ | १३.४० | १३.१२ | ११.४३ | ११.३२ | उणे २.८१ | उणे २.६८ | उणे २.०८ |
| ११. | वयोगट रचना (वय वर्षे ६ व त्यावरील वयोगट) | ८४.०७ | ८५.८९ | ८६.६० | ८६.८८ | ८८.५७ | ८८.६८ | २.८१ | २.६८ | २.०८ |

*स्त्रोत : १) Government of India, (2011), "Provisional Population - Total India," Registrar General and Censes Commissioner, Government of India.*

*२) India - Human Development Report, (2011), Oxford Press, Delhi.*

*३) पुणे जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, वर्ष २०११, पृ. क्र. १.*

*४) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१२–१३, पृष्ठ क्र. १३ ते १८.*

## ४.६ पुणे जिल्ह्यातील बँका आणि वित्तसंस्था :

आर्थिक विकासात बँका आणि वित्तसंस्था अत्यंत महत्त्वाची भुमिका बजावताना दिसतात. दि. ३१ मार्च २०११ अखेर, पुणे जिल्ह्यातील बँका व वित्तसंस्थांची व्यापकता, खालील तक्ता क्र. ४.५ वरुन स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.५

पुणे जिल्ह्यातील बँका आणि वित्तसंस्था

*( ३१ मार्च २०११ अखेर)*

| अनु. क्र. | बँका / वित्तसंस्थांचा प्रकार | बँका / वित्तसंस्थांची संख्या | ग्रामीण भागातील शाखा | शहरी भागातील शाखा | एकुण शाखा व शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|
| १. | व्यापारी बँका | ६२ | २२६ | ५२२ | ७४८ (३१.१३) |
| २. | प्रादेशिक ग्रामीण बँका | २ | २ | ० | २ (०.०८) |
| ३. | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | १ | २०७ | ३९ | २४६ (१०.२४) |
| ४. | कृषी सहकारी व ग्रामीण विकास बँका | १ | २३ | १ | २४ (१.००) |
| ५. | प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था | १,२९३ | १,२९३ | ० | १,२९३ (५३.८१) |
| ६. | बिगर कृषी सहकारी पतसंस्था आणि इतर | ९० | ० | ९० | ९० (३.७४) |
| | पुणे जिल्हा एकुण शेकडा प्रमाण (%) | १,४५२ | १,७५१ ७२.८७ | ६५२ २७.१३ | २,४०३ १००.०० |

*टिप : कंसातील आकडे एकुणाशी शेकडा प्रमाण दर्शवितात.*

*स्त्रोत : वार्षिक पतपुरवठा आराखडा, २०१२-१३, वार्षिक ऋण योजना, पुणे जिल्हा, पृ. क्र. ९.*

## ४.७ पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य, बेरोजगारी आणि विविध क्षेत्रातील रोजगाराची स्थिती :

### ४.७.१ पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य आणि बेरोजगारी :

२०११ च्या आकडेवारीनुसार, पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एकुण १४,९०,५६९ कुटुंबांपैकी १,९२,४६८ म्हणजे १२.९१ टक्के कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील जीवन जगत असल्याचे दिसते. तर शहरी

भागातील ८,६५,१४६ कुटुंबांपैकी ३६,७१० म्हणजेच ४.२४ टक्के कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली असुन ग्रामीण भागातील ६,२५,८२३ कुटुंबांपैकी १,५५,७५८ म्हणजे २४.९ टक्के कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील जीवन जगतात. शहरी भागातील दारिद्र्याचा तालुकानिहाय विचार करता, जुन्नर तालुक्यात दारिद्र्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३१.२९ टक्के असुन पुणे शहरात हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे केवळ १.८९ टक्के असल्याचे दिसते. ग्रामीण भागातील आंबेगाव तालुक्यात दारिद्र्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे २९.९ टक्के असुन भोर तालुक्यात ते सर्वात कमी म्हणजे २२.६७ टक्के असल्याचे आढळते. यावरुन पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात शहरी भागापेक्षा दारिद्र्याचे प्रमाण जास्ती असुन तालुकानिहाय भिन्नता आढळुन येते.

### ४.७.२ पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील रोजगाराची स्थिती :

जिल्ह्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांकडे २०१०-११ वर्षाअखेर नोंदणी झालेल्या २,२०,२८८ उमेदवारांपैकी ८१,२९९ म्हणजेच केवळ ३६.९१ टक्के उमेदवारांनाच रोजगार प्राप्त झाला असुन उर्वरित ६३.०९ टक्के उमेदवारांना रोजगार उपलब्ध होऊ न शकल्याचे दिसते. पुणे जिल्ह्यातील एकुण ८,३९,०३० कामगारांपैकी ६,५३,५६१ कामगार म्हणजे शेकडा ७७.८९ टक्के कामगार हे खाजगी क्षेत्रात कार्यरत असुन निम-शासकिय वा शासकिय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगारांची संख्या ही अनुक्रमे ९९,८१३ म्हणजे शेकडा ११.१० टक्के आणि ८५,६६३ शेकडा १०.२९ टक्के असल्याचे आढळते. जिल्ह्यातील एकंदर कामगारांचे क्षेत्रीय वर्गीकरण केल्यास, सर्वाधिक म्हणजे ४,६१,२१७ शेकडा ५४.९७ टक्के कामगार हे औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असुन त्या खालोखाल सामुहिक, सामाजिक आणि वैयक्तिक सेवांतर्गत १,४९,२०४ कामगार, शेकडा १७.७८ टक्के तर वीज, गॅस व पाणीपुरवठा क्षेत्रात १,०२,३८० म्हणजेच १२.२० टक्के, परिवहन, गोदामे व दळणवळण क्षेत्रात ३६,७९२ म्हणजे ४.३९ टक्के कामगार कार्यरत आहेत. उर्वरित क्षेत्रातील कामगारांची संख्या ही केवळ ४ टक्क्यांपेक्षा कमी असल्याचे दिसते. कृषी क्षेत्रात तर केवळ २.०५ टक्के कामगार काम करीत असल्याचे निदर्शनास येते.

## ४.८ महाराष्ट्र शासनाच्या महिला विकास योजनांचा आढावा :

### ४.८.१ प्रस्तावना :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंचवार्षिक योजनांच्या नियोजनातुन समाजातील सर्व घटकांचा विकास साधण्याची ध्येये निश्चित करण्यात आली. त्या अंतर्गत महिलांचे प्रश्न, त्यांच्या मुलभूत गरजांची मांडणी व मागणी, भौगोलिक परिस्थितीच्या संदर्भात विचारात घेऊन, विकासाचे ध्येय गाठण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुनच 'महिला' हे कोणत्याही कल्याणकारी योजनेचे उद्दिष्ट होते. १९५३ मध्ये 'केंद्रीय कल्याणकारी बोर्ड' स्थापन करण्यात

आले. कल्याणकारी दृष्टिने महिलांच्या समस्यांकडे जेव्हा बघितले जाते, तेव्हा त्यात परावलंबी, मध्यमवर्गीय गृहिणीची जगण्याची रीत विचाराच्या पातळीवर अदृश्य रुपात वावरत असते. कल्याणकारी दृष्टिकोन किंवा समुदाय विकासाचा दृष्टिकोन, या दोहोंमधुन महिला मंडळे व स्त्रियांच्या संघटनात्मक गटांची, सामुहिकतेची कल्पना पुढे येऊ लागली. विकासाच्या कामात समाजाचा सहभाग आवश्यक आहे. समाज व शासन, ही एकाच रथाची दोन चाके असुन, ती समांतर दिशेने, समान वेगात गतीमान झाल्यासच, प्रगती पथावरुन मार्गोत्क्रमण होऊ शकते, याची जाणीव शासनाला आणि सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनांना झाली.

खऱ्या अर्थाने, २० व्या शतकाच्या शेवटच्या त्रिदशकांमध्ये, म्हणजे साधारणपणे, १९७० सालानंतर समाजाचा विकास साधावयाचा असेल तर समाजाचा अर्धा भाग असलेल्या महिलांचा विकास व स्वयंपुर्णता आवश्यक असल्याचे समाजधुरीणांच्या नजरेस आले. महिलांबाबत होणारे सर्व प्रकारचे भेदभाव, दुय्यमत्व, हीन वागणुक दूर करण्यासाठी, संयुक्त राष्ट्र संघटनेने, १९७९ मध्ये पाऊले उचलण्यास सुरुवात केली. १९९५ मध्ये बिजींग येथील चौथ्या जागतिक महिला परिषदेने महिला विकासाचा आराखडा तयार केला. त्या आधीच, भारत सरकारने घटना दुरुस्ती करुन महिलांसाठी शासकिय संस्थांमध्ये १/३ आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला.

महाराष्ट्र शासनानेही, सन १९९४ मध्ये, महिला धोरण तयार करुन देश पातळीवर प्रथम राज्य होण्याचा मान मिळविला. या महिला विषयक धोरणात दर ३ वर्षांनी आढावा घेण्याची तरतुदही करण्यात आली. सन १९९१-९२ मध्ये, महाराष्ट्र शासनाने, महिला व बाल विकास विभाग, स्वतंत्रपणे सुरु केला. राज्याच्या व राष्ट्राच्या विकासात आणि अर्थव्यवस्था सक्षम बनविण्यामध्ये महिलांचा सहभाग निर्विवादपणे मोठा राहिला आहे, हे मान्य करण्यात आले. त्यांचे संरक्षण, आर्थिक स्वावलंबन, महिलांच्या क्षमतांचे संवर्धन, निर्णय प्रक्रियेतील महिलांचा सहभाग, अनुकुल वातावरण निर्मिती, यांचा विचार शासनाने सन २००१ च्या जाहीर केलेल्या महिला धोरणात सर्वानुमताने व सर्वांच्या सहमतीने मान्य केला. येथुन पुढे महिलांना केंद्रस्थानी मानुनच कोणतेही नियोजन करण्याचे ठरले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्थानिक संस्था स्तरावर विशिष्ट व पुरेसा आर्थिक निधी राखुन ठेवण्याचे प्रयोजन करण्यात आले. त्या राखीव निधीच्या वापरातुन प्राप्त उद्दिष्टांचे बाह्य यंत्रणेकडुन 'जेंडर ऑडिट' करण्याचे ठरविले.

२००२-२००३ या आर्थिक वर्षापासुन, महिलांना केंद्रीभुत मानुन, शासकीय नियोजन केले जाऊ लागले. त्यानुसार -

- महिलांना सक्षम बनविण्यासाठी कोणते धोरण, योजना आणि कार्यक्रम राबविण्यात येणार, त्यासाठी किती निधी देण्यात येणार आणि त्यांचा महिलांवर होणारा परिणाम, या गोष्टींचा विचार करुन, प्रत्येक शासकीय विभाग त्यांच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात, महिलांच्या सक्षमीकरणाला, केंद्रस्थानी मानुन, वार्षिक योजनांचे वा कार्यक्रमाचे नियोजन करेल, हे स्पष्ट करण्यात आले.
- शासकीय योजना व कार्यक्रमांच्या आखणीत, नियोजनात आणि अंमलबजावणीत प्रत्येक क्षेत्रात महिलांना सहभागी करुन घेतले जाईल आणि त्याचा उल्लेख महिला सक्षमीकरणासाठीच असेल, हे ठरविण्यात आले.
- यापुढे सामाजिक-आर्थिक दर्जाचे विश्लेषण करताना, पुरुष-स्त्री, अशी स्वतंत्र विभागणी करण्यात येईल.
- शासकीय अर्थ संकल्प तयार करण्याची प्रक्रिया सुरु असताना, महिला संघटनांशी विचार विनिमय करण्यात येईल.
- राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीमध्ये, महिलांच्या घरकामाच्या मुल्यांचा समावेश केला जावा, अशी शिफारस राज्यशासन केंद्र शासनाला करेल, हे ठरविण्यात आले.
- आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात, महिलांच्या सक्षमीकरणाला देशाच्या आर्थिक विकासात पुरेशी संधी उपलब्ध असल्याचे मान्य करण्यात आले. परंतु त्या संदर्भात पुरेसे मुल्यमापन होत नसल्यामुळे, त्याचे आर्थिक पैलु ठळकपणे स्पष्ट होत नसल्याचे लक्षात आले. त्याकरीता पुरेसा शासकीय निधी उपलब्ध होत नसल्याचेही दिसुन आले. अशा प्रकारचे मुल्यमापन नियोजनाचा भाग म्हणुन, नियमितपणे करण्यात येईल, अशी ग्वाही शासनाकडुन देण्यात आली.
- सर्व नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, सर्व स्तरांवरील वार्षिक आणि पंचवार्षिक महिला सक्षमीकरण योजना तयार करतील. विविध स्तरांमधील महिला बाल विकास समित्यांकडुन या योजनांचा समन्वय साधण्यात येईल व त्या त्या पातळीवरील संस्थांकडुन म्हणजे ग्राम पंचायत, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपालिका, महानगरपालिकांकडुन, या योजनांचा आढावा घेण्यात येईल हे ठरविण्यात आले.

### ४.८.२ महिलांसाठी सनद :

सर्व शासकीय, निमशासकीय विभाग, स्थानिक संस्था, शासनमान्य आणि शासन सहाय्यित इतर संस्था, महिलांना सक्षम करण्यासाठीच्या कृती कार्यक्रमाची सनद (चार्टड फार वुमेन) तयार करतात. संबंधित विभागांकडुन या बाबतीत त्यांच्या अंतर्गत असलेल्या किंवा एकमेकांशी संलग्न असलेल्या संस्थांकरिता मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येतात. त्या अनुषंगाने, झालेल्या कार्यवाहीचा रितसर आढावा घेण्यात येतो. संस्थांना अनुदान मान्यता किंवा परवानगीच्या अटी, नियम व शर्तीत या

सनदेचा व तिच्या अंमलबजावणीचा अंतर्भाव करण्यात येतो. दरवर्षी ३ जानेवारी रोजी पाळण्यात येणाऱ्या 'सावित्रीबाई फुले स्त्री मुक्तिदिनी' या सर्व संस्था या सनदेचा आढावा घेतात आणि सनदेस मान्यता देतात. सनदेच्या संदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती प्रत्येक विभागाकडुन कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या महिला सक्षमीकरणाच्या प्रकरणामध्ये देण्यात येते.

### ४.८.३ महिलांच्या सक्षमीकरणासाठी निधी :

- आदिवासींसाठी 'आदिवासी उपाययोजना' आणि अनुसूचित जातीसाठी असलेली 'विशेष घटक योजना' यांच्या धर्तीवर 'महिला घटक योजना' तयार करण्यात येते. त्यामुळे महिलांच्या विकास कार्यक्रमासाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकतो. निरनिराळ्या योजनांची विसंगती आणि पुनरावृत्ती टाळुन, उपलब्ध निधीमधुन एकत्रितपणे महिला कार्यक्रम राबविण्यात येतात. या महिला घटक योजनेत महिला विकासासाठी घेण्यात येणारे विविध कार्यक्रम आणि निरनिराळ्या स्त्रोतांमधुन उपलब्ध असणारा निधी दाखविण्यात येतो.
- सध्या नागरी संस्थांच्या महसुली उत्पन्नाच्या पाच टक्के रकमेतुन खर्च वजा जाता उरणारी रक्कम महिला व बाल कल्याणावर खर्च केली जाते. ही रक्कम पंचायत राज संस्थांप्रमाणे दहा टक्क्यांपर्यंत वाढविण्यात येते. नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत या रकमेतील खर्च न झालेली शिल्लक रक्कम पुढील वर्षाच्या आर्थिक तरतुदीत समाविष्ट केली जाते.
- महिला आणि बाल कल्याणासाठी नागरी व ग्रामीण स्थानिक संस्थांप्रमाणेच, सहकारी संस्था, मार्केट यार्डस, शैक्षणिक संस्था, यांनी विशिष्ट निधी राखुन ठेवलेला असतो.

महिला विकास धोरण यशस्वी करण्यासाठी, शासकीय जाणीव जागृती निर्माण करणे अत्त्यावश्यक आहे. यासाठी महिला कल्याण आणि विकास कार्यक्रमांसाठी नवजागृतीचा कार्यक्रम आखणे, महिला विकासाच्या आवश्यकतेबद्दल लोकप्रतिनिधी आणि विविध संस्थांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर विविध योजनांची माहिती देणारी केंद्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. महिला धोरणांच्या संनियंत्रण आणि पर्यवेक्षणासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात येते. या समितीची बैठक दर तीन महिन्यांनी घेण्यात येते. दर तीन महिन्यांनी या समितीचा महिला विकासासंदर्भात करण्यात आलेल्या कार्यवाढीच्या प्रगतीची महिला व बाल विकास मंत्री माहिती देतात. मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली राज्यपातळीवर कृती दल (टास्क फोर्स) तसेच, जिल्हा पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आणि महापालिका क्षेत्रात महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण समित्या स्थापन केल्या जातात. या सर्व समित्यांवर महिला सक्षमीकरणाशी संबंधित संघटनांना प्रतिनिधीत्व दिले जाते.

महाराष्ट्र राज्यातील महिलांचा शारीरिक, मानसिक आणि भावनिक जीवनाची गुणवत्ता सुधारणे, हे या धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. जीवनाच्या सर्व अंगांमध्ये म्हणजेच राजकीय, आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये, स्त्रियांसाठी समानता प्रस्थापित करण्यानेच हे उद्दिष्ट सफल व साध्य होऊ शकेल. जिल्हा ते राज्य स्तरापर्यंत नियोजन प्रक्रियेच्या प्रत्येक पातळीवर महिला आयोगाच्या सदस्यांचा सहभाग राहील, अशा प्रकारे महिला आयोगाची कार्यकक्षा व भुमिका निश्चित करण्यात येते. महिला आयोग आणि सर्व महिला विकास योजना, यांमध्ये कायमस्वरुपी व परिणामकारक सुसंवाद होण्यासाठी नियोजन खात्यामध्ये शासनाच्या उपसचिवांच्या अधिकाराखाली एक विशेष कक्ष तयार करण्यात येतो. महिलांच्या विविध प्रश्नांसंबंधी सरकारला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी आयोग संदर्भ केंद्र म्हणुन काम करते. तसेच, राज्याच्या सर्व भागांमधील महिला विषयक अभ्यास केंद्रांशी शासनाचा दुवा साधण्यासाठी आयोगास योग्य मदतीने सक्षम करण्यात येते. महाराष्ट्रातील महिलांचा दर्जा, या विषयावर राज्य महिला आयोग एक अहवाल तयार करुन देते, या महत्त्वाच्या आधारे पुढील कृती योजना आखण्यात येते.

### ४.८.४ महिला सक्षमीकरण समिती :

(शासन निर्णय – महिला व बाल विकास विभागाचे दि. २१–३–२००० च्या शासन निर्णय क्र. एम्. आय्.एस्.–१०९९ /प्र.कृ. ३ /का–१०) महिला धोरण २००१ मध्ये, व्यवस्थापन व संनियंत्रणाबाबत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय, महिला सक्षमीकरण समिती, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण कृतिदल आणि जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सक्षमीकरण समिती, स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असुन सदर समित्या महिला घटक योजनेअंतर्गत राज्याशासनाच्या योजना आणि केंद्रशासन पुरस्कृत आणि युनिसेफ पुरस्कृत योजनांचा आढावा घेण्यासाठी नेमण्यात येत आहे. या शासन निर्णयानुसार नेमण्यात आलेल्या समितीची कार्यवाही, राज्यस्तरीय महिला सक्षमीकरण कृतिदलाकडे सोपविण्यात येत असुन, वरील संदर्भातील शासन निर्णयानुसार नेमण्यात आलेली समिती रद्द करण्यात येत आहे. महिला घटक योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांसाठी किंवा केंद्रशासन पुरस्कृत योजनांसाठी राज्यस्तरावर आणि जिल्हास्तरांवर निर्माण करण्यात आलेल्या समित्या स्थापुन, त्या सर्व समित्यांचे काम नियुक्त करण्यात आलेल्या समितीकडे सोपविण्यात येते.

- *महिला सक्षमीकरण समितीची रचना :*

| | | |
|---|---|---|
| मा. मुख्यमंत्री | .... | अध्यक्ष |
| मा. उपमुख्यमंत्री | .... | उपाध्यक्ष |
| मा. महिला व बाल विकास मंत्री | .... | उपाध्यक्ष |
| मा. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्री | .... | सदस्य |
| मा. ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता विभाग मंत्री | .... | सदस्य |
| मा. नगर विकास विभाग राज्यमंत्री | .... | सदस्य |
| मा. उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्री | .... | सदस्य |
| मा. शालेय शिक्षण विभाग मंत्री | .... | सदस्य |
| मा. कृषी विभाग मंत्री | .... | सदस्य |
| सर्व महिला राज्यमंत्री | .... | सदस्य |
| मुख्य सचिव | .... | सदस्य |
| अध्यक्ष – नाबार्ड | .... | सदस्य |
| पोलिस महासंचालक | .... | सदस्य |
| युनिसेफचे क्षेत्रीय प्रतिनिधी | .... | सदस्य |
| अध्यक्ष – सी.सी.आय्. (पश्चिम विभाग) | .... | सदस्य |
| अध्यक्ष – महिला आर्थिक विकास महामंडळ | .... | सदस्य |
| अध्यक्ष – महाराष्ट्र राज्य महिला आोग | .... | सदस्य |
| अध्यक्ष – महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार बोर्ड | .... | सदस्य |
| अध्यक्ष – इंडियन मेडिकल कौन्सिल | .... | सदस्य |
| अध्यक्ष – बार असोसिएशन | .... | सदस्य |
| एस्.एन्.डी.टी. विद्यापीठाचे प्रतिनिधी | .... | सदस्य |
| टाटा सामाजिक विज्ञान संस्था – संचालक | .... | सदस्य |
| एका मजदुर संघटनेचे अध्यक्ष | .... | सदस्य |
| महासंचालक, प्रसिद्धी व जनसंपर्क | .... | सदस्य |
| अध्यक्ष – पत्रकार संघ | .... | सदस्य |
| अध्यक्ष – भारतीय संघटना | .... | सदस्य |
| नामांकित महिला संस्था (३) | .... | सदस्य |
| महिला क्षेत्रात काम करणाया नामांकित व्यक्ती (३) | .... | सदस्य |
| प्रधान सचिव /सचिव – महिला व बालकल्याण विभाग | .... | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे महिला सक्षमीकरण समितीची रचना असुन, ती प्रामुख्याने मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येते.

- *जिल्हा स्तरावर महिला सक्षमीकरण समितीची रचना :*
  - जिल्हाधिकारी .... अध्यक्ष
  - मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद .... सदस्य सचिव
  - जिल्हा पोलिस प्रमुख .... सदस्य
  - अध्यक्ष, महिला व बाल कल्याण समिती .... सदस्य
  - नगर परिषद, महानगरपालिका .... सदस्य
  - जिल्हा लीड बँक ऑफिसर .... सदस्य
  - महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र .... सदस्य
  - सामाजिक विज्ञान /समाजशास्त्र /महिला विद्यालयाचे प्राचार्य .... सदस्य
  - जिल्ह्यातील महिला खासदार /आमदार .... सदस्य
  - जिल्हा प्रसिद्धी अधिकारी .... सदस्य
  - जिल्ह्यातील महिला आयोगाचे प्रतिनिधी .... सदस्य
  - स्थानिक महिला संस्थांचे प्रतिनिधी .... सदस्य
  - जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी .... सदस्य
  - महिला सुरक्षा क्षेत्रात काम करणारी नामांकित व्यक्ती .... सदस्य
  - महिला आर्थिक क्षेत्रात काम करणारी व्यक्ती वा संस्था .... सदस्य

वरीलप्रमाणे जिल्हा स्तरावर महिला सक्षमीकरण समितिची रचना आहे. या महिला सक्षमीकरण समित्यांची बैठक दर तीन महिन्यांतुन घेण्यात येते. जिल्हा समितीला आपला अहवाल महिला व बाल विकास विभागात नियमितपणे सादर करावा लागतो. तो कृतीदलापुढे आढाव्यासाठी पाठविला जातो.

### ४.८.५ जिल्हा परिषदांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या महिला व बाल कल्याण समित्यांचे कार्य व निधी :

- *प्रस्तावना :*

महिला व बाल विकासाशी संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे व्हावी, या हेतुने शासनाने दि. २४-४-१९९२ रोजी, महाराष्ट्र अधिनियम २ /१९९२ अन्वये, सर्व जिल्हा परिषदांमध्ये एका नवीन महिला व बाल कल्याण समितीची स्थापना केली. सदर समिती, ही वैधानिक स्वरुपाची

असल्याने, जिल्हा परिषदांमधील इतर विषय समित्यांसारखेच या समितीला अधिकार देण्यात आले. या समितीची कार्ये आणि निधी उपलब्धतेबाबत या विभागाने वेळोवेळी सुचना दिल्या असल्या तरी राज्यातील जिल्हा परिषदा दर वर्षी त्यांच्या स्वतःच्या उत्पन्नातुन किमान १० टक्के रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिला व बाल विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी अर्थसंकल्पित करीत नसल्याने अनुशेषाच्या रकमेत दरवर्षी भर पडत असते.

- *शासन निर्णय :*

महिला व बाल विकाससंबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी योग्य प्रकारे करण्याच्या उद्देश्याने शासनाने, दि. २४-४-१९९२ रोजी महिला व बाल कल्याण समितीची स्थापना केली असुन, जिल्हा परिषदेच्या अन्य समित्यांप्रमाणेच या समितीला अधिकार आहेत. महिला व बाल कल्याणासाठी काही वेगळ्या योजना चालु करावयाच्या असतील तर आयुक्त, महिला व बाल विकास संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या मान्यतेने अशा नवीन योजना, समिती सुरु करु शकते.

महिला व बाल कल्याण समितीसाठी, जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातुन, किमान १० टक्के रक्कम उपलब्ध करुन द्यावी, अशी सुचना यापुर्वीच सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्याशिवाय, जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या तरतुदींमधुन दरवर्षी रु. १0.00 लाख या प्रमाणे १९९४-९५ सालापासुन अनुदानाच्या स्वरुपात सदर समितीस उपलब्ध करुन देण्याबद्दलचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचप्रमाणे, शासनाने महिलांच्या विकासाबाबत नव्याने धोरण जाहीर केले असुन, त्यानुसार ग्रामपंचायतीच्या उत्पन्नापैकी १0 टक्के उत्पन्न महिला व बालकांच्या संबंधीत कार्यक्रमावर खर्च करण्यावर भर दिला आहे.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीकडुन, सन २000-0१ च्या तिसऱ्या अहवालाद्वारे, शासनाच्या असे निदर्शनास आणुन दिले की, राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेने दरवर्षी स्वतःच्या उत्पन्नातुन, किमान १0 टक्के रक्कम, जिल्हा परिषद क्षेत्रातील महिला व बालकांच्या विकास योजना राबविण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी, या सुचनांचे पालन होत नाही. जिल्हा परिषदांकडुन यासाठी स्वउत्पनातुन १0 टक्क्यांपेक्षा कमी रकमेची तरतुद करण्यात येत असल्याने, शासनाच्या सुचनांची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसुन आले. परिणामतः, महिला व बाल विकास योजनांसाठी आवश्यक निधीच्या अनुशेषांच्या रकमेत दरवर्षी भर पडताना दिसते.

### ४.८.६ महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.) :

- *प्रस्तावना :*

महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.) हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम आहे. आंतर–राष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने, २४ फेब्रुवारी १९७५ साली, या महामंडळाची स्थापना झाली. महिलांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्व आणि महामंडळाची या कामातील तज्ञता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय क्र. माविम–२००१ / प्र.क्र. १०, दि. २० जानेवारी २००३ नुसार महामंडळाला महिला विकासाची राज्यस्तरीय 'शिखर संस्था' म्हणुन घोषित केले. राज्यातील महिला विकासाच्या सर्व योजना नियोजनाने राबविण्यासाठी मा.वि.म. ला 'शिखर संस्था' म्हणुन घोषित केले आहे.

- *ध्येय :*

चिरंतर विकास प्रक्रियेतुन महिलांसाठी सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे.

- *उद्दिष्ट्ये :*
- ग्रामीण भागातील महिलांना संघटीत करणे.
- महिलांची क्षमता विकसीत करणे.
- महिलांमध्ये आत्मविश्वास व आत्मनिर्भरता वाढविणे.
- महिलांचा उद्योजकीय विकास घडवुन आणणे.
- रोजगाराच्या संधी व बाजारपेठ, यांची सांगड घालणे.
- महिलांचा शिक्षण, संपत्ती व सत्तेत सहभाग वाढविणे.
- स्थायी विकासासाठी स्वयंसहाय बचत गटांना संख्यात्मक स्वरुप देऊन बळकट करणे.

- *महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कार्यप्रणालीचे स्वरुप :*
- केंद्र व राज्य शासन पुरस्कृत, महिलांसाठीच्या विविध विकासात्मक योजनांसाठी राज्यस्तरीय शिखर संस्था म्हणुन कार्य करणे.
- स्वयंसहाय बचत गट, महिला उद्योजक, महिलांशी संबंधीत विषयांवर कार्यरत स्वयंसेवी संस्थांसाठी 'समन्वयक संस्था' या नात्याने कार्य करणे.
- महिला विकासाच्या विषयावर आधारित खालील स्वरुपाचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
    - क्षमतावृद्धी प्रशिक्षण आणि
    - कौशल्यवृद्धी प्रशिक्षण आणि व्यवसाय प्रशिक्षण (शेतीवर आणि बिगरशेतीवर आधारित.)

महिला आर्थिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असुन, मा.वि.म.ची मुबंईसह ग्रामीण भागात जिल्हा कार्यालये आहेत. माविम मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची अंमलबजावणी मा.वि.म. जिल्हा कार्यालयांतर्फे होत असते. या जिल्हा कार्यालयांच्या प्रमुख योजनांची अंमल बजावणी मा.वि.म. जिल्हा कार्यालयांमार्फत होते. या जिल्हा कार्यालयांचा प्रमुख म्हणुन, जिल्हा समन्वयक अधिकारी, लेखाधिकारी, लिपीक, असा अधिकारी व कर्मचारी वर्ग कार्यरत असतो.

- *महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम :*
- महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम.
- महिला स्वावलंबन निधी.
- महिलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम.
    - महिलांचे हक्क, आधिकार व कायदे व सामाजिक सशक्तीकरण.
    - महिलांच्या विकास योजना, स्वयंसहायता बचत गट, पंचायतराज प्रशिक्षण.
    - आरोग्य व स्वच्छता.
    - आहार व आरोग्य शास्त्र.
- राष्ट्रीय महिला कोष.
- नोरॅड
- स्टेप योजना
- स्वयंसिद्धा प्रकल्प
- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- उद्योग निहाय नोंदणी
- स्वयंसहायता बचत गटांचे महासंघ
- स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना
- महाराष्ट्र शासन पुरस्कृत, विविध महिला विकासाच्या योजनांसंदर्भात सल्ला व मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे.
- महिलांनी तयार केलेल्या वस्तुंकरीता प्रदर्शन व तत्सम माध्यमांमधुन सुरक्षित बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे.
- महिला उद्योजक व महामंडळामार्फत उपहार गृह, फास्ट फुड सेंटर, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे चालविणे.
- नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृह चालविणे.
- स्वयंसहायता बचत गटाच्या संकल्पनेवर आधारित, विविध क्षेत्रातील प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्याचे काम मा.वि.म. करीत आहे.

- सुडा व टुडा योजनेअंतर्गत, गरजु महिलांना मा.वि.म. तर्फे प्रशिक्षण देऊन स्वबळावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

महिला सबलीकरण हा एखादा कार्यक्रम किंवा प्रकल्प नसुन, ती एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सामील होणारी प्रत्येक महिला, खऱ्या अर्थाने, सक्षम झाली आहे, असे तेव्हाच म्हणता येईल, जेव्हा प्रत्येक महिला स्वतःसाठी किंवा आपल्या कुटुंबासाठी स्वतः नियोजन करुन, त्याप्रमाणे, निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करुन, तिला अपेक्षित उद्दिष्ट साध्य करु शकेल. स्वयंसहायता बचत गट हे सबलीकरणाचे प्रभावी व परिणामकारक माध्यम आहे.

**महिला सबलीकरणाचे /सक्षमीकरणाचे विविध घटक आणि मा.वि.म.ची वाटचाल :**

महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत अनेक घटकांचा समावेश आहे, जसे आर्थिक, सामाजिक, राजकिय, आरोग्य, शैक्षणिक, इत्यादी सर्व घटकांचे महिला सबलीकरणासाठी महत्त्व ओळखुन मा.वि.म.ने बनविलेल्या प्रत्येक गटात या घटकांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला आहे.

- ***आर्थिक घटक :***

  महिलांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध छोटे उद्योग-व्यवसाय निर्मितीवर भर दिला जातो. शेतीवर आधारित, कुक्कुटपालन, शेळ्या-मेंढ्या पालन, आळंबीची शेती, फलोत्पादन, भाज्या विकण्याचा व्यवसाय, बी-बियाणे विकण्याचा व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, अशा विविध उद्योग-व्यवसायांचा समावेश होतो. त्याचप्रमाणे, बिगर-शेतीवर आधारित किराणा दुकान, शिवण काम, पिठाची गिरणी, फॉल-पिको, लहान मुलांचे कपडे तयार करणे, स्वेटर्स तयार करणे, मंडप डेकोरेशन व्यवसाय, लॉन्ड्री व्यवसाय, रेडिमेट गारमेंटस्, उपहार गृह, खानावळ, मिरची कांडप केंद्र, बांगड्या विक्री, अशा उद्योगांमध्ये महिलांना प्रोस्ताहित करुन यशस्वी करणे.

- ***सामाजिक घटक :***

  आर्थिक व्यवहारासोबत मा.वि.म.ने जाणीवपुर्वक स्वयंसहायता बचत गटांमध्ये विविध सामाजिक घटकांवर भर दिला आहे. समाजातील सर्व स्तरांमधील महिलांनी, स्वयंसहायत महिला बचत गटात सहभाग घेतल्यावर, महिलांना घरात व समाजात मानाचे स्थान मिळत आहे. त्याच बरोबर, दारु, जुगार, मटका, अशा व्यसनांचे निर्मुलन करणे, तसेच, समाजात चालत आलेल्या बालविवाह, हुंडा, महिलांना विशेषतः पत्नीला होणारी मारहाण, त्यांची होणारी मानसिक व शारीरिक छळवणुक अशा अन्यायी चालीरिती, चुकीच्या व कालबाह्य रुढी, परंपरा आणि अंधश्रद्धांना आळा बसण्यासाठी या महिला बचत गटांचा पुढाकार असतो.

- ***राजकीय घटक :***

  महिला सबलीकरणात महिलांचा राजकारणातील सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गाव पातळीवर, ग्राम पंचायतींमध्ये महिलांचा सहभाग वाढु लागल्यानंतर चांगल्या सुधारणा होऊ लागल्याचे दिसुन येत आहे. एवढेच नव्हे तर, गाव पातळीवरच्या राजकारणातील महिलांचा सक्रिय सहभाग महिलांमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, संघटन, निर्माण करण्यात यशस्वी ठरत आहे. मा.वि.म.च्या आतापर्यंतच्या विविध गटातील ४,९४६ महिला सरपंच, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा सदस्य वा सभापती, अशा उच्च पदांवर निवडुन आल्या असुन, राजकीय क्षेत्रातसुद्धा यशस्वी वाटचाल करीत आहेत.

  स्वयंसहायता महिला बचत गटांसाठी उत्पादन तथा विक्री केंद्र व प्रशिक्षण केंद्र 'माविम महिला प्रांगण' या नावाने कार्यरत आहे. ही केंद्रं फक्त भंडारा, गडचिरोली व वाशिम जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहेत. महिला उद्योजकांनी तयार केलेल्या वस्तुंना चांगली बाजारपेठ मिळावी, या हेतुने मा.वि.म. जिल्हा कार्यालयामार्फत, जिल्हा पातळीवर वेळोवेळी प्रदर्शन, महोत्सव, मेळावे, यांचे आयोजन केले जाते. या अंतर्गत, प्रामुख्याने, महिला बचत गटांतील महिलांनी तयार केलेल्या वस्तुंचे, खाद्य पदार्थांचे स्टॉल्स् लावण्यात येतात. अशा प्रकारे महिला आर्थिक विकास महामंडळ, महिला स्वयंसहायत बचत गटांच्या माध्यमातुन आपल्या महिला विकास योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करताना दिसते.

### ४.८.७ पुणे महानगरपालिका, नागरवस्ती विकास योजना विभाग :

कायद्यातील ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे, महानगरपालिकांच्या कर्तव्यांमध्ये महत्त्वाचा बदल झाला असुन, केवळ जनतेला मुलभूत सुविधा पुरविणे, एवढीच मर्यादित भुमिका आता महानगर पालिकांमध्ये राहिलेली नाही. सामाजिक, आर्थिक उन्नतीचे विविध कार्यक्रम, तसेच दारिद्र्य निर्मुलनाचे कार्यक्रम राबविणे, हा महानगरपालिकांच्या कर्तव्याचा भाग झाला आहे. ग्रामीण मागासलेल्या भागाप्रमाणेच शहरांमधील दरिद्री, गरीब, कुपोषित, आर्थिकबाबतीत दुर्बल जनतेसाठी भारत सरकारने शहरातील गरीबी निर्मुलनाचे धोरण निश्चित केले आहे. या धोरणाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- ***वैशिष्ट्ये :***
- लाभार्थींचे संघटन व त्यामार्फतच कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करणे.
- गरजवंत व्यक्तिंना गटांचा सभासद करुन घेणे आणि गटांमार्फत त्यांना आवश्यक ती मदत करणे.

- गटांमार्फत विविध उपक्रम सुरु करणे.
- लाभार्थींचे सबलीकरण व लाभार्थ्यांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढविणे.
- सर्व योजनांमध्ये सुसूत्रता व समन्वय साधुन योजना यशस्वी करणे.
- गरीब, गरजु व्यक्तींना मदत करण्यासाठी प्राधान्य देणे.
- विशेष करुन गरजु महिलांना प्राधान्य देणे.

केंद्रशासन, राज्यशासन, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कल्याणकारी योजना वरील धोरणांप्रमाणे राबविण्याबाबत केंद्र शासनाचे कडक आदेश आहेत. त्यानुसार, पुणे महानगरपालिके मार्फत मागासवर्गीयांसाठी, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, महिला बाल कल्याणकारी योजना, युवक कल्याणकारी योजना, सामाजिक अर्थसहाय्य योजना, अशा विविध योजना यशस्वीरित्या राबविण्यात येतात.

या सर्व योजनांची अंमलबजावणी करताना, खालील वैशिष्ट्यांवर भर दिला जातो.

- स्वयंरोजगारावर भर, स्वावलंबन, स्वयंनिर्णय प्रक्रियेत अवलंब.
- शासकीय विकास योजना आणि महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजना, यांच्यामधील सुसूत्रता व समानतेमुळे, समाजातील सर्व घटकांना अशा योजनांचा लाभ होतो.
- पुर्ण शहर पातळीवर योजनांची कार्यवाही.
- महिला बचत गटांना प्राधान्य देणे.
- जनहितार्थ राबविली जाणारी कोणतीही योजना, ही केवळ, अनुदान वाटपाची खैरात न ठरता, गरीबांच्या गरजा भागवुन, त्यांचे सबलीकरण होण्यासाठी सहाय्यभुत ठरणारी असावी.

पुणे शहरात, नागरवस्ती विकास योजना विभागाच्या सहकार्याने १०,९९६ बचत गटांची स्थापना करण्यात आली असुन, सावित्री बचत गट महासंघ, या बचत गटांच्या शिखर संस्थेची स्थापना नागरी विकास योजना विभागामार्फत करण्यात आली आहे. या संस्थेचे सुमारे ४,३६६ सभासद असुन, संस्थेची बचत रक्कम रुपये ३७.०० लाख इतकी आहे. त्याअंतर्गत रु. ७४.०० लाखांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. बचत गटांची लोकप्रियता म्हणजे महिलांना स्वबळावर आर्थिक समस्या सोडविण्यासाठी प्रवृत्त करण्याची पावती आहे. अशा तऱ्हेने ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीने अभिप्रेत असलेली, लाभार्थींना केंद्रबिंदु मानुन सुरु केलेली, 'नागरवस्ती विकास योजना' ही पुणे महानगरपालिकेने सुरु केलेला, स्तुत्य व लोकप्रिय उपक्रम आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

मागासवर्गीय कल्याणकारी योजनेसाठी, तसेच, महिला बाल कल्याण योजनेसाठी, राज्य सरकारच्या आदेशानुसार, महानगरपालिकेचा बांधील खर्च वजा जाता, उर्वरित आर्थिक तरतुदीच्या ५० टक्के एवढा निधी खर्च करणे बंधनकारक असुन, शिल्लक निधी सदर घटकांतर्गत विविध योजनांवर दरवर्षी खर्च करण्यात येतो. त्यापैकी महिलांच्या सबलीकरणासाठी, पुणे महानगर पालिकेची, 'महिला सबलीकरण योजना', 'युवक-युवतींसाठी कल्याणकारी योजना', 'सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना', 'महिला सबलीकरण केंद्र', 'विविध व्यावसायिक प्रशिक्षण योजना', 'स्वयंरोजगारासाठी अनुदानाच्या योजना' अशा विविध योजना राबविल्या जातात.

तक्ता क्र. ४.६
पुणे महानगरपालिकेने स्वर्णजयंती शहरी रोजगार योजनांवर केलेला खर्च

| अनु. क्र. | महिला व बाल विकास गट | आर्थिक वर्ष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ | २००८-०९ |
| १. | आर्थिक उद्दिष्ट्ये | १० | २० | १० | ४५ | ०० | ६१ | ११० |
| २. | आर्थिक उद्दिष्ट संख्या | ८ | १४ | ७ | १४ | ५६ | १० | ५८ |
| ३. | कर्ज मंजुर | २ | ० | २ | २ | ७ | १७ | ५८ |
| ४. | अनुदानाची रक्कम रु. | ६०,००० | ० | २,००,००० | १२,५०० | ५१,८०० | १,०६,५५० | ३६,८७,०१५ |
| ५. | बचत गटांची संख्या | १० | ४० | २८ | १२१ | १२१ | ० | २०५ |
| ६. | वार्षिक उद्दिष्ट | २७ | ५२ | ४० | १०० | १३२ | ४८ | ६५ |
| ७. | आर्थिक उद्दिष्ट साध्य | ० | ० | ० | २०,१६,००० | ० | ० | ० |
| ८. | अनुदानाची रक्कम रु. | ३०,००० | ५१,००० | ५,१५,००० | ६,१४,००० | १२,३६,००० | ५,२१,००० | ६५,१०,००० |

*स्त्रोत : स्वर्ण ग्राम स्वरोजगार योजना, पुणे महानगरपालिका, पुणे. (२००१-२०१०)*

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की, २००१-०२ मध्ये स्वर्णजयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत अनुदानाची रक्कम रु. ३०,००० होती, त्यात वाढ होऊन २००८-०९ मध्ये ती रु. ६,५१,००० वर पोहचल्याचे दिसते. अशा प्रकारे विविध योजनांची अंमलबजावणी, पुणे महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत केली जाते. *संशोधकाने संशोधन करताना महिला सबलीकरणासाठी महानगरपालिकेच्या कोणत्याच योजनांचा अभ्यास केलेला नाही. फक्त निवडलेल्या ग्रामीण तालुक्यांचा अभ्यास केलेला आहे.*

## ४.८.८ महिला व बाल विकास विभागाच्या एकुण योजनांचा तपशील :

- *प्रस्तावना :*

महिला व बाल विकास विभागामार्फत, समाजातील दुर्बल महिला व बालकांच्या विकासाचे प्रश्न हाताळण्यासाठी, खालील ठिकाणी या विभागाची कार्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

- महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे.
- एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
- महिला आर्थिक विकास महामंडळ, वांद्रे, मुंबई.
- महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्ड, मुंबई.

त्याचप्रमाणे, राज्यातील सर्व जिल्हानिहाय, जिल्हास्तरीय कार्यालये आणि नागरी प्रकल्प कार्यालये स्थापन करण्यात आली आहेत. सदर कार्यालयांमार्फत विविध महिला विकास व बाल विकास योजना राबविल्या जातात. त्याअंतर्गत, जिल्हास्तरीय कार्यालयातील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व योजनांचे काम पहातात.

- *महिला विकास :*

महिला विकास योजना प्रामुख्याने दोन प्रकारात राबविण्यात येतात. मुली किंवा स्त्रियांचा अनैतिक व्यवसाय प्रतिबंध अधिनियम, १९५६, या कायद्यांतर्गत नैतिक संकटात सापडलेल्या स्त्रियांच्या संरक्षण व पुर्नवसनासाठी, ठिकठिकाणी महिला संरक्षण गृहे स्थापन करण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे, अन्य महिला कल्याणकारी उपक्रमांमध्ये निराश्रित, आर्थिकदृष्ट्या मागास, परितक्त्या, विधवा, या प्रकारांमध्ये समाविष्ट होणाऱ्या महिलांच्या पुर्नवसनासाठी व त्यांच्या कल्याणासाठी महिला राज्यगृहे, आधार गृहे, माहेर योजना संस्थांतर्गत, विविध व्यवसाय प्रशिक्षण, अशा योजना राबविण्यात येत आहेत. महिलांच्या व्यक्तिगत प्रगतीसाठी विद्यावेतन, स्वयंरोजगार, महिला प्रशिक्षण केंद्र, विवाह भत्ता, इत्यादी योजना कार्यरत आहेत.

वरील सर्व योजनांची अंमलबजावणी व कार्यवाही महाराष्ट शासन, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषदा, महानगरपालिका, यांना प्रत्येक वर्षी ठराविक अनुदान देऊन करण्यात येते.

- *महिला व बाल विकास विभागाच्या एकुण योजना :*

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या एकुण योजना खालीलप्रमाणे :

१) राज्यगृहे व संरक्षण गृहे.

२) निराश्रित स्त्रियांसाठी विविध व्यवसाय प्रशिक्षण केंद्रे.

३) आधारगृहे चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना अनुदान.

४) विवाहातील हुंडा पद्धतीचे निर्मुलन.

५) महिला मंडळांना आर्थिक अनुदान.

६) स्वयंरोजगारांतर्गत महिलांना व्यक्तिगत व्यवसायासाठी आर्थिक व वस्तु स्वरुपात अनुदान.

७) विविध व्यवसायाभिमुख शिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतनाचा लाभ.

८) देवदासी व त्यांच्या पाल्यांचे शिक्षण व पुर्नवसन.

९) महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या योजना.

१०) महिला व बाल कल्याण समिती, जिल्हा परिषदेच्या योजना.

११) निराधार व निराश्रित विधवांच्या मुलींच्या विवाहासाठी विवाह अनुदान.

१२) महिला बहुद्देशीय सामुहिक केंद्राच्या योजना.

१३) पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर पुरस्कार.

१४) जिजामाता महिला आधार विमा योजना.

१५) स्वयंसिद्धा योजना.

१६) कामधेनु योजना.

१७) महिला समुपदेशन केंद्र.

१८) शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहाची योजना.

१९) महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना.

वरील सर्व योजनांपैकी, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, कृ. एम.बी. एस्.-२००० प्रकृ /३५३/ का-२, दिनांक २०-१०-२००० अन्वये योजना क्र. ६, ७, ८, ९, १२, १४, १८ या दिनांक २-१०-२००० पासुन, जिल्हापरिषदेकडे अंमलबजावणीसाठी, हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. महिला व बाल विकास विभागाच्या एकुण योजनांपैकी, संशोधकाने संशोधन अभ्यासासाठी, एकुण १९ योजनांपैकी २० टक्के योजना म्हणजे एकुण ४ योजना निवडलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

- स्वयंरोजगार योजनेअंतर्गत महिलांना व्यक्तिगत व्यावसायिक अनुदान.
- विविध व्यवसायाभिमुख शिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन.
- कामधेनु योजना.
- महिला आर्थिक विकास महामंडळाच्या चार प्रमुख योजना -
    - महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम.
    - स्वयंसिद्धा प्रकल्प

- स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना
- स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना

वरीलपैकी दोन योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. पुणे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये या योजनांची कार्यवाही केली जाते. संशोधकाने वरील योजनांची निवड करताना महिला सबलीकरणाशी संबंधित अशा, आर्थिक महिला विकास योजनांची निवड केलेली आहे.

- *जिल्हा परिषदेतील संरचना :*

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय (राज्यस्तरीय)
*(एकुण २९ पदे, वर्ग १ – ६ पदे आणि वर्ग २)*
|
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
*(वर्ग १ – २९ + ६ पदे)*
|
जिल्हा पर्यविक्षा अधिकारी
*(वर्ग ३)*
|
पर्यविक्षा अधिकारी
*(वर्ग ३)*
|
वरिष्ठ लिपिक
*(वर्ग ३)*
|
कनिष्ठ लिपिक
*(वर्ग ३)*
|
वाहन चालक
*(वर्ग ३)*
|
शिपाई
*(वर्ग ४)*

- *महिला व बाल विकास विभागातील संरचना :*
  - आयुक्तालय
  - जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (सर्व जिल्हे)
  - नियंत्रण मंडळ, अनाथालये व इतर धर्मदाय गृहे (पर्यविक्षण व नियंत्रण) अधिनियम, १९६०.
  - महिला व बाल विकास महामंडळ

- व्यवस्थापकीय संचालक
- विभागीय व्यवस्थापक
- जिल्हा कार्यक्रम समन्वयक (सर्व जिल्हे)

- सचिव, महाराष्ट्र राज्य, समाजकल्याण सल्लागार बोर्ड
- सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग
- राष्ट्रीय महिला कोष

## ४.८.९ जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास समितीतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांचा तपशील :

१) ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत महिलांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे.

२) महिला मंडळांतर्फे गावात वाचनालय व प्रौढ शिक्षण शिबिरांचे आयोजन.

३) ग्रामीण भागातील महिलांसाठी सुलभ शौचालये बांधणे.

४) आदर्श अंगणवाडी वा बालवाडी सेविकांना उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार.

५) ग्रामपातळीवरील महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहित करण्यासाठी, विविध स्पर्धांचे आयोजन करणे.

६) महिला लोक प्रतिनिधींना पंचायतराज संस्थेबाबतचे प्रशिक्षण देणे.

७) महिला प्रतिनिधींची अभ्यास सहल.

८) गरीब मुलींच्या लग्नासाठी अर्थसहाय्य.

९) महिला मंडळे वा स्वयंसेवी संस्थांना विविध उद्योग-व्यवसायातील प्रशिक्षणासाठी अनुदान.

१०) आर्थिकदृष्ट्या गरीब महिलांना संसारोपयोगी साहित्य पुरविणे.

११) विधवा, परितक्त्या तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत महिलांना शेती अवजारे खरेदीसाठी अर्थसहाय्य करणे.

१२) संगणक प्रशिक्षण देणे.

१३) फॉल पिको मशीन पुरविणे.

१४) ग्रामीण भागातील महिलांना पिठ गिरणी पुरविणे.

वरील सर्व योजनांची कार्यवाही जिल्हा परिषद, पुणे, यांच्यामार्फत केली जाते. महिला व बाल कल्याण विभागातर्फे, लाभार्थी महिलांना अर्थसहाय्य पुरविले जाते, तसेच, त्यावर नियंत्रण ठेवले जाते. जिल्हा परिषदेच्या एकुण योजनांपैकी, संशोधकाने अभ्यासासाठी, चार योजनांची निवड केली आहे. एकुण जिल्हा परिषदेच्या योजनांपैकी २६ टक्के म्हणजेच ४ योजनांची निवड प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आली आहे. ज्या योजना महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी आवश्यक आहेत, त्या योजना खाली दिल्या आहेत.

१५) ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत वा दुर्बल असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशीन वस्तु लाभ योजनेअंतर्गत पुरविणे.

१६)	महिला लाभार्थींना संगणक प्रशिक्षण देणे.

१७)	महिला लाभार्थींना फॉल पिको मशीन देणे.

१८)	ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे.

वरील सर्व योजनांची निवड संशोधकाने संशोधन अभ्यासासाठी केली असुन, सदर योजनांची निवड करताना स्वयंरोजगार, तांत्रिक प्रशिक्षण, इत्यादी निकष विचारात घेतले आहेत.

- *जिल्हा परिषदेतील संरचना :*

जिल्हा परिषद, पुणे (महिला व बाल कल्याण विभाग) यांची संरचना खालीलप्रमाणे :

जिल्हा महिला व बाल कल्याण विभाग (जिल्हास्तरीय)
*(एकुण ३३ कार्यालये)*
|
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
*(वर्ग १ – ३३ पदे)*
|
कक्ष अधिकारी
*(वर्ग ३)*
|
अधिक्षक
*(वर्ग ३)*
|
वरिष्ठ सहायक
*(वर्ग ३)*
|
सांख्यिकी सहायक
*(वर्ग ३)*
|
वरिष्ठ सहायक
*(वर्ग ३)*
|
कनिष्ठ सहायक
*(वर्ग ३)*
|
वाहन चालक
*(वर्ग ३)*
|
शिपाई
*(वर्ग ४)*

## ४.८.१० महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (मा.वि.म.) योजनांचा तपशील :

- *प्रस्तावना :*

'महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.)' हे महाराष्ट्र शासनाच्या अधिकारातील महामंडळ 'आंतरराष्ट्रीय महिला वर्षात' म्हणजे २४ फेब्रुवारी १९७५ रोजी स्थापन करण्यात आले. महिला वर्ग ही एक जाज्वल्य शक्ति आहे, हा दृष्टिकोन बाळगुन, महिलांच्या आर्थिक विकासाचा पाया, महिला आर्थिक विकास महामंडळ घालुन, नव्या आर्थिक व औद्योगिक वातावरणात महिलांना सक्षम बनविते. ही संस्था महिलांच्या विकासाला प्रेरक व पुरक ठरणारी संस्था आहे. मा.वि.म. कोणत्याही महिला विकास योजनेअंतर्गत, लाभार्थींना प्रत्यक्ष अर्थसहाय्य करीत नाही. मात्र अर्थसहाय्य मिळवुन देण्यात, मध्यस्थांची महत्त्वपुर्ण भुमिका बजावते. दारिद्र्य निर्मुलनाच्या दृष्टिने, ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रमांतर्गत सहभागी असलेले, शासकीय विभाग, नाबार्ड, मिटकॉन, एम्.सी.इ.डी., यांसारख्या निमशासकिय संस्था, तसेच, ग्राम विकास विभाग यांच्या सहाय्याने, ग्रामीण भागातील दारिद्र्यपीडीत महिलांपर्यंत, एकात्मिक पद्धतीने, पोहचविण्याचा प्रयत्न, महिला आर्थिक विकास महामंडळाने १९९३ पासुन केला आहे. मा.वि.म. ने स्वयंसेवी संस्थांची निवड करुन, त्या संस्थाच्या कार्यकर्त्यांना बचत गटाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच, या कार्यक्रमांतर्गत, पुढील उपक्रम राबविण्यात येतात.

स्वयंसहाय्यता बचत गटावार आधारित, महिला आर्थिक विकास महामंडळाने, पुढील योजना राबविल्या आहेत.

- महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम (१९९४-२००२)
- रमाई महिला सक्षमीकरण योजना (२००३ ते २००६)
- स्वयंसिद्धा योजना (२००३-२००८)
- स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (२००२ ते आजतागायत सुरु आहे.)

वरील बचत गटावर आधारीत योजना संशोधकाने प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत.

- *चैतन्य संस्था :*

१९९३ पासुन, 'ग्रामीण महिला स्वयंसिद्धा संघ' या महासंघाद्धारे, 'चैतन्य' ही संस्था स्वयंसहायता गटाची चळवळ बळकट करण्याचा सक्रिय प्रयत्न करीत आहे. पुणे जिल्ह्यातील सुमारे ७५ खेड्यांमध्ये हे गट सुरु आहेत. सुरुवातीस ७०० महिलांनी, दर आठवड्याला, १ रुपयाप्रमाणे बचत केली. एका वर्षात ही बचत १ लाख रुपयांपर्यंत गेली. या बचतीतुन गरजु महिलांना अर्थसहाय्य होऊ लागले. हळुहळु ही चळवळ विस्तारत गेली आणि महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये असलेल्या बचत गटांपर्यंत ही चळवळ पोहचली. पुणे जिल्ह्यातील १६ विविध संस्थांचे जाळे यासाठी निर्माण करण्यात आले.

डॉ. सुधाताई कोठारी यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या या कार्याला दिवसेंदिवस आणखी व्यापक स्वरुप प्राप्त होत आहे. चैतन्य संस्थेचा संपर्कासाठीचा पत्ता – चैतन्य द्वारा ग्रामीण महिला स्वयंसिद्धा संघ, माती चौक, राजगुरुनगर, जिल्हा – पुणे ४१० ५०५. दूरध्वनी : ०२१३५–२२३१७६, ई.मेल. – info@chaitanyaindia.net

अशा प्रकारे, महिला बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास मंडळाच्या विविध योजनांपैकी, संशोधकाने प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी, आठ योजनांची निवड केली आहे. त्या योजनांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :

## ४.९ संशोधनासाठी निवडलेल्या आठ योजनांचा सविस्तर तपशील :

### ४.९.१ व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन : (आय्.टी.आय्., नर्सिंग व टेलिफोन ऑपरेटर)

प्रस्तुत योजना, सर्वसाधारणपणे, १० वी वा १२ वी झालेल्या महिलांसाठी असते. ज्यांना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे, परंतु, त्यांच्या कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे, इच्छाशक्ती असुन देखील, त्यांना पुढील शिक्षण घेता येत नाही. त्याचा परिणाम त्यांना नोकरी न मिळण्यावर होतो. नोकरी मिळण्यासाठी आय्.टी.आय्., नर्सिंग व टेलिफोन ऑपरेटर, यांसारखे व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणे आवश्यक असते. परंतु आर्थिक दुर्बलतेमुळे तत्सम प्रशिक्षण घेऊ न शकणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या, स्वतःच्या पायांवर उभे राहण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी, महाराष्ट्र शासनातर्फे, ही योजना सुरु करण्यात आली.

सदर योजना, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, कृ. एस्.डब्ल्यु.आर.–१०८५–२०८३०(८०)–सी.ए.३, दिनांक २१–१०–१९८५ अन्वये सुरु करण्यात आली असुन, दि. १–४–१९९५ पासुन, संबंधित, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, यांना योजनेतील लाभार्थी महिलांना विद्यावेतन मंजुर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. एका महिलेस दरमहा रु. १०० प्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी, सहा महिने ते दोन वर्षांचा असुन, या कालावधीसाठी महिलेला विद्यावेतन देण्यात येते.

**तक्ता क्र. ४.७**
**आय्.टी.आय्., नर्सिंग, टेलिफोन ऑपरेटर, यांसारख्या**
**व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन (कालावधी २०००-०१ ते २००९-१०)**

| साल | महिला लाभार्थींची संख्या | विद्यावेतनावर करण्यात आलेला खर्च रुपये |
|---|---|---|
| २०००-०१ | काही नाही | काही नाही |
| २००१-०२ | ३,४१३ | ३४,१३,००० |
| २००२-०३ | २,९१७ | १७,५०,००० |
| २००३-०४ | १४,००६ | ८४,०४,००० |
| २००४-०५ | १४,११७ | ८४,७०,००० |
| २००५-०६ | ४,०१३ | ४०,१३,००० |
| २००६-०७ | ५,२३८ | ५२,३८,००० |
| २००७-०८ | २,५९० | २५,९०,००० |
| २००८-०९ | ४,०८८ | ४०,८८,००० |
| २००९-१० | ४,४९७ | ४४,९७,००० |

*स्त्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २००४-०५, २००७-०८, २०१०-११,*
*महिला व बाल विकास योजना, महाराष्ट शासन.*

***अनुदानासाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :***

- प्रशिक्षण देत असलेली संस्था शासन मान्यता प्राप्त असावी. अभ्यासक्रमात संबंधित विभागाची मान्यता असावी.
- लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी शासनाने ठरवुन दिल्याप्रमाणे रु. ५०,००० च्या आत असावे.
- लाभार्थीचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असावे.
- प्रशिक्षणार्थीस इतर संस्था अगर व्यक्तींकडुन सदर विद्यावेतनापेक्षा जास्ती विद्यावेतन मिळत असेल तर या योजनेअंतर्गत विद्यावेतन मिळणार नाही. मात्र जर या योजनेपेक्षा ते विद्यावेतन कमी असेल तर या योजनेचे विद्यावेतन मिळेल.
- प्रशिक्षणार्थी ज्या संस्थेमध्ये ज्या व्यवसायाचे प्रशिक्षण घेत असेल, त्या संस्थेकडे सदर प्रशिक्षण वर्ग चालविण्याचा शासनाच्या संबंधित प्राधिकरणाचा परवाना असणे बंधनकारक आहे.

### ४.९.२ स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना व्यक्तीगत आर्थिक सहाय्य :

- ***योजनेचे स्वरुप :***

  आर्थिकदृष्ट्या मागास महिलांना छोटा उद्योग-व्यवसाय सुरु करण्यासाठी मदत म्हणुन रु.५०० इतके अनुदान.

- ***अनुदानासाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :***
- लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी शासनाने ठरवुन दिल्याप्रमाणे म्हणजे रु. ५०,००० च्या आत असावे.
- लाभार्थींचे महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य असावे.

प्रस्तुत योजना आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील, कुटुंब प्रमुखाला नोकरी नसणे, किंवा असली तरी अपुरी मिळकत असणे, किंवा कुटुंबातील व्यक्तींची संख्या अधिक असणे, किंवा इतर अडचणींमुळे त्यांच्या संसारात आर्थिक समस्या निर्माण होते, अशा प्रसंगी कुटुंब प्रमुख त्या समस्यांना तोंड देण्यास असमर्थ ठरतो, किंवा त्याच्या पत्नीने संसारास हातभार लावावा, अशी अपेक्षा कुटुंब प्रमुख करतो, अशा महिलांना स्वयंरोजगार मिळण्यासाठी, शासनातर्फे, आर्थिक सहाय्य देण्यात येते. उदा. खाद्यपदार्थ तयार करुन विकणे, मण्यांच्या वस्तु करणे, भाजीपाला व फळे विकणे इत्यादी, अशा प्रकारचा छोटा उद्योग-व्यवसाय सुरु करण्यासाठी, शासनामार्फत रु.५०० आर्थिक मदत देण्यात येते.

सदर योजना शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, कृ. एस्. डब्ल्यु.आर.-१०८५-२०८९१ (८८)-सी.ए. ३, दिनांक २१-१०-१९८५ अन्वये दि. १-४-१९८५ पासुन, ही योजना सुरु करण्यात आली.हे ५०० रुपयांचे अनुदान, लाभार्थी महिलेस वर्षातुन एकदाच शासनामार्फत देण्यात येते. सदर अनुदान देण्याचे अधिकार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

**तक्ता क्र. ४.८**

**स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना व्यक्तीगत आर्थिक सहाय्य (कालावधी २०००-०१ ते २००९-१०)**

| साल | महिला लाभार्थींची संख्या | मंजुर करण्यात आलेले अनुदान (रुपये) |
|---|---|---|
| २०००-०१ | ४,३०० | २२,६८,००० |
| २००१-०२ | ८,३२५ | ४८,००,००० |
| २००२-०३ | ३,४०० | १७,००,००० |
| २००३-०४ | ९,९६० | ४९,८०,००० |
| २००४-०५ | ११,४०० | ७५,२०,००० |
| २००५-०६ | १०,६७२ | ५३,३६,००० |
| २००६-०७ | १२,४१० | ६२,०५,००० |
| २००७-०८ | १५,१२८ | ७५,६४,००० |
| २००८-०९ | १२,३५० | ६१,७५,००० |
| २००९-१० | १३,५८६ | ६७,९३,००० |

*स्त्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २००४-०५, २००७-०८, २०१०-११,*
*महिला व बाल कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन.*

### ४.९.३ कामधेनु योजना :

***योजनेचे स्वरुप :***

गरजु महिलांना घरबसल्या काम मिळावे व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होता यावे, या हेतुने महाराष्ट्र शासनाने, सन १९९५-९६ पासुन, 'कामधेनु योजना' कार्यान्वित केली. नोंदणीकृत महिला संस्थांना, जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळा, शैक्षणिक संस्था, शासकीय इस्पितळातील कर्मचाऱ्यांना लागणारे गणवेष व अन्य उपयुक्त वस्तु , जसे चादरी, उशा, उशांचे अभ्रे, कपडे, फिनेल, झाडु, असे स्वच्छतेचे सामान, त्याचप्रमाणे, विविध प्रकारचे मसाले, पापड, लोणचे, तयार करण्याची कामे गरजु महिलांना देण्याचे मान्य करण्यात आले. त्याद्धारे, विविध महिला संस्थांमार्फत इच्छुक व गरजु महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

या अंतर्गत, खाजगी उद्योजकांकडुन काम मिळविणे व ते काम गरजु व कार्यकुशल महिलांकडुन घरबसल्या करवुन घेणे, महिलांनी पुर्ण केलेले काम तयार मालाच्या स्वरुपात उद्योजकांकडे विक्रीसाठी

परत करुन, त्याचा ठराविक प्रमाणातील आर्थिक लाभ, गरजु महिलांना मिळवुन देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत पुर्ण करवुन घेतले जाते. या स्वयंसेवी संस्था, गरजु महिलांना, दरमहा कमीत कमी रु. ७०० इतका खर्च वजा जाता, मिळकत मिळवुन देत असुन, शासनाला प्रत्येक महिलेमागे दरमहा रु. २० प्रमाणे रक्कम व्यवस्थापन अनुदानाच्या रुपात प्राप्त होते.

कामधेनु योजना परिणामकारकरित्या राबविणे व त्याद्धारे जास्तीत जास्त गरजु व कार्यकुशल महिलांना घर बसल्या काम उपलब्ध व्हावे, यासाठी स्वयंसेवी संस्थाना मार्गदर्शन व सहकार्य करणे, तसेच, खाजगी उद्योजकांना या योजनेअंतर्गत त्यांची कामे काटेकोरपणे करवुन घेण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, जिल्हा उद्योग समित्यांअंतर्गत, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'कामधेनु योजना उपसमिती', स्थापन करण्यात आली असुन, त्या समितीचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, हे सदस्य सचिव असतात.

सदर योजना शासन निर्णय, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई, कृ. एम्.बी.एस्./२००० / ५३३५३ /का.२ /दिनांक २०-१०-२०००, अन्वये सदरहु योजना दि. २-१०-२००० पासुन, जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली.

सदर योजनेमुळे महिला संस्थांची संख्या वाढुन, अनेक महिला उद्योजक संस्था तयार होतील, अशी अपेक्षा ठेवण्यात आली आहे. मा.वि.म. किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत मिळालेल्या व्यवसायाभिमुख प्रशिक्षणामुळे व तयार मालाच्या विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेल्या जागेमुळे, मालाच्या प्रतवारीप्रमाणे माल पुरविण्यात येतो. तसेच, बचत गट हे समाजातील तळागाळापर्यंत पोहचले असल्यामुळे, या योजनेचा प्रचार, प्रसार व प्रसिद्धी, विस्तृत प्रमाणात होऊन, या योजनेची व्याप्ती व स्वरुप व्यापक होऊन, त्याचा फायदा समाजातील सर्व स्तरांमधील गरजु व कार्यकुशल महिलांना होऊन, त्याद्धारे शासनाचे महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

**तक्ता क्र. ४.९**
**कामधेनु योजनेचे स्वरुप (कालावधी २०००-०१ ते २००९-१०)**

| साल | महिला लाभार्थींची संख्या | मंजुर करण्यात आलेले अनुदान (रुपये) |
|---|---|---|
| २०००-०१ | काही नाही | काही नाही |
| २००१-०२ | काही नाही | काही नाही |
| २००२-०३ | काही नाही | काही नाही |
| २००३-०४ | काही नाही | १,६६,००० |
| २००४-०५ | काही नाही | १,६६,००० |
| २००५-०६ | काही नाही | १०,००० |
| २००६-०७ | काही नाही | ५०,००० |
| २००७-०८ | २,८०० | २,८०,००० |
| २००८-०९ | ५,००० | १,००,००० |
| २००९-१० | ५,००० | १,००,००० |

*स्त्रोत : कार्यक्रम अंदाजपत्रक २००४-०५, २००७-०८, २०१०-११,*
*महिला व बाल कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन.*

वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन, कामधेनु योजनेला यश लाभल्याचे दिसत नाही. २०००-०१ ते २००२-०३ सालापर्यंत, शासनाने या योजनेअंतर्गत, कोणताच खर्च केला नसल्याचे खेदाने म्हणावे लागते. २००३-०४ या सालात रु.१,६६,००० इतक्या रकमेचे शासकीय अनुदान मंजुर झाले, परंतु एकसुद्धा लाभार्थी उपलब्ध झाला नसल्याचे स्पष्ट दिसते. जवळपास २००३-०४ सालापासुन ते २००६-०७ सालापर्यंत, अनुदानाची रक्कम शासनाने मंजुर केली, परंतु लाभार्थींनी त्याचा लाभ न घेतल्याचे दिसुन येते. २००७-०८ सालात, केवळ २,००० रुपये एवढे शासकीय अनुदान उपलब्ध झाल्यावर २,८०० इतके लाभार्थी आढळतात. त्यानंतर २००९-१० सालापर्यंत लाभार्थींची संख्या आणि अनुदानाच्या रकमेत कोणताच ताळमेळ लागत नाही.

### ४.९.४ ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे :

***योजनेचे स्वरुप :***

सदर वस्तुलाभाची योजना असुन, जिल्हा परिषदेमार्फत वस्तु वाटप केले जाते. समाज कल्याण विभागातर्फे देखील शिलाई मशीन पुरविण्याची योजना आहे. तसेच, केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक

ग्रामीण विकास कार्यक्रमाअंतर्गत, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना शिलाई मशीन देण्याची तरतुद आहे. या दोन्हीही योजनांचे नियंत्रण या समितीकडे देण्यात आले आहे. तसेच, समितीला शिलाई मशीन खरेदी करता येण्यासाठी, लाभार्थी कसे व किती निवडावेत, या बाबत जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्राम पंचायत यांनी निर्णय घ्यावयाचा असतो. सदर योजना २००१ पासुन सुरु झालेली असुन, शासन निर्णय, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई, कृ.एम्.बी.एस्. /२०००/ ५३३५३ /का.२ / दिनांक २०-१०-२००० अन्वये, दि. २-१०-२००० पासुन जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यात आली.

*वस्तु लाभ योजनेसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :*

- लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांसाठी शासनाने ठरवुन दिल्याप्रमाणे म्हणजे रु. ३२,००० च्या आत असावे.
- अर्जदार हा दारिद्र्यरेषेखालील असल्यास सोबत त्याबद्दलचे प्रमाणपत्र वा वार्षिक उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक असते.
- व्यवसाय करण्यासाठीचे ग्राम पंचायतीचे ना हरकत प्रमाण पत्र जोडणे सक्तीचे असते.
- महाराष्ट्रात सलग १५ वर्षे वास्तव्य करत असल्याचा रहिवासी दाखला आवश्यक असतो.

तक्ता क्र. ४.१०

ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या

स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे (कालावधी २००५-०६)

| अनु. क्र. | तालुका | शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण योजनेअंतर्गत | विशेष घटक योजनेअंतर्गत |
| १. | बारामती | २० | ३ |
| २. | इंदापूर | १० | १० |
| ३. | जुन्नर | ३५ | १२ |
| ४. | खेड | ४१ | २ |

*स्त्रोत : वरील २००५-०६ सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यातील महिला लाभार्थींच्या आकडेवारीवरुन असे दिसुन येते की, विशेष घटक योजने अंतर्गत मागासवर्गीय महिला लाभार्थींना, या योजनेची माहिती मिळाली नसल्यामुळे, या योजनेतील विशेष घटक योजनेअंतर्गत, शिलाई मशीन प्राप्त झालेल्या, महिला लाभार्थींची संख्या ही सर्वसाधारण योजनेतील महिला लाभार्थींच्या संख्येच्या तुलनेत खुपच कमी असल्याचे आढळते.

तक्ता क्र. ४.११
ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या
स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे (कालावधी २००६-०७)

| अनु. क्र. | तालुका | शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण योजनेअंतर्गत | विशेष घटक योजनेअंतर्गत |
| १. | बारामती | २५ | ५ |
| २. | इंदापूर | १२ | १० |
| ३. | जुन्नर | ४१ | ११ |
| ४. | खेड | ४३ | ४ |

*स्त्रोत : वरील २००६-०७ सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यातील महिला लाभार्थींच्या संख्येवरुन असे दिसुन येते की, संशोधनासाठी निवडलेल्या खेड आणि जुन्नर तालुक्यातील, सर्वसाधारण योजनेअंतर्गत, शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या, विशेष घटक योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या मागासवर्गीय महिला लाभार्थींपेक्षा अधिक आहे. याचाच अर्थ, सदर योजनेची पुरेशी व योग्य ती माहिती मिळाली नसल्यामुळे, या योजनेतील विशेष घटक योजनेअंतर्गत, शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या ही सर्वसाधारण योजनेतील महिला लाभार्थींच्या संख्येच्या तुलनेत खुपच कमी असल्याचे जाणवते.

तक्ता क्र. ४.१२
ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या
स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे (कालावधी २००७-०८)

| अनु. क्र. | तालुका | शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण योजनेअंतर्गत | विशेष घटक योजनेअंतर्गत |
| १. | बारामती | ३० | ५ |
| २. | इंदापूर | १२ | ११ |
| ३. | जुन्नर | ५१ | १३ |
| ४. | खेड | ४६ | ४ |

*स्त्रोत : वरील २००७-०८ सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्ता क्र. ४.१२ मधील महिला लाभार्थींच्या संख्येवरुन असे दिसुन येते की, संशोधनासाठी निवडलेल्या खेड आणि जुन्नर तालुक्यातील, सर्वसाधारण योजनेअंतर्गत शिलाई मशीन प्राप्त

झालेल्या महिला लाभार्थींची संख्या, विशेष घटक योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या मागासवर्गीय महिला लाभार्थींपेक्षा खुपच जास्ती आहे. याचाच अर्थ, सदर योजनेची पुरेशी व योग्य ती माहिती मिळाली नसल्यामुळे, या योजनेतील विशेष घटक योजनेअंतर्गत शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या ही सर्वसाधारण योजनेतील महिला लाभार्थींच्या संख्येच्या तुलनेत खुपच कमी असल्याचे जाणवते.

तक्ता क्र. ४.१३
ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या
स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे (कालावधी २००८-०९)

| अनु. क्र. | तालुका | शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण योजनेअंतर्गत | विशेष घटक योजनेअंतर्गत |
| १. | बारामती | ३७ | २ |
| २. | इंदापूर | ५३ | १३ |
| ३. | जुन्नर | ५३ | २२ |
| ४. | खेड | ५७ | ० |

*स्त्रोत : वरील २००८-०९ सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यातील महिला लाभार्थींच्या संख्येवरुन असे दिसुन येते की, संशोधनासाठी निवडलेल्या इंदापूर, खेड आणि जुन्नर तालुक्यातील सर्वसाधारण योजनेअंतर्गत शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या, विशेष घटक योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या मागासवर्गीय महिला लाभार्थींपेक्षा खुपच जास्ती आहे. याचाच अर्थ, सदर योजनेची पुरेशी व योग्य ती माहिती मिळाली नसल्यामुळे, या योजनेतील विशेष घटक योजनेअंतर्गत शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या ही सर्वसाधारण योजनेतील महिला लाभार्थींच्या संख्येच्या तुलनेत खुपच कमी असल्याचे जाणवते.

तक्ता क्र. ४.१४
ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या
स्त्रियांसाठी मोफत शिलाई मशीन खरेदी करणे (कालावधी २००९-१०)

| अनु. क्र. | तालुका | शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण योजनेअंतर्गत | विशेष घटक योजनेअंतर्गत |
| १. | बारामती | ४२ | ४ |
| २. | इंदापूर | २१ | १ |
| ३. | जुन्नर | ६५ | १२ |
| ४. | खेड | ४० | ३ |

*स्त्रोत : वरील २००९-१० सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यातील महिला लाभार्थींच्या संख्येवरुन असे दिसुन येते की, संशोधनासाठी निवडलेल्या खेड, जुन्नर आणि बारामती तालुक्यातील सर्वसाधारण योजनेअंतर्गत शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या, विशेष घटक योजनेअंतर्गत लाभ घेतलेल्या मागासवर्गीय महिला लाभार्थींपेक्षा खुपच जास्ती आहे. याचाच अर्थ, सदर योजनेची पुरेशी व योग्य ती माहिती मिळाली नसल्यामुळे, या योजनेतील विशेष घटक योजनेअंतर्गत, शिलाई मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या ही सर्वसाधारण योजनेतील महिला लाभार्थींच्या संख्येच्या तुलनेत खुपच कमी असल्याचे जाणवते.

तक्ता क्र. ४.१५
२०००-०१ ते २००९-१० या कालावधीतील जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले
वस्तु अनुदान आणि शिलाई मशीनसाठी आलेल्या खर्चाचा तपशील

| वर्ष | जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले वस्तु अनुदान (रुपयांत) | शिलाई मशीनसाठी आलेला अनुदान खर्च (रुपयांत) |
|---|---|---|
| २००५-०६ | ४,९४,५०५ | ४,९४,५०५ |
| २००६-०७ | ५,७५,००० | ५,७५,००० |
| २००७-०८ | ९,७९,६०० | ७,९९,६०० |
| २००८-०९ | ६५,००,००० | ६५,००,००० |
| २००९-१० | ५८,४४,७५४ | ५८,४४,७५४ |

*टिप : २०००-०१ ते २००४-०५ या कालावधीतील, जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले वस्तु अनुदान आणि शिलाई मशीनसाठी आलेल्या खर्चाचा तपशील जिल्हा परिषद कार्यालयात उपलब्ध नाही.*
*स्त्रोत : जिल्हा परिषद कार्यालय.*

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, दरवर्षी या योजनेअंतर्गत मिळालेल्या अनुदानाच्या रकमेत वाढ झालेली आहे. याचाच अर्थ, या योजनेला मिळालेला महिला लाभार्थींचा प्रतिसाद, त्यांचा प्रत्यक्ष सहभाग, प्रतिवर्षी महिला लाभार्थींच्या संख्येत झालेली वाढ उल्लेखनीय व प्रगतीकारक असुन, सदर योजनेला अपेक्षित यश मिळ्याचे स्पष्ट होते.

### ४.९.५ मुलींना संगणकाचे प्रशिक्षण देणे :

- *योजनेचे स्वरुप :*

सदर योजना जिल्हा परिषद (महिला व बाल विकास विभाग) यांच्यामार्फत राबविली जाते. दहावी व बारावी उत्तीर्ण झालेल्या ग्रामीण भागातील मुलींना सदर योजनेचा लाभ घेता येतो. ही योजना २००८ सालापासुन सुरु झाली असुन, या योजनेअंतर्गत, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय्.टी.आय्.) मार्फत एम्. एस्. सी. आय्. टी. चे प्रशिक्षण दिले जाते. हे प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना २००८-०९ या सालात, शासनातर्फे वार्षिक रु. २,००० अनुदानापोटी दिले जात होते. २००९-१० सालात या अनुदानाच्या रकमेत रु. २०० ची वाढ होऊन त्या सालात विद्यार्थिनींना रु. २,२०० प्राप्त झाले.

२०१४-१५ या वर्षी, प्रत्येक विद्यार्थिनीला एम्. एस्. सी. आय्.टी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर शासनाकडुन अनुदानापोटी मिळणारी रक्कम रु. ३,०५० करण्यात आली आहे. तसेच, ज्या वर्षी ही योजना सुरु झाली, त्यावेळी अट १० वी व १२ वी उत्तीर्ण होती. ती अट आता बदलुन, शैक्षणिक पात्रता ७ वी व १० वी परीक्षा उत्तीर्ण अशी शिथिल करण्यात आली आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ सहायक अधिकाऱ्यांनी संशोधकास प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळेस दिली.

- *संगणकीय प्रशिक्षण योजनेसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :*
- प्रशिक्षणासाठी लाभार्थी किमान १० वी उत्तीण असणे आवश्यक असते.
- लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्यास, ग्रामसेवकाचा अन्यथा तलाठ्याकडुन रु.५०,००० चे आतील वार्षिक उत्पन्नाचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.
- महाराष्ट्र ज्ञान महामंडळ आकारीत असलेले प्रति लाभार्थी जास्तीत जास्त शुल्क किंवा लाभार्थी घेत असलेल्या प्रशिक्षणासाठी आकारण्यात येणारे शुल्क या पैकी जी रक्कम कमी असेल ती अनुज्ञेय असते.

- लाभार्थीच्या कुटुंबातील कोणीही व्यक्ति ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद सदस्य नसावी. तसेच, लाभार्थीच्या कुटुंबातील कोणीही व्यक्ति शासकीय, निमशासकीय सेवेत नोकरीस नसल्याचा ग्रामसेवकाचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.
- लाभार्थीची निवड ही त्या त्या गावातील ग्रामसभेद्धारे करण्यात येते.
- सदर योजनेचा लाभ लाभार्थीने अन्य कोणत्याही विभागाकडुन न घेतल्याची शहानिशा केली जाते.
- लाभार्थीने प्रशिक्षण पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र संस्थेकडुन घेणे आवश्यक असते. सदर प्रमाणपत्राची प्रत प्रकल्पासोबत सादर केल्यासच लाभार्थीला शासनाकडुन अनुदान मिळु शकते.
- सदर योजनेअंतर्गत शासनाकडुन प्राप्त होणारे वार्षिक देय अनुदान प्रस्तावात मान्य केलेल्या सर्व अटी व नियमांची पुर्तता झाल्यानंतर लाभार्थीच्या बँकेतील खात्यामध्ये जमा करण्यात येते.

तक्ता क्र. ४.१६
संगणक प्रशिक्षण देण्याच्या योजनेअंतर्गत सन २००८-०९ आणि
२००९-१० या वर्षासाठी तालुकानिहाय महिला लाभार्थीची आकडेवारी

| अनु. क्र. | तालुका | महिला लाभार्थीची संख्या | |
|---|---|---|---|
| | | २००८-०९ | २००९-१० |
| १. | बारामती | ९० | ८० |
| २. | इंदापूर | १०० | १०० |
| ३. | जुन्नर *(संगणक प्रशिक्षणाची योजना या तालुक्यात कार्यान्वित नव्हती.)* | ० | ० |
| ४. | खेड | २०० | २२२ |
| | एकुण | ३९० | ४०२ |

*स्त्रोत : पंचायत समिती कार्यालय, इंदापूर (अनुदान वितरण आदेश).*

वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या महिला लाभार्थीच्या आकडेवारीमध्ये, जुन्नर तालुक्यामध्ये सदर योजनेचा लाभ घेतलेला एकही लाभार्थी आढळत नाही. यावरुन असे दिसते की, सदर योजना या तालुक्यात कार्यान्वित नव्हती. परंतु याचे कारण मात्र स्पष्ट होऊ शकले नाही.

### ४.९.६ ग्रामीण भागातील महिलांना पिठाची गिरणी पुरविणे :

- ***योजनेचे स्वरुप :***

**सदर योजना २००९-१० या वर्षी प्रथमच, समाज कल्याण व महिला बाल कल्याण विभागामार्फत राबविली गेली. समाज कल्याण विभागामार्फत 'मागासवर्गीयांना पिठाची चक्की (घरघंटी)' या शीर्षकाखाली, तर महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे, यांच्यामार्फत सर्वसाधारण, अनुसूचित जाती, आदिवासी उपयोजना, या प्रवर्गातील महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ घेता येतो. ही योजना 'महिलांना पिठाची गिरणी पुरविणे', या शीर्षकाखाली राबविली जाते.**

- ***वरील योजनांसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :***
- **लाभार्थी महिलांना दारिद्र्यरेषेखालील कुटुबांच्या यादित समावेश असल्याचा दाखला व तलाठ्याचा रु. ५०,००० चे आतील वार्षिक उत्पन्नाचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.**
- **लाभार्थी महिलांकडे विद्युत पुरवठा असल्याचा पुरावा असणे आवश्यक असते.**
- **लाभार्थी महिला ही विधवा किंवा परितक्ता वा निराधार असल्याचा ग्रामसेवक वा सरपंच यांचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.**
- **वस्तु लाभाच्या (पिठाची गिरणी) एकुण किंमतीपैकी १० टक्के रक्कम साहित्य वाटपाच्या वेळी शासनाला भरणे आवश्यक असते. (उदा. पिठाच्या गिरणीची किंमत रु. १६,०६५ इतकी असेल तर लाभार्थी महिलेना रु. १,६६५ रोख स्वरुपात भरणे आवश्यक असते. त्या नंतरच उर्वरित ९० टक्के रक्कम जिल्हा परिषद निधीतुन शासनाकडे भरली जाते.**

**वरील योजनेअंतर्गत, जिल्हा परिषदेकडुनच महिला लाभार्थींची अंतीम संख्यासुद्धा मंजुर केली जाते. त्याचप्रमाणे, प्रत्यक्ष वस्तु खरेदी करुन, ती तालुक्यातील पंचायत समितीकडे वाटपासाठी पाठविली जाते. त्यानंतरच लाभार्थी महिला, पंचायत समितीच्या कार्यालयातुन सदर वस्तु (पिठाची गिरणी) प्रत्यक्ष घेऊन जाऊ शकते. सदर योजनेअंतर्गत मिळालेली लाभ वस्तु वापरण्याचे प्रशिक्षण, पंचायत समिती कार्यालयाकडुन तज्ञ व अनुभवी व्यक्तिकडुन, लाभार्थी महिलेस घेणे सक्तिचे असते. वस्तुचा लाभ घेतल्यापासुन एका वर्षाच्या आत पिठ गिरणी नादुरुस्त झाल्यास, दुरुस्तीसाठी येणारा खर्च, पंचायत समिती कार्यालयाकडुन केला जातो.**

**तक्ता क्र. ४.१७**
**महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांच्यामार्फत**
**महिला लाभार्थींना पिठाची गिरणी पुरविणे योजना (कालावधी २००९-१०)**

| अनु. क्र. | तालुका | पिठाची गिरणी प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | जिल्हा परिषद निधी अंतर्गत | विशेष घटक योजने अंतर्गत |
| १. | बारामती | ९१ | ६१ |
| २. | इंदापूर | ५१ | २२ |
| ३. | जुन्नर | ५७ | ५६ |
| ४. | खेड | १०५ | १८ |

*स्त्रोत : वरील २००९-१० सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालय, तसेच, महिला व बाल कल्याण विभागामध्ये उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यावरुन असे आढळते की, विशेष घटक योजनेअंतर्गत, बारामती तालुक्यामध्ये पिठाच्या गिरणीचा लाभ झालेल्या ६१ महिला लाभार्थींची संख्या सर्वात जास्ती आहे. तर जिल्हा परिषद निधी अंतर्गत, खेड तालुक्यामध्ये पिठाच्या गिरणीचा वस्तु लाभ घेतलेल्या १०५ महिला लाभार्थींची संख्या सर्वात जास्ती आहे. त्यामुळे बहुसंख्य महिला लाभार्थींना स्वयंरोजगार प्राप्त झाल्यामुळे, महिलांच्या आर्थिक उत्पन्नात भर पडल्याने, त्यांचे आर्थिक सबलीकरण झाल्याचे स्पष्ट होते. याचाच अर्थ, शासनाच्या या योजनेला, समाजातील सर्व स्तरातील महिलांकडुन भरघोस प्रतिसाद मिळाल्याचे दिसुन येते.

### ४.९.७ ग्रामीण भागातील महिलांना फॉल पिकोचे मशीन पुरविणे :

- ***योजनेचे स्वरुप :***

सदर योजना, समाज कल्याण, जिल्हा परिषद, पुणे आणि महिला व बाल कल्याण विभागामार्फत, सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिलांसाठी राबविली जाते. परंतु या दोन्ही योजनांच्या कार्यवाही व अंमलबजावणीबाबत, लाभार्थींच्या संख्या निवडीबाबत कोणताही निर्णय वा जबाबदारी ही फक्त जिल्हा परिषदेचीच असते. सदर योजना, ग्रामीण भागातील गरजु व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना स्वयंरोजगार मिळावा, या हेतुने २००७ सालात महाराष्ट्र शासनातर्फे सुरु करण्यात आली.

- ***वरील योजनांसाठी लागु असलेल्या अटी व शर्ती :***
- लाभार्थी महिलांना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादित समावेश असल्याचा दाखला व तलाठ्याचा रु. ५०,००० चे आतील वार्षिक उत्पन्नाचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.
- लाभार्थी महिलांकडे मतदान ओळखपत्र असणे आवश्यक असते.
- लाभार्थी महिला ही विधवा किंवा परितक्ता वा निराधार असल्याचा ग्रामसेवक वा सरपंच यांचा दाखला प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक असते.
- लाभार्थी महिलांकडे विद्युत पुरवठा असल्याचा पुरावा असणे आवश्यक असते.
- लाभार्थी महिलांकडे शौचालय असल्याचा पुरावा असणे आवश्यक असते.

तक्ता क्र. ४.१८
विशेष घटक योजनेअंतर्गत फॉल पिकोचे मशीन
प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या (कालावधी २००७-०८)

| अनु. क्र. | तालुका | विशेष घटक योजनेअंतर्गत फॉल पिकोचे मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या |
|---|---|---|
| १. | बारामती | ९ |
| २. | इंदापूर | ७ |
| ३. | जुन्नर | ८ |
| ४. | खेड | ७ |

*स्त्रोत : जिल्हा परिषद कार्यालय, पुणे, येथे उपलब्ध असलेल्या लाभार्थी यादीनुसार (सन २००७-०८).*

वरील तक्त्यावरुन, संशोधकाने निवडलेल्या चार तालुक्यामध्ये विशेष घटक योजनेअंतर्गत महिला लाभार्थींना फॉल पिकोचे मशीन पुरविणे, या शीर्षकांतर्गत, महिला लाभार्थींची संख्या फारच कमी असल्याचे दिसते. मागासवर्गीय महिलांपर्यंत सदर योजनेची आवश्यक ती माहिती योग्य रितीने पोहचु शकली नाही, हेच या आकडेवारीवरुन सिद्ध होते. त्यामुळे अनेक गरजु व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला, या योजनेचा म्हणावा तसा लाभ उठवु शकल्या नाहीत हे स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.१९
विशेष घटक योजनेअंतर्गत फॉल पिकोचे मशीन
प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या (कालावधी २००८-०९)

| अनु. क्र. | तालुका | विशेष घटक योजनेअंतर्गत फॉल पिकोचे मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या |
|---|---|---|
| १. | बारामती | ६ |
| २. | इंदापूर | ३ |
| ३. | जुन्नर | ७ |
| ४. | खेड | ७ |

*स्त्रोत : महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, पुणे, येथे उपलब्ध असलेल्या लाभार्थी यादीनुसार. (सन २००८-०९).*

वरील तक्त्यावरुन, संशोधकाने संशोधन अभ्यासासाठी निवडलेल्या, चार तालुक्यांमध्ये, शासनाने राबविलेल्या महिला विकास योजनेअंतर्गत सुरु केलेल्या, विशेष घटक योजनेतील महिला लाभार्थींना फॉल पिकोचे मशीन पुरविणे, या शीर्षकाखाली लाभ घेतलेल्या मागासवर्गीय महिला लाभार्थींची संख्या अत्यल्प असल्याचे दिसते. मागासवर्गीय महिलांपर्यंत सदर योजनेची आवश्यक ती माहिती योग्य रितीने पोहचु शकली नाही, हेच या आकडेवारीवरुन सिद्ध होते. त्यामुळे अनेक गरजु व आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिला या योजनेचा लाभ उठवु शकल्या नाहीत, हे स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.२०
जिल्हा परिषद निधी अंतर्गत आणि विशेष घटक योजनेअंतर्गत फॉल पिकोचे मशीन
प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या (कालावधी २००९-१०)

| अनु. क्र. | तालुका | पिठाची गिरणी प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या | |
|---|---|---|---|
| | | जिल्हा परिषद निधी अंतर्गत | विशेष घटक योजने अंतर्गत |
| १. | बारामती | ३५ | १३ |
| २. | इंदापूर | २५ | १२ |
| ३. | जुन्नर | ३२ | १३ |
| ४. | खेड | २० | ९ |

*स्त्रोत : वरील २००९-१० सालामधील उपरोक्त माहिती, जिल्हा परिषद कार्यालय, तसेच महिला व बाल कल्याण विभागामध्ये उपलब्ध असलेल्या महिला लाभार्थींच्या यादीवरुन प्राप्त झाली आहे.*

वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, २००७-०८, २००८-०९ या दोन्ही वर्षापेक्षा २००९-१० या वर्षात निवडलेल्या तालुक्यातील फॉल पिकोचे मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या वाढलेली दिसते. परंतु जिल्हा परिषद निधीतुन फॉल पिकोचे मशीन प्राप्त झालेल्या महिला लाभार्थींची संख्या कमीच असल्याचे आढळते. ही लाभार्थींची संख्या वाढावी यासाठी शासनाने आणखी प्रयत्न करणे गरजेचे आहे, हे यावरुन स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४.२१**

**फॉल पिको मशीनसाठी जिल्हा परिषदेने दिलेले आर्थिक अनुदान आणि तरतुद**

**(कालावधी - २००७-०८, २००८-०९ आणि २००९-१०)**

| वर्ष | जिल्हा परिषदेला प्राप्त झालेले अनुदान (रुपयांत) | फॉल पिको मशीनसाठी आलेला खर्च (रुपयांत) |
|---|---|---|
| २००७-०८ | १,८७,५०० | १,८७,५०० |
| २००८-०९ | ४,९२,७५० | ४,९२,७५० |
| २००९-१० | ६,९२,६४० | ६,९२,६४० |

*स्त्रोत : जिल्हा परिषद कार्यालय, पुणे आणि महिला व बाल कल्याण विभाग.*

### ४.९.८ महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.) स्वयंसहायता गटावर आधारित विविध योजनांचा आढावा :

- ***योजनेचे स्वरुप :***

  बचत गटांवर आधारित महिला विकास योजनांची अंमलबजावणी मा.वि.म.मार्फत करण्यात येते. त्याचा तपशील खाली दिला आहे.

- महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम (१९९४-२००२)
- रमाई महिला सक्षमीकरण योजना (२००३ ते २००६)
- स्वयंसिद्धा योजना (२००३-२००८)
- स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना (२००२ ते आजतागायत सुरु आहे.)

गरजु आणि आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांसाठी राबविलेल्या वरील चारही योजना महिला आर्थिक विकास महामंडळाअंतर्गत राबविल्या जातात. त्यांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे -

### *अ) महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम (१९९४-२००२) :*

आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधीच्या माध्यमातुन, महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम, हा दारिद्र्य निर्मुलनाचा प्रकल्प असुन, त्याचा पहिला टप्पा १९९४ मध्ये चंद्रपुर, यवतमाळ, नांदेड आणि पुणे

या चार जिल्ह्यात, तसेच, सदर प्रकल्पाचा दुसरा टप्पा १९९८ पासुन गडचिरोली, भंडारा, अमरावती, जळगांव, धुळे, ठाणे, नंदुरबार, या आठ जिल्ह्यात राबविण्यात आला.

सदर प्रकल्प हा २००२ मध्ये संपुष्टात आला. त्यावेळी ५,३२१ स्वयंसहायता बचत गटांची निर्मिती झालेली होती आणि त्याअंतर्गत ८०,००० महिलांचे संघटन करण्यात आले होते. सदर प्रकल्पामध्ये मार्च २००६ पर्यंत लाभार्थी महिलांकडुन रु. १०.१५ कोटी इतकी रक्कम बचतीच्या माध्यमातुन जमा झालेली होती. आंतरराष्ट्रीय कृषि विकास निधीची रक्कम आणि महिला लाभार्थींनी जमा केलेली बचतीची रक्कम या मधुन रु. ३९.४१ कोटी आणि बँकांच्या मार्फत रु. २३.३१ कोटी इतक्या रकमेचे कर्ज गरजु व पात्र बचत गटातील सदस्य महिलांना देण्यात आले.

*ब) रमाई महिला सक्षमीकरण योजना (२००३-२००६) :*

विशेष घटक कार्यक्रमांतर्गत, अनुसूचित जातीतील महिलांचे स्वयंसहायता बचत गट तयार करुन, त्यांचा आर्थिक व सर्वांगिण सामाजिक विकास साधण्याच्या उद्देश्याने, मा.वि.म. ने रमाई महिला सक्षमीकरण योजना, २००३ ते २००६ या मर्यादित कालावधीसाठी राबविली गेली. सदर योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, यांच्या अर्थ सहाय्याने आणि स्वयंसेवी संस्थांच्या प्रत्यक्ष कार्यवाहीने राबविण्यात आली.

सदर योजनेअंतर्गत, स्वयंसहायता बचत गटांच्या गरजु लाभार्थी महिलांना संघटित करण्याबरोबरच लिंग समभाव संचेतना कार्यात्मक साक्षरता, उद्योजकता, सामाजिक जाणीव जागृती, स्वसंरक्षण, या विविध घटकांच्या अनुषंगाने, क्षमता वृद्धिपर व्यावसायिक प्रशिक्षण, सहभागी महिला लाभार्थींना दिले गेले. शासन निर्णय कृ. माविम-२००१ /प्र.कृ. ४ /का-१०, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, दि. १५ फेब्रुवारी, २००३ नुसार सदर प्रकल्प राबविण्याची मान्यता महिला आर्थिक विकास महामंडळाला प्राप्त झालेली होती. ही योजना मा.वि.म. ने नियुक्त केलेल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविण्यात आली.

सदर योजनेअंतर्गत मा.वि.म. आणि स्वयंसेवी संस्था, यांनी एकत्रित काम करुन मार्च २००६ पर्यंत १७,९६१ स्वयंसहायता बचत गटांची निर्मिती केल्याचे दिसते. या बचत गटांच्या माध्यमातुन एकंदर २,१६,१०१ महिलांना संघटीत करण्यात आले. त्या महिलांकडुन बचतीच्याद्वारे जमा करण्यात आलेली एकुण रक्कम रु. १२.६६ कोटी होती. त्या अंतर्गत, गरजु महिलांना रु. १४.८८ कोटी रक्कम कर्जाच्या रुपात वितरीत करण्यात आली. कर्ज घेतलेल्या महिला लाभार्थींकडुन त्यापैकी रु. ८.७९ कोटी रकमेच्या कर्जाची परतफेड करण्यात आली.

### *क) स्वयंसिद्ध योजना (२००३-२००८) :*

केंद्र शासन पुरस्कृत, स्वयंसिद्ध योजनेअंतर्गत, महिला आर्थिक विकास महामंडळाने (माविम), २००३ ते २००८ या कालावधीमध्ये, स्वयंसहायता बचतगटांच्या निर्मितीचे आव्हानात्मक कार्य केले. विविध योजनांतर्गत तयार झालेल्या बचत गटांचे महासंघ तयार करणे आणि शासनाच्या विविध विभागांचा कृतीसंगम साधणे, हे स्वयंसिद्ध योजनेचा प्रमुख केंद्रबिंदु होता. हे लक्ष्य साधण्यासाठी महाराष्ट्रातील एकुण १९ जिल्ह्यांतील ३६ तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला.

सदर स्वयंसिद्ध योजनेअंतर्गत, मार्च २००६ पर्यंत एकंदर ३,९२३ स्वयंसहायता बचत गटांची निर्मिती करण्यात आली होती. या बचत गटांच्या माध्यमातुन ४९,७६१ महिलांना संघटित करण्यात आले. या विविध बचत गटांमधील संघटित महिला लाभार्थींनी रु. ३.९० कोटीची रक्कम बचत स्वरुपात जमा केली. शासकिय अनुदान आणि महिला लाभार्थींनी जमा केलेल्या रकमेतुन गरजु महिलांना ३.१० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. त्यापैकी कर्जधारक महिलांकडुन ३.२० कोटी रुपयांची कर्ज परतफेड करण्यात आली. या कालावधीत एकंदर ७,७११ महिला लाभार्थींना स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरु करण्यासाठी बँकांच्या मार्फत ३.४२ कोटी रुपयांचे कर्ज प्राप्त झाल्याचे स्पष्ट होते.

### *ड) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना :*
### *(२००२ ते आजतागायत सुरु आहे.)*

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना, सन १९९९ मध्ये सुरु झालेली असुन, महिला आर्थिक विकास महामंडळाने सन २००१ मध्ये प्रत्यक्षात ती कार्यान्वित केली. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषे खालील आर्थिकदृष्ट्या दुर्बल, कमकुवत व गरजु महिलांना स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातुन एकत्र आणुन त्यांना छोट्या उद्योग व्यवसायांसाठी प्रवृत्त करणे, प्रोत्साहित करणे, हा या योजनेचा प्रमुख हेतु असुन, त्याअंतर्गत लाभार्थी महिलांना आर्थिक अनुदानाच्या सुविधेसह शासनाकडुन ठराविक निधी उपलब्ध करुन दिला जातो.

सदर योजना मा.वि.म. तर्फे ३१ ग्रामीण व मागास जिल्ह्यात राबविण्यात येत असुन, या अंतर्गत मा. वि. म. च्या सहकार्याने अनेक स्वयंसेवी सामाजिक विकास संस्था, ग्रामसेवक, विविध पंचायत समित्यांचे वरिष्ठ अधिकारी, अंगणवाडी सेविका, एकत्र येऊन गावोगाव स्वयंसहायता बचत गटांची मोठ्या प्रमाणात निर्माण करण्याचे आव्हानात्मक कार्य करीत आहेत.

**तक्ता क्र. ४.२२**

**स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत**

**तालुकानिहाय स्वयंरोजगार अनुदान आणि स्वयंसहायता बचत गटांच्या माध्यमातुन**

**लाभार्थींना वाटप करण्यात आलेल्या कर्जाचा तपशील (कालावधी २००२ ते २००८)**

*(रुपये - लाखात)*

| अनु. क्र. | तालुका | बचत गटाचे उद्दिष्ट्य | बँकेकडे सादर प्रस्ताव | मंजुर /वाटप बचत गट | स्वयंरोजगारी लाभार्थी | शासकीय अनुदान रुपये | कर्जवाटप रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | *बारामती* * | *३४* | *३४* | *३१* | *३००* | *२७.२८* | *४८.५२* |
| २. | *इंदापूर* * | *४०* | *७६* | *७६* | *०* | *७५.३४* | *२११.८८* |
| ३. | *जुन्नर* * | *४०* | *८* | *७* | *३८५* | *३८.५०* | *७१.४०* |
| ४. | *खेड* * | *४०* | *३७* | *३७* | *७१* | *६.८१* | *१६.३०* |
| ५. | आंबेगांव | २४ | २९ | २९ | २८८ | २८.८० | ५९.७५ |
| ६. | भोर | १० | २१ | २१ | २०२ | २०.०९ | ४९.५५ |
| ७. | दौंड | २६ | २९ | २९ | २६४ | २३.५७ | ५३.५६ |
| ८. | हवेली | ३४ | २५ | २३ | २१६ | २१.३२ | ३६.२६ |
| ९. | मावळ | १६ | १२ | १२ | १०९ | ९.५७ | १८.२० |
| १०. | मुळशी | ८ | ८ | ८ | ६० | ६.०० | १६.५२ |
| ११. | पुरंदर | १० | ९ | ६ | ६६ | ६.६० | १६.५२ |
| १२. | शिरुर | १८ | ४० | ४० | ३७२ | २९.११ | ८१.५७ |
| १३. | वेल्हा | ४ | १ | १ | १० | ०.७२ | १.८३ |
| | एकुण | ३०४ | ३२९ | ३२० | ३,१३५ | २९३.७१ | ७६१.८६ |

*स्त्रोत :* *पुणे जिल्हा परिषद, ग्राम विकास यंत्रणा अहवाल, २००८.*
** संशोधनासाठी निवडलेले तालुके.*

**वरील तक्त्यावरुन असे दिसुन येते की, पुणे जिल्ह्यामध्ये, मार्च २००८ अखेर, मा.वि.म.चे ३०४ बचत गट स्थापनेचे उद्दिष्ट होते, तर ३२९ बचत गटांकडुन बँकाकडे मंजुर प्रस्ताव सादर करण्यात आले. त्यापैकी ३२० बचत गटांना बँकामार्फत कर्जाचे वाटप करण्यात आल्यामुळे एकंदर ३,२१४ बचत गटांमधील लाभार्थींना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. त्यामध्ये महिला लाभार्थींचे प्रमाण ३,१३५ इतके असुन, त्यांना ३११.२६ लाख रुपयांचे शासकीय अनुदान देण्यात आले. त्यापैकी**

२९३.७१ लाख रुपयांचे अनुदान केवळ महिला लाभार्थींना प्राप्त झाले तर एकुण कर्ज वाटपाची रक्कम ७९५.९२ लाख रुपये असुन, त्यापैकी स्त्रियांना ७६१.८६ लाख रुपये कर्जाच्या स्वरुपात प्राप्त झाले.

या वरुन पुणे जिल्ह्यातील महिला स्वयंसहायता बचत गटांची झालेली उल्लेखनिय प्रगती आपल्याला दिसुन येते. पर्यायाने, त्या अनुषंगाने, शासनाच्या प्रयत्नांना विविध महिला विकास योजनांच्या माध्यमातुन, महिला सबलीकरणाच्या बाबतीत यश मिळत असल्याचे स्पष्ट होते.

तक्ता क्र. ४.२३
स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत
१९९९-२००० ते २००७-२००८ या कालावधीमधील स्वयंसहायता बचत गटाच्या आकडेवारीचा तपशील

*(रुपये - लाखात)*

| अनु. क्र. | कालावधी (साल) | बचत गटांची संख्या | स्वयंरोजगारी संस्थाची संख्या | कर्ज मंजुर रक्कम (रुपये) | शासकीय अनुदान रक्कम (रुपये) | एकुण कर्ज वाटप रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | १९९९-२००० | काही नाही | काही नाही | काही नाही | काही नाही | काही नाही |
| २. | २०००-२००१ | ३४ | ३६१ | ९६.६१ | ४१.१९ | १३७.८० |
| ३. | २००१-२००२ | ६५ | ६६७ | ११८.७८ | ७८.९७ | १९७.७५ |
| ४. | २००२-२००३ | ११३ | १,१८० | १९१.४४ | १११.८१ | ३०३.२५ |
| ५. | २००३-२००४ | १८३ | १,८९८ | ३१८.४६ | १८३.८२ | ५०२.२८ |
| ६. | २००४-२००५ | १९३ | १,८६२ | ३१०.५७ | १९१.२७ | ५०१.८४ |
| ७. | २००५-२००६ | १६५ | १,५०१ | ४९०.९९ | १५६.४८ | ६४७.४७ |
| ८. | २००६-२००७ | १९८ | २,०२५ | ४२०.६६ | १९३.१८ | ६१३.८४ |
| ९. | २००७-२००८ | ६२ | ६६४ | १२८.२८ | ६३.११ | १९१.३९ |
| एकुण | | १,००४ | १०,१७४ | २,०७५.७९ | १,०१९.८३ | ३,०९५.६२ |

*स्त्रोत : पुणे जिल्हा परिषद, ग्राम विकास यंत्रणा अहवाल, २००८.*

- ***स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना समितीची तालुका पातळीवरील संरचना :***

प्रत्येक तालुका पातळीवर, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेअंतर्गत, कार्यकारिणी समितीचे स्वरुप खाली दर्शविल्याप्रमाणे असते.

- प्रकल्प संचालक – जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण. ... अध्यक्ष
- प्रकल्प अधिकारी – स्वयंरोजगार योजना. ... सदस्य
- बचत गटांमधील सर्व बँक शाखांचे अंमलबजावणी करणारे शाखा व्यवस्थापक. ... सदस्य
- संबंधित संलग्न विभागाचे गटस्तरीय उपविभागीय सदस्य अधिकारी. ... सदस्य
- अशासकीय संघटना प्रतिनिधी (प्रत्येकी एक) ... सदस्य
- गट विकास अधिकारी ... निमंत्रक

गट विकास अधिकारी यांच्यामार्फत, स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार समितीची आवश्यकतेनुसार, बैठक बोलविण्यात येते. प्रत्येक गटात अग्रणी बँक अधिकारी, नाबार्डचा डेप्युटी डेव्हलपमेंट मॅनेजर (डी.डी.एम्.) आणि रिझर्व बँकेचा अग्रणी जिल्हाधिकारी, असे मान्यवर, विशेष निमंत्रित म्हणुन, जास्तीत जास्त बैठकींना उपस्थित राहतात. त्यामुळे स्थानिक पातळीवरील समस्यांशी ते अल्पावधित परिचित झाल्यामुळे उद्भविलेल्या व भविष्यात उद्भविणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी योग्य तो पर्यायी मार्ग सुचवू शकतात.

तक्ता क्र. ४.२४
महिला आर्थिक विकास महामंडळ (मा.वि.म.), मुंबई
विविध शासकीय विकास योजनांमधील
एकुण स्वयंसहायता बचत गट निर्मिती आणि सभासद संख्या (ऑक्टोबर २०१० नुसार)

| अनु. क्र. | योजना | स्थापित बचत गट | एकुण सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १. | स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना | १०,०७० | १,१७,८०३ |
| २. | स्वयंसिद्ध योजना | ३,२२० | ४२,२७४ |
| ३. | रमाई महिला सक्षमीकरण योजना (विशेष घटक योजना) | १७,२८३ | २,१८,५२१ |
| ४. | महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम | २,९१८ | ४२,२१४ |

*स्त्रोत : महाराष्ट्र शासन, कार्यक्रम अंदाजपत्रक, महिला व बाल विकास विभाग, २०११-१२.*

तक्ता क्र. ४.२५

एकुण सभासदांचा जातीनिहाय तपशील (ऑक्टोबर २०१०)

| अनु. क्र. | योजना | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | इतर मागासवर्गीय | अल्पसंख्यांक | भटक्या जमाती | खुला वर्ग | एकुण सभासद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना | २०,२६४ | २१,४४७ | ३३,८५७ | ३,४१३ | १३,१४६ | २५,६७६ | १,१७,८०३ |
| २. | स्वयंसिद्ध योजना | ३,३२७ | १६,५३१ | १०,७०४ | १,८८३ | ३,१०७ | ६,७२२ | ४२,२७४ |
| ३. | रमाई महिला सक्षमीकरण योजना (विशेष घटक) | १,९९,९२२ | ४,४६१ | ८,६०३ | १,८५९ | ४,२५४ | ३,६७१ | २,१८,५२१ |
| ४. | महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम | ६,१०८ | ८,३१६ | १९,१३४ | ५४२ | ३,०४२ | ५,०७२ | ४२,२१४ |

स्त्रोत : महाराष्ट्र शासन, कार्यक्रम अंदाजपत्रक, महिला व बाल विकास विभाग, २०११–१२.

**तक्ता क्र. ४.२६**
**पुणे जिल्ह्यातील स्वयंसहायता बचत गटांची प्रगती (कालावधी २००९-१०)**

| अनु. क्र. | तालुका | दारिद्र्य रेषेखालील बचत गटांची संख्या | दारिद्र्य रेषेवरील बचत गटांची संख्या | एकुण बचत गट |
|---|---|---|---|---|
| १. | *बारामती* * | *१,२७४* | *३,२९६* | *४,५७०* |
| २. | *इंदापूर* * | *१,१२९* | *२,९४२* | *४,०७१* |
| ३. | *जुन्नर* * | *८३१* | *३,९२१* | *३,७५२* |
| ४. | *खेड* * | *६५०* | *२,८४३* | *३,४९३* |
| ५. | आंबेगांव | ५९४ | २,६०० | ३,१९४ |
| ६. | भोर | ६७२ | १,७६२ | २,४३४ |
| ७. | दौंड | १,१०४ | १,६१८ | २,७२२ |
| ८. | हवेली | ५४२ | ३,३५४ | ३,८९६ |
| ९. | मावळ | ५९८ | २,९६० | ३,५५८ |
| १०. | मुळशी | ३८४ | १,४२८ | १,८१२ |
| ११. | पुरंदर | ६७६ | ३,१६७ | ३,८४३ |
| १२. | शिरुर | ५६९ | २,७९९ | ३,६६८ |
| १३. | वेल्हा | १३४ | ७९४ | ९२८ |
| | एकुण | ९,१५७ | ३३,४८४ | ४१,६४१ |

*स्त्रोत : पुणे जिल्हा ग्रामीण विकास संस्था, २००९-१०.*

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते कि, संशोधनासाठी निवडलेल्या चारही तालुक्यांमध्ये एकुण बचत गटांची संख्या २००९-१० या कालावधीत वाढलेली आहे. त्याचप्रमाणे, बारामती तालुक्यात दारिद्र्य रेषेखालील बचत गटांची संख्या आणि दारिद्र्य रेषेवरील बचत गटांची संख्या उल्लेखनिय असल्याचे आढळते.

## संदर्भ सूची (References) :


- महाराष्ट्र शासन, 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन', पुणे जिल्हा, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे, २०११, पृ. क्र. १.
- 'पुर्वोक्त', २०११, पृ. क्र. ६५.
- 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी', अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २०११-१२, पृ. क्र. १४.
- 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी', २०११-१२, पुर्वोक्त, पृ. क्र. ९४, १७०, १७१.
- दास्ताने संतोष, 'महाराष्ट्र वार्षिक', नितिन प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. क्र. ४३०.
- **Government of India, 'Gazetteer of Bombay State', Poona District, Government Central Press, Bombay, 1954, pp. 1.**
- 'पुणे जिल्हा : आर्थिक व सामाजिक समालोचन', पुणे जिल्हा, २००९-१०, पृ. क्र. I, II, III, IV.
- पुणे जिल्हा परिषद, ग्राम विकास यंत्रणा, पुणे रिपोर्ट, मार्च २००८, ऑगस्ट २००८ अखेर.
- पुणे महानगरपालिका नागरवस्ती विकास योजना - विविध कल्याणकारी योजना, २००८-०९, परिशिष्ट्ये, बचत गटासंबंधी कागदपत्रे.
- मुलाणी एम्. यु., 'महिला स्वयंसहायता बचत गट', डिसेंबर २००६, डायमंड प्रकाशन.
- अहवाल - पुणे जिल्हा परिषद, ग्रामविकास यंत्रणा, पुणे, रिपोर्ट, मार्च २००८, ऑगस्ट २००८ अखेर.
- कदम प्रभा, 'महिला सक्षमीकरणामध्ये महिला बचत गटांचे योगदान : सातारा जिल्ह्याचा सुक्ष्म अभ्यास', अर्थशास्त्र परिषद, २००७.
- भागवत विद्युत, 'स्त्रियांचा विकास, कल्याण की सक्षमीकरण', स्त्री मासिक, मार्च-एप्रिल २००८, पृ. क्र. ३२.
- 'महिला व बाल विकासाच्या योजना', महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, यशदा, पुणे, पृ. क्र. १४, १५, २१, २२.
- 'कार्यक्रम अंदाजपत्रक - २००९-१०, २००८-०९, २००५-०६, २००२-०३, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
- लोकराज्य मासिक, मार्च २०१०, पृ. क्र. ३, ४, ५, ९.

- यशमंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, जानेवारी-मार्च २०१४, पृ. क्र. २७.
- यशमंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, जानेवारी-मार्च २०००२, पृ. क्र. ११, १३, १९, २३, २७, ४९, ७१.
- पंचायत महिला शक्ती अभियान कार्यशाळा, महिला सबलीकरण कक्ष, संशोधन व प्रलेखन केंद्र, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, जानेवारी-मार्च २०१४, पृ. क्र. ६१, ६२, ६३, ६५.
- यशमंथन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर २०००९, पृ. क्र. २२, २७.
- 'माहिती पुस्तिका - सन २०११-१२', महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे, पृ. क्र. ३८, ४२, ४३, ४६.
- महाराष्ट्र शासन, 'दहाव्या पंचवार्षिक योजनेसाठी स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गटाच्या शिफारशी', अध्यक्ष - उमर काझी, १३ नोव्हेंबर, २००१.
- 'महिला व बाल विकास धोरण आणि निर्णय - १९७५ ते जानेवारी २००२ : एक दृष्टिक्षेप...', महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रकाशक - यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे, ८ मार्च २००२, (प्रथम आवृत्ती).
- पुणे जिल्हा परिषद, महिला व बाल विकास विभाग - अहवाल २००९-१०, २००८-०९, २००५-०६, पुणे.

## संकेतस्थळे : (websites)

- *www.wikipidia.pune.dist*
- *www.maharashtra.gov.in*
- *www.mavim.com*
- *pune.mah.mic.in/zp*

.....

# महाराष्ट्र राज्य नकाशा



# प्रकरण ५

# स्त्रियांच्या सद्यस्थितीचा आढावा (करोना काळातील)

**५.१ प्रस्तावना**

**५.२ करोना काळातील मुली/स्त्रियांची शक्षणाची परिस्थिती**

**५.३ करोना काळातील बालविवाहांचे प्रमाण**

**५.४ करोना काळात पुरुषांच्या तुलनेत स्त्री कामगाराच्या नोकरीत सर्वांत जास्त कपात**

**५.५ स्थलांतरित स्त्रिया**

**५.६ निष्कर्ष**

**५.७ संदर्भसूची**

## ५.१ प्रस्तावना

भारतामध्ये स्त्रीशिक्षणाचे प्रमाण कमी असण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत.त्यामध्ये येथील समाजाची जातपितृसत्ताक रचना व तिच्यामुळे निर्माण झालेला स्त्री शिक्षणाप्रतीचा नकारात्मक दृष्टिकोन हा मुख्य अडसर असल्याचे दिसून येते.येथील जातीय पितृसत्ताक मानसिकतेनुसार आजही स्त्रिच्या आयुष्याचे मुख्य ध्येय 'चूल आणि मूल' हेच गृहीत धरले जाते.तसेच मुलगी परक्याचे धन मानली जाते.त्यामुळे तिला शिकवून काय फायदा असे मानून तिच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते.

स्त्रियांना दुय्यमत्वपासून मुक्त करून त्यांना समानता ,न्याय ,आणि सक्षमीकरनाचे हक्क मिळवून देणे हे लिंगभावावर आधारित नियोजनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या नव्या नियोजन प्रणालीला अधिकृतता प्राप्त होण्याआधी ज्या प्रतिक्रियांद्वारे ती प्रत्यक्षात उतरणार आहे त्यांचे नेमके स्वरूप लक्षात घेतले पाहिजे.

आर्थिक नियोजनात लिंगभावाचा मुद्दा महत्वाचा का आहे या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला प्रथम विकास आणि स्त्रिया याबाबतची धोरणे तसेच विकसनशील देशातील विकासाचे नियोजन करणाऱ्या व्यक्तींची वैचारिक जडणघडण तपासून पहावी लागेल. संयुक्त राष्ट्र संघाने १९७६-८५ हे दशक स्त्रियांचे दशक म्हणून साजरे केले .याचा चांगला परिणाम म्हणजे 'तिसऱ्या जगातील' देशातील आर्थिक व सामाजिक विकासात स्त्रियांच्या आत्तापर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या महत्वाच्या योगदानावर प्रकाश पडला आणि मुख्यतः कमी उत्पन्न असलेल्या वर्गातील स्त्रियांचे कष्ट व त्यांची धडपड समोर आली .या दशकात संशोधक आणि धोरणकर्त्यांच्या दृष्टिकोनात बराच बादल घडून आला .संशोधकांनी स्त्रीला केवळ कुटुंबाच्या गरजा भागवणाऱ्या आणि प्रजननाची जबाबदारी सांभाळणारी या संकुचित दृष्टिकोनातून बघण्याऐवजी उत्पादनातील स्त्रियांची भूमिका व त्यांच्या श्रम आणि रोजगारामागील  गुंतागुंत समजावून घ्यायला सुरुवात केली .याच दशकात धोरणकर्त्यांनी देखील उत्पादक म्हणून स्त्रियांच्या भूमिकेला महत्त्व द्यायला सुरुवात केली. तरीदेखील करोनाच्या काळात यामध्ये मोठया प्रमाणात तफावत आढळली.तसेच स्त्रियांच्या परिस्थिती खूपच बिकट झाली.

## **५.२ करोना काळातील मुली/स्त्रियांची शक्षणाची परिस्थिती**

### **◆बाल शिक्षण**

जागतिक पातळीवर कार्यरत असणाऱ्या OXFAM या संघटनेने जानेवारी २०२१मध्ये 'The Inequality Virus' या नावाने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये भारतासंबंधी एक स्वतंत्र पुरवणी आहे. हा अहवाल २०२० या वर्षातील परिस्थिती मांडतो. अहवालातील शिक्षणासंबंधी काही निरीक्षणे पुढीलप्रमाणे आहेत

- ➢ जगभरातील १ अब्ज ६० कोटी बालकांच्या शिक्षणावर कोरोनासंकटामुळे परिणाम झाला आहे.
- ➢ २ कोटी ४० लाख मुले आणि किशोरवयीन मुले शाळाबाह्य राहण्याचा धोका निर्माण झाला आहे.

- शाळा बंद असल्यामुळे ३२ कोटी भारतीय मुलांवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. त्यापैकी ८४ टक्के मुले ग्रामीण आणि ७० टक्के मुले शहरी भागातील सरकारी शाळांतील होती.
- विद्यार्थ्यांच्या गळतीमध्ये दलित, आदिवासी आणि मुस्लीम विद्यार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.
- यातून बालमजुरीची आणि बालविवाहाची समस्या आणखी तीव्र होईल.
- लॉकडाऊनच्या काळात, शाळेत शिकणाऱ्या मुलांसाठी ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग सुचवला जात आहे. ऑनलाइन शिक्षणाच्या संधी मुलींसाठी कितपत लागू होतील हे पाहायचे झाल्यास लॉकडाऊनपूर्वी म्हणजे जानेवारी २०२० मध्ये युनिसेफ आणि सेंटर फॉर बजेट पॉलिसी स्टडीजच्या अहवालानुसार १५-१८वर्ष वयोगटातील ४०% मुली आजही शिक्षणापासून दूर आहेत. यातील ३०% मुलींनी त्याच्या आयुष्यात शाळेत कधी पायही टाकला नाहीये. सद्यस्थितीत ह्या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करून चालणार नाही.

राज्यघटनेतील कलम २१अ आणि शिक्षण हक्क कायदा यानुसार देशातील ६-१४ वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकाला सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे अशी तरतूद असली तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबाजवणी होताना दिसत नाही. परिणामी लाखो मुले-मुली शिक्षणापासून आजही वंचित आहेत.

या लॉकडाऊनमुळे गरीब लोकांचे हाल सुरू आहेत. बहुतांश मजुरांना त्यांचा रोजगार गमवावा लागला आहे. या स्थलांतरित मजुरांसोबत बोलत असताना त्यांनी ही सगळी परिस्थिती सुधारत नाही, तोपर्यंत सर्व प्रकारच्या खर्चात कपात करावी लागणार असल्याचे मत व्यक्त केले. रोटी, कपडा आणि मकान या जीवनावश्यक गोष्टीमध्ये सध्याच्या स्थितीत रोटी आणि रोटीसाठी कमाई गरजेची आहे. यावरच फक्त खर्च केला जाईल असे त्यांचे म्हणणे होते. मुलांच्या शिक्षणाबद्दल विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, ‘लडकी के पढाई का खर्चा नही कर सकते. अभी तो गाव मे जाकर ऐखाद सालमे शादी कर देंगे.’ दूसरा व्यक्ती सांगत होता अभी काम नही है. गाव जाने को और आठ दिन लगेंगे. सारे पैसे भी खत्म हो चुके है. गाव जाकर सावूकाहर (सावकार) के पाससे कर्जा लेकर काम शुरू नही होता तब तक गुजारा करना पडेगा. काम शुरू हो जाये

तब सारे काम करेंगे तभी जिंदा रह सकते है, पढाई के बारे तो सोच भी नही सकते'. असे गरीब मजुरांचे उत्तर होते. ही सगळे मजूर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची दारे कोविड १९ ने बंद केली आहे.

या सगळ्या परिस्थितीवर विचार करून शिक्षण धोरण ठरवणे गरजेचे आहे. कोविड १९ मुळे शाळा सप्टेंबर महिन्यात सुरू होतील असा सरकार विचार करत आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर सरकारने बऱ्याच राज्यात ई-लर्निंग सुरू केले आहे. इतकेच काय तर टीव्ही आणि रेडियोच्या माध्यमातूनही शिक्षण सुरू केले गेले आहे.

यासंदर्भात दिल्ली शहरातील काही सरकारी शाळेतील शिक्षकांसोबत राइट टु एड्यूकेशन फोरमच्या सदस्यांनी चर्चा केली असताना शाळांमध्ये शालेय मुलांना ऑनलाइन शिक्षण सुरू केले आहे. यात त्यांना होम वर्क दिला जात आहे. यात केवळ २५-३०% मुली होमवर्क पूर्ण करू शकत आहे. यामागचे कारण जाणून घेतले असता मुलींकडे स्वत:चा स्मार्ट फोन नाही. घरात एकच स्मार्ट फोन आहे. हा फोन वडील किंवा भावाकडे असतो. हे दिल्लीसारख्या शहरातील मुलीच्या ऑनलाइन शिक्षण पद्धतीचे चित्र समोर यायला सुरुवात झाले आहे. वरून आपण अंदाज बांधू शकतो की, दिल्लीसारख्या शहराचे हे चित्र असेल तर ग्रामीण भागातील आणि छोट्या शहरातील गरीब घरातील मुलींसाठी लॉकडाऊननंतर शिक्षण खरच मिळेल का?

एकंदरीत देशातील स्त्री शिक्षणाचा इतिहास पाहिला तर स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतरही मुलींसाठी शिक्षण उपलब्ध होत नाही. शाळा गळतीचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही. उदाहरण म्हणून पाहायचे झाल्यास कोणतीही आपत्ती आली तर मुलीच्या शिक्षणावर परिणाम होत असतो. मराठवाड्याच्या दुष्काळाच्या काळात अनेक मुलींना पाणी आणण्यासाठी टँकरवर नंबर लावणे किंवा दुसरीकडून पाणी आणणे यासाठी शाळा सोडलेल्या आढळून येते. पुढे एखाद वर्षात याच मुलीची लग्न लावून देण्यात येतात.

काही वर्षापूर्वी इबोला पॅनडेमिकमुळेही आता सारखीच परिस्थिती उदद्भवली होती. याचाही सर्वाधिक परिणाम हा मुलीच्या शिक्षणावर झाल्याचे अनेक आंतरराष्ट्रीयस्तरावर झालेल्या अभ्यासातून समोर आले. इबोलाचा फैलाव रोखण्यासाठी ई-लर्निंग, टीव्ही शो सुरू केले गेले पण ही सुविधा मुलींसाठी खूपच कमी प्रमाणात मिळाली. मुली घरी असल्यामुळे त्याच्यावर घरातील सगळी काम करण्याची जबाबदारी टाकण्यात आली.

मुलींनी घरी राहून घरातील कामे करणे, मुलगी जबाबदारी असते म्हणून कमी वयात लग्न लावून देणे यातून होणारी गर्भधारणा, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक शोषण यासारख्या अत्याचारांना बळी पडतात.

आपल्या देशात मुलींच्या शिक्षणावर परिणाम करणारे घटक म्हणून पाहिले तर गरीबी, सामाजिक विषमता, जातीप्रथा, पितृसत्ताक पद्धती आणि लिंग भेदभाव अशा कारणामुळे अनेक मुलींनी शाळेची पायरी कधी चढली नाही, काही मुलीचे शिक्षण अर्थवट सुटले तर काही मुलींनी त्याच्याबाबतीत होणाऱ्या शोषनामुळे शिक्षण सोडले. यात समाजातील गरीब किंवा दुर्लक्षित घटकातील (मार्जिनल कम्युनिटी ) मुलीचा समावेश आहे.

१९८६ चे शिक्षण धोरण जर पाहिले तर यात मुलीचे शिक्षण आणि मुलीच्या सक्षमीकरणावर भर दिला होता. त्यानंतर मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेतले गेले. सध्याही देशात ‘बेटी बचाव बेटी पढाव’चा जोरदार नारा दिला जात आहे. शैक्षणिक धोरणाचा नवीन मसुदाही चर्चेत आहे. कोविड १९ नंतर मुलींसाठी शिक्षण कसे असेल याचा विचार केला तर सद्यपरिस्थिती लोकांसमोर जगण्याचे प्रश्न उभे आहेत.

यावर मात करण्यासाठी कोठे कपात करायची असेल तर ही कपात मुली-मुलांच्या शिक्षणावर केली जाते. एकवेळ मुलांसाठी शिक्षण सुरू करण्याचा विचार केला जातो पण मुलीच्या बाबतीत ही शक्यता धूसर होत जाते. आजही मुलगी परक्याचे धन, मुलगी म्हणजे जबाबदारी ह्या विचारांची पाळंमुळ घट्ट रूतलेली आहेत. ‘शाळा बंद पण शिक्षण सुरू’ असे धोरण जरी राबविले जात असले तरी स्मार्ट फोन किती लोकांकडे उपलब्ध आहे, मुलींना अभ्यासासाठी फोन किंवा अन्य गॅझेटस उपलब्ध करून दिली जातील का? यावर उपाय म्हणून टीव्हीवर शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. टीव्ही माध्यमाचा विचार केला तरी टीव्ही पाहाण्यासाठी वेळ, अभ्यासक्रम लिहून घेण्यासाठी शैक्षणिक साहित्य वही, पेन इत्यादी मुलींसाठी उपलब्ध होतील का? हे प्रश्न शेष राहतात हा एक भाग झाला.

यातील दुसरा भागही समजून घेणे गरजेचे आहे, पोस्ट लॉकडाऊननंतर बऱ्याच मुली शाळेत परत येणार नाही. पालक जबाबदारीतून मोकळं होण्यासाठी मुलीचे लग्न लावून देतील. आपत्तीच्या काळातील उदाहरण द्यायचे झाल्यास वर्ष २०१५ मराठवाडा, विदर्भ

या भागात दुष्काळ होता. या दुष्काळात मुलामुलीवर पाणी भरण्याची जबाबदारी होती. दुष्काळी भागातून कामाच्या शोधात जेव्हा कुटुंब स्थलांतरित झाले तेव्हा अनेक गावात वयात आलेल्या मुलींचे लग्न लावून दिले गेले. मुलीला सोबत घेऊन गेलो तिच्या बाबतीत काही घडले तर या काळजी पोटी बाल वयात लग्न लावून देणे हा मार्ग सोपा वाटतो. कमी वयातील लग्न यातून येणारे मातृत्व, कुपोषण ही समस्याची साखळी घेऊन येतात.

पोस्ट लॉकडाऊननंतरही अशीच स्थिती उत्पन्न होईल. जेव्हा शाळा सुरू होतील तेव्हा मुलीवर घरातील कामांची जबाबदारी असेल. इतक्या दिवसांनंतर शाळा सुरू झाली शिकून काय होणार म्हणून मुलीसाठी शिक्षणाची कवाड बंद होऊ शकतात. बाल विवाहाचे प्रमाण वाढू शकते. दिव्यांग मुलींसाठीच्या अडचणी अजून वेगळया आहेत. ह्या सगळया परिस्थितीत पुन्हा सामाजिक विषमतेची दरी रुंदावत जाईल, गरिबांसाठी समस्याची साखळी निर्माण होईल.

देशात जर खऱ्या अर्थाने बेटी बचाव बेटी पढावची अंमलबजावणी करण्यासाठी पोस्ट लॉकडाऊन मुलीचे शिक्षण अर्धवट सुटू नये म्हणून मुलींसाठी विशेष शैक्षणिक स्कॉलरशिप देता येईल का यावर धोरणात्मक विचार करावा लागेल. 'माझी कन्या भाग्यश्री', 'सुकन्या ठेव योजना' यातील रक्कम आता मुलीच्या शिक्षणासाठी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मुलींची शाळा बंद होऊ नये म्हणून त्यांच्या पालकांसोबत संवाद साधावा लागेल. पालकांचे समुदेशन करावे लागेल. आपल्याकडे शालेय समुपदेशक नाहीत त्यामुळे ही जबाबदारी शिक्षक, शालेय स्थानिक समिती सदस्य, पालक संघ यांच्यामार्फत करावी लागेल.

येणाऱ्या काळात सर्व शाळामध्ये प्रशिक्षित शालेय समुपदेशक नियुक्त करणे गरजेचे आहे. गेल्या अनेक वर्षापासून शाळेत शालेय समुपदेशक नियुक्त करण्याबाबतचे विधेयक सरकार दरबारी पडून आहे. या महामारीच्या काळात यावरही सरकारने विचार करणे गरजेचे आहे.

ऑनलाइनपेक्षा ऑफलाइन शिक्षण कसे देता येईल. पूर्वी शिक्षणासाठी सुरू केलेल्या योजना साखर शाळा, महात्मा फळे शिक्षण योजना, वस्ती शाळा हे प्रारूप नव्याने तयार करावे लागणार आहे. शिक्षणाची यापुढली पावले ओळखून जर स्वत:च्या पायांवर उभे

राहण्यासाठी, मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी बेटी पढाओचा नारा यशस्वी करण्यासाठीसआजच्या 'ऑनलाइन'वर समाधानी न राहता त्यापुढे जावे लागेल.

राज्यात ४००० पेक्षा अधिक शाळा बंद होणार अशी चर्चा होत आहे. ह्या शाळेतील मुलांनी कोठे जायचे. शहरी गरीब वस्त्या आणि खेडोपाडी वाडी वस्त्यावर आता कुठे शिक्षण सुरू होत होते त्याठिकाणी कोरोनाची नकार घंटा घोंगावत आहे. या सगळ्याचा परिणाम मुलामुलीच्या शिक्षणावर होणार आहे. प्रामुख्याने मुलीच्या शिक्षणासोबत त्याच्या आयुष्यावरही होणार आहे. गरीब घरातील मुलीसाठी शाळा, शाळेतील मैत्रिणी, त्याच्या सोबतचा संवाद हे मुलीचे भावविश्व आहे. शाळेचा वेळ हा फक्त ह्या मुलीचा वेळ असतो. ऐरवी मुलींना घराबाहेर पडण्याच्या संधी मिळत नाही. अशा सगळ्या गोष्टीचा परिणाम मुलीच्या आयुष्यावर होईल. कोरोना कोविड १९ मुळे मुलीसाठी शिक्षणाचे लॉकडाऊन होऊ नये म्हणून ई-लर्निंग, ऑनलाइन शिक्षणापेक्षा ऑफलाइन शिक्षणाचे पर्याय लागू करावे लागतील.

## ५.३ करोना काळातील बालविवाहांचे प्रमाण

**◆करोनामुळे बालविवाहांच्या प्रमाणात वाढ-**

भारतात 40 टक्क्यांपेक्षा जास्त आणि महाराष्ट्रात 30 टक्क्यांपेक्षा जास्त होणारे विवाह हे बालविवाह असतात. आजही बालविवाह होणाऱ्या मुलींचे वय 12 ते 16 वयोगटातील असते व केवळ आदिवासी, भटके यांच्यातच नव्हे तर सर्वच जातींमध्ये बालविवाहाचे प्रमाण अत्यंत गंभीर आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना व सर्वांसाठी आरोग्य ही घोषणा प्रत्यक्षात आणताना बालविवाह हा सर्वात मोठा अडथळा आहे, याचे कारण ती मुलगी बालविवाहानंतर कायमस्वरूपी आजारी होते. तिच्यात सातत्यानं न्यूनगंड राहतो, होणारी संतती ही कमी वजनाची व कुपोषित असते ती मुलगी कमी शिकलेली व निरक्षर राहिल्याने स्वावलंबी होऊ शकत नाही. बालविवाह कायदा अत्यंत कठोर असूनही त्याबाबत गुन्हे किंवा शिक्षा होण्याचे प्रमाण हे नगण्य आहे, असे मत सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केले आहे.

संपूर्ण जग गेल्या वर्षभरापासून कोरोना साथीच्या संकटात सापडलंय. याचा महिलांवर अधिक परिणाम झालाय. त्यामुळे या दशकभरात कोरोनामुळे सामाजिक-

आर्थिक पातळीवर खूप मोठे बदल होतील असंया रिपोर्टनं म्हटलंय. तसंच बालविवाहाची संख्याही एक कोटींनी वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आलीय.

शाळा बंद होणं, वाढता आर्थिक ताण, आरोग्य सेवांमधे अडथळा, कोरोनामुळे गर्भधारणेत वाढ आणि पालकांचा मृत्यू दर वाढल्यामुळे बालविवाहाच्या घटना वाढू शकतात. कोरोनाच्या काळात एकत्र येण्याची आणि शारीरिक अंतराच्या नियमांचं पालन करायची बंधनं आहेत. मुलींसाठी आरोग्य, सामाजिक सेवा ही एक समस्या बनलीय.

सध्याच्या संकटकाळात बालविवाह, त्यातून आलेली गर्भधारणा आणि स्त्री पुरुष विषमतेमुळे मुलींना मदत मिळणं कठीण झालंय. त्यांच्या शाळा सोडल्याच्या घटनांमधे वाढ झालीय. भविष्य दिसेनासं झालंय. तर कोरोनाच्या संकटामुळे कुटुंबांचं उत्पन्नही कमी झालंय. दोन वेळंच जेवण मिळणं अवघड होतं. अशात मुलींचा सांभाळ कसा करायचा या विवंचनेत पालक असतात. त्यामुळेही लवकर लग्न लावून दिली जातात.

रिपोर्टमधल्या आकडेवारीनुसार, जगभरातल्या ६५ कोटी मुलींचं त्यांच्या बालपणातच लग्न होतं. त्यातली अर्धी लग्न बांगलादेश, ब्राझील, इथिओपिया, भारत आणि नायजेरियातून होतात. जगाचा विचार केला तर १८ वर्षाच्या आत वय असलेल्या दक्षिण आफ्रिकेतल्या ३५ टक्के मुलींची लग्न कमी वयात झालेत.

दक्षिण आफ्रिकेनंतर दक्षिण आशियाचा नंबर लागतो. दक्षिण आशियातल्या ३० टक्के मुलींची लहान वयात लग्न झालीत अशी रिपोर्टची आकडेवारी म्हणतेय. तसंच लॅटिन अमेरिका आणि अमेरिकेच्या मध्य पूर्वेकडच्या कॅरिबियन देशांमधे २४ टक्के आणि उत्तर आफ्रिकेत १७ टक्के बालविवाह झालेत. तर पूर्व युरोप आणि मध्य आशियात हे प्रमाण १२ टक्के इतकं आहे.

मागच्या १० वर्षांमधे जगभरात बालविवाहाच्या संख्येत १५ टक्क्यांची घट झालीय. मागच्या दशकभरात जवळपास २.५ कोटी बालविवाह होण्यापासून रोखलेत. युनिसेफनं बालविवाहाच्या विरोधात जे अभियान सुरू केलं होतं त्यामुळेच हे शक्य झालंय.

खरं तर बालविवाह ही आजची समस्या नसून तो मागच्या शतकातला विषय होता, अशीच अनेकांची समजूत असते. पण जेव्हा प्रत्यक्ष ग्रामीण भागात जाऊन पाहिल्यास ही समस्या अजुनही आहे याचा प्रत्यय येईल. जग कोरोनाच्या विळख्यात सापडल्या पासून

जगातील कित्येक सामजिक समस्या या आणखीनच तीव्र होत चाललेल्या आहेत. त्यापैकीच एक समस्या म्हणजे बालविवाह. लोकसत्ता वृत्तपत्रात 11 ऑक्टोबर 2020 रोजी बालविवाहावर एक रीपोर्ट प्रसिद्ध झाला आहे, या मध्ये राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या अहवालाने समोर आलेल्या आकडेवारी वर वृत्तांकन केले आहे. त्यानुसार 2019 च्या तुलनेत 2020 साली बालविवाहाचे प्रमाण 78.3 टक्के वाढले आहे. मागच्या वर्षी प्रशासनाने 120 बालविवाह थांबवले होते, पण आता त्यांची संख्या वाढून 213 झाली आहे. हे समोर आलेले आकडे एवढे आहेत तर बाहेर न आलेल्या बालविवाहांची संख्या ही मोठी असू शकते. एकंदरीत सर्व परिस्थिती ही चिंताजनक आहे.

## **५.४ करोना काळात पुरुषांच्या तुलनेत स्त्री कामगाराच्या नोकरीत सर्वांत जास्त कपात**

### ◆स्त्रिया, त्यांचे काम आणि कोव्हिड-१९

जगभरात आरोग्यसेवा असो की सामाजिक सेवा क्षेत्र यामध्ये काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ७०% आहे. याचा अर्थ असा होतो की या विषाणूच्या उद्रेकाचा पहिला परिणाम स्त्रियांनाच भोगावा लागणार आहे. इतकेच नाही तर स्त्रियांना या आजाराचा संसर्ग होण्याची शक्यताही अधिक आहे. नॅशनल सॅम्पल सर्व्हेने भारतातील रोजगारावर एक अहवाल तयार केला आहे. त्यांच्या या अहवालानुसार आरोग्य क्षेत्रातील एकूण पात्र कर्मचाऱ्यांच्या तुलनेत पात्र स्त्री कर्मचाऱ्यांचे प्रमाण हे जवळपास निम्मे आहे. आरोग्य क्षेत्रातील वेगवेगळ्या श्रेणींचा विचार केल्यास, पात्र नर्सेस आणि सुईणी यांचेच प्रमाण ८८.९% इतके आहे. म्हणजे या क्षेत्रात तर स्त्रियांचेच वर्चस्व अधिक आहे.

जगभर या काळात घरातून काम करण्याचे धोरण (वर्क फ्रॉम होम) वाढत आहे आणि जवळपास सगळ्या शाळांना देखील सुट्ट्या दिल्या आहेत. जणू उन्हाळी सुट्ट्या आधीच सुरु झाल्यात आणि त्या लांबत चालल्यात. परंतु यामुळे घराची काळजी वाहणाऱ्या व्यक्तीवरील ताण वाढतो आहे. साधारणतः अनेक घरात अशी काळजी वाहणाऱ्या स्त्रियाच असतात. भारताच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने २०१९ मध्ये पिरीऑडीक लेबर फोर्स सर्व्हे ऑफ इंडिया (PLFS) चे सर्वेक्षण प्रसिद्ध केले होते. या सर्वेक्षणात असे आढळून आले की, भारतातील अधिकांश महिलांना फक्त

बालसंगोपन, पोषण, पूर्व-प्राथमिक शाळा आणि पाळणाघर अशा काही मोजक्याच क्षेत्रातील व्यावसायिक प्रशिक्षण मोठ्या प्रमाणात दिले जाते. या क्षेत्रातील प्रशिक्षित स्त्रियांचे प्रमाण १८% आहे तर फक्त १.२% पुरुष या क्षेत्रातील व्यावसायिक प्रशिक्षण घेतात. शाळा बंद असल्याने या क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कित्येक पटीने वाढला आहे.

याही पुढे जाऊन देशातील काही राज्यांमधून मान्यता प्राप्त सामाजिक स्वास्थ्य कार्यकर्त्या (आशा) आणि अंगणवाडी सेविकांना त्यांच्या-त्यांच्या परिसरातील कुटुंबाची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांनी घरोघरी जाऊन नागरिकांनी कोव्हिड-१९ पासून बचाव करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावयाची आहे याची माहिती द्यायची आहे. परंतु, एका वृत्तानुसार, आशा कर्मचाऱ्यांच्या संघटनेने केंद्र सरकारकडे, यासाठी अत्यावश्यक असलेली साधने पुरवण्याची मागणी केली आहे.सध्या त्यांच्याकडे अशा अत्यावश्यक सुरक्षा साधनांचा अभाव आहे. देशात सार्वजनिक आरोग्य कर्मचारी म्हणजेच आशा (ASHA) म्हणून काम करणाऱ्या दहा लाख महिला आहेत तर अंगणवाडी सेविका म्हणून काम करणाऱ्यांमध्ये १.४ दशलक्ष स्त्रिया आहेत.

भारतात अधिकांश महिला या घरात काम करणाऱ्या आहेत. तसेच स्वयंरोजगार करणाऱ्या महिलांचे प्रमाणही मोठे आहे. कोव्हिड-१९ सारख्या महामारीचा या वर्गावर काय परिणाम होतो, हे पाहणे महत्वाचे आहे. बिगर-शेती क्षेत्रात काम करणाऱ्या ३१.७% महिला या घरातून काम करतात. याच्या तुलनेत पुरुषांचे प्रमाण फक्त ११% आहे. काही लोकांसाठी घरातून काम करणे म्हणजे फक्त रोजच्या दैनंदिन नित्यक्रमातील एक बदल आहे, त्याच्या अगदी उलट घरातून काम करणे हाच यांच्यासाठी रोजचा नित्यक्रम आहे.

घरातून काम करणाऱ्या या स्त्रियां स्वयंरोजगार करतात, म्हणजेच त्यांना इतर कंपन्या जशा आपल्या कर्मचाऱ्यांना महामारीमुळे इतर फायदे देऊ शकतात तसे फायदे मिळवणे शक्य नाही. पीएलपीएस (PLFS) ने बिगर शेती क्षेत्र आणि पूरक शेती क्षेत्र (जसे की पशुपालन, मत्स्यपालन, मासेमारी आणि शेतीला पूरक ठरतील असे व्यवसाय) यातून अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांचा आकडा निश्चित करण्याचे ठरवले. त्यांच्या सर्वेक्षणानुसार, महिला कामगारांमध्ये अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या

महिलांचे प्रमाण ५४.८% आहे. म्हणजेच कोव्हिड-१९ मुळे स्त्रियांवर विचित्र परिणाम होणार आहे. कारण, एकतर या काळात त्यांचे काम सुटण्याची शक्यता अधिक आहे आणि शिवाय त्यांना कंत्राटीपद्धतीने दिल्या जाणाऱ्या पगारी रजांच्या धोरणाचा लाभ देखील मिळणार नाही.

### ◆स्त्रिया, आरोग्यसुविधा मिळण्याचा संधी आणि कोव्हिड-१९

स्त्रियांच्या महत्वाच्या गरजांना नेहमीच दुय्यम प्राधान्यक्रम मिळत असतो. अत्यावश्यक असणारी लैंगिक आणि प्रजनन आरोग्यसेवेची साधने आपत्कालीन प्रतिसादासाठी वापरली जात आहेत. मोठ्या प्रमाणात संक्रमित होणाऱ्या आजारांचा उद्रेक झाल्यास प्रजनन आणि लैंगिक आरोग्यासेवेचा अभाव वाढू शकतो. महामारीच्या काळात गर्भवती स्त्रियांमध्ये आजार बळावण्याचा आणि मृत्यूचा धोका जास्त संभवतो असे, अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. आफ्रिकेत जेंव्हा इबोलाची साथ पसरली होती, तेव्हा गर्भवती स्त्रियांवर याचे काय परिणाम होतात याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती.

इबोलाच्या संदर्भात गर्भवती स्त्रियांची काळजी कशी घ्यावी, याचे वैद्यकीय मार्गदर्शन आणि योग्य माहिती नसल्याने सुईणीं सारख्या पहिल्या फळीवर काम करणाऱ्या आरोग्य सेवकांना बराच संघर्ष करावा लागला. यात भर म्हणजे, इबोला साथीच्या काळात, गिनिया, सिएरा लिओनी आणि लाइबेरिया येथे दवाखान्यात प्रसूती होऊन जन्म देण्याचे प्रमाण ३०% नी घसरले आणि माता मृत्यूदर ७५% नी वाढला होता.

प्रसूतीकाळात घ्यावयाची काळजी आणि कौशल्यपूर्ण आणि तातडीच्या प्रसूतीसेवेचा अभाव यामुळे कोव्हिड-१९च्या काळात माता मृत्युदाराचा वाढता दर पाहता, भारतासाठी सुसज्ज राहणे अधिक आव्हानात्मक आहे. NFHS-4 च्या आकडेवारी नुसार भारतात फक्त २१% महिलांनाच प्रसूती कालीन आरोग्य सेवेचा पूर्ण लाभ मिळतो. सार्वजनिक रुग्णालयात प्रसूती झाल्यास जननी सुरक्षा योजने अंतर्गत आर्थिक लाभ मिळालेल्या मातांचे प्रमाण फक्त ३६.४% आहे. कोरोनाच्या या जागतिक महामारीच्या विरोधात सुसज्ज होत असताना, समाजातील कमकुवत घटकांसोबतच गर्भवती स्त्रियांच्या

गरजा लक्षात घेऊन त्यांची पूर्तता करणे अत्यावश्यक आहे. याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.

कोव्हिड-१९ने जगभरातील आरोग्यसेवा क्षेत्राला अक्षरश: हादरवून सोडले आहे. ज्याचे एसआरएच (SRH) वर आणि त्याच्या अधिकारावर अत्यंत भयावह परिणाम होऊ शकतात. या महामारीच्या उद्रेकामुळे जगभरातील पुरवठा साखळीत व्यत्यय निर्माण झाला आहे. याच कारणाने चीनने अनेक औषध निर्माण प्रकल्प बंद ठेवले आहेत. त्यामुळे भारतात जेनेरिक औषधे तयार करण्याऱ्या ज्या कंपन्या आहेत त्यांना अशी औषधे बनवण्यास विलंब होत आहे. यामुळे गर्भनिरोधक गोळया, लैंगिक संबंधातून निर्माण होणाऱ्या आजारात गरजेची असलेली अँटी-बायोटिक्स आणि एड्स/एचआयव्ही बाधित रुग्णांना आवश्यक असणारे अँटीरीट्रोव्हायरल्स अशा औषधांचा तुटवडा भासू शकतो.

या औषधांच्या तुटवडा निर्माण झाल्यास त्याच्या किमतींमध्ये वाढ होऊ शकते. त्यामुळे ज्या गरीब स्त्रियांना गर्भपात करायचा असेल किंवा या काळात विषाणूचा संसर्ग होऊ नये म्हणून काळजी घ्यायची असेल त्यांच्यावर मोठा परिणाम होऊ शकतो. ब्राझीलमध्ये जेंव्हा झिका व्हायरसची साथ पसरली होती तेंव्हा अबॉर्शन करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोळया आणि गर्भनिरोधक औषधांच्या तुटवडा निर्माण झाला होता. याचा परिणाम म्हणून समाजातील सामाजिक-सांस्कृतिक दृष्ट्या खालच्या स्तरावर असणाऱ्या स्त्रियांनी जन्म दिलेल्या नवजात बालकांमध्ये झिका संसर्गामुळे अपंगत्व निर्माण झाले.

### ◆स्त्रिया, शिक्षण, प्रतिनिधित्व आणि कोव्हिड-१९

युनेस्को (UNESCO) च्या अंदाजानुसार जगभरातील १०७ देशांनी त्यांच्यासंपूर्ण देशात शिक्षण संस्थांचे कामकाज बंद ठेवले आहे.जगभरातील ८६१.७ दशलक्ष विद्यार्थ्यांना आणि तरुणांना याचे परिणाम भोगावे लागत आहेत. कोव्हिड-१९ च्या प्रसारामुळे कदाचित पुढे शिक्षणातील लिंगभेद अधिक वाढू शकतो. शाळा बंद असल्याचे सर्वात तीव्र दूष्परिणाम हे मुलींच्या शिक्षणा संदर्भाने दिसून येतात. उदाहरणार्थ-

सिएरा लिओनने हे निदर्शनास आणून दिले की, इबोलाच्या महामारीनंतर मुलींच्या शाळागळतीचे प्रमाण वाढले होते.

आरोग्य क्षेत्रात पहिल्या आघाडीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये स्त्रियांची संख्या मोठी आहे. परंतु, जागतिक आरोग्य सुरक्षा, निगराणी ठेवणे, शोधणे आणि प्रतिबंध घालणे या यंत्रणेत त्यांचा सहभाग कमी आहे. उदाहरणार्थ – जागतिक आरोग्य संघटना-चीन यांच्या कोव्हिड-१९च्या संयुक्त मिशनमध्ये एकूण २५ सदस्य आहेत, ज्यामध्ये फक्त तीन स्त्रिया आहेत. यावरून जागतिक स्तरावर कोव्हिड-१९ बाबतच्या धोरणांमध्ये स्त्रियांचे अपुरे प्रतिनिधित्व स्पष्ट दिसून येते. भारतात कोव्हिड-१९ इकोनॉमिक रिस्पॉन्स टास्क फोर्सचे नेतृत्व एक स्त्रिच्या हाती आहे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन याचे नेतृत्व करत आहेत. परंतु, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने गठीत केलेल्या कोव्हिड-१९ च्या सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांच्या २१ सदस्यांच्या समितीमध्ये फक्त दोन स्त्री सदस्यांचा समावेश आहे.

महामारीला तोंड देण्यास सज्ज होताना त्यामध्ये स्त्रियांच्या ज्ञानाचा आणि त्यांच्या अभिव्यक्तीचा समावेश केल्यास ही तयारी अधिक सामर्थ्यशाली बनू शकते आणि या समस्येकडे एका उत्तम-लिंगभाव दृष्टीकोनातून पहिले जाऊ शकते. कोव्हिड-१९ च्या प्रसाराला मिळणाऱ्या प्रतिक्रियेमध्ये असुरक्षित नागरिक आणि स्त्रियांवर याचा जो वेगवेगळा परिणाम होणार आहे त्याची दखल घेणे गरजेचे आहे. म्हणूनजागतिक समुदायाने आपापले अनुभव परस्परांशी वाटून घ्यावेत, उत्तम पद्धती शिकून घ्याव्यात आणि कोणत्याही पद्धतीचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होणार नाहीत याची खातरजमा करून घ्यावी.

## ◆शेती क्षेत्र आणि स्त्रिया

एका पर्यावरणासंदर्भात काम करणाऱ्या संस्थेने शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने भारतातील महिला शेतकऱ्यांच्या स्थितीचा शोध घेतला. आकडेवारीच्या आधारे केलेल्या या तपासणीत महिला शेतकऱ्यांविषयी अनेक धक्कादायक माहिती समोर आली आहे. देशात महिला शेतकऱ्यांच्या संख्येत सातत्याने घट होत आहे, तर महिला

मजुरांची संख्या वाढत आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारतात ९.५९ कोटी शेतकरी आहेत. यामध्ये ७.३९ कोटी पुरुष आणि २.२८ कोटी महिला आहेत. त्याचबरोबर देशात एकूण ८.६१ कोटी कामगार शेतात काम करतात. त्यामध्ये ५.५२ कोटी पुरुष आणि ३.०९ कोटी महिला आहेत. या व्यतिरिक्त एकूण ८०.९५ लाख लोक फळबागा, पशुसंवर्धन, मत्स्यपालनासारख्या व्यवसायाशी संबंधित आहेत. यात २५ लाख महिलांचा समावेश आहे.

जर आपण शेतीतील महिला मजुरांची संख्या पाहिली तर खूप धक्कादायक माहिती समोर येते. यामध्ये ५ ते ९ वर्षे वयाच्या मुलीदेखील शेतमजूर म्हणून काम करतात. २०११च्या जनगणनेनुसार देशात १,२०,७०१ मुली शेतमजूर आहेत. संख्येच्या बाबतीत ४० ते ४९ वयोगटातील बहुतेक स्त्रिया शेतात शेतमजूर म्हणून काम करतात. त्यांची संख्या ६२.६४ लाख आहे. यानंतर ३५ ते ३९ वर्षे वयोगटातील ४०.८९ लाख महिला, तर २५ ते २९ वयोगटातील ३९.५४ लाख, ३० ते ३४ वयोगटातील ३८.६७ लाख, ५० ते ५९ वयोगटातील ३७.१८ लाख महिला शेतमजूर आहेत. यानंतर २० ते २४ वर्षातील ३४.६२ लाख, ६० ते ६९  वर्षे वयोगटातील २२.३१ लाख, १५ ते १९ वर्षे वयोगटातील २०.३१ लाख ते ७० ते ७९ वर्षे वयोगटातील, ४.९५ लाख, १० ते १४ वयोगटातील आणि ४.५५ लाख व ८० वर्षांवरील शेतमजूर महिलांची संख्या १.२१ एवढी आहे. ही महिला शेतमजुरांची आकडेवारी धक्कादायक आहे. तरीही आपण 'बेटी बचाओ बेटी पढाओ' वा 'महिला सक्षमीकरणा'च्या बाता मारतो…

२००१च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार देशात १०.३६ कोटी शेतकरी होते. त्यापैकी ७.८२ कोटी पुरुष आणि २.५३ कोटी महिला होत्या. त्याच वेळी शेतमजुरांची संख्या ६३४ कोटी होती. यात ४.११ कोटी पुरुष आणि २.२३ कोटी महिलांचा सहभाग होता. आकडेवारीची तुलना केल्यास २००१ ते २०११ या कालावधीत एकूण शेतमजुरांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून दोन जनगणनेदरम्यान देशात २,२६, ७१,५९२ इतकी शेतमजुरांची संख्या वाढली आहे.

महिला शेतमजुरांविषयी असे दिसून आले की, २००१मध्ये हे प्रमाण २.२३ कोटी होते, ते २०११मध्ये वाढून ३.०९ कोटी झाले. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर २००१ ते २०११ या कालावधीत शेतमजूर महिलांची संख्या ८५.३४ लाखांनी वाढली आहे.

२०११च्या जनगणना आकडेवारीनुसार २००१ ते २०११ या कालावधीत महिला शेतकऱ्यांची संख्या कमी झाली आहे आणि महिला शेतमजुरांची संख्या वाढली आहे. २००१मध्ये महिला शेतकऱ्यांची संख्या २.३३ कोटी होती, तर २०११मध्ये ती घटून ती कमी २.२८ कोटी झाली. म्हणजे सुमारे २५ लाख महिला शेतकऱ्यांनी शेती सोडली आहे. यापैकी एकतर या महिला शेतात मजूर झाल्या किंवा काही अन्य प्रकारचे काम करण्यास गेल्या. याशिवाय देशातील एकूण शेतकऱ्यांची संख्याही कमी होत आहे. २००१ ते २०११ या काळात भारतात ७६.८३ लाख शेतकरी कमी झाले आहेत.

या १० वर्षात ५१.९१ लाख पुरुष शेतकरी कमी झाले आहेत आणि १.४१ कोटी पुरुष शेतमजुरांची संख्या वाढली आहे. तज्ज्ञांच्या मते, शेतकऱ्यांची घटती संख्या आणि शेतमजुरांची वाढती संख्या यांच्यात खूप जवळचे नाते आहे. शेतीची लागवडी खालील जमीन कमी होत आहे. भारतात एकूण १,४५७ लाख शेतजमीन मालकी आहे. कृषी स्वामित्व कायद्यानुसार २०१५-१६च्या जनगणनेनुसार १३.९६ टक्के महिलांच्या नावे शेती जमिनी आहेत. २०१०-११मध्ये हे प्रमाण १२.७९ टक्के होते. एकूण शेतजमिनीपैकी ११.७२ महिला शेतकरी हे प्रत्यक्ष शेतीत काम करत.

भारतात सरासरी लहान, मध्यम आणि मोठ्या महिला शेतकऱ्यांची एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. महिलांना एक हेक्टरपेक्षा कमी शेतीवरील मालकी हक्क (शेती धारण) आहेत. देशातील केवळ १.५८ कोटी हेक्टर शेतजमीन महिला शेतकऱ्यांच्या मालकीची आहे. ग्रामीण भारतातील ७३ टक्क्यांपेक्षा जास्त महिला कामगार शेतीत काम करतात. केवळ ५.४३ लाख महिला शेतकऱ्यांच्या ७.५ हेक्टर ते १० हेक्टर क्षेत्राच्या शेतजमिनी आहेत.

अनुसूचित जातीच्या महिला शेतकऱ्यांकडे सरासरी ०.६८ हेक्टर शेतजमीन आहे. त्याचबरोबर अनुसूचित जमातीच्या महिला शेतकऱ्यांची परिस्थिती थोडी ठीक आहे. एसटी महिलांकडे सरासरी १.२३ हेक्टर जमीन आहे. कृषी जनगणना २०१५-१६ नुसार देशात ३०.९९ लाख महिला शेतकरी असून त्यांच्याकडे एक ते दोन हेक्टर शेतजमीन आहे. हिंदू वारसा हक्क विधेयक १९५६नुसार एखाद्या माणसाच्या मृत्यूनंतर त्याची जमीन विधवा, मूल आणि मृत व्यक्तीच्या आईमध्ये समान विभागली जाईल अशी तरतूद आहे. त्याच प्रमाणे हा समान कायदा शीख, बौद्ध आणि जैन धर्मासाठीही लागू आहे. त्याच वेळी

मुस्लीम वैयक्तिक कायद्यानुसार विधवा महिलेचा एक चतुर्थांश मालमत्तेत वाटाधारक म्हणून विचार केला गेला आहे, परंतु सामाजिक प्रथांमुळे तो कमी होत आहे. मालमत्तेमध्ये महिलांचा समान वाटा हवा, पण भारतीय समाज आणि त्यांना या अधिकारापासून वंचित ठेवत आहे.

'ऑक्सफॅम इंडिया'च्या सर्वेक्षणानुसार (२०१८ सन ऑफ द सॉईल) केवळ ८ टक्के महिलांना शेतीच्या उत्पन्नावर हक्क आहे. याचा अर्थ असा की, शेतीतून मिळणाऱ्या ९२ टक्के उत्पन्नावर पुरुषांचा, तर ७३ टक्के उत्पन्नावर महिलांचा हक्क आहे.

सरकारी नोंदीनुसार महिलांना शेतकरी म्हणून संबोधले जात नाही. फक्त १३ टक्के महिलांच्या नावावर शेतजमीन आहे. आणि म्हणूनच ८७ टक्के महिलांना शासनाकडून शेतीवरील कर्ज, अनुदान यांचे लाभ मिळू शकत नाहीत. ही समस्या लक्षात घेऊन २०११मध्ये राज्यसभेचे नामांकित सदस्य एम.एस. स्वामीनाथन (२००७-१३) यांनी संसदेत 'महिला शेतकरी हक्क विधेयक २०११' आणले. ११ मे २०१२ रोजी राज्यसभेत हे विधेयक मांडण्यात आले होते, परंतु एप्रिल २०१३मध्ये ते रद्द केले गेले. या विधेयकात महिला शेतकऱ्यांचे हक्क आणि जबाबदारी ठरवण्यावर चर्चा झाली. महिला शेतकऱ्यांच्या परिभाषा यासारख्या गोष्टीही या विधेयकात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. विधेयकाच्या कलम २एफनुसार ज्या स्त्रिया खेड्यात राहतात आणि प्रामुख्याने शेतीची कामे करतात - जरी काही वेळा त्या बिगरशेती कामे करतात - त्या सर्व महिला शेतकरी आहेत. त्याचबरोबर महिला शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देण्याची आणि ही प्रमाणपत्रे पुरावा म्हणून मान्यता देण्याचीही बाब होती.

त्यानुसार ग्रामसभेच्या मंजुरीनंतर ग्रामपंचायतीने महिला शेतीशी जोडलेल्या असल्याचे सिद्ध करण्यासाठी महिला शेतकऱ्यांना अशी प्रमाणपत्रे द्यावीत. नोव्हेंबर २०१८मध्ये सुमारे १० हजार महिला शेतकऱ्यांनी 'महिला किसान हक्क विधेयक' आणण्यासाठी 'दिल्ली चलो'ची हाक दिली होती, परंतु सरकारने त्यांच्या मागण्यांकडे विशेष लक्ष दिले नाही. अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीतर्फे 'किसान मुक्ती मार्च' आयोजित करण्यात आला होता. २००हून अधिक शेतकरी संघटनांनी त्यात भाग घेतला. महिला शेतकऱ्यांच्या या मोर्चाच्या मुख्य मागण्या जवळपास सारख्याच होत्या, ज्याचा स्वामीनाथन यांनी आपल्या विधेयकात उल्लेख केला होता. २०१८मध्ये शेतीतील

लिंग-आधारित भेदभाव दूर करण्यासाठी 'ग्रामसभेपासून विधानसभा' या नावाने मोर्चा काढण्यात आला होता. मार्च २००६ मध्ये गोरखपूर पर्यावरण कृती समूहाने (जीईएजी) राबवलेल्या 'आरो मोहिमे'चा हा भाग होता. या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शेतीत खरोखरच हातभार लावणाऱ्यांना सक्षम बनवणे हे होते.

एका अंदाजानुसार शेतीमध्ये काम करणाऱ्या महिलांमध्ये ५२ ते ७५ टक्के महिला अशिक्षित आणि अल्पशिक्षित आहेत. त्यांच्यात जागरूकता नाही. म्हणून बहुतेक स्त्रिया शेतात कोणताही मोबदला न घेता काम करतात. शेतीत पुरुष शेतकऱ्यांची मजुरी महिला कामगारांच्या चतुर्थांशापेक्षाही अधिक आहे. जगातील एकूण शेती क्षेत्रापैकी ५० टक्के शेतीक्षेत्रात ग्रामीण महिलांचा सहभाग आहे. महिलांची शेतीतील भूमिका पाहता दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी 'महिला-किसान दिन' साजरा केला जातो. अन्न व कृषी संघटनेच्या मते भारतीय शेतीत महिलांचा वाटा सुमारे ३२ टक्के आहे. कृषी रोजगारात ४८ टक्के महिलांचा सहभाग आहे, तर ७.५ कोटी महिला दुग्ध उत्पादन आणि पशुधन व्यवस्थापनात कार्यरत आहेत.

एफएओच्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील महिला दरवर्षी हेक्टरी ३,४८५ तास काम करतात. त्या तुलनेत पुरुष केवळ १,२१२ तास काम करतात. नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशन (एनएसएसओ)च्या आकडेवारीनुसार २३ राज्यात कृषी, फळबाग, वनीकरण आणि मत्स्यव्यवसायात ५० टक्के ग्रामीण भागातील महिला काम करतात. बंगाल, तामिळनाडू, पंजाब आणि केरळ या राज्यांमध्ये हे प्रमाण ५० टक्के आहे, तर बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये महिलांचे प्रमाण ७० टक्क्यांपर्यंत आहे. हेच प्रमाण पूर्वोत्तर राज्यांमध्ये १० टक्के आहे.

## ५.५ स्थलांतरित स्त्रिया

**◆करोना काळातील स्त्रियांचे स्थलांतर**

करोना महामारी गरिबांच्या, त्यातही महिलांच्या पिळवणुकीत दिवसेंदिवस अधिकाधिक भर टाकत आहे...

रोगापेक्षा इलाज भयंकर' या स्वरूपाचा २१ दिवसांचा कडक लॉकडाऊन २४ मार्च २०२०च्या संध्याकाळी आठ वाजता घोषित झाला आणि अवघ्या चार तासांतच रात्री १२ वाजता हा निर्णय देशभर लागू झाला. १३० कोटी लोकसंख्या असलेला हा देश रातोरात पूर्णपणे ठप्प झाला. नियोजनाशिवाय रातोरात लागू केलेली नोटबंदी आणि त्यानंतर सामान्य नागरिकांची झालेली जीवघेणी परवड हा अनुभव गाठीशी असतानादेखील तितक्याच निष्काळजीपणे पुन्हा एकदा तशीच घोडचूक केली गेली आणि सर्वसामान्य जनतेला पुन्हा एकदा अनागोंदीच्या खाईत ढकलून दिलं गेलं.

कुठलाही मागचा-पुढचा विचार न करता घेतला गेलेला हा संपूर्ण लॉकडाऊनचा निर्णय सर्वच जनतेच्या तोंडचं पाणी पळवणारा होता, मात्र याचा सर्वांत जास्त फटका बसला तो हातावर पोट असणाऱ्या शहरातील स्थलांतरित मजुराला. कुणीतरी पायाखालची जमीन ओढून घ्यावी, अशा असहाय परिस्थितीत हा वर्ग ढकलला गेला. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात याठिकाणी बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान या राज्यांतून मोठ्या संख्येनं स्थलांतरित मजूर रोजगाराच्या शोधात येत असतात. या स्थलांतरित मजुरांच्या श्रमणाऱ्या हातातील काम एकाएकी बंद पडल्यावर त्या शहरांना त्या श्रमिक मजुरांशी काही घेणं-देणं राहिलं नाही. काम नाही तर पैसे नाही, मग घरभाडं कुठून भरणार, खाणार काय, या विवंचनेनं ग्रासलेल्या मजुरांपुढे पुन्हा आपल्या मूळ गावी जाण्यावाचून कुठलंही गत्यंतर राहिलं नाही. मात्र तेही आता सोपं राहिलं नव्हतं. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प होती. मग त्यानंतर सुरू झाली त्यांची जीवघेणी फरफट.

रणरणत्या उन्हात, तापलेल्या रस्त्यांवरून सामानाच्या पिशव्या, लहान लहान लेकरं अंगा-खांद्यावर घेऊन उपाशी-तापाशी, तहानेनं व्याकूळ स्थलांतरित मजुरांचे निस्तेज चेहरे शेकडो किमीचं अंतर पायीच चालत निघालेले आपल्या देशानेच नाही तर सगळ्या जगाने पाहिले. काहींनी मिळेल त्या ट्रक, टेम्पोत, रिक्षात दाटीवाटीने बसून तर काहींनी अक्षरशः दुधाच्या टँकमध्ये, सायकलवर जमेल तसं आपलं गाव जवळ करण्याचा प्रयत्न केला.

हातावर पोट भरणारा, राबणारा कामगार, श्रमणारा हात, रणरणत्या भर उन्हात रस्त्याने पायी चालत गेलेला मजूर हे वर्णन ऐकलं की, स्वाभिकपणे आपल्या जाणिवे-नेणिवेत एका पुरुष मजुराचं चित्र उभं राहतं. आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, त्या जीवघेण्या उलट्या स्थलांतरामध्ये महिलादेखील मोठ्या संख्येनं होत्या. मात्र तरीही त्यांच्याकडे नकळतपणे दुय्यम म्हणूनच पाहिलं गेलं. कारण तशा जाणिवा-नेणिवा घडवण्यात इथली सामाजिक संरचना कारणीभूत आहे.

रोजगाराच्या शोधात मोठ्या प्रमाणात महिलांचं देशातील अविकसित भागातून विकसित भागात, तसेच राज्यांतर्गत खेड्यांतून शहरात स्थलांतर होत असतं. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांपेक्षा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची संख्या प्रचंड मोठी आहे. मागील वर्षी मार्च महिन्यात 'डेलॉइट' (Deloitte) या संस्थेने 'Empowering Women and Girls in India' for the fourth Industrial Revolution' या नावानं प्रकाशित केलेल्या अहवालानुसार, भारतात तब्बल ९५ टक्के (१९.५ कोटी) महिला या असंघटित क्षेत्रात काम करतात. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मिळणाऱ्या थोड्याफार सोयीसुविधादेखील असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना मिळत नाहीत. ना निश्चित रोजगाराची हमी असते, ना कामाचा पुरेसा मोबदला. कामाच्या ठिकाणच्या असुविधा, लैंगिक शोषण, पुरुषांच्या तुलनेत मिळणारं कमी वेतन या सर्व गोष्टी तिच्या शोषणात अधिक भर टाकत असतात.

या असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांमध्ये स्थलांतरित मजूर महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश होतो आणि त्या प्रामुख्याने दलित, आदिवासी, कमी उत्पन्न गटातील गरीब महिला असतात. बिगारी काम करणाऱ्या, धुणीभांडी करणाऱ्या महिला, हॉस्पिटल्स, मॉल्स या ठिकाणी सफाई करणाऱ्या, मदतनीस, केअरटेकर म्हणून अशा अनेकविध ठिकाणी त्या काम करत असतात. शहरात आल्यावर फुटपाथ, झोपडपट्टी, बांधकाम साईटवर पत्र्याच्या शेडमध्ये संसार थाटून, मुलंबाळं सांभाळून रोजंदारीवर कष्टाची कामं अशी दुहेरी जबाबदारी त्या पार पाडत असतात. मात्र तरीही पुरुषांचं वर्चस्व असणाऱ्या या समाजात तिला नेहमी दुय्यम स्थानी, केवळ पुरुषाची सहायक म्हणून पाहिलं जातं. तिच्याकडे एक स्वतंत्र कामगार किंवा मजूर या चौकटीत पाहून तिची दखल घेतली जात नाही. त्यामुळे तिच्या दुहेरी श्रमाकडे आणि एक कामगार म्हणून असणाऱ्या तिच्या

अस्तित्वाकडे केवळ जाणीवपूर्वक पाहणंच गरजेचं नाही, तर त्यांची ठळक दखल घेणंदेखील तितकंच आवश्यक आहे.

या करोना काळातील उलट्या स्थलांतरादरम्यान सामाजिक दुय्यमत्वाबरोबरच, तिची नैसर्गिक शारीरिक रचनादेखील तिच्या दुहेरी त्रासास कारणीभूत ठरली आहे. रणरणत्या उन्हातला शेकडो किमीचा पायी प्रवास काहींसाठी काही आठवड्यांचा होता, तर काहींसाठी जवळपास महिन्याचा. या प्रवासात कित्येकींना मासिक पाळी आली असणार, त्या अवस्थेत पायी चालत राहणं, शारीरिक स्वच्छतेसाठी पाण्याची आणि आडोशाची सोय नसणं; अशा वेळी त्यांच्या झालेल्या गैरसोयीची आणि त्रासाची तर कल्पनाही करवत नाही. तान्ह्या लेकरांना घेऊन प्रवास करणाऱ्या आयांना उपाशीपोटी असताना लेकरांना स्तनपान करण्याची वेळ आली असणार. कित्येकींनी गरोदर अवस्थेत प्रवास केला, तर काहींनी वाटेतच बाळांना जन्म दिला.

एकीने गरोदर अवस्थेत शेकडो किमी प्रवास करून वाटेत बाळाला जन्म दिला आणि लगेच त्याच अवस्थेत आणखी शे-दीडशे किमी प्रवास केल्यावर तिचा मृत्यू झाला होता. तर एकीचा गुजरातहून बिहारला निघालेल्या श्रमिक ट्रेनमधून उपाशीपोटी काही दिवस प्रवास केल्यावर वाटेतच प्लॅटफॉर्मवर मृत्यू झाला, तेव्हा तिच्या मृत शरीराशी खेळणाऱ्या आणि तिला उठवू पाहणाऱ्या तिच्या तान्ह्या लेकराचा व्हिडिओ सगळ्या देशाने पाहिला होता आणि एक-दोन दिवस हळहळसुद्धा व्यक्त केली होती. तर दाटीवाटीने रिक्षात बसून मूळगावी परतत असताना अपघातात जखमी झालेल्या एका महिलेचा हॉस्पिटलमध्ये वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाला होता.

ही काही मोजकी उदाहरणं आहेत. अशा कित्येक स्थलांतरित मजूर महिला आणि पुरुष यांनी या जीवघेण्या आणि बळजबरीनं लादलेल्या उलट्या स्थलांतरामध्ये आपला जीव गमावला आहे. ते इथल्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व्यवस्थेच्या क्रूरतेचे नाहक बळी ठरले आहेत, पण सरकारने मात्र आता हात वर केले आहेत, आणि स्थलांतरित मजुरांच्या मृत्यूची कुठलीही आकडेवारी उपलब्ध नसल्याचे असंवेदनशीलपणे जाहीर केलं आहे. म्हणजे आता 'मृतांची संख्या' अशा शाब्दिक स्वरूपातदेखील त्यांचं अस्तित्व शिल्लक राहणार नाही.  ही व्यवस्था या मजुरांना अक्षरशः 'वापरा आणि फेकून द्या' या सूत्रानं वागवत आहे. या श्रमिकांच्या जीवांची यापेक्षा अधिक उपेक्षा काय असणार आहे?

भारतातील स्थलांतरित मजूर महिला रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात प्रामुख्यानं बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान यांसारख्या अविकसित राज्यांतून स्थलांतरित होत असतात. या राज्यांमध्ये स्त्रियांवरील पितृसत्ताक बंधनं अधिक जाचक आहेत. त्यामुळे अशा राज्यांतून जेव्हा विकसित राज्यांतील शहरांत त्या स्थलांतरित होतात, त्या वेळी त्यांना रोजगारामुळे तर काही प्रमाणात आर्थिक स्थिरता तर मिळतेच, पण त्याचबरोबर शहरातला मोकळेपणा त्यांच्यात आत्मविश्वासदेखील निर्माण करत असतो. गावाकडच्या एकत्र कुटुंब पद्धतीतून शहरातील एकल कुटूंब पद्धतीत होणारं परिवर्तन त्यांना अधिक स्वातंत्र्य देत असतं. मात्र करोना महामारीपाठोपाठ आलेल्या अनियोजित लॉकडाऊनमुळे त्यांना शहरं सोडण्यास आणि मूळ गावी परतण्यास मजबूर केले. उलट्या स्थलांतराचे अग्निदिव्य पार करून गावी पोहचलेल्या या मजूर महिलांना आता नवीन त्रासाला सामोरं जावं लागणार होतं.

शहरांनी वाऱ्यावर सोडल्यावर गावची वाट धरणाऱ्या या महिलांसाठी गावी परतणं म्हणजे पुन्हा तिथल्या जाचक पितृसत्ताक ढाच्यात परतण्यासारखं होतं. शहरातील रोजगार, एकल कुटुबांत मिळणारं निर्णय स्वातंत्र्य किंवा निर्णय प्रक्रियेतील सहभाग, आर्थिक स्वातंत्र्य या सर्व गोष्टी गायब होऊन आता पुन्हा एकदा तोंडावर पदर घेऊन स्वयंपाकघरात स्वतःला डांबून घेणं आणि एकत्र कुटुंबात रांधा, वाढा, उष्टी काढा या मर्यादेत अडकून जाणं...

करोना महामारी दिवसेंदिवस भयानक रूप घेत असताना पुरुष मजुराच्या तुलनेत महिला मजुरांसाठी शहरात पुन्हा परतणं आता तितकंसं सोपं राहिलेलं नाही. तिला मुलाबाळांना घेऊन गावी राहणं भाग आहे. त्यामुळे आता गावाकडे आर्थिक परावलंबित्वाबरोबर येणारा अपमान आणि एकत्र कुटुंब पद्धतीतील पितृसत्ताक जाच सहन केल्याशिवाय भाग नाही अशी परिस्थिती आहे. तसंच गावाकडच्या पाण्याच्या, आरोग्याच्या, शौचालयाच्या असुविधा देखील तिच्या शोषणात भरच टाकणाऱ्या आहेत.

'Scroll.in' या वेबसाईटवर प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार, भारतात सुमारे ६० कोटी जनता पाणी टंचाईला सामोरी जात असते. उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, प. बंगाल, मध्य प्रदेश यांसारखी दाट लोकसंख्येच्या राज्यांत प्रामुख्याने पिण्याची पाण्याची टंचाई, पाणी मिळवण्यासाठी करावी लागणारी वणवण, त्यामुळे स्वच्छतेवर होणारे परिणाम हे करोनाच्या काळात ठळकपणे समोर आले आहेत.

या अहवालामध्ये नोंदवल्यानुसार, स्वच्छ पाण्याच्या पुरेशा पुरवठ्याअभावी ९.४ कोटी जनतेला करोना संक्रमणाचा अधिक धोका आहे. भारतात कुटुंबासाठी लागणारे पाणी मिळवणे आणि त्याची साठवण करणे ही जबाबदारी प्रामुख्याने महिलांवरच सोपवली जाते. या महामारीच्या काळात सतत स्वच्छता करणं भाग असल्यामुळे महिलांवरील स्वच्छ पाणी मिळवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षात अधिक भर पडली आहे.

स्त्रियांसमोरील आणखी एका समस्येची भर पडलीय, ती म्हणजे मुलींचे कमी वयात केले जाणारे बालविवाह. महामारीच्या या काळात या कमी खर्चात लग्न उरकून टाकणं काही प्रमाणात शक्य होत असल्यामुळे मुलींच्या लग्नाचा भार कमी व्हावा, म्हणून तिचा कमी वयात, तसेच काही ठिकाणी अगदी बालविवाहदेखील उरकून टाकत असल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. पुरोगामी म्हणवला जाणारा महाराष्ट्रदेखील यात मागे नाही. अशा प्रकारे ही करोना महामारी गरिबांच्या, त्यातही प्रामुख्याने महिलांच्या पिळवणुकीत दिवसेंदिवस अधिकाधिक भर टाकत आहे.

करोनामुळे झालेल्या सामाजिक आणि आर्थिक परिणामासंदर्भात ‘यूएन महिला आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम’ने एक अहवाल सादर केला आहे. त्यानुसार या महामारीमुळे जगाची आर्थिक, सामाजिक स्थिती अधिकाधिक दयनीय स्थितीत पोहचणार असण्याची शक्यता वर्तवली आहे.

त्यातही ही महामारी प्रामुख्याने महिलांवर अधिक परिणाम करेल असं या अहवालात नोंदवलं आहे. करोनापूर्वी केल्या गेलेल्या एका दुसऱ्या अहवालानुसार २०१९-२१ याकाळात महिलांमधील गरिबीचा दर २.७ टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता वर्तवली होती. मात्र या वैश्विक महामारीच्या दरम्यान आलेल्या या नवीन अहवालानुसार महिलांच्या गरिबीमध्ये तब्बल ९.१ टक्के वाढ झाली आहे. या जागतिक महामारी २०२१पर्यंत जगभरातील गरिबांची संख्या ४३.५० कोटी होईल. त्यातही ९.६ कोटी लोक अत्याधिक गरीब होतील म्हणजेच दारिद्र्यरेषेच्या खाली जातील आणि त्यात ४.७ कोटी महिला आणि मुली असतील.

भारताचा विचार केला तर या महामारीची सर्वाधिक किंमत ही स्थलांतरित मजूरच चुकवत आहेत. त्यातही स्थलांतरित मजूर महिलांचा विचार केला, तर सर्वच स्तरावर

त्यांच्यासाठी हा संघर्ष दुप्पट असणार आहे. आर्थिक, सामाजिक समानतेसाठी त्यांनी आजवर केलेल्या संघर्षाला पुन्हा एकदा मागे घेऊन जाण्यास ही करोना महामारीच केवळ जबाबदार नाही, तर राजकीय, सामाजिक, आर्थिक स्तरावरील त्यांच्याप्रती असणारी उदासीनतादेखील तितकीच जबाबदार आहे.

## **५.६ निष्कर्ष**

एकबाजूला शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरनाचा आभास निर्माण केला जात आहे तर त्याचवेळी दुसऱ्या बाजूला मुलींच्या शिक्षणाचा अवकाश संकुचित होताना दिसतो आहे.वरील अनेक अडथळयांचा कचाट्यामध्ये स्त्रीशिक्षण अडकलेले दिसते या परिस्थितीत सर्वांगीण बदल होणे आवश्यक आहे.परंतु ,अशा प्रतिकूल परिस्थितीत संघर्षाच्या वाटेनेच स्त्री शिक्षणासाठी नव्या वाटा धुंडाळायला लागणार आहेत.

समाजात स्त्री शिक्षणाप्रती असणारी उदासीन मानसिकता दूर करण्यासाठी विविध माध्यमांच्या आधारे स्त्रीशिक्षणाप्रती लोकांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे.क्युबा श्रीलंका यांसारख्या लहान लहान देशांच्या तुलनेत भारताचा एकूण शिक्षणक्षेत्रातील खर्च अत्यल्प आहे.

मुलींची शाळेतून मोठ्याप्रमाणात गळती होण्याचे कारण असलेल्या लहान मुलांच्या संगोपनासाठी सरकारने पाळणाघर ,बालवाडी, अंगणवाडी शाळा मोठया प्रमाणात सुरू कराव्यात .वरील सर्व बाजूंचा विचार केला असता स्त्रीशिक्षणाकडे सुटा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही.स्त्रीशिक्षणाच्या दुरावस्थेमागे अनेक घटक कारणीभूत आहेत.त्यात जात पितृसत्ता ब्राम्हणी सांस्कृतिक अधिसत्ता ,गरिबी ,रोजगाराचा अभाव ,शिक्षणाचे खाजगीकरण ,शिक्षणाच्या अपुऱ्या सुविधा हुंडाप्रथा आदींचा समावेश होतो.या सर्व बाबींचा विचार करून व्यापक उपाययोजना केल्या तरच वर्षानुवर्षापासून जेरबंद झालेल्या स्त्रीशिक्षणाच्या वाटा मुक्त होऊ शकतात.

## ५.७ संदर्भसूची


१) www.TheWireMarathi.com

www.aksharnama.com

https://www.asercentre.org › ...

ASER Reports - ASER Centre

२) लोकसत्ता पेपर 11 ऑक्टोबर 2020

www.thewire

३) www.orf.org

https://www.cmie.com

https://www.oxfamindia.org

Oxfam India | NGO Working for Child Education, Inequality, Women ...

४)https://www2.deloitte.com/content/dam/Deloitte/in/Documents/about-deloitte/UNGCNI_black_final%20v6%20web%20high%20res.pdf

https://scroll.in/article/964427/94-million-indians-are-at-greater-risk-from-coronavirus-because-of-lack-of-access-to-clean-water

https://www.unwomen.org/en/digital-library/publications/2020/09/gender-equality-in-the-wake-of-covid-19